राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक निर्णय अधिकारी व इतर अधिकारी यांच्यासाठी सर्वसाधारण सूचना व माहितीपुस्तिका

(महानगरपालिका निवडणुकांकरीता)

जानेवारी, २०१७

पहिला मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई:- ४०० ०३२.

A

अनुक्रमणिका

अ.क्र.	विषय	आदेश क्रमांक	दिनांक	पृष्ठ क्रमांक
	प्रकरण १ -मतदार यादी तयार करणे व मतदान केंद्र निश्चिती			१
१	मतदार यादी अधिप्रमाणित करणे व ती सुरक्षित ठेवणे संदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश	SEC/1096/CR-6/96/D-3	31.01.1996	५
२	मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यामधील दुरुस्त्याबाबत	एसईसी/जीएन-१०९६/ सीआर.१७/का.३	05.11.1996	७
३	मतदार यादी मधील सुधारणा नामनिर्देशनाच्या शेवटच्या तारखेपर्यंतच करता येतील याबाबतचे आदेश	एसईसी/एमसी-२००२/ प्र.क्र.१/का.१०	02.01.2002	९
४	मतदार नोंदणी अधिकारी यांनी अद्ययावत यादी पुरविणेबाबत मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिलेल्या सूचना दि.०८.१२.२००४	रानिआ/मनपा/२००४/प्र.क्र.३३/का.५	23.12.2004	११
५	मतदार यादीतील दुबार नावाबाबत करावयाची कार्यवाही	रानिआ/मनपा२००७/प्र.क्र.६/का.५	24.04.2007	१५
६	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीतील मयत अथवा स्थांनातरीत मतदारांबाबत करावयाची कार्यवाही	रानिआ/मनपा२०१०/प्र.क्र.४/का.५	11.10.2010 07.02.2012	१७-१९
७	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी वापरावयाच्या मतदार यादीबाबत	रानिआ २०१५/ प्र.क्र.३/ प्रकल्प कक्ष	17.04.2015	२१
८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका - मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र	रानिआ २०१५/ प्र.क्र.९/ प्रकल्प कक्ष क्र.रानिआ/मनपा२०१६/ प्र.क्र. ४/का.५	27.05.2015 09.03.2016	२५-३८
९	महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका- २०१७ प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येबाबत	रानिआ/मनपा-२००५/ प्र.क्र.१६/का-५	03.12.2016	३९
१०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकामध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत	रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.१६/का-५	08.11.2011 06.02.2012 29.03.2010 02.08.2012	४१-५०
११	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकामध्ये तोतयेगिरीबाबत मतदान केंद्राध्यक्षांनी करावयाची कार्यवाही.	रानिआ/मनपा-२०१०/ प्र.क्र.४/का-५	22.10.2010	५१
१२	अपंग मतदारांना तळमजल्यावर मतदान केंद्र उभारण्याबाबत	रानिआ/मनपा-२००५/ प्र.क्र.३४/का-५	24.12.2005	५३
	प्रकरण २ -नामनिर्देशपत्राबाबतच्या तरतुदी			५५
१	नामनिर्देशनपत्र व एकत्रित शपथपत्र यांचे सुधारीत नमुने	रानिआ/मनपा२०१५/प्र.क्र.२४/का.०५	05.10.2015	६१
२	जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास हमी पत्र देणेबाबत.	रानिआ/मनपा२०१५/प्र.क्र.५/का.०५ व शासन अधिसूचना	09.04.2015	७७
३	विशेष मागासप्रवर्ग संदर्भातील राज्य निवडणूक आयोगाचे पत्र या संदर्भातील शासनाचे पत्र	सीबीसी-१०९६/सी-१२५८/प्र.क्र.२३८/ मावक-५ एसईसी/एमएमसी-११९६/ प्र.क्र.९१६/ का.३	05.10.1996 07.10.1996	८५-८७
४	दोनपेक्षा अधिक अपत्ये नसल्याबाबतचे सुधारीत शपथपत्राबाबत - राज्य निवडणूक आयोगाचे पत्र	एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/ का.१० व शासन अधिसूचना	31.03.2009 13.09.2000	८९-९८
५	गुन्हेगारी पार्श्वभीमी व स्थावर,जंगम मालमत्ता तपशिल देणारे शपथपत्राबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश व त्याबाबतची सुधारणा	एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/ का.५	15.03.2004	९९
६	सूचक, अनुमोदक व उमेदवार यांचे मतदार यादीतील अनुक्रमांक चुकीचे असल्यासंदर्भातील न्यायालयाचा निर्णय नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याबाबत आयोगाचे पत्र	रानिआ/मनपा२००८/प्र.क्र.१२/का.५	23.06.2008	१०३
७	निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी मराठी अथवा इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेतून विहित नमुन्यात शपथपत्र/घोषणापत्र सादर करण्याची मुभा	रानिआ/मनपा-२०१२/ प्र.क्र.१२/का-५	28.01.2012	१०५
८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये शपथपत्र/घोषणापत्र स्टॅम्पपेपरवर सादर करण्याची आवश्यकता नसल्याबाबत	रानिआ/मनपा२०१४/प्र.क्र.२२/का.५	08.01.2015	१०७

B

९	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रामध्ये कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत	रानिआ/मनपा२०१५/प्र.क्र.५/का.६	27.03.2015	१०९
१०	महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका -२०१७ बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने मतपत्रिकेचा नमुना (बृहन्मुंबई मतानगरपालिका वगळून)	रानिआ/मनपा२०१५/प्र.क्र.५/का.५	03.01.2017	११५
११	शौचालयाच्या वापराबाबतचे प्रमाणप्रत्र सादर करण्याबाबत	न. वि. वि. पत्र क्र. स्वमअ-२०१६/प्रक्र-२५४/नवि-३४ व शासन अधिसूचना क्र. १९ असाधारण क्र. १४५	04.01.2017 07.05.2016 16.12.2016	१२१-१३२
	प्रकरण ३ -राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हवाटप			१३३
१	महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ (राजकीय पक्षांनी पक्षाचा उमेदवार कळविण्याबाबतचे परिशिष्ट १, २ व ३ यांचे नमूने)	एसईसी/आरपीपी/२००९/ सी.आर ४९/का.११	31.03.2009	१३९
२	महानगरपालिका निवडणूका पक्षांच्या उमेदवारांनी सादर करावयाचे - सुधारीत जोडपत्र १ व २ बाबत	क्र.रानिआ/रापनो २००९/प्र.क्र.४९ (भाग-२)/का.११	25.02.2013	१४७
३	राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्षांची नावे व चिन्हांची यादी	क्र.रानिआ/रापनो२०१२/प्र.क्र.८३/का-११	18.10.2016	१५५
४	दि १८.१०.१६ नंतर राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत ५३ पक्षांच्या नावांची यादी		53 पक्षांची यादी	१९७
५	बहुसदस्यीय पध्दतीत चिन्हांचे वाटप करण्यासंदर्भातील सुधारणा	क्र.एसईसी- २००९/प्र.क्र.४९ /का.११	04.02.2012	२०३
६	राजकीय पक्षाव्दारे उभे करण्यात येणारे उमेदवार	रानिआ/मनपा/२००६/प्रक्र१९/का५	06.01.2007	२०५
७	चिन्हांचे वाटप करण्यासंदर्भातील कार्यपध्दतीबाबत स्पष्टीकरण	क्र.एसईसी- २००९/प्र.क्र.४९ /का.११	05.02.2012	२०७
	प्रकरण ४ - आचारसंहिता			२११
१	आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश	रानिआ/नपा/२०१६/प्र.क्र.३१ /का.६	14.10.2016	२१७
२	मालमत्ता विद्रुपीकरण या संदर्भातील आदेश	एसईसी/१०९५/सीआर-२५/९५/ पीआर	21.01.1995	२५१
३	मद्य विक्री वरील बंदीबाबत -राज्य निवडणूक आयोगाचे निदेश	एसईसी/१०९५/सीआर-१/९५/डेस्क-३	07.03.1995	२५३
४	उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादाबाबतचे मुळ आदेश व यासंदर्भात सादर करावयाची विवरणपत्रे	एमईसी.१०९५/१०१/ डेस्क-३	07.02.1995	२५५
५	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका निवडणूक खर्चाचा हिशेब देणयासाठी उमेदवारां करीता वेळ (Time) आणि रीत (Manner) निश्चित करणेबाबत.	रानिआ/२०१६/ उनिख/प्र.क्र.१३/ संगणीकरण कक्ष	15.10.2016	२६७
६	राजकीय पक्षांनी सादर करावयाचे अहवाल,विवरणपत्रे, इत्यादी बाबत	क्र.रानिआ/रापनो२०१६/प्र.क्र.०४/का.१२	20.10.2016	२८३
७	उमेदवारांच्या व राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चाबाबत विवरणपत्रे व शपथपत्रे यांचे नमुने	रानिआ/२०१६//प्र.क्र.१३/का.सं. कक्ष	25.10.2016	२९५
८	स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा	रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/ का-५	30.07.2011	३१३
९	निवडणुकांकरीता पक्षाने केलेला खर्च संबंधित उमेदवारांमध्ये विभागणे व सादर करावयाचे वेळपत्रक	रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/ का-५	28.12.2006	३१५
१०	निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर न केल्यास उमेदवारास अनर्ह ठरविण्याबाबत	रानिआ/मनपा२००८/प्र.क्र.५/का-५	29.09.2008	३१७
११	महानगरपालिका, नगरपरिषदा,नगरपंचायती निवडणूकांमध्ये उमेदवारांने केलेल्या खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत	रानिआ/नप-२००९/ प्र.क्र.१३/ का.०५ व का. ०६	05.06.2010	३२१
१०	महानगरपालिका, नगरपरिषदा,नगरपंचायती, जिल्हापरिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट निवडणूकांमध्ये उमेदवारांने केलेल्या खर्चाचा हिशोब सादर न केल्यास अनर्ह ठरविण्याबाबत	रानिआ/नप-२०१५/ प्र.क्र.१०/ का.०६	10.08.2015	३२३
११	ध्वनीपेक्षकाच्या वापराबाबत - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश	एसईसी-१०९५/सीआर-९/ ९५/ डेस्क-३	18.03.1995	३२९
१२	पोस्टर्स व पॅम्प्लेटची छपाई व प्रसिद्धीवर निर्बंध	एसईसी-१०९५/सीआर-७७/ ९५/ डेस्क-३	28.08.1995	३३१
१३	आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत	एसईसी/जीईएन-२००२/ प्र.क्र.१०/ का-१०	25.01.2002	३३३

१४	आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत- महापौर,जिल्हापरिषद अध्यक्ष,पंचायत समिती सभापती व ग्रामपंचायतीचे सरपंच	रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५	11.01.2012	३३५
१५	आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत- जिल्हयाचे पालकमंत्री	रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५	11.01.2012 2	३३७
१६	निवडणूक प्रचाराकरीता उमेदवारास वाहन वापराबाबत दयावयाच्या परवानगी बाबतचे आदेश	एसईसी/जीईएन-११९८/ प्र.क्र.१/ का-३	06.01.1998	३३९
१७	राजकीय पक्ष,उमेदवार यांच्या इलेक्ट्रॉनिग प्रसार माध्यमाद्वारे (केबल नेटवर्क,स्थानिक वाहिनी)प्रसारीत करण्यात येणा-या मुलाखती इत्यादीबाबत-आदेश	रानिआ/मनपा२००९/प्र.क्र.१/का.५	06.01.2009	३४१
१८	केबल नेटवर्क, स्थानिक वाहिनी प्रसारीत करण्यात येणा-या मुलाखती इत्यादीबाबत-प्रमाणपत्र देण्याकरीता महानगरपालिका / जिल्हाधिकारी कार्यालयात समिती गठीत करण्याबाबत आदेश	रानिआ/मनपा२००९/प्र.क्र.१/का.५	22.12.2011	३४९
१९	पेड न्यूज बाबत समिती गठीत करण्याबाबतचे आदेश	रानिआ/मनपा२००९/प्र.क्र.१/का.५	16.01.2012	३५१
२०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रचारादरम्यान वपरावयाच्या वाहन संख्येबाबत	रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र.३१/का.७	19.11.2016	३५५
२१	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील प्रचार	रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४/का-५	09.04.2010	३५७
२२	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये प्राण्यांचा वापर करण्यास प्रतिबंध करणे बाबत	रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२६/का-५	23.12.2011	३५९
२३	निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्र व आजूबाजूच्या परिसरात उमेदवारांचा प्रवेश व निवडणूक काळात उमेदवारांनी उघडावयाची प्रचार कार्यालये - आदेश	रानिआ/मनपा/२००७/प्र.क्र.६/का.५	04.02.2012	३६१
२४	स्टार प्रचारकांची नावे कळविणे व त्यांच्या प्रवासखर्चास सूट देण्याबाबत	रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का.५	08.11.2011	३६३
२५	प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर घरोघरी करण्यात येणा-या प्रचाराबाबत	रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५	14.02.2012	३६५
२६	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांची आचारसंहिता लागू असल्याच्या कालावधीत जिल्हा नियोजन समितीची बैठक घेणेबाबत	रानिआ/ग्रापनि२०१२/प्र.क्र.६/का.०८	21.08.2012	३६७
२७	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकापूर्वी लोकप्रतिनिधिंना स्वेच्छा निधीतून (Discretionary Grant)खर्च करण्यावर निर्बंध	रानिआ/२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क.	05.10.2016	३६९
२८	सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेल्या व्यक्तीस तसेच लोक प्रतिनिधीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी या मतमोजणी प्रतिनिधी न नेमणेबाबत	रानिआ/जिपपंस /२०१६ /प्र.क्र.२३/का.७	19.10.2016	३७५
२९	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या आचारसंहिता कालावधीत उमेदवार/ राजकीय पक्ष यांना लभा/प्रचाराकरीता विविध परवानग्या देण्याकरीता "एक खिडकी योजना" राबविण्याबाबत	रानिआ/जिपपंस /२०१६ /प्र.क्र.३०/का.७	23.11.2016	३७७
३०	निवडणूक संनियंत्रण समितीने जप्त केलेल्या रोकड रकमा परत करण्यापूर्वी आयोगाची मान्यता घेण्याबाबत....	रानिआ/नप-२००६/प्र.क्र.४२/का.६	24.11.2016	३८५
	प्रकरण क्र.५- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM)			३८७
१	मतदान यंत्र व त्यांच्याशी संबधित साहित्याची नोंद जडवस्तू संग्रह नोंदवहीत घेणेबाबत	रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.७/का-५	05.07.2007	३८९
२	मतदान यंत्राची मेमरी ३ महिन्याच्या कालावधीनंतर कोषागरातून काढण्यास सक्षम अधिकारी	रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का-५	08.10.2007	३९१
३	मतदान संपनंतर बॅटरी सुरु राहून मतमोजणीच्या वेळी बॅटरी संपून निकाल दिसत नसल्यास करावयाची कार्यवाही	रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१८/ का-५	13.06.2005	३९३
४	मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणा-या शाईच्या बाटलीऐवजी मार्करपेनच्या वापराबाबत	रानिआ/मनपा२०१०/ प्र.क्र.१०/का-५	19.11.2011	३९५
५	मतदाराच्या बोटाला शाई लावण्याबाबत	रानिआ/मनपा२०१२/ प्र.क्र.२४/का-५	09.10.2012	३९७
६	इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा सुरक्षित साठा करणे व त्यांच्या संख्येचा हिशोब ठेवणे	रानिआ/मनपा२०१०/ प्र.क्र.६/का-५	03.01.2011	३९९

D

७	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका - मतदान यंत्र सेट व सील करणेबाबत	रानिआ/मनपा२०११/ प्र.क्र.१८/का-५	12.03.2012	४०१
८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता ईव्हीएममध्ये पांढ-या रंगाच्या मेमरीचा वापर करण्याबाबत	रानिआ२०१३/जुमेमा/ प्र.क्र.२/का-१२	18.06.2013	४०५
९	ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे मतदान करण्याबाबतचा (सुधारणा) आदेश - २०१३	रानिआ २०१३/प्र.क्र.८/का-१२	28.10.2013	४०७
१०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावर " None of the Above" (NOTA) बटनाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत	रानिआ २०१३/प्र.क्र.११/का-१२	12.11.2013	४१३
११	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावर " वरील पैकी एकही नाही " (NOTA) बटनाच्या वापराबाबत पूरक आदेश	रानिआ २०१३/प्र.क्र.११/का-१२	26.11.2013	४२५
१३	स्थानिक पातळीवर मतपत्रिका छापून घेणेबाबत	रानिआ/मनपा/२०१४/ प्र.क्र.२०/ का-५	17.11.2014	४२७
	प्रकरण क्र.६- निवडणूकांकरीता आवश्यक असलेले नमुने			४२९
१	नमुना -१ निवडणूकीची सूचना			४३१
२	नमुना -२ नामनिर्देशनाची सूचना			४३३
३	नमुना -३ (पहा नियम वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी			४३५
४	नमुना -४ उमेदवारी मागे घेण्यासंबंधी सूचना			४३७
५	नमुना -५ उमेदवारी मागे घेण्यासंबंधी सूचना (फळ्यावर लावण्यासाठी)			४३९
६	नमुना -६ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी			४४१
७	नमुना -७ निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक			४४३
८	नमुना -८ निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणे बाबत			४४५
९	नमुना -९ मतदान प्रतिनिधींची नेमणूक			४४७
१०	नमुना -१० मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणे बाबत			४४९
११	मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक			४५१
१२	मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणे बाबत			४५३
१३	मतपत्रिकेवर नाव छापणेबाबत			४५५
१४	मतदान केंद्रासाठी लागणाऱ्यासाहित्याची यादी			४५७
१५	उमेदवार, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, मतदान व मतमोजणीसाठी वापरण्यात येणा-या छपाई साहीत्याची यादी			४६५
१६	निवडणूक विभागाकडे साहीत्य स्वीकृत तक्ता			४७३
	प्रकरण क्र.७- राज्य निवडणूक आयोगाकडे माहिती पाठविण्याचे विविध नमुने			४७७
	निवडणूक प्रक्रियेपूर्वी तसेच दरम्यान सादर करावयाच्या अहवालाचे नमुने	रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२०/का.७	२४.१०.२०१६	४७९
१	अंतिम प्रभाग रचनेनंतर व निवडणूक कार्याक्रम जाहिर होण्यापूर्वी सादर करावयाची माहिती	विवरणपत्र १		४८३
२	निवडणूकीसाठी आवश्यक असलेले साहित्य	विवरणपत्र २		४८५
३	निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची माहिती	विवरणपत्र ३		४८७
४	नामनिर्देशन पत्रांबाबत दैनंदिन तपशिल	विवरणपत्र ४		४८९
५	वैध नामनिर्देशन पत्रे व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या इ.	विवरणपत्र ५		४९१
६	मतदानाच्या दिवशी पाठवावयाची मतदानाची टक्केवारी	विवरणपत्र ६		४९३
७	झालेले मतदान तसेच वैध व अवैध मतांची संख्या	विवरणपत्र ७		४९५
८	पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाची मते मिळालेल्या उमेदवारांची माहिती	विवरणपत्र ८		४९७
९	पक्षनिहाय झालेले मतदान	विवरणपत्र ९		४९९
१०	पक्षनिहाय झालेल्या जागांची संख्या	विवरणपत्र १०		५०१
११	निवडणूकीचा संकलित तक्ता	विवरणपत्र ११		५०३

E

	प्रकरण क्र.८- इतर महत्वाचे आदेश व सुचना			५९३
१	Requisition of Staff and Vehicles	SEC/306/Desk-3	02.03.1995	५९७
२	Restrictions on transfer of staff	SRC/1095/CR- 5/95/D-5	15.03.1995	५२३
३	पोस्टल बॅलट ऑर्डर-२००१ व दि.१७ जानेवारी २००२ चे पत्र	एसईसी/जीईएन/२००१/ प्र.क्र.५/ का-१०	26.04.2001 16.01.2001 17.01.2002	५२५-५५०
४	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवजणूकीच्या प्रत्येक टप्प्यावरील माहिती राज्य निवडणूक आयोगास कळविण्याबाबत	एसईसी/एमसी/२००३/ प्र.क्र.७०/ का-१०	20.09.2003	५५१
५	निवडणूकीत झालेल्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याबाबत	मनपा-२००४/प्र.क्र.३५/का-५	01.12.2004	५५५
६	नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या तारखेनंतर एकच उमेदवार शिल्लक असल्यास त्याचा अहवाल आयोगास पाठविण्याबाबत व आयोगाच्या मान्यतेनंतर त्या उमेदवारास विजयी घोषित करणेबाबत	रानिआ/मनपा-२००४/ प्र.क्र.३७/ का.५	23.12.2004	५५७
७	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघाची पुर्नरचना- कामकाज गोपनियरित्या हाताळण्याबाबत	रानिआ/मनपा-२००५/ प्र.क्र.१७/ का.५	24.10.2005 02.07.2013	५५९-५६२
८	महानगरपालिका, नगर परिषद/नगरपंचायत निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित करणेबाबत	रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.४(१)/का.५	06.02.2015	५६३
९	निवडून आलेल्या उमेदवारांना दयावयाचे प्रमाणपत्र	एसईसी१०९५/सीआर११/डे-३	10.04.1995 08.06.1995	५६७-५७२
१०	महानगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांना दयावयाच्या प्रमाणपत्राचा सुधारीत नमूना	रानिआ/मनपा/२००५/ प्र.क्र.१५/का-५	08.04.2005	५७३
११	महानगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांना संगणकीय प्रणालीमधून दयावयाचे प्रमाणपत्र	रानिआ-२०१५/प्र.क्र.०२/सं.कक्ष	14.12.2016	५७५
१२	निवडणूकीसंबधी गुन्हयात तातडीने आरोपपत्र दाखल करणेबाबत	रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१४/का-५	12.04.2005	५७७
१३	स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही	रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.२५/का-५	11.08.2005	५७९
१४	स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही	रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.३/का-५	20.02.2013	५८१
१५	व्हिडिओ कॅसेटची विल्हेवाट लावण्याबाबत	रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.३६/का-५	20.12.2005	५८५
१७	निवडणुकीमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई	रानिआ२००६/प्र.क्र.१४/ का-५	02.08.2006	५८७
१८	निवडणुकविषयक गुन्हे मागे घेताना आयोगाची परवानगी घेणेबाबत	रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.१०/का-५	14.03.2007	५९१
१९	निवडणुकविषयक कार्यवाहीच्या व्हिडिओ चित्रीकरणाच्या सीडी उपलब्ध करून देणेबाबत	मनप-२००७/प्र.क्र.१८/ का-७	07.04.2007	५९३
२०	प्रभाग रचना संदर्भात आदेश - स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दबावास बळी न पडण्याबाबत	रानिआ/मनपा२००७/प्र.क्र.६/का.०५	10.04.2007	५९५
२१	मतदानाच्या कामाकरीता शिक्षकांची नेमणूक केल्यास करावयाची कार्यवाही	रानिआ/मनपा-२००८/प्र.क्र.१/का-५	11.11.2008	५९७
२२	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा अधिगृहीत करण्याबाबत	रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२३/ का-५	11.12.2011	५९९
२३	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्यावेळी मतदान/मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना तसेच पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना द्यावयाच्या निवडणूक भत्ता/ आहार भत्त्याबाबतचे आदेश व शुध्दीपत्रक	रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का-५	31.01.2012 11.02.2012	६०१-६०४
२४	मतदान व मतमोजणीसाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना द्यावयाच्या निवडणूक भत्त्याबाबत	सा.प्र.वि.शा.नि.क्र.टिडीए १००९/ प्र.क्र.३१०/०९/३३	08.04.2009	६०५
२६	महानगरपालिका/नगरपरिषदा सार्वत्रिक पोटनिवडणूकांमध्ये काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचा-यांना मानधनाबाबत	न.वि.वि.शा.नि.क्र.संकिर्ण २००६/ ५१२/ प्र.क्र. ८९/२००६/ नवि-२०	16.07.2007	६०९

F

२७	विधानसभा निवडणूकमध्ये कर्मचाऱ्यांनी केलेल्या जादा कामाबाबत अतिकालिक भत्ता व त क्षेत्रिय अधिकाऱ्यांना द्यावयाच्या मानधनाबाबत	सा.प्र.वि.शा.नि.क्र.ईएसटी१००९/प्र.क्र.१५३/३/०९/ ३३	29.04.2011	६११
२८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये किन्नरांकरीता प्रभाग आरक्षित करण्याबाबत	रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का-५	24.11.2011	६१३
२९	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ज्येष्ठ नागरीक, अंध व अपंग मतदार तसेच गरोदर अथवा तान्हया मुलासह असणा-या स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करु देण्याबाबत	रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२०/का-५	05.12.2011	६१५
३०	महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निडणूकीच्या कर्तव्यांवर असताना जखमी झालेल्या अधिकारी/ कर्मचा-यांनाच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.	रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.२४/का.०६	28.11.2016	६१७
३१	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचा-यांवर क्षेत्रिय अधिका-याचे (झोनल ऑफीसर) काम सोपविण्याबाबत	रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१८/ का-५	23.01.2012	६२१
३२	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जनमत चाचणी मतदानोत्तर चाचणी घेणे, निष्कर्ष प्रसिध्द करण्याबाबचे निर्बंध	**नविन आदेश तयार करणे**		६२३-६२८
३३	राज्य निवडणूक आयोगाचा लोगो छापणेबाबत	रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२४/ का-५	17.12.2011	६२९
३४	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतमोजणी करावयाची पध्दत	रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/ का-५	21.12.2009 29.03.2010	६३३-६३६
३६	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रीय स्तरावरील निवडणूकविषयक कामकाजाची जबाबदारी निश्चित करण्याबाबत	रानिआ/मनपा/२०१५/ प्र.क्र.०६/ का-५	10.02.2015	६३७
३७	महानगरपालिका निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या	रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/ का-५	12.03.2015	६४३
३८	महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करणेबाबत	रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१६/ का-५	26.12.2016	६४७
३९	निवडणूक प्रक्रिया पार पाडल्यानंतर सादर करावयाची प्रमाणपत्र	रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१६/ का-७	09.11.2016	६४९
४०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासप्रवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने निहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत	एमसीओ-२०१६/प्र.क्र.४६/निवि-१४	28.03.2016	६५९
४१	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासप्रवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने निहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत	रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.१/ का-५	16.012.2016	६६३

प्रकरण १

मतदार यादी तयार करणे

सर्वसाधारण सूचना

१. राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्त्वात असलेली विधानसभेची मतदार यादी महानगरपालिकेच्या प्रभागानुसार विभागून ती निवडणूकीसाठी छापून घेणे व अधिका-यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. असे करताना संबंधित क्षेत्राची विधानसभेची मतदार यादी जशी असेल तशी संबंधित प्रभागामध्ये विभागावयाची आहे. त्यामध्ये कोणतीही नावे वाढविणे, कमी करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करणे इ. ची अनुमती देण्यात आलेली आहे. मतदार यादी विभागण्याचे काम हे "कट ॲण्ड पेस्ट ऑपरेशन " असून विधानसभा मतदार यादीच्या कोणत्याही भागात बदल करता येणार नाही. मतदार यादी विभागताना प्रभागाच्या हद्दीवर राहणा-या मतदारांच्या संदर्भात विशेष दक्षता घेणे आवश्यक असून त्यासाठी गरज वाटल्यास स्थळ निरीक्षण करुन यादी विभागावयाची आहे. असे करताना एका प्रभागाच्या हद्दीतील मतदारांची नावे अन्य प्रभागाच्या मतदार यादीत समाविष्ट होणार नाहीत हे पाहणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्त्वात असलेली मतदार यादी प्राप्त केल्यानंतरदेखील मतदार नोंदणी अधिकारी त्या यादीमधील राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या मतदारांच्या नावाची पुरवणी यादी किंवा ज्यांची नावे कमी करावयाची असतील त्यांची यादी स्वतंत्रपणे देतात याचा काळजीपूर्वक विचार करुन त्यानुसार विधानसभेच्या मतदार यादीमध्ये सुधारणा करुन ती वापरणे आवश्यक आहे.

२. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार प्रथम प्रभागनिहाय मतदार यादया अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित प्रभागातील मतदारांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात याव्यात.

३. त्यानंतर प्रारुप मतदार यादी नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात यावी.

४. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीमधून महानगरपालिकेच्या निवडणुकांकरीता मतदार यादया तयार करताना -

(अ) काही लेखनिकांच्या चुका असल्यास त्या सुधारण्यात याव्यात.

(ब) दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागातून वगळण्यात यावीत व संबंधित प्रभागात समाविष्ट करण्यात यावीत.

(क) महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या क्षेत्रातील विधानसभेच्या यादीत मतदारांची नावे असूनही महानगरपालिकेच्या मतदार यादीमध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात यावीत.

५. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यात याव्यात व त्याबद्दलची सूचनाही प्रसिध्द करण्यात यावी. मतदार यादी अधिप्रमाणित करणे व तिच्या सुरक्षिततेबाबत राज्य निवडणूक आयोगाने क्र. एसईसी-१०९६/प्र.क्र.६/९६/डी-३, दि.३१ जानेवारी, १९९६ अन्वये दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात यावे.

६. मतदार यादी अधिप्रमाणित केल्यानंतरदेखील त्या यादीमध्ये काही चुका निदर्शनास आल्यास अशा चुका राज्य निवडणूक आयोगाने क्र. एसईसी/जीईएन - १९९६/सीआर १७/का-३, दि.०५ नोव्हेंबर, १९९६, व क्र. एसईसी-एमसी/२००२/प्र.क्र.१/का-१०, दि. ०२ जानेवारी, २००२ अन्वये दिलेल्या आदेशानुसार नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सुधारता येतील.

७. प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिध्द करण्यात याव्यात.

८. मतदार यादीतील दुबार नावांबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा/२००७/प्र.क्र.६/का.०५, दि.२४ एप्रिल, २००७ व राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र.रानिआ/मनपा २०१२/प्र.क्र.०४/का.०५, दि.०७.०२.२०१२ अनुसार कार्यवाही करावी.

९. तसेच मतदार यादीतील स्थानांतरीत अथवा मयत नावांबाबत आदेश क्र.रानिआ/मनपा/२०१०/प्र.क्र.४/का.०५, दि.११ ऑक्टोबर, २०१० अनुसार कार्यवाही करावी.

१०. मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र निर्मितीबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या खालील पत्रातील सूचना विचारात घ्याव्यात.

(१) क्र.रानिआ २०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दि.२७ मे, २०१५

(२) क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४/का.५, दि.९ मार्च, २०१६

(३) क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१६/का.५, दि.३ डिसेंबर, २०१६

११. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा २००९/प्र.क्र.१६/का.०५, दि.०८.११.२०११, दि.२९.०३.२०१० व दि.०२.०८.२०१२ च्या आदेशानुसार तसेच मतदार यादीतील फोटो अथवा अन्य तपशिल चुकीचा असल्यास राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा २०११/प्र.क्र.१६/का.०५, दि.०६.०२.२०१२ नुसार कार्यवाही करावी.

१२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तोतयेगिरीबाबत मतदान केंद्राध्यक्षांनी राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा २०११/प्र.क्र.१६/का.०५, दि.२२.१०.२०१० नुसार कार्यवाही करावी.

असा. क्र. ८ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साजय/२०

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जानेवारी ३१, १९९६/माघ ११, शके १९१७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

भाग एक-अ—मध्य उप-विभाग

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Opp. Mantralaya, Madame Cama Road, Mumbai 400 032, dated the 31st January 1996.

Order

CONSTITUTION OF INDIA.

No. SEC. 1096/CR-6/96/D-3.—WHEREAS the superintendence, direction and control of all elections to the Municipalities in the State vest in the State Election Commission, Maharashtra, by virtue of the provisions of Article 243-ZA of the Constitution of India and corresponding provisions made to that effect in the respective Municipal Act;

AND WHEREAS, by the Maharashtra Municipal Corporations, Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial townships (Third Amendment) Act, 1995 (Mah. XI of 1996) the sections of the relevant Municipal Act providing for adapting the Maharashtra Legislative Assembly electoral roll for the purpose of preparing Municipal ward electoral roll and other incidental and elaborate provisions with regard to maintenance, correction, etc. of such ward roll have been substituted by a new section;

AND WHEREAS, although the new section as substituted in each of the Municipal Acts provides for adaptation of the Maharashtra Legislative Assembly electoral roll for preparation of Municipal ward electoral roll, it does not provide for the incidental and elaborate provisions with regard to the maintenance, correction, etc. of such ward roll;

AND WHEREAS, it is expedient to make such provisions with regard to Municipal ward rolls;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by Article 243-ZA of the Constitution of India, read with sub-section (4) of section 18A of the Bombay Municipal Corporation Act (Bom. III of 1888), sub-section (4) of section 9-B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C. P. and Berar II of 1950), sub-section (4) of section 14 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949), sub-section (4) of section 10A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), and of all other powers enabling me in this behalf, and in relation to the preparation of electoral rolls for the purpose of municipal elections under the superintendence, direction and control of the State Election Commission, I, D. N. Chaudhari, State Election Commissioner, Maharashtra, hereby direct as follows :—

1. The authenticated ward roll or voters' list shall be kept in the chest or safe under the lock and key by such officer not below the rank of an Assistance Commissioner or the Chief Officer as—

(a) in the case of a Municipal corporation, the Municipal commissioner ; and

(b) in the case of a Municipal Council, the Collector, may designate and the officer so designated shall be responsible for the safe custody of such ward roll or voters' list.

2. (a) At the time of every election, the Municipal Commissioner or the Chief Officer of the Municipal Council, as the case may be, shall issue a public notice informing the date on and from which and the place at which the ward roll or the voters' list shall be kept open for public inspection. Such public notice shall be displayed on the notice board of the office of Municipal Corporation or the Municipal Council, as the case may be, and on such conspicuous place or places in the ward as the Municipal Commissioner or the Municipal Chief Officer may direct and also in one of the local newspapers widely circulated in the municipal area.

(b) Before issue of such public notice, the officer designated by the Municipal Commissioner, or, as the case may be, the Collector under clause 1 shall carry out in the authenticated copy of the ward roll or the voters' list of each ward all corrections which might have been made in the Maharashtra Legislative Assembly electoral roll till the date notified by State Election Commissioner for preparation of ward roll or voters' list under the respective provision of the relevant municipal law; and each such correction so made shall be initialed with date by such officer.

D. N. CHAUDHARI,
State Election Commissioner, Maharashtra.

असा. क्र. ७१ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, नोव्हेंबर ६, १९९६/कार्तिक १५, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

भाग एक-अ—मध्य उप-विभाग

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना याव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक एसईसी/जीईएन-१०९६/सीआर-१७/का-३,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ५ नोव्हेंबर १९९६.

प्रति

(१) आयुक्त
महानगरपालिका (सर्व)

(२) जिल्हाधिकारी (सर्व)
(मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).

विषय.—महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुका.
मतदार यादीबाबत.

महानगरपालिका व नगरपरिषदांसाठी लागू असलेल्या खालील कायद्यातील तरतुदीप्रमाणे महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयुक्त जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी महानगरपालिका/नगरपरिषदांच्या प्रभागामध्ये विभागून व छापून अधिप्रमाणित करून वापरावयाची आहे :—

(१) मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३).

(२) नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २).

(३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९).

(४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०).

२. वरील तरतुदीप्रमाणे मतदार यादी तयार करीत असताना विधानसभेच्या मतदार यादीप्रमाणे मतदारांची नावे ज्या नगरपरिषद निवडणूक प्रभागामध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे, त्याऐवजी काही नगरपरिषदांच्या संदर्भात त्या मतदारांची नावे नगरपरिषदेच्या दुसऱ्याच प्रभागामध्ये समाविष्ट होऊन छापली गेल्याचे तसेच नगरपरिषद क्षेत्रासाठी राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीत नाव आहे, परंतु नगरपरिषद निवडणुकीसाठी

प्रभागनिहाय मतदार यादी तयार करून छापताना नगरपरिषदेतील कोणत्याही निवडणूक प्रभागामध्ये नाव समाविष्ट करून छापण्याचे राहून गेल्याचे राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. वरील वस्तुस्थितीचा विचार करून या संदर्भात राज्य निवडणूक आयुक्तांचे मला आपणास खालीलप्रमाणे कळविण्याचे आदेश आहेत :—

(१) विधानसभा मतदार यादीवरून महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी यांत्रिकतेप्रमाणे (Mechanically) प्रभागामध्ये विभागून छापूने घेतांना काही त्रुटी निर्माण झाल्यास त्या दुरुस्त करण्याची संबंधित कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. परंतु, विधानसभा मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट असलेल्या मतदारास मतदार यादी तयार करणाऱ्या व ती अधिप्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या चुकांमुळे संबंधित प्रभागामध्ये मतदान करण्यापासून वंचित करणे योग्य होणार नसल्याकारणाने भारतीय संविधानाच्या कलम २४३-झेडए व मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १८-अ (४) व कलम १९ (१) (वी), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २) चे कलम ९-बी व कलम १२, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९) चे कलम १४(४) व कलम ७-अ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) चे कलम १०-अ (४) व कलम ११ खालील व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र असे आदेश देत आहेत की, महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी वर नमूद केलेल्या संबंधित कायद्यातील तरतुदीप्रमाणे राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करून छापून घेतल्यानंतर विधानसभेच्या मतदार यादीप्रमाणे एखाद्या मतदाराचे नाव अगर मतदारांची नावे विधानसभा मतदार यादीचा विचार करताना महानगरपालिका व नगरपरिषदांच्या ज्या प्रभागामध्ये नाव/नावे समाविष्ट असणे आवश्यक आहे, त्याऐवजी दुसऱ्याच प्रभागामध्ये नाव/नावे समाविष्ट झाली असल्याचे निदर्शनास आल्यास कायद्यातील वर नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे मतदार यादी अधिप्रमाणात करण्यासाठी सक्षम केलेल्या अधिकाऱ्याने अशा नावांची यादी करून, त्या खाली तारखेसह सही करून ती यादी संबंधित प्रभागाच्या मतदार यादीसोबत जोडावी.

(२) तसेच विधानसभा मतदार यादीत नाव आहे, परंतु महानगरपालिका/नगरपरिषदांच्या प्रभागनिहाय तयार केलेल्या कोणत्याही प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आल्यास कायद्यातील वर नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे मतदार यादी अधिप्रमाणित करण्यास सक्षम केलेल्या अधिकाऱ्यांनी अशा नावांची यादी करून त्याखाली तारखेसह सही करून ती यादी संबंधित प्रभागाच्या मतदार यादीसोबत जोडावी.

(३) वरीलप्रमाणे तयार केलेल्या यादीतील मतदारास/मतदारांना संबंधित प्रभागाच्या निवडणुकीसाठी मतदार करण्यास परवानगी देण्यात यावी.

(४) त्या संदर्भात आवश्यक त्या सूचना निर्वाचन अधिकारी व केंद्राध्यक्ष यांना द्याव्यात.

(५) तसेच अनुक्रमांक १ प्रमाणे तयार केलेल्या यादीची एक प्रत ज्या प्रभागाच्या मतदार यादीमध्ये चुकीने नाव/नावे समाविष्ट झाली असतील त्या प्रभागाच्या मतदान केंद्राध्यक्षाकडे देऊन बोगस मतदान होणार नाही अशी दक्षता घेण्याबाबत त्यांना सूचना द्याव्यात.

निवडणुका स्वच्छ, निर्भय व खुल्या वातावरणात होण्याच्या दृष्टीने भारताच्या संविधानात सुधारणा करून राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचा स्वतंत्र अधिकारी/कर्मचारीवर्ग निर्माण केलेला नसल्यामुळे राज्य निवडणूक आयोगास जिल्ह्यातील सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून निवडणुकांचे काम करून घ्यावयाचे आहे व त्यासाठी कायद्यातील तरतुदींनुसार असे अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाच्या पर्यवेक्षण, निर्देशन व नियंत्रण याखाली निवडणुकीची कामे करीत असतात. निवडणुकांसाठी प्रभाग रचना करणे, मतदार याद्या तयार करणे व प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणे ह्या सर्व बाबी अत्यंत जबाबदारीच्या असून, त्याकामी कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा करणे ही बाब अत्यंत गंभीर असून अक्षम्य आहे. त्यामुळे, राज्य निवडणूक आयुक्तांचे असेही आदेश आहेत की, जेथे अशा प्रकारच्या चुका झाल्याचे दिसून येईल त्या प्रकरणात संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध विभागीय चौकशी त्वरित सुरू करावी व त्याचा प्राथमिक अहवालही राज्य निवडणूक आयोगास त्वरित पाठवावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,
बा. र. पोखरकर,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २ जानेवारी, २००२.

आ दे श

क्रमांक-एसईसी/एमसी/२००२/प्र.क्र.१/का-१०. ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या ७३ व्या व ७४ व्या दुरुस्तीनुसार राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे ; आणि

ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम १९(१)(बी), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम १२, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७अ व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ११ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका व नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयुक्त जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी प्रभागनिहाय विभागून व छापून अधिप्रमाणित करुन वापरावयाची आहे; आणि

ज्याअर्थी, वरील तरतुदीप्रमाणे मतदार यादी तयार करीत असताना विधानसभेच्या मतदार यादीनुसार मतदारांची नांवे ज्या निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे, त्याऐवजी त्या मतदारांची नांवे दुसऱ्याच निवडणूक प्रभागांमध्ये चुकीने समाविष्ट होऊन छापली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच महानगरपालिका अथवा नगर परिषद क्षेत्रासाठी राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीत नांवे असूनदेखील प्रभागनिहाय मतदार यादी तयार करुन छापताना कोणत्याही निवडणूक प्रभागामध्ये नांव समाविष्ट करुन छापण्याचे राहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व २४३ झेड्ए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक-३) चे कलम १८अ, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९१० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक-२) चे कलम ९बी, मुंबई प्रांतिक

..२/-

महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक-५९) चे कलम १४(४) व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा अधिनियम क्रमांक ४०) चे कलम १०अ(४) खालील व राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी काढलेल्या काही आदेशांचे अंशतः अधिक्रमण करुन आता राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. हे आदेश राज्यातील सर्व महानगरपालिका, नगर परिषदा तसेच नगर पंचायती यांच्या निवडणुकांसाठी लागू असतील.

२. विधानसभा मतदार यादीवरुन महानगरपालिका, नगर परिषदा अथवा नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी विधानसभा मतदार यादी प्रभागनिहाय विभागून छापून व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द केल्यानंतर काही मतदारांची नांवे ज्या प्रभागात असणे आवश्यक आहे, त्याऐवजी दुस-याच प्रभागाच्या मतदार यादीत चुकीने छापण्यात आल्यास अथवा राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस ज्या मतदाराचे नांव संबंधित क्षेत्राच्या विधानसभा मतदार यादीत असूनदेखील ते नांव महानगरपालिका, नगर परिषदा अथवा नगर पंचायतींच्या निवडणुकीच्या प्रभागनिहाय मतदार यादीत छापावयाचे राहून गेल्यास मतदार यादी तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने त्यासंदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात.

३. सदर दुरुस्त्या महानगरपालिका, नगर परिषदा अथवा नगर पंचायतींच्या निवडणुकांची नामनिर्देशनपत्रे भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करता येतील. मात्र, याचा अर्थ असा नव्हे की, मतदार यादीत नवीन नांवे समाविष्ट करण्याची अथवा वगळण्याची परवानगी देण्यात आली आहे.

(य. ल. राजवाडे)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र.

प्रति,
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
एएमी२२४

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३३/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक- २३ डिसेंबर, २००४.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील मतदार यादी

महोदय,

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार मतदार यादी तयार करणे व पुरवणी यादी तयार करणे ही निरंतर प्रक्रिया आहे. असे असताना देखील सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोग जी तारीख अधिसूचित करील, त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी उपलब्ध करुन देण्याव्यतिरिक्त मतदार नोंदणी अधिकारी विधानसभा मतदार संघ मतदार यादी ही ज्या दिनांकास अंतिमरित्या प्रसिध्द झाली अशीच तीच उपलब्ध करुन देतात व यानंतर कोणतीही पुरवणी यादी प्रसिध्द झाली नाही, असे प्रमाणपत्र देतात.

२. राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे यासंबंधी लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० अनुसार कार्यवाही करावी व राज्य निवडणूक आयोग जी तारीख निश्चित करील त्या तारखेपर्यंत अद्ययावत केलेली यादी उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे याबाबतचा पाठपुरावा सातत्याने केला असून, उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सर्व जिल्हाधिकारी व सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांना पत्र क्रमांक डीएलआर-१००४/प्र.क्र.५६५/०४/३३, दिनांक- ८ डिसेंबर, २००४ अन्वये योग्य त्या सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या पत्राची एक प्रत आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे. यापुढे या पत्रात नमूद केल्याप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेपर्यंतची अद्ययावत मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्राप्त करुन घ्यावी, ही विनंती.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(महेन्द्र ब. वारभुवन)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,

*सर्व विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी

*सर्व विधानसभा मतदार संघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी

(* जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे मार्फत)

क्रमांक: ईएलआर–१००४/प्र.क्र. ५६५/०४/३३,

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ८ डिसेंबर २००४

विषय :– स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी मतदार यादी

महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार राज्य निवडणूक आयोग जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीवरुन स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीसाठी प्रभाग निहाय मतदार यादी तयार करावी लागते. तथापि, या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, सर्वसाधारणपणे विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी ही ज्या दिनांकास अंतिमरित्या प्रसिध्द झालेली असेल तीच मतदारयादी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन दिली जाते व " यानंतर कोणतीही पुरवणी यादी प्रसिध्द झाली नाही" असे प्रमाणपत्र देण्यात येते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी विधानसभा मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून अद्ययावत मतदार याद्या उपलब्ध करुन देण्यात येत नसल्यामुळे मतदार यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रयोजनासाठी ज्या दिनांकास अस्तित्वात असलेली मतदार यादी उपयोगात आणावयाचे अधिसूचित करेल त्या दिनांकापर्यंत मतदार यादीमध्ये पात्र मतदारांची नांवे मतदार यादीमध्ये अंतर्भूत न केल्यामुळे असे मतदार हे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीमध्ये मतदानापासून वंचित राहतात.

२. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील तरतूदीनुसार विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी ही भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या अर्हता दिनांक धरुन तयार केली जाते व त्यामध्ये सुधारणा केल्या जातात. भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादी तयार करुन ती अंतिमरित्या प्रसिध्द केल्यानंतर अशी मतदार यादी ही

उपरोक्त अधिनियमाच्या कलम २१(१) मधील तरतूदीनुसार अंमलात येते. अंतिमरित्या प्रसिध्द झालेल्या मतदार यादीमध्ये जर एखाद्या पात्र मतदाराचे नांव अंतर्भूत करावयाचे राहून गेले असल्यास किंवा मतदार यादीतील एखादी नोंद ही चुकीची किंवा सदोष असल्यामुळे दुरुस्त करावयाची असल्यास, मतदार संघातील एखाद्या संपीत व्यक्तीने मतदार संघातील तिचे सर्वसाधारण वास्तव्याचे ठिकाण स्थलांतरण केल्यामुळे तिच्या नांवाची नोंद ही मतदार यादीमध्ये स्थानांतर करावयाची असल्यास आणि एखादा मतदार हा मृत्यु पावल्यामुळे अथवा मतदारसंघातील सर्वसाधारण रहिवासी राहिला नसल्यामुळे अशा मतदारांच्या नांवाच्या नोंदी वगळणे आवश्यक असल्यास तर संबंधीत मतदार नोंदणी अधिकारी हा उक्त अधिनियमातील कलम २२ व २३ मधील तरतूदीनुसार मतदार यादीमध्ये यथास्थित नवीन नांव नोंदवणे, वगळणे अथवा त्यामध्ये सुधारणा करणे या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करु शकतो. मात्र अशी कार्यवाही ही त्या मतदार संघासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणूकांसाठी नामनिर्देशनपत्रे दाखल करावयाच्या शेवटच्या दिनांकापासून ते निवडणूकीची प्रक्रिया संपेपर्यंतच्या कालावधीत करता येत नाही.

३. अधिनियमातील ही तरतूद लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी अंतिमरित्या प्रसिध्द केलेल्या मतदार यादीबरोबरच मतदार नोंदणी अधिकाऱ्याने मतदार यादी अंतिमरित्या प्रसिध्द केल्यानंतर प्राप्त झालेले दावे व हरकती निकाली काढल्यानंतर निरंतर पुनरिक्षण प्रक्रिये अंतर्गत तयार करण्यात आलेली व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मागणी केलेल्या दिनांकापर्यंत अद्ययावत केलेली पुरवणी यादी ही उपलब्ध करुन देण्यात यावी अशा सूचना सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात याव्यात, ही विनंती.

४. कृपया या पत्राची पोच द्यावी.

(के. व्ही. कुरुंदकर)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीबाबत

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र. ६/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ एप्रिल, २००७.
आ दे श

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेताना विधानसभेची राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या तारखेची संबंधित मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांची मतदार यादी तयार करण्यासाठी वापरण्यात येते. विधानसभा मतदार यादीवरुन प्रभागवार/मतदार गटवार/मतदार मणवार मतदार यादी तयार करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, विधानसभा मतदार यादीत बरीच नांवे एकापेक्षा जास्त वेळा येतात. त्यावेळी काय करावयाचे याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांकडून राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन मागविण्यात येते. याबाबत भारतीय लोकप्रतिनिधीत्व अधिनियमामध्ये ज्या व्यक्तीने नांवाची नोंदणी मतदार यादीत एकापेक्षा जास्त वेळा केली असेल त्यांच्याविरुध्द दावा चालविण्याची व न्यायालयात त्यांचा अपराध असल्याचे सिध्द झाल्यास त्याला जास्तीत जास्त एक वर्षापर्यंतची शिक्षा देण्याची तरतूद कलम ३१ मध्ये उपलब्ध आहे. परंतु, असा दावा दाखल करण्याचे अधिकार मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना प्राप्त आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुका घेणारे अधिकारी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या एकापेक्षा जास्त वेळा एकाच व्यक्तीचे नांव येते ते प्रकार निदर्शनास आणू शकतात, त्यापेक्षा अधिक काही करु शकत नाही.

२. एकापेक्षा जास्त वेळा एकाच मतदाराचे नांव आल्याने त्या मतदाराच्या नांवे अन्य कोणी मतदार मतदान करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता असते. असे प्रकार टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

(१) ज्या मतदाराचे नांव एकापेक्षा जास्त वेळा आले असेल तो मतदार एकच आहे याची खात्री करुन घ्यावी.

(२) एकापेक्षा जास्त प्रभागात अशा मतदाराचे नांव आले असल्यास त्या मतदाराला तो कोठे मतदान करणार आहे, हे विचारावे. त्याने तसे

कळविल्यानंतर ज्या प्रभागात तो मतदान करणार नसेल तेथे तो कोणत्या प्रभागात मतदान करणार आहे त्याचे अभिप्राय मतदार यादीवर लिहिण्यात यावे.

(३) ज्या मतदारांचे नांव एकाच प्रभागात जास्त वेळा आले असेल तेथे तो नेमका कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे ते मतदाराला विचारुन घ्यावे व त्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी.

(४) काहीवेळा ग्रामीण/शहरी भागातील मतदारांची नांवे शहरी/ग्रामीण भागातही आढळून येतात. त्यांनी जर ग्रामीण/शहरी भागातील निवडणुकीसाठी मतदान केले असेल तर त्यांना शहरी/ग्रामीण भागासाठी मतदान करु देण्यात येऊ नये. तसे मतदार यादीवर अभिप्राय लिहिण्यात यावे.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार/राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab१२१.doc

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीतील मयत अथवा स्थानांतरीत मतदारांबाबत करावयाची कार्यवाही.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ११ ऑक्टोबर, २०१०.

आदेश

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेताना राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या तारखेची अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी घेऊन संबंधित प्रभागांमध्ये / मतदार गट / मतदार गणामध्ये विभागण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, या यादीमध्ये बरेच मतदार मयत अथवा स्थलांतरीत झालेले असतात. अशा ब-याच तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे येतात तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिका-यांकडून याबाबत कोणती कार्यवाही करावी याची विचारणा होत असते. लोकप्रतिनिधित्व अधिनियमामधील तरतुदीनुसार प्रसिध्द केलेल्या विधानसभेच्या मतदार यादीमध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास नाहीत.

मतदार यादीमध्ये ज्या मतदारांबाबत मयत अथवा स्थलांतरीत मतदार असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या असतील त्या मतदारांच्या नावावर कोणत्याही प्रकारचे खोटे (Bogus) मतदान होऊ नये याकरिता राज्य निवडणूक आयोग पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

१. मतदार यादीमध्ये ज्या मतदारांबाबत मयत अथवा स्थलांतरीत मतदार असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या असतील त्या मतदारांच्या नावासमोर विशिष्ट खूण करण्यात यावी.

[illegible] अशा मतदारांच्या नावावर मतदानास आलेल्या व्यक्तींचे ओळखीचे [illegible] काटेकोरपणे तपासावेत.

३. याबाबत उमेदवारांनीही त्यांच्या मतदान प्रतिनिधीमार्फत अशा मतदारांच्या नावावर मतदानास आलेल्या व्यक्तींबाबत वेळीच हरकत घ्यावी असे आवाहन उमेदवारांच्या बैठकीमध्ये निवडणूक निर्णय अधिका-यांनी सर्व उमेदवारांना करावे.

४. मतदान केंद्राध्यक्षांनी अशा व्यक्तींची ओळख पटल्यानंतर त्यांना मतदान करु दयावे.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

(मंगेश मोहिते)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ / मनपा - २०१२ / प्र.क्र.४ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ०७/०२/२०१२

वाचा :- १. आयोगाचे आदेश क्र. क्रमांक- रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का.५, दि.२४ एप्रिल, २००७
२. आयोगाचे आदेश क्र. रानिआ / मनपा - २०१० / प्र.क्र.४ /का.५, दि.११/१०/२०१०

परिपत्रक

मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ७०८/२०१२ श्री. विनोद चंदीराम तलरेजा व अन्य एक विरुध्द तहसिलदार, अंबरनाथ व इतर मध्ये दि. ३१ जानेवारी, २०१२ मध्ये दिलेल्या निर्णयामध्ये राज्य निवडणूक आयोगास पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत :-

"मृत व्यक्तींच्या नावावर अन्य व्यक्ती मतदान करणार नाहीत. तसेच ज्या व्यक्तींची नावे एकापेक्षा जास्त प्रभागांच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट झालेली आहेत अशा व्यक्ती, जर त्या अन्यथा मतदान करण्यास पात्र असतील, तर त्यांना फक्त एकाच प्रभागातून मतदान करण्यास परवानगी देण्यात येईल याची राज्य निवडणूक आयोगाने दक्षता घ्यावी."

या संदर्भात नमूद करण्यात येते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये एकाच मतदाराचे नाव मतदार यादीमध्ये एकापेक्षा जास्तवेळा आले असल्यास किंवा एकापेक्षा जास्त मतदार याद्यामध्ये समाविष्ट झाले असल्यास त्या मतदारास एकापेक्षा जास्तवेळा मतदान करता येऊ नये किंवा त्याच्या नावावर अन्य व्यक्तीने मतदान करु नये यादृष्टीने करावयाच्या कार्यवाहीबाबत आयोगाच्या दि. २४/४/२००७ च्या आदेशान्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मतदार यादीतील मयत अथवा

स्थानांतरीत मतदारांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत आयोगाच्या दि. ११/१०/२०१० च्या आदेशान्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी उपरोक्त न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास पुन्हा सुचित करण्यात येते की, आयोगाच्या उपरोक्त आदेशात नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(डॉ. अ. द. कोल्हे)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी वापरावयाच्या मतदार यादीबाबत.

४०८ कार्य
५।५।१५

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-२०१५/प्र.क्र.३ /प्रकल्प कक्ष
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७/०४/२०१५

आदेश

ज्याअर्थी,भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकाचे आयोजन करण्याची अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १९ (ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७-अ महाराष्ट्र नगरपालिका, नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा.५) च्या कलम १३, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १२ अन्वये लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या तरतुदीअन्वये महाराष्ट्र विधानसभेसाठी तयार केलेली आणि राज्य निवडणूक आयुक्त यांनी अधिसूचित केलेल्या दिनांकाची असलेली मतदार यादी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता विशाद्यून व अधिप्रमाणित करुन वापरण्याबाबत तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे राज्यामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी वापरावयाची मतदार यादी तयार करण्याची सर्व कार्यवाही जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांकडून करण्यात येते.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी (मुदत संपणाऱ्या) जाहीर केलेला विशिष्ट दिनांक ग्राह्य धरुन विधानसभेसाठी तयार करण्यात आलेली मतदार यादी जशीच्या तशी या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येते.

आणि ज्याअर्थी, मतदार यादीमध्ये दुरुस्ती करण्याबाबतची प्रक्रिया लोकसभा / विधानसभेच्या निवडणुकांपूर्वी ज्या गांभीर्याने केली जाते, त्याच गांभीर्याने ती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी सुध्दा करण्याची गरज आहे.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जाहीर केलेला विशिष्ट दिनांक लक्षात घेता भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी यांनी तयार केलेली मतदार यादी अद्ययावत करण्यात आली आहे किंवा नाही हे बघण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा. ५) च्या कलम ९ए(४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता <u>मतदार यादी बिनचूक, त्रुटीविरहीत तयार करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे</u> :-

<u>१) नवीन मतदारांची नोंदणी करणे-</u>

i) सर्व जिल्हाधिकारी यांनी मुदत संपणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वर्षनिहाय व महिनानिहाय कॅलेंडर तयार करावे.

ii) ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सार्वत्रिक निवडणुका असतील त्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ग्राह्य धरण्यात येणारी विशिष्ट दिनांकाच्या कमीत कमी ६ महिने अगोदरपासून त्यांनी मतदार जागृती कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवावा. त्यामध्ये १८ वर्षांच्यावरील सर्व पात्र व्यक्तींची नावे मतदार यादीमध्ये नोंदविली जातील या दृष्टीने जनजागृती करावी. यासाठी जिल्हाधिकारी यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. प्रसंगी त्याकरीता शासनाच्या निरनिराळे विभाग, स्वयंसेवी संस्था, खाजगी कंपन्या इ. यांची मदत घ्यावी. १८ वर्षावरील एकही पात्र व्यक्ती विशिष्ट दिनांकास नोंदणीशिवाय राहणार नाही याकडे जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक राहील.

iii) राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, सूचना व अर्ज संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यास त्यावर संबंधित जिल्हाधिकारी यांनी वेळेवर भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

(२) मतदार याद्या त्रुटी / चूका विरहीत होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे -

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या ग्राह्य धरण्यात येणारी विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी जशीच्या तशी त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येते.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रभाग, मतदार विभाग, निर्वाचक गण इत्यादी प्रमाणे या मतदार यादीचे विभाजन करुन प्रारुप यादी प्रसिध्द करण्यात येते व त्यावर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यात येतात.

आलेल्या हरकतींपैकी १) मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात समाविष्ठ झाली असतील २) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राच्या बाहेर असलेल्या मतदारांची नावे समाविष्ठ झाली असतील किंवा ३) विधानसभा मतदार यादीत नाव असून सुध्दा ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीत समाविष्ठ करण्याचे राहून गेले आहे, अशा हरकती व सूचनांचा फक्त विचार करुन, अधिनियमातील तरतूदींच्या अनुषंगाने या दुरुस्त्या करण्यात येतात.

विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इ. अधिकार राज्य निवडणूक आयोगाला नाहीत.

ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी प्रारुप मतदार यादीवर असलेल्या हरकती अंतिम करताना मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (Booth Level Officer) प्रत्येक मतदाराच्या निवासस्थानी / पत्त्यावर भेट देणे क्रमप्राप्त आहे.

यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सर्व चुका / त्रुटींसंदर्भात माहिती व्यवस्थित गोळा करावी. उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद ३ प्रकारच्या हरकती / सूचनांबाबत स्थानिक स्वराज्य संस्थेची मतदार यादी अधिप्रमाणित

करणाऱ्या अधिकाऱ्याने दुरुस्ती करावी, उर्वरित त्रुटी / चुकांसंदर्भात प्राप्त झालेली माहिती भारत निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे पाठवावी. मतदार नोंदणी अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे त्यांची दखल घेऊन मतदार यादी दुरुस्ती करावी.

३) भारत निवडणूक आयोगाने नुकताच राष्ट्रीय मतदार याद्या शुध्दीकरण व प्रमाणिकरण कार्यक्रम "NERPAP-National Electoral Electoral Rolls Purification and Authentication Programme" हाती घेतला आहे. यात मतदाराचा आधार कार्ड नंबर हा मतदार ओळखपत्राशी (EPIC DATA) लिंक करण्याचे प्रस्तावित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (BLO) यांनी मतदाराच्या निवासस्थानाच्या भेटीच्यावेळी मतदार ओळखपत्राशी आधारकार्डाची सांगड घालण्याबाबत सुध्दा आवश्यक ती खबरदारी घ्यावी. या कार्यक्रमाअंतर्गत संबंधित जिल्हाधिकारी यांनी मागणी केल्याप्रमाणे मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (BLO) उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, मुख्याधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका आयुक्त यांची असेल.

४) राज्य निवडणूक आयोग जिल्हाधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत नियमितपणे आढावा घेईल.

हे आदेश मुख्य निवडणूक अधिकारी यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

Pradeep Vy
(प्रदीप व्यास) 17/12/2015
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत
प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
जिल्हाधिकारी (सर्व)
महानगरपालिका आयुक्त, (सर्व)
जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायती (सर्व)

D:\Mahale DS\मतदार यादीबाबत सूचना.docx

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका-२०१५
मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र
निर्मितीबाबत

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ-२०१५/प्र.क्र. e /प्रकल्प कक्ष,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७/०५/२०१५.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका-२०१५
मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र निर्मितीबाबत...

संदर्भ:-१) राज्य निवडणूक आयोगाकडील मतदान केंद्रविषयक आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंसनि/२०१०/प्र.क्र.०२/का-७, दिनांक-१२/७/२०१०.
२) क्रमांक-रानिआ/ग्रापनि-२०१०/प्र.क्र.२०/का-८,दिनांक-१४/१०/२०१० चे पत्र
३) क्रमांक-रानिआ/२०१०/प्र.क्र.४/का-०५, दिनांक ३०/७/२०११ चे पत्र
४) क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.०४/का-५, दिनांक-१५/९/२०११ चे पत्र
५) क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दिनांक- ७/१/२०१५.

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३ के, २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीत, निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडणे तसेच या निवडणुकांचे नियंत्रण, संचालन व अधिक्षण करण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे.

२. निवडणुकांच्यावेळी "मतदान केंद्र" हा महत्वाचा विषय असून भारत निवडणूक आयोगाच्या निवडणुकीच्यावेळी घेण्यात येणारी सर्व दक्षता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही घेणे आवश्यक आहे.

३. राज्य निवडणूक आयोगाकडून यापूर्वी निर्गमित झालेल्या संदर्भाधीन आदेशामधील मतदान केंद्रविषयक सूचना अधिक्रमित करून मतदान केंद्र निश्चितीबाबत, भारत निवडणूक आयोगाची आदर्श मतदान केंद्राविषयीची तत्वे व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अधिनियम व नियमातील तरतुदी लक्षात घेऊन खालील सूचना देण्यात येत आहेत :-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांचा मतदार संघ हा प्रभागात/निर्वाचन गट/ गणामध्ये विभागलला असतो व प्रत्येक प्रभाग हा भौगोलिकदृष्टया सलग प्रदेश असतो. सबब, प्रत्येक प्रभाग, गट/गणाकरिता किमान १ मतदान केंद्र असणे आवश्यक आहे.

(ii) ग्रामपंचायतीमध्येच म्हणजेच बहुसदस्यीय पध्दती लागू असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एका मतदान केंद्रास जोडणाऱ्या मतदारांची संख्या ८०० हून अधिक असू नये. परंतु, जिल्हा परिषद/पंचायत समिती, महानगरपालिका, नगर परिषदा सारख्या एक सदस्यीय पध्दती लागू असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतदारांची संख्या जास्तीत जास्त १२०० ते १४०० असण्यास हरकत नाही. परंतु, सदर मतदान केंद्रावर १४०० हून अधिक मतदार असू नयेत. तसेच मागील निवडणुकांतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अशा केंद्रांवर अतिरिक्त मतदान अधिकारी नेमावा.

(iii) भौगोलिकदृष्टया मतदान केंद्र हे जोडलेल्या भागाच्या मध्यावर असावे. जेणेकरून, मतदान केंद्रास जोडलेल्या कोणत्याही मतदारास २ किमीपेक्षा अधिक प्रवास करावा लागू नये. सबब, विरळ लोकसंख्या/भौगोलिक कारणास्तव विखुरलेल्या /

विभागलेल्या वस्त्यांमध्ये कमी मतदारांसाठी देखील मतदान केंद्र तयार केल्यास हरकत नसावी. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(ई))

(iv) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शक्यतोवर एका इमारतीत शहरी भागात जास्तीत जास्त ४ व ग्रामीण भागात जास्तीत जास्त २ केंद्रे ठेवावीत. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(एफ))

(v) मतदान केंद्राची जागा किमान २० चौ. मीटर असेल. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(सी))

(vi) मतदान केंद्रात जाणे-येणे कामी स्वतंत्र Entry-Exit असावे. जेथे अशी सोय नसेल तेथे दोरीच्या सहाय्याने तात्पुरती व्यवस्था करावी. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(बी))

(vii) मतदान केंद्र हे पक्क्या इमारतीत असावे. तसेच शासकीय /निमशासकीय शाळा, कार्यालये किंवा अनुदानित शाळा/कार्यालयांच्या इमारतीतच असावे. जेणेकरून, टेबल-खुर्च्या व इतर सोयी निर्माण करणे सोपे जाते. सुरक्षिततेच्या दृष्टीनेदेखील सदर बाब योग्य होते. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापन करावयाचे झाल्यास आयुक्त, महानगरपालिका व जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी सर्व कारणमिमांसा जाणून घेऊन मगच अशा मतदान केंद्रांना परवानगी द्यावी.

खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापतेवेळी त्याच्या मालकाची लेखी संमती असणे आवश्यक राहील.

खाजगी इमारतीतील मतदान केंद्राच्या बाबत अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर इमारतीत कोणत्याही पक्षाचे कार्यालय/उमेदवार/हितचिंतक/पाठीराखा

रहात नसल्याची/मालकी नसल्याची खात्री करावी. असल्यास मतदान केंद्र अन्य ठिकाणी नेण्याची पर्यायी व्यवस्था करावी.

मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास मतदान प्रक्रिया सुरु होण्याच्या २४ तास अगोदर असे मतदान केंद्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ताब्यात घ्यावे. (राज्य निवडणूक आयोगाकडील ०२/०३/१९९५ चे आदेश) (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(के),(एम),(एन))

(viii) मतदान केंद्राचा २०० मीटर परिघ हा मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात राहील. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास सदर मतदान केंद्राच्या २०० मिटर परिघात खाजगी इमारतीचा मालक व त्याचे सुरक्षा रक्षक प्रवेश करणार नाही. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(एन))

(ix) कोणतेही मतदान केंद्र कोणत्याही स्थितीत पोलीस स्टेशन, हॉस्पिटल, देऊळ, धार्मिक इमारतीत नसेल. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(ओ))

(x) मतदान केंद्रात खालील मुलभूत सुविधा पुरवण्यात याव्यात:- (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका तसेच भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST- BMF/२०१३-EPS, दिनांक २७/१/२०१४)

(a) मतदान केंद्र शक्यतोवर तळमजल्यावर ठेवावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असेल तर तेथे लिफ्टची सोय असावी वा मानवी डोलीची व्यवस्था करावी.

(b) मतदान केंद्रावर वृध्द/अपंग व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी.

(c) मतदान केंद्र सुरक्षित पक्क्या इमारतीतच असावे. खिडक्या, दरवाजे, पंखे आणि विद्युत पुरवठा यांची तपासणी करून घ्यावी.

(d) मतदान केंद्रावर भरपूर उजेड व हवा असेल याची तपासणी करावी. मतदान केंद्र निश्चितीपूर्वी तपासणीच्यावेळी या सर्व बाबींची नोंद घ्यावी. बल्ब, लाईट्स, फॅन्स, स्वीचेस, वायरिंग तपासणी करून घ्यावी. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या क्षेत्रात लोड शेडिंग असणार नाही याची खात्री संबंधित यंत्रणेला (MSEB/RELIANCE/TATA) आवश्यक आदेश देऊन करावी. तसेच आवश्यकतेनुसार जनरेटरचीही सोय ठेवावी.

(e) मतदान केंद्रावर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय आहे याची खात्री करावी. उन्हाळयात प्रत्येक केंद्रावर मातीच्या मडक्यात (२ ग्लास सोबत ठेवावेत) स्वच्छ पिण्याचे पाणी ठेवावे. ते मडके सातत्याने भरलेले राहील याकडे लक्ष द्यावे.

(f) मतदान केंद्रावर किमान आवश्यक फर्निचर (टेबल, खुर्च्या, बेंच, मतदारांना रांगेत उभे राहतेवेळी सावलीसाठी शेडस्) ची उपाययोजना करावी. Entry-Exit साठी आवश्यक तेथे बांबूची किंवा दोरीची बॅरीकेटिंग करून घ्यावी.

(g) स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये आहेत याची खात्री करावी. मतदानाच्यावेळी त्याच्या स्वच्छतेबाबतचीही काळजी घ्यावी.

(h) मतदान केंद्राच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ "मतदार सहाय्य केंद्र" स्थापित करावे. त्यावरील कर्मचाऱ्यांकडे चिन्हांकित मतदार यादीची एक प्रत, मतदारांची वर्णानुक्रमे नावे असलेली एक यादी, मतदान केंद्राचा (मतदार अनुक्रमांक ..... ते ..... मतदान केंद्र क्रमांक) तपशील असावा. जेणेकरून मतदारांना त्यांची नावे शोधण्यासाठी व संबंधित मतदान केंद्रात पाठविण्यासाठी सहाय्य करणे सुलभ होईल.

(i) मतदान केंद्रावर मतदारांना माहिती देणारे फलक योग्य ठिकाणी लावावेत. उदा. मतदान केंद्राचा मार्ग दर्शविणारा नकाशा, मतदान केंद्रावरील सोयींबद्दलची (मतदान केंद्र सहाय्य शौचालय, पाणी) माहिती दर्शविणारे फलक

(j) उन्हाळयात होणाऱ्या निवडणुका लक्षात घेता उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून आवश्यक ती प्रथमोपचार, औषधे (जसे De-hydration Medicine) मतदान अधिकाऱ्यांसोबत द्यावीत. सर्व मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत साखर-मीठाच्या पुडया मतदान साहित्यात द्याव्यात. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४५८/४/९८PLN-IV, दिनांक १/६/१९९८)

(k) भौगोलिक परिस्थिती व वातावरण यांचा अंदाज घेऊन उष्माघातात आवश्यकतेनुसार लोकांनी घ्यावयाच्या काळजीबाबतच्या सूचनांसह प्रसिध्दी द्यावी. "आरोग्य अधिकाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करून घ्याव्यात व त्यांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत आवश्यक त्या औषधांसोबत फिरतीवर ठेवणे. जेणेकरून, गरजेनुसार ते उपचार करू शकतील. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४५८/४/९८PLN-IV, दिनांक १/६/१९९८)

(l) पावसाळयात मतदान केंद्राबाबत तितकीच काळजी घेणे आवश्यक असून मतदान केंद्रात छपरातून पाणी गळणे वा चिखलसदृश्य परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मतदान केंद्राच्या छपरावर आवश्यक असल्यास ताडपत्रीची व्यवस्था करण्यात यावी.

(xi) मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह/आश्रम असल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र असण्यास हरकत नाही. त्यामध्ये काम करणारे अधिकारी/डॉक्टर्स/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.३.१)

(xii) परदानशीन स्त्रियांसाठी किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळत असल्याने प्रत्येक मतदान अधिकाऱ्यांच्या टीममध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल. आवश्यकतेनुसार कमी खर्चाचे पार्टिशन (बेडशीट/चारपाईचा उपयोग) तयार करून घ्यावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-५७६/११/ESO/२४/९४, दिनांक २१/१०/१९९४)

(xiii) शक्य असेल तेथे स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा ठेवाव्यात, जिथे शक्य नसेल तिथे रांगेतील एका पुरुषामागे २ स्त्रिया याप्रमाणे मतदान करू द्यावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२०११-EPS, दिनांक २६/१२/२०११)

(xiv) ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरीक/अपंग/गरोदर स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करू द्यावे. असे करीत असताना इतर मतदाराकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळविणेकामी राज्य निवडणूक आयोगाच्या सदरच्या सूचनांना माफक प्रसिध्दी द्यावी. तसेच या सर्व सूचनांबाबत मतदान कर्मचारीवृंदानाही प्रशिक्षणादरम्यान सूचित करावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/२००९-EPS, दिनांक ३०/०४/२००९)

(xv) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिघात कोणत्याही पक्षाचे/प्रतिनिधीचे कार्यालय राहणार नाही. २०० मीटर परिघाच्या बाहेर प्रत्येक उमेदवारास केवळ १ मतदार सहाय्य केंद्र उभारता येईल. सदर केंद्रावर केवळ १ टेबल, २ खुर्च्या, सावलीसाठी मोठी छत्री/ताडपत्री/कापड टाकण्याची परवानगी असेल. परंतु, सदर केंद्रास स्थानिक प्राधिकरणाकडून परवानगी घ्यावी लागेल.

सदर केंद्रावर ३ x ४ ½ फुटापेक्षा जास्त लांबी रुंदी नसणारा फलक लावू शकतील. त्यावर उमेदवाराचे नाव, चिन्ह, पक्षाची माहिती असेल. त्याव्यतिरिक्त कोणताही अनधिकृत फलक लावल्यास तो फलक काढून टाकण्यात येईल.

मतदानाच्या दिवशी या केंद्रावर उमेदवाराचे नाव/चिन्ह नसलेल्या केवळ मतदाराचा मतदान क्रमांक, मतदान केंद्राचा तपशील दर्शविणाऱ्या चिठ्ठया दिल्या जाऊ शकतील. परंतु त्यावर इतर कोणताही तपशील असणार नाही.

येथे अनावश्यक गर्दी होणार नाही वा मतदारांना एखाद्या विशिष्ट उमेदवारास मत द्यावे म्हणून भरीस पाडले जाणार नाही याची दक्षता स्थानिक पोलिसांनी घ्यावी. प्राप्त तक्रारीवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/०१/२००७)

(xvi) मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद/पोलीसांव्यतिरिक्त कोणीही मोबाईल/कॉडलेस फोन/वायरलेस वापरणार नाही. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/०१/२००७)

(xvii) मागील निवडणुकीतील मतदान प्रक्रियेशी निगडित गुन्हे, मतदानाची सरासरी, मतदार यादीतील फोटो, ओळखपत्र प्राप्त मतदारांची सरासरी, कुटुंबविरहित न सापडणाऱ्या मतदारांची संख्या लक्षात घेऊन, भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रक क्रमांक-४६४/INST/२००८-EPS, दिनांक २४/१०/२००८ नुसार संवेदनशील /अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची यादी तयार करावी.

अशी यादी पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मदतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी / मनपा आयुक्त यांनी तयार करावी व तद्नंतर अशा संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रात अतिरिक्त पोलीसवृंद,

आवश्यकतेनुसार डिजिटल / व्हिडिओ कॅमेरे लावणे, मतदारांची ओळख पटविताना विशेष काळजी घेणे यासारख्या उपाययोजना कराव्यात.

(xviii) भारत निवडणूक आयोगाकडील परिपत्रक क्र. ४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/१०/२००७ नुसार मतदार संघात असणाऱ्या असुरक्षित/कमजोर मतदारांचा समूह/विभाग असल्यास तो शोधून काढणे, त्यांना जोडलेल्या मतदान केंद्रावर विशेष दक्षता घेणेबाबत काही महत्वाच्या सूचना पारित करण्यात आल्या आहेत, त्या सूचनांचे तंतोतंत पालन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही करण्यात यावे.

(a) तहसिलदार/गट विकास अधिकारी/पोलीस यंत्रणा, महानगरपालिका क्षेत्रात विभाग अधिकारी (ward officer) यांनी असे कमकुवत गट शोधून काढण्यात मदत करावी. अशा विभागात असुरक्षितता निर्माण करणाऱ्या गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना पोलीस यंत्रणेला तात्काळ कळेल.

(b) अशा विभागात संबंधित मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्याकामी क्षेत्रीय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी यासारखे अधिकारी वारंवार भेटी देतील. तेथील प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क साधून होणाऱ्या घडामोडींचा आढावा घेतील.

(c) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षांना अशा विभागातून होणाऱ्या मतदानाच्या आकडेवारीवर विशेष लक्ष देण्याचे सूचित करावे. अशा ठिकाणी मतदान कमी होत असल्याचे निदर्शनास आल्यास विशेष पथकाने तात्काळ भेट देऊन मतदारांना मतदान करण्याकामी प्रवृत्त करावे.

(d) असुरक्षित घटकांना मतदान प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेण्याकामी आवश्यकतेनुसार स्वतंत्र मतदान केंद्र निर्माण करण्यास हरकत नसावी. (जरी असे मतदान केंद्र ५०० मतदारांपेक्षाही कमी असले तरी चालेल) अशा

कमकुवत मतदारांना जाणुन बुजून दूरवरच्या वा जिथे त्यांना मतदानास प्रतिबंध केला जाईल अशा विभागातील मतदान केंद्रास जोडले जाणार नाही याची काळजी घ्यावी.

उपरोक्त सूचनांचे पालन काटेकोरपणे केले जाईल याची जबाबदारी महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त यांची राहील. तसेच महानगरपालिका वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सदर जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

(xix) (a) मतदान केंद्रांची यादी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार) किमान मुदती अगोदर अंतिम होणे आवश्यक राहील. अंतिम मतदान केंद्राची यादी तयार करण्यापूर्वी सर्व तहसिलदार, महानगरपालिका आयुक्त यांनी मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करावी. उपरोक्त सूचनांप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध आहेत वा कसे? याची तपासणी करून आवश्यक त्या सोयी सुविधा निर्माण करून घ्याव्यात.

(b) प्रारुप मतदान केंद्रांच्या यादीस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात तात्काळ (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार) प्रसिध्दी द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील माजी पदाधिकारी/राजकीय पक्ष यांची बैठक आयोजित करून त्यांना ती यादी मोफत द्यावी. त्यांचे आक्षेप लेखी नोंदवून आवश्यक ते बदल (प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक तेथे ते) समाविष्ट करून अंतिम यादी तयार करावी.

(c) अंतिम मतदान केंद्रांची यादीनुसार मतदान केंद्र दर्शविणारा नकाशा तसेच त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा नकाशा, वाहतूकविषयक आराखडा (Transport plan) तसेच मतदान केंद्राच्या जवळचे पोलीस स्टेशन, मतदान केंद्रावरील दूरध्वनी, संपर्क अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी यांच्या संपर्क दूरध्वनीसह एक Communication Plan

तयार करावा. तसेच वॉटस् ॲप, एसएमएस, ई-मेल यांचा वापर जास्तीत जास्त करावा व त्यासाठी सर्व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक व ई-मेल ॲड्रेस कम्युनिकेशन प्लॅनमध्ये समाविष्ट असावेत.

(d) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकामी राज्य निवडणूक आयोगाकडून नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निरीक्षकांना संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रांच्या यादीसह उपरोक्त प्लॅन टिप्पणीसह पुरवावेत.

प्रदीप व्यास
27-5-2015
(डॉ. प्रदीप व्यास)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता
मतदार यादी व मतदान केंद्र निश्चितीबाबतचे निकष

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. ०४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०९/०३/२०१६.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदार यादी व मतदान केंद्र निश्चितीबाबतचे निकष

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दिनांक २७/५/२०१५ च्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र निर्मितीबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर सूचनांमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

(१) सूचना क्रमांक- (iv) च्या शेवटी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

"लोकसभा व विधानसभा निवडणुकांकरिता मतदाराचे नाव ज्या मतदान केंद्रावर होते, शक्यतोवर त्याच मतदान केंद्रावर (मतदान केंद्राची इमारत) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता त्याचे नाव ठेवण्यात यावे. तसेच एका कुटुंबातील सर्व मतदार एकाच मतदान केंद्रावर असतील याची दक्षता घेण्यात यावी."

(२) सूचना क्रमांक- (vii) च्या शेवटी नवीन परिच्छेदात पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

"मतदान केंद्र निश्चित केल्यानंतर व यादी प्रसिध्द झाल्यानंतर जर काही कारणास्तव अपवादात्मक परिस्थितीत मतदान केंद्राचे स्थान किंवा इमारतीमध्ये बदल करावयाचा असल्यास महानगरपालिकेच्या निवडणुकीबाबत महानगरपालिका आयुक्त व इतर निवडणुकांच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता राहील व तसा बदल करण्यात आल्यानंतर तसे राज्य निवडणूक आयोगास अवगत करावे."

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत : १. सर्व अधिकारी/सर्व कार्यासने, राज्य निवडणूक आयोग
२.निवडनस्ती

F:\महानगरपालिकांची पत्रे\महानगरपालिका निवडणुकीची पत्रे.docx

३८

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका - २०१७
प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येबाबत.

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१६ /का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०३ डिसेंबर, २०१६

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१७
प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येबाबत.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दि. २७/०५/२०१५
२) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.०४/का.५ दि. ०९/०३/२०१६

महोदय,

आपल्याला माहितच आहे की, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने संबंधित महानगरपालिका आयुक्त व पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची आहे.

२. शासनाने दि.३० ऑगस्ट, २०१६ रोजी काढलेल्या अध्यादेशानुसार सर्व महानगरपालिका निवडणुकांकरिता (बृहन्मुंबई वगळून) एक सदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे. यामुळे प्रत्येक मतदाराला सरासरी ४ मते द्यावी लागणार आहेत.

३. ही बाब लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि. २७ मे, २००५ च्या आदेशामध्ये पुढीलप्रमाणे अंशत: सुधारणा करण्यात येत आहे :-

कृ.मा.प./-

अ.क्र.	महानगरपालिका	मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या
१	बृहन्मुंबई महानगरपालिका (प्रत्येक मतदार -१मत)	१२०० ते १४०० मतदार प्रती मतदान केंद्र
२	इतर सर्व महानगरपालिका (प्रत्येक मतदार - सरासरी ४ मते)	७५० ते ८०० मतदार प्रती मतदान केंद्र

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५.
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दिनांक-१९ डिसेंबर, २००९ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मतदारांची ओळख पटविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १६ कागदपत्रे सादर करण्यास परवानगी दिली होती. हे आदेश रद्द करुन त्यामध्ये आता सुधारणा करणे गरजेचे झाले असल्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

मतदान केंद्राध्यक्षाने मतदारास आपली ओळख पटविण्याकरिता प्रथम फोटो असलेले निवडणूक ओळखपत्र सादर करण्यास सांगावे. असे ओळखपत्र सदर मतदाराकडे उपलब्ध नसल्यास किंवा त्यावरुन त्या मतदाराची ओळख पटत नसल्यास खालील पुराव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करण्याची सूचना मतदान केंद्राध्यक्ष मतदारास करेल व त्यानुसार मतदाराची ओळख पटल्यानंतर मतदारास मतदान करु देईल.

१. पासपोर्ट,
२. वाहन चालविण्याचा परवाना
३. आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र
४. केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेली ओळखपत्रे
५. राष्ट्रीयकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक
६. स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र
७. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्याने अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागासवर्ग प्रवर्ग इत्यादींना फोटोसहित दिलेले प्रमाणपत्र
८. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहित अपंगत्वाचा दाखला
९. मालमत्तेबाबतची कागदपत्रे तसेच नोंदणी खत इत्यादी (फोटोसहित)
१०. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत फोटोसहित देण्यात आलेला शस्त्रास्त्राचा परवाना
११. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील, फोटो असलेले ओळखपत्र
१२. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले निवृत्त कर्मचाऱ्यांचे फोटो असलेले पासबुक
१३. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विधवा / अवलंबित व्यक्ती यांचे, फोटो असलेले प्रमाणपत्र
१४. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले वयस्कर निवृत्ती वेतनधारक अथवा त्यांच्या विधवा यांचे, फोटो असलेले प्रमाणपत्र
१५. केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड
१६. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेली शिधापत्रिका (कुटुंबातील सर्व मतदारांनी मतदान करण्यासाठी एकत्र येणे आवश्यक असेल. तसेच जर शिधापत्रिकेवर एकाच व्यक्तीचे नाव असल्यास त्याने स्वतःच्या वास्तव्याचा अन्य पुरावा जसे वीज वापराचे देयक, दूरध्वनी वापराचे देयक, प्रॉपर्टी कार्ड किंवा घरपट्टी भरल्याची पावती सोबत आणणे बंधनकारक राहील.)
१७. आधार ओळखपत्र

उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधींनी मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप घेतल्यास किंवा मतदाराने सादर केलेल्या ओळखीच्या पुराव्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत संपूर्ण शहानिशा करेल व आवश्यकता वाटल्यास इतर ओळखीच्या पुराव्यांची मागणी करुन मतदाराच्या ओळखीची संपूर्णतः खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु देईल. जर एखादा मतदार असा ओळखीबाबतचा समाधानकारक पुरावा /कागदपत्रे सादर करु न शकल्यास त्यास मतदान करु देऊ नये. कोणत्याही परिस्थितीत तोतया मतदाराकडून मतदान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांची असेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना मतदार यादीतील फोटो अथवा अन्य तपशील चुकीचा असल्यास करावयाची कार्यवाही...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का-५.
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ६ फेब्रुवारी, २०१२.

आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांची मतदार यादी विधानसभेच्या मतदार यादीवरून तयार करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की विधानसभेच्या मतदार यादीमध्ये काही मतदारांच्या नावासमोर त्यांचे फोटो चुकीचे छापलेले आहेत अथवा अन्य तपशिलातही चुका आहेत. राज्य निवडणूक आयोगास सदर यादीवरून स्थानिक स्वराज्य संस्थांची मतदार यादी बनविताना त्यात सुधारणा करण्याचे अधिकार नाहीत.

यासंदर्भात राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र असे आदेश देत आहे की राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मतदारांची ओळख पटविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १७ कागदपत्रे सादर करण्यास परवानगी दिली असून या पुराव्यांच्या आधारे ज्या मतदाराची ओळख पटत असल्याबाबत मतदान केंद्राध्यक्षांची खात्री झाल्यानंतर त्या मतदारास त्याचा मतदार यादीमध्ये फोटो अथवा अन्य तपशील चुकीचा नमूद करण्यात आला असला तरी मतदानाची परवानगी देण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(डॉ. अ. द. कोल्हे)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र. १६/का-५.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २९ मार्च, २०१०.

वाचा:- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.१६/का-५, दिनांक- १९ डिसेंबर, २००९.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने मतदारांची ओळख पटविण्यासाठी कुठले पुरावे ग्राह्य धरण्यात येतील याबाबत दिनांक- १९ डिसेंबर, २००९ रोजी आदेश काढलेले आहेत. या आदेशामध्ये शिधापत्रिका हा एकमेव पुरावा असा आहे की, ज्यावर मतदारांचे छायाचित्र नाही. त्यामुळे या पुराव्याचा दुरुपयोग होऊ नये यासाठी शिधापत्रिका हा पुरावा वापरावयाचा असेल तर कुटुंबातील सर्व मतदार एकत्रितरित्या मतदानासाठी यावयास पाहिजे अशी अट घातली आहे. परंतु, काही वेळेला कुटुंबामधील एकाच व्यक्तीचे नांव शिधापत्रिकेवर असेल तर अशावेळी मतदाराची ओळख पटविण्यामध्ये विश्वासार्हतेचा अभाव वाटू शकतो या कारणास्तव राज्य निवडणूक आयोग असा आदेश देत आहे की, शिधापत्रिका हा पुरावा वापरावयाचा असेल व एकाच व्यक्तीचे नांव शिधापत्रिकेवर असेल तर त्याने त्यासोबत त्याच्या स्वतःच्या वास्तव्याचा अन्य पुरावा जसे की, वीज वापराचे देयक, दूरध्वनी वापराचे देयक, प्रॉपर्टी कार्ड किंवा घरपट्टी भरल्याची पावती सोबत आणणे बंधनकारक राहील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(रा. नी. पांडे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र. १६/का-५.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २ ऑगस्ट, २०१२.

वाचा:- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.१६/का-५, दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाकडे अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत की मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या दि. १२ ऑगस्ट, २०१२ रोजी होणा-या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदाराची ओळख पटविण्याकरिता बोगस पॅन कार्ड व शिधापत्रिकेचा वापर होण्याची शक्यता आहे.

बोगस मतदारांना आळा घालण्यासाठी राज्य निवडणूक आयोग असा आदेश देत आहे की, एखाद्या मतदाराचा मतदार यादीमध्ये फोटो नसेल आणि असा मतदार मतदानासाठी ओळखीचा पुरावा म्हणून केवळ पॅन कार्ड अथवा शिधापत्रिका देत असेल आणि त्या मतदाराच्या ओळखीबाबत मतदान केंद्राध्यक्षांना अथवा मतदान केंद्रामध्ये उपस्थित मतदान प्रतिनिधी यांना शंका आल्यास त्या मतदारास त्याच्या स्वत:च्या ओळखीकरिता संदर्भाधीन आदेशामधील ओळखीबाबतचा अन्य पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(वि. मा. पानसरे)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषद / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २२ ऑक्टोबर, २०१०.

प्रति,
सर्व महापालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तोतयेगीरी बाबत मतदान केंद्राध्यक्षानी करावयाची कार्यवाही.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १९ डिसेंबर, २००९ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदार आपल्या ओळखीचा पुरावा म्हणून मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त सदर आदेशात नमूद केलेल्या इतर १६ पुराव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करु शकतो असे आदेश निर्गमित केले आहेत. मतदानाचे वेळी तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाकडून खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. मतदान केंद्राध्यक्षाने मतदारास आपली ओळख पटविण्याकरिता प्रथम फोटो असलेले निवडणूक ओळखपत्र सादर करण्यास सांगावे. असे ओळखपत्र सदर मतदाराकडे उपलब्ध नसल्यास किंवा त्यावरुन त्या मतदाराची ओळख पटत नसल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १९ डिसेंबर, २००९ च्या आदेशात नमूद केलेला मतदाराची ओळख पटविण्याकरिता त्याचा फोटो असलेला कोणताही पुरावा सादर करण्यास मतदान केंद्राध्यक्ष अशा मतदारास सूचना देईल.

२. एखादा मतदार फक्त शिधापत्रिका, ज्यामध्ये त्याचे किंवा त्याच्यासह त्याच्या कुटुंबियांचे नाव आहे, घेऊन कूटुंबासह मतदान करण्यास आल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याच्या ओळखीबाबत

आवश्यक ती शहानिशा करील. याबाबत शिधापत्रिकेवर मतदाराचे एकटयाचेच नाव असल्यास राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दिनांक २९ मार्च, २०१० मध्ये नमूद केलेल्या इतर पुराव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करण्यास मतदान केंद्राध्यक्ष आदेश देईल.

३. उमेदवारांच्या मतदान प्रतिनिधीनी मतदाराच्या ओळखी बाबत आक्षेप घेतल्यास किंवा मतदाराने सादर केलेल्या ओळखीच्या पुराव्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्या बाबत संपुर्ण शहानिशा करेल व आवश्यकता वाटल्यास इतर ओळखीच्या पुराव्यांची मागणी करुन मतदाराच्या ओळखीची संपुर्णतः खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु देईल.

जर एखादा मतदार असा ओळखी बाबतचा समाधानकारक पुरावा /कागदपत्रे सादर न करु शकल्यास त्यास मतदान करु देऊ नये. कोणत्याही परिस्थितीत तोतया मतदाराकडून मतदान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांची असेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशनुसार,

आपला,

(मंगेश मोहिते)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.३४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ डिसेंबर, २००५.

आ दे श

महाराष्ट्रातील अपंग मतदारांना मतदानाच्यावेळी काही सुविधा देण्याचा प्रश्न बरेच दिवस राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होता. त्यावर राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

सार्वत्रिक निवडणुकीत अथवा पोटनिवडणुकीच्यावेळी मतदार यादी प्रथम जनतेच्या हरकती व सूचनांसाठी प्रसिध्द करण्यात येते. या हरकती व सूचना मुख्यत्वे करून एका प्रभागातील उमेदवाराचे नांव दुस-या प्रभागात तर आले नाही याबाबत असते. याच कालावधीमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थातील अपंग मतदारांना आपली नांवे देण्याचे आवाहन करण्यात यावे. त्यांनी नाव देताना आपला मतदार यादी क्रमांक, भाग क्रमांक व मतदार क्रमांक नमूद करावा.

जे अपंग मतदार आपली नांवे देतील त्याबाबत संबंधित मतदार यादी करणारे अधिकारी यांची जबाबदारी राहील की, त्या मतदारांची नांवे तळमजल्यावरील मतदान केंद्रात येतील याची दक्षता घ्यावी. कारण ब-याचदा एका इमारतीमध्ये तळमजल्यावर व वरच्या मजल्यावर असे मतदान केंद्र असते. जर अपंग मतदाराचे नांव वरच्या मजल्यावरील मतदान केंद्राच्या मतदार यादीत असेल तर ते तेथून कमी करून तळमजल्यावरील मतदान केंद्राशी संबंधित मतदार यादीमध्ये पुरवणी म्हणून जोडण्यात यावे.

जर एखादया मतदान केंद्रावर ५ पेक्षा जास्त अपंग मतदार असतील तर त्या मतदान केंद्रावर चढाव (Ramp) पुरविण्यात यावा.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य-निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

प्रकरण २

नामनिर्देशनपत्राबाबतच्या तरतुदी

सर्वसाधारण सूचना

१. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार नेमून दिलेल्या कालावधीमध्ये नामनिर्देशनपत्र देणे व स्विकारणे या प्रक्रिया करावयाच्या आहेत.

२. क्रमांक- रानिआ /मनपा / २०१५ / प्र.क्र.२४ / का-०५, दि. ५ ऑक्टोंबर, २०१५ च्या आदेशान्वये महानगरपालिकांकरिता नामनिर्देशनपत्र व एकत्रित शपथपत्र यांचे सुधारित नमुने विहित करण्यात आले आहेत. ऑनलाईन नामनिर्देशन प्रक्रियेमध्ये नामनिर्देशनपत्राचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी विहित केल्यानुसार वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. तथापि, जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्याऐवजी वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी उमेदवाराने जात पडताळणी समितीकडे केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी

निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत तरतूद केली आहे. यासंदर्भात उमेदवाराकडून याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.

४. जी जागा ज्या प्रवर्गासाठी राखीव आहे, त्याच प्रर्वगातील उमेदवारांना सदर जागेची निवडणूक लढविता येईल. शासनाने विशेष मागास प्रवर्गात ज्यांचा समावेश केला आहे त्यांना नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यामधून निवडणूक लढविता येईल. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. एसईसी/एमएमसी-११९६/प्र.क्र.१९६/का-३ दि.०६/१०/१९९६ व शासनाचे पत्र क्र.सीबीसी-१०९६/सी-१२५८/प्र.क्र.२३८/मावक-५ दि.०५/१०/१९९६ सोबत जोडले आहे.

५. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का-१० दि.३१/३/२००९ अन्वये दोनपेक्षा जास्त मुले नसल्याबाबत शपथपत्र देणे आवश्यक आहे. सदर शपथपत्राचा नमुना दि.०५/१०/२०१५ च्या आदेशान्वये सुधारित करण्यात आला आहे व एकत्रित शपथपत्र विहित केले आहे.

६. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/का-०५ दि.१५/०३/२००४ अन्वये गुन्हेगारी पार्श्वभूमी बाबत व स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील देणारे शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने उमेदवारानी सादर केलेली शपथपत्रे, सूचना फलकावर चिकटवून त्याचा प्रसार करावयाचा आहे. तसेच प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत निवडणूक लढविणारा उमेदवार प्रसिदधी माध्यमे यांना योग्य ते शुल्क आकारुन त्याच्या प्रती देता येतील. कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवाराने स्वत: शपथपत्राद्वारे परस्परविरोधी माहिती सादर केली असली

तरी त्या माहितीचादेखील वरीलप्रमाणेच प्रसार करावयाचा आहे. निवडणूक निर्णय अधिकारी शपथपत्रातील गुन्हेगारी पार्श्वभूमी व मालमत्तेचा तपशील याबाबतच्या माहितीची छाननी अथवा सत्यता पडताळून पाहणार नाही अथवा चुकीची आढळल्यास त्याच्या आधारे नामनिर्देशनपत्र नाकारणार नाही. यासंदर्भातील शपथपत्राचा नमुना दि.०५/१०/२०१५ च्या आदेशान्वये सुधारित करण्यात आला आहे व एकत्रित शपथपत्र विहित केले आहे.

७. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ८/१/२०१५ च्या आदेशानुसार शपथपत्रे स्टॅम्प पेपरवर करण्याची आवश्यकता नाही. नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास आयोगाच्या क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का-६, दिनांक २७/३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-५७६/३/२०१३-एसडीआर, दिनांक- ३० सप्टेंबर, २०१३ समध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कार्यवाही करावी. याबाबत सर्व राजकीय पक्षांना माहिती देण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना सर्व महानगरपालिका आयुक्त यांनी कराव्यात.

८. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अंतर्गत निवडणूक नियमाच्या नियम क्रमांक ९(९)(ड) मधील तरतुदीनुसार उमेदवाराची ओळख मतदार यादीतील अनुक्रमांकानुसार पटणे आवश्यक आहे. तथापि, यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक-३६३८/२००८ व अन्य ८ मध्ये दिनांक १७ जून, २००८ रोजी दिलेल्या एकत्रित निर्णयानुसार उमेदवार, सूचक, अनुमोदक यांचे क्रमांक चुकीचे असतील पण त्यांचे नाव संबंधित मतदार यादीत असेल तर नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात यावे. या

संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र.रानिआ/मनपा २००८/प्र.क्र.१२/का.५, दि. २३ जून, २००८ अन्वये सूचना दिल्या आहेत.

९. राज्य निवडणूक आयोगाने नामनिर्देशनपत्र व शपथपत्र उमेदवारांना सहज रितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरणे आवश्यक आहे. त्यांनी वेब साईट उघडून ते भरावयाचे आहे व शपथपत्रामधील माहिती भरून व त्यामध्ये आवश्यक असल्यास दुरुस्ती करून त्याचे प्रिंट आऊट काढून त्यावर स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करावयाचे आहे. असा भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशनपत्राचा नमुना नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राहय धरण्यात येईल.

१०. बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवावयाची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.८/का.५, दि.०३/०१/२०१७ अन्वये आदेश देण्यात आले आहेत. या आदेशांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसारच्या मतपत्रिकेचे नमुने विहित करण्यात आले आहेत.

प्रत्येक जागेसाठी वेगवेगळे नामनिर्देशनपत्र भरणे आवश्यक राहील. तसेच प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरणे आवश्यक राहील. एका जागेसाठी एका व्यक्तीकडून जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील. एकाच जागेसाठी नामनिर्देशनपत्र स्वीकारताना अनामत रक्कम एकदाच स्विकारण्यात येईल.

११. महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवारांनी आपल्या नामनिर्देशनपत्रासोबत पुढीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे:-

उमेदवार	महानगरपालिका निवडणुकांकरिता अनामत रक्कम
अराखीव	रुपये ५,०००/-
अनुसूचित जाती	रुपये २,५००/-
अनुसूचित जमाती	रुपये २,५००/-
नागरिकांचा मागास प्रवर्ग	रुपये २,५००/-
महिला	रुपये २,५००/-

१२. नामनिर्देशनपत्राची छाननी करताना सदस्यांची अर्हता व अनर्हता याबाबतच्या खालील तरतुदींचा विचार करणे आवश्यक आहे :-

अ. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत महानगरपालिका - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ८, ९ व १० तसेच त्याअंतर्गत निवडणूक नियम क्र. ९

ब. बृहन्मुंबई महानगरपालिका - बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ११, १४ व १६ ,

१३. शासनाने सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१९ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य होण्यासाठी शौचालय असणे व त्याचा वापर करीत असल्याबाबतची सुधारणा केली असून, सर्व महानगरपालिकांकरिता सदर सुधारणा दिनांक २ जानेवारी, २०१७ पासून अंमलात येत असल्याचे अधिसूचित केले आहे.

महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने सादर करावयाचे नामनिर्देशनपत्र व एकत्रित शपथपत्र यांचे सुधारित नमुने...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र. २४/का.५,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
दिनांक :- ०५/१०/२०१५.

आ दे श

ज्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(१) अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महानगरपालिकांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता आदेश क्र.रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१८/का.५, दि.१७/११/२००६ अन्वये तर राज्यातील इतर महानगरपालिका निवडणुकांसाठी एकसदस्यीय पध्दतीनुसार निवडणुकीसाठी आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१८/का.५, दि.२९/०९/२००६ अन्वये तर बहुसदस्यीय पध्दतीनुसार निवडणुकीसाठी आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.८/का.५, दि.२०/०९/२०११ अन्वये नामनिर्देशनपत्राचे नमुने विहित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक-एसईसी /जीईएन /२००२ /प्र.क्र.८५ /कार्या.५, दिनांक १५/०३/२००४ व दि.०७/०७/२००८ च्या आदेशान्वये उमेदवाराने गुन्हेगारी पार्श्वभूमी, मत्ता व दायित्वे व शैक्षणिक अर्हता इ.संदर्भात नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे शपथपत्र विहित केले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक-एसईसी /जीईएन /२००१ /प्र.क्र.२९ /का.१०, दि.३१/०३/२००९ अन्वये उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत अपत्यांसंदर्भात द्यावयाचे शपथपत्र विहित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का.६, दि.१०/०८/२०१५ च्या आदेशान्वये निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर करण्याबाबत उमेदवाराने द्यावयाचे हमीपत्र विहित केले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.५/का.५, दि.०९/०४/२०१५ च्या पत्रान्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग या राखीव जागांवरुन निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल याची त्याला जाणीव असल्याबाबत द्यावयाचे हमीपत्र विहित केले आहे.

आणि ज्याअर्थी, नामनिर्देशनाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने नामनिर्देशनपत्राचा नमुना सुधारणे तसेच राज्य निवडणूक आयोगाने विविध बाबींसाठी विहित केलेले शपथपत्रांचे तसेच हमीपत्रांचे नमुने एकत्रित करून शपथपत्रांचा सर्वसमावेशक असा एकच नमुना विहित करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती.

आणि त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए(४) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४ (४) अन्वये मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि.२९/०९/२००६, १७/११/२००६, २०/०९/२०११, १५/०३/२००४, ०७/०७/२००८, ३१/०३/२००९, १०/०८/२०१५ व ०९/०४/२०१५ च्या आदेशांन्वये विहित केलेले यथास्थिती नामनिर्देशनपत्र / शपथपत्र / हमीपत्र यांचे नमुने याद्वारे सुधारित करण्यात येत आहेत.
२. महानगरपालिका निवडणुकांकरिता नामनिर्देशनपत्राचा नमुना अनुसूची-१ मध्ये दर्शविल्यानुसार राहील.
३. महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने सादर करावयाच्या एकत्रित शपथपत्राचा नमुना अनुसूची-२ मध्ये दर्शविल्यानुसार राहील.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
४. निवड नस्ती.

D:\Corpn २०१४-१५\Election २०१४-१५ Feb..docx

महानगरपालिका निवडणूक

(अ) नामनिर्देशनपत्र भरण्याकरिता सूचना

(१) नामनिर्देशनपत्रातील कोणत्याही रकान्यातील माहिती निरंक ठेवू नये. निरंक असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे. नामनिर्देशनपत्रासोबतच्या शपथपत्रामधील कोणत्याही रकान्यातील माहिती न भरल्यास अथवा रिक्त ठेवल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का-६, दिनांक २७/३/२०१५ अनुसार नामनिर्देशनपत्र नाकरण्यास पात्र होऊ शकते.

(२) ज्या प्रभागातून निवडणूक लढवावयाची आहे त्या प्रभागाचा क्रमांक व जागा क्रमांक स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

(३) उमेदवार, प्रस्तावक व अनुमोदक यांचे नाव ज्या प्रभागाच्या मतदार यादीमध्ये आहे त्या प्रभागाचा अनुक्रमांक व मतदार यादीचा भाग क्रमांक व अनुक्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

(४) सर्व उमेदवारांनी, मग तो अपक्ष उमेदवार असो अथवा पक्षाचा पुरस्कृत उमेदवार असो, तीन चिन्हांची निवड करणे आवश्यक आहे.

(५) जंगम व स्थावर मालमत्तेचा तपशील देताना प्रत्येक बाबींचा तपशील स्वंतंत्रपणे द्यावा.

(६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १६ मधील तरतुदींचे वाचन करण्यात यावे.

(ब) नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे

(१) उमेदवार राखीव जागेवरून निवडणूक लढवित असल्यास -

(i) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणा-या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत सोबत जोडावी. तसेच,

(ii) नामनिर्देशनपत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

(iii) उपरोक्त अधिनियमास अनुसरुन दिलेले जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास जातीची वैधता तपासणीकरिता जात वैधता पडताळणी समितीकडे अर्ज केल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.

(२) उमेदवार दुसऱ्या प्रभागातील मतदार असल्यास त्याबाबतचा उतारा सोबत जोडणे आवश्यक आहे.

(क) शपथपत्र (नामनिर्देशनपत्रासोबतचे) भरण्याबाबतच्या सूचना

(१) बंधपत्रे /कर्जरोखे/भाग यांचे मूल्य सूचीतील कंपन्यांच्या बाबतीत शेअर बाजारामधील सध्याच्या बाजारभाव मूल्यानुसार व सूचीबाह्य कंपन्यांच्या बाबतीत पुस्तकी मूल्यानुसार देण्यात यावे.

(२) जंगम व स्थावर मालमत्तेचा तपशील देताना प्रत्येक बाबींचा तपशील स्वतंत्रपणे द्यावा.

(३) अवलंबित व्यक्ती म्हणजे उमेदवार, त्याची / तिचा पत्नी / पती व स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नसलेली व पूर्णत: उमेदवारावर अवलंबून असलेली मुले व मुली.

• कोणताही रकाना रिक्त ठेवू नये. लागू नसल्यास अथवा निरंक असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

अनुसूची- १

नामनिर्देशनपत्र (महानगरपालिका)

(प्रस्तावक व अनुमोदनकर्ता आणि उमेदवार अथवा संबंधित अधिकारी यांनी भरावयाचे)

भाग एक

आम्ही, याद्वारे;

महानगरपालिका : ----------

प्रभाग क्रमांक : ------- जागा क्रमांक : -------

प्रभागाचे नांव (असल्यास) ---------- मधून निवडणुकीकरिता ----------

-------- यांना उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहोत.

१) उमेदवाराचे नांव : ----------

२) वडिलांचे/पतीचे नांव : ----------

३) लिंग : पुरुष / स्त्री / इतर

४) जन्मतारीख व वय : -----/ -------/------ , -----वर्षे --------महिने

५) व्यवसाय/धंदा : ----------

६) संपूर्ण पत्ता (पोस्टाचा पत्ता) : ----------

----

७) उमेदवाराचा मतदार यादीतील तपशील

अ) नाव : ----------

ब) प्रभाग क्रमांक : ----------

क)अनुक्रमांक : ----------

८) उमेदवाराचा प्रवर्ग : (राखीव जागेची निवडणूक असल्यास)

- अनुसूचित जाती ☐ प्रवर्ग ----------
- अनुसूचित जमाती ☐ प्रवर्ग ----------
- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग ☐ प्रवर्ग ----------

९) महिलांकरिता राखीव असलेल्या जागेकरिता निवडणूक आहे काय ? : ----------

- कोणताही रकाना रिक्त ठेवू नये. लागू नसल्यास अथवा निरंक असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

नामनिर्देशनपत्र
(२/४)

१०) मतदार यादीमधील प्रस्तावकाचा तपशील -

अ) प्रस्तावकाचे नाव : ----------

ब) प्रभाग क्रमांक : ----------

क) अनुक्रमांक : ----------

दिनांक : (प्रस्तावकाची सही किंवा अंगठयाचा ठसा)

११) मतदार यादीमधील अनुमोदकाचा तपशील -

अ) अनुमोदकाचे नाव : ----------

ब) प्रभाग क्रमांक : ----------

क) अनुक्रमांक : ----------

दिनांक : (अनुमोदकाची सही किंवा अंगठयाचा ठसा)

मी, याद्वारे सूचित करतो की, निवडून आल्यास महानगरपालिका सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांक : (उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा)

उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र

मी, याद्वारे असे घोषित करतो की, माझी या नामनिर्देशनास संमती असून, मी असेही घोषित करतो की,

(अ) माझ्या वयाची --------- वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० मधील तरतुदीनुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही.

(क) मी महानगरपालिकेचा ठेकेदार नाही.

(ड) मी महानगरपालिकेस नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी शिल्लक ठेवलेली नाही.

दिनांक :

उमेदवाराची सही किंवा
अंगठयाचा ठसा
नांव ----------

प्रभाग क्र.--------- जागा क्र.------- व प्रभागाचे नांव (असल्यास) --------

- कोणताही रकाना रिक्त ठेवू नये, लागू नसल्यास अथवा निरंक असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

भाग दोन
(निवडणूक चिन्हांच्या निवडीबाबतचे घोषणापत्र)

मी, याद्वारे आणखी असे घोषित करतो की, --

(अ) मी, या निवडणुकीमध्ये ---------- *पक्ष (राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई याच्याकडे नोंदणी झालेल्या पक्षाचे नाव) यांच्यातर्फे उभा आहे/ मी अपक्ष उमेदवार म्हणून उभा आहे. (लागू नसेल ते खोडावे.)

(ब) मी निवडलेली निवडणूक चिन्हे ही पसंतीक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहेत :---

(१)

(२)

(३)

उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

दिनांक :

* कोणताही रकाना रिक्त ठेवू नये. लागू नसल्यास अथवा निरंक असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

भाग तीन

क्रमांक -रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७/०३/२०१५.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रामध्ये कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.....

संदर्भ:- १. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/का-५, दिनांक- १५/३/२००४.
२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का-१०, दिनांक ३१/०३/२००९.
३. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२२/का-५, दिनांक ८/१/२०१५.
४. भारत निवडणूक आयोगाचे निदेश क्रमांक-५७६/३/२०१३-एसडीआर, दिनाक ३० सप्टेंबर, २०१३.

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य

...कृ.मा.प./-

ROTAI/1697(550-3-2015)-1
F:\Anagha\Local Disk (D)\बैठका\कलेक्टर टिप्पणी.docx

संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शक्यतोवर भारत निवडणूक आयोगाने जी पध्दत वापरली आहे त्यानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे. राज्यामध्ये नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांचेवेळी शपथपत्रामध्ये आवश्यक ती माहिती न भरल्यास/कोणत्याही रकान्यामधील माहिती रिक्त ठेवल्यास अशा नामनिर्देशनपत्राच्या संदर्भात काय कार्यवाही करावी याबाबत भारत निवडणूक आयोगाचे निदेश क्रमांक-५७६/३/२०१३-एसडीआर, दिनाक ३० सप्टेंबर, २०१३ ची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यापुढे होणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये भारत निवडणूक आयोगाच्या उपरोक्त निदेशामध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कार्यवाही करावी. याबाबत सर्व राजकीय पक्षांना माहिती देण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना सर्व जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांनी कराव्यात.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

F:\Anagha\Local Disk (D)\बैठका\कानेड टिप्पणी.docx

ELECTION COMMISSION OF INDIA

NIRVACHAN SADAN, ASHOKA ROAD, NEW DELHI-110001

No. 576/3/2013-SDR

Dated: 30th September, 2013

To

The Chief Electoral Officers of
all States and Union Territories.

Sub: Judgment dated 13-09-13 of the Hon'ble Supreme Court in WP (C) No. 121 of 2008-Resurgence India vs. Election Commission of India and other, regarding filing of incomplete affidavit of candidates.

Sir/ Madam,

I am directed to enclose herewith a copy of the abovementioned judgment of the Hon'ble Supreme Court. It would be seen that by this judgment, the Hon'ble Supreme Court has held that the voter has the elementary right to know full particulars of a candidate who is to represent him in the Parliament/ Assemblies and such right to get information is universally recognized natural right flowing from the concept of democracy and is an integral part of Art. 19 (1) (a) of the Constitution.

2. The Hon'ble Court has accordingly held that in the affidavits filed by candidates along with their nomination paper, the candidates are required to fill up all columns therein and no column can be left blank. Therefore, at the time of filing of affidavit, RO has to check whether all columns of the affidavit filed with the nomination paper are filled up. If not, the RO shall give a reminder to the candidate to furnish information against blank columns. The Hon'ble Court has held that is there is no information to be furnished against any item, appropriate remarks such as 'NIL' or 'Not Applicable' or 'Not Known' as may be applicable shall be indicated in such column. They should not leave any column blank. If a candidate fails to fill the blanks even after reminder, the nomination paper will be liable to be rejected by the RO at the time of scrutiny of nomination papers.

3. The Hon'ble Court has observed that another clause may therefore be inserted in the standard draft format already prescribed by the Commission for reminding the candidates to fill the blanks with the relevant information thereby conveying the message that no affidavit with blank particulars will be entertained. The Hon'ble Court has categorically mentioned that it is the duty of the Returning Officer to check whatever the information required is fully furnished at the time of filing of affidavit with the nomination paper since such information is very vital for giving effect to the 'right to know' of the citizens. If a candidate fails to fill in the blanks even after the reminder by the Returning Officer, the nomination paper is fit to be rejected.

4. The relevant extracts from the judgment are reproduced below:-

(i) *The voter has the elementary right to know full particulars of a candidate who is to represent him in the Parliament/Assemblies and such right to get information is universally recognized. Thus, it is held that right to know about the candidate is a natural right flowing from the concept of democracy and is an integral part of Article 19(1) (a) of the Constitution.*

(ii) The ultimate purpose of filing of affidavit along with the nomination paper is to effectuate the fundamental right of the citizens under Article 19(1)(a) of the Constitution of India. The citizens are supposed to have the necessary information at the time of filing of nomination paper and for that purpose, the Returning Officer can very well compel a candidate to furnish the relevant information.

(iii) Filing of affidavit with blank particulars will render the affidavit nugatory.

(iv) It is the duty of the Returning Officer to check whether the information required is fully furnished at the time of filing of affidavit with the nomination paper since such information is very vital for giving effect to the 'right to know' of the citizens. If a candidate fails to fill the blanks even after the reminder by the Returning Officer, the nomination paper is fit to be rejected. We do comprehend that the power of Returning Officer to reject the nomination paper must be exercised very sparingly but the bar should not be laid so high that the justice itself is prejudiced.

(v) We clarify to the extent that Para 73 of People's Union for Civil Liberties case (supra) will not come in the way of the Returning Officer to reject the nomination paper when affidavit is filed with blank particulars.

(vi) The candidate must take the minimum effort to explicitly remark as 'NIL' or 'Not Applicable' or 'Not known' in the columns and not to leave the particulars blank.

(i) Filing of affidavit with blanks will be directly hit by Section 125A(i) of the RP Act However, as the nomination paper itself is rejected by the Returning Officer, we find no reason why the candidate must be again penalized for the same act by prosecuting him/her.

5. The CHECK LIST of documents required to be filed by a candidate along with the nomination paper was prescribed by the Commission vide letter No.576/3/2009/SDR dated 10-02-2009 in order to ensure transparency and accountability and to streamline the procedure of filing of nomination and scrutiny of nomination papers. The CHECK LIST was modified in pursuance of Hon'ble Supreme Court judgment dated 09-12-2011 in CA No.4956 of 2010 – Ramesh Rout Vs. RavindraNath Rout and circulated vide letter No.576/3/2013/SDR dated 21-01-2013. The same CHECK LIST is now further amended to comply with the direction of the Apex Court in the instant case to insert another clause for reminding the candidates to fill in the blank columns, if any, in the affidavit. A revised format of the CHECK LIST is enclosed herewith. Please replace the existing Format of Check List in the ROs Handbook as well in other records where the Check List is kept.

6. The Commission has directed that the revised format of the CHECK LIST should be brought to the notice of the all Returning Officers for all elections conducted by the Commission, including elections to Rajya Sabha and Legislative Councils (in the States having Legislative Council). You may kindly ensure that all the Returning Officers, including Returning Officers for elections to Council of States and Legislative Councils (in States were Legislative Council is in existence), receive a copy of this letter along with the revised CHECK LIST and acknowledgement of receipt be obtained from every Returning Officer in the State. A consolidated certificate that all the Returning Officers have received the instructions may be forwarded to the Commission within one month of receipt of this letter.

Kindly acknowledge receipt.

Yours faithfully

(Ashish Chakraborty)
SECRETARY

Original/Duplicate

(Original to be kept with nomination paper and duplicate to be handed over to candidate)

Check list of documents in connection with filing of nomination

Name of constituency .....
Name of the candidate .....
Date and time of filing nomination paper .....
Sl.No. of nomination paper .....

Sl.No.	Documents	Whether filed (Write Yes/No) *{if there is any defect/ shortcoming in the documents, the same should be specified}*
1	Affidavit in Form 26 --- (a) Whether all columns are filled up. (b) If not, which are blank column(s) (Please specify): (c) Whether the affidavit is sworn before an Oath Commissioner or Magistrate of First Class or before a Notary Public.	
2	Certified extract of electoral roll(when candidate is an elector of a different constituency)	
3	Form A and B (applicable in the case of candidates set up by political parties)	
4	Copy of cast certificates (if the candidate claims to belong to SC/ ST)	
5	Security deposit (whether made)	
6	Oath and affirmations (whether taken)	

The following documents which have not been filed should be filed as indicated below:

(a)_____should be filed latest by_____.

(b) Above mentioned columns in the Affidavit in Form 26 have been left blank. You must submit a fresh Affidavit will columns duly filled up before the commencement of scrutiny of nominations, failing which the nomination paper will be liable to be rejected.

(c)_____should be filed latest by_____.

Received.

....

(Signature of candidate) Signature of RO/ARO

Date & time:
Place:

N.B

1. The affidavit in Form 26 and Forms A& B.have to be filed latest by 3.00 P.M on the last date of filing nominations.
2. The nomination paper will be rejected if a candidate fails to fill the blanks in Form 26 even after reminder by RO by the hour fixed for scrutiny of nomination paper.
3. Oath has to be taken after filing nomination paper and before the date fixed for scrutiny.
4. Certified extract of electoral roll can be filed up to the time of scrutiny.
5. Security deposit should be made either before filing of nomination paper or at the time of filing of nomination paper. Therefore, there is no question of issuing notice for making the security deposit.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका-२०१७
बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने
मतपत्रिकेचा नमुना.

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२. दिनांक : ०३ जानेवारी, २०१७

आदेश

क्रमांक रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. ०८ /का.५ ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी, शासनाने "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश २०१६ (२०१६ चा अध्या. १६)" दिनांक १३ मे २०१६ व ३० ऑगस्ट २०१६ अन्वये महानगरपालिकांमध्ये (बृहन्मुबई वगळून) एक सदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली असून त्या अनुषंगाने मतपत्रिका व इतर अनुषंगिक बाबींकरिता नव्याने आदेश पारित करणे आवश्यक झाले आहे.

३. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४ (४) अन्वये तसेच आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन व आदेश क्रमांक रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.८/का.५, दि. २० सप्टेंबर, २०११ अधिक्रमीत करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे नव्याने आदेश देत आहे :-

३.१ **प्रभागातील जागांना क्रमांक देणे** - महानगरपालिका सदस्य पदाच्या निवडणुकांकरिता प्रत्येक प्रभागातील प्रत्येक सदस्य पदाच्या जागेला प्रभागाच्या क्रमांकासोबत यथास्थिती "अ" , "ब", "क" "ड" किंवा "इ" अशा रितीने क्रमांक देण्यात येतील. उदा. प्रभाग क्र. १० मध्ये ३ जागा असतील तर त्या प्रभागातील जागांना १०अ, १०ब, व १०क असे संबोधण्यात येईल.

३.२ **नामनिर्देशनपत्र सादर करणे** - महानगरपालिका सदस्य पदाच्या प्रत्येक जागेसाठी वेगवेगळे नामनिर्देशनपत्र भरणे आवश्यक राहील. तसेच प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरणे आवश्यक राहील. एका जागेसाठी एका व्यक्तीकडून जास्तीत जास्त ४ नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील. एकाच जागेसाठी नामनिर्देशनपत्र स्वीकारताना अनामत रक्कम एकदाच स्वीकारण्यात येईल.

४. बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास, छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवायची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे

५. **मतपत्रिकेचा रंग** - बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये मतदान यंत्रावर लावण्यात येणाऱ्या विविध जागांच्या मतपत्रिका मतदारांच्या चटकन लक्षात येण्यासाठी प्रत्येक प्रभागातील प्रत्येक जागेसाठी वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका लावणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक जागेच्या मतपत्रिकेचा रंग खालीलप्रमाणे राहील :-

१) प्रत्येक प्रभागातील "अ" जागेची मतपत्रिका - पांढरा रंग.

२) प्रत्येक प्रभागातील "ब" जागेची मतपत्रिका - फिका गुलाबी रंग.

३) प्रत्येक प्रभागातील "क" जागेची मतपत्रिका - फिका पिवळा रंग.

४) प्रत्येक प्रभागातील "ड" जागेची मतपत्रिका - फिका नीळा रंग.

५) प्रत्येक प्रभागातील "इ" जागेची मतपत्रिका - फिका हिरवा रंग.

६. **मतपत्रिकेचा नमुना** - महानगरपालिका निवडणुकांकरिता मतपत्रिकेचा नमुना परिशिष्ट- १ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे राहील.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन.
३) सर्व महानगरपालिका आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
६) निवड नस्ती.

परिशिष्ट-१

(प्रभागातील "अ" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (पांढरा रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "अ" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) /सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-१

(प्रभागातील "ब" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका गुलाबी रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "ब" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-१
(प्रभागातील "क" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका पिवळा रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "क" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-१
(प्रभागातील "ड" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका नीळा रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "ड" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) /सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-१

(प्रभागातील "इ" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका हिरवा रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "इ" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण /सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

927

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक-०२२-२२८३८८७५
इमेल-pratibha.patil78@nic.in

क्र: स्वमअ-२०१६/प्र.क्र.२५४/नवि-३४
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ३२
दिनांक- २ जानेवारी, २०१७

राज्य निवडणूक आयोग
आवक क्रमांक 9 ८४
दिनांक 5/1/2017
वाचा

प्रति,
आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

विषय- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य होण्यासाठी शौचालय असणे व त्याचा वापर करीत असणे याबाबत.

महोदय,

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य होण्यासाठी शौचालय असणे व त्याचा वापर करीत असणे. अशी तरतू "मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमय आणि महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनिमय १९६५" मध्ये करण्यासाठी मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार राज विधानमंडळासमोर विधेयक सादर करण्यात आले होते.

२. महाराष्ट्र विधानमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर दिनांक ७ मे, २०१६ रोजी याबाबतचा अधिनियम अस्तित्वात आल आहे. सदर "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथ सुधारणा) अधिनियम, २०१५" च्या प्रकरण एक मधील, कलम १ च्या पोट कलम (२) मधील तरतूदी नुसार राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, नेमून देईल अशा दिनांकास सदर अधिनिमय अंमलात येईल अशी तरतूद आहे. त्यानुसा सदर अधिनियम अंमलात येण्यासाठी, दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये २ जानेवारी, २०१७ ही तारी निश्चित करण्यात आली आहे.

३. सबब, "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथ सुधारणा) अधिनियम, २०१५" दिनांक २ जानेवारी, २०१७ पासून अंमलात आलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यासा उपरोक्त नमूद अधिसूचना दिनांक ७ मे, २०१६ व दिनांक १६ डिसेंबर, २०१६ सोबत जोडून पाठविण्यात येत आहे

आपली,

(प्रतिभा मा. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

RNI No. MAHBIL /2009/35530

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष २, अंक २०] शनिवार, मे ७, २०१६/वैशाख १७, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक २८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

	पृष्ठे
सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.— मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . .	१-३

दिनाक ६ मे २०१६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रकाश हिं. माळी,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक ७ मे २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) अधिनियम, २०१५ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

प्रकरण दोन

मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १६ मधील, पोट-कलम (१) मध्ये खंड (ग) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा ३.

"(ह) जी व्यक्ती,—

(एक) तिच्या मालकीच्या घरात राहत असून, त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे; किंवा

(दोन) तिच्या मालकीच्या घरात राहत नाही आणि त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे किंवा तिच्या घरामध्ये असे शौचालय नाही मात्र ती सामुदायिक किंवा सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे,

असे प्रमाणित करणारे सहायक आयुक्ताचे प्रमाणपत्र तिने महानगरपालिकेला सादर करण्यात कसूर केली आहे :

परंतु, कोणत्याही पालिका सदस्याने, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) अधिनियम, २०१५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एकशे ऐंशी दिवसांच्या कालावधीच्या आत असे प्रमाणपत्र सादर केले तर, या खंडान्वये, तो, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास निरर्ह ठरणार नाही. २०१६ चा महा. १९.

परंतु, आणखी असे की, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत सहायक आयुक्ताने असे प्रमाणपत्र देण्याविषयीच्या अर्जावर निर्णय घेतला नाही तर, असे प्रमाणपत्र देण्याविषयीचा अर्ज मंजूर केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार सहायक आयुक्त अर्जदारास असे प्रमाणपत्र देईल.".

प्रकरण तीन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १० ची सुधारणा.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १० मधील, पोट-कलम (१) मध्ये खंड (ज) नंतर पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"(के) जी व्यक्ती,—

(एक) तिच्या मालकीच्या घरात राहत असून, त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे; किंवा

(दोन) तिच्या मालकीच्या घरात राहत नाही आणि त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे किंवा तिच्या घरामध्ये असे शौचालय नाही मात्र ती सामुदायिक किंवा सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे.

असे प्रमाणित करणारे प्रभाग अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र तिने संबंधित महानगरपालिकेला सादर करण्यात कसूर केली आहे :

परंतु, कोणत्याही पालिका सदस्याने, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) अधिनियम, २०१५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एकशे ऐंशी दिवसांच्या कालावधीच्या आत असे प्रमाणपत्र सादर केले तर, या खंडान्वये, तो, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास निरर्ह ठरणार नाही. २०१६ चा महा. १९.

परंतु, आणखी असे की, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत प्रभाग अधिकाऱ्याने असे प्रमाणपत्र देण्याविषयीच्या अर्जावर निर्णय घेतला नाही तर, असे प्रमाणपत्र देण्याविषयीचा अर्ज मंजूर केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार प्रभाग अधिकारी अर्जदारास असे प्रमाणपत्र देईल.".

प्रकरण चार

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.

१९६५ चा महा. ४०. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १६ ची सुधारणा.

४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम १६ मधील, पोट-कलम (१) मध्ये खंड (ल) नंतर पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

"(म) जी व्यक्ती,—

(एक) तिच्या मालकीच्या घरात राहात असून, त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे ; किंवा

(दोन) तिच्या मालकीच्या घरात राहात नाही आणि त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे किंवा तिच्या घरामध्ये असे शौचालय नाही मात्र ती सामुदायिक किंवा सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे,

असे प्रमाणित करणाऱ्या संबंधित परिषदेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र तिने परिषदेला सादर करण्यात कसूर केली आहे :

२०१६ चा महा. १९. परंतु, कोणत्याही परिषद सदस्याने, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) अधिनियम, २०१५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एकशे ऐंशी दिवसांच्या कालावधीच्या आत असे प्रमाणपत्र सादर केले तर, या खंडान्वये, ती, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास निरर्ह ठरणार नाही .

परंतु, आणखी असे की, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत प्राधिकृत अधिकाऱ्याने असे प्रमाणपत्र देण्याविषयीच्या अर्जावर निर्णय घेतला नाही तर, असे प्रमाणपत्र देण्याविषयीचा अर्ज मंजूर केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार प्राधिकृत अधिकारी अर्जदारास असे प्रमाणपत्र देईल.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/31749
Reg. No. MCS /174/2016-18

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ७२] शुक्रवार, डिसेंबर १६, २०१६/अग्रहायण २५, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक १४५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

नगरविकास विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ डिसेंबर २०१६

अधिसूचना

महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, २०१५.

क्रमांक स्वमअ. २०१५/प्र. क्र. २५४/नवि. ३४.—महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) अधिनियम, २०१५ (महा. २०१६ चा १९) याच्या कलम १ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियम ज्या दिनांकास अंमलात येईल, तो दिनांक २ जानेवारी २०१७ असा नियम करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुधाकर शा. बोबडे,
शासनाचे उप सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 16th December 2016

NOTIFICATION

MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 2015.

No. SMA. 2015/CR-254/UD-34.—In the exercise of the powers conferred by sub-section (2) of section 1 of the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Fourth Amendment) Act, 2015 (Mah. XIX of 2016), the Government of Maharashtra hereby appoints the 2nd January 2017 to be the date on which the said Act shall come into force.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUDHAKAR D. BOBADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

प्रकरण ३

चिन्ह वाटप

चिन्ह वाटपाबाबत सर्वसाधारण सूचना

राज्य निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप आदेश, दिनांक- २० नोव्हेंबर, २००४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता पक्षांची नोंदणी आवश्यक केली. दि. ३१ मार्च, २००९ च्या आदेशानुसार याबाबत नव्याने एकत्रित आदेश दिले आहेत. त्यानुसार जे पक्ष राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करतील केवळ त्याच पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविताना चिन्ह राखून ठेवता येते किंवा चिन्ह वाटपामध्ये प्राधान्य मिळते. ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांची यादी राज्य निवडणूक आयोग वेळोवेळी प्रसिध्द करते. त्या यादीनुसारच चिन्ह वाटप करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत केवळ भारत निवडणूक आयोगाच्या पक्षांच्या यादीतील नावांच्या आधारे चिन्ह वाटप करण्यात येऊ नये. दिनांक १८/१०/२०१६ च्या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाने पक्षांची यादी व चिन्हे अधिसूचित केली आहेत. या यादीमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येते. प्रत्येक निवडणूकीच्या वेळी अद्ययावत यादी राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त करून घ्यावी. दिनांक १८/१०/२०१६ ते १२/०१/२०१७ या कालावधीत नोंदणी झालेल्या १२ पक्षांची यादी सोबत देण्यात आली आहे.

१. राज्य निवडणूक आयोगाने क्र.एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का-११, दिनांक ३१ मार्च, २००९ च्या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांना चिन्हाचे वाटप कशाप्रकारे करावे याबाबत आदेश दिले आहेत. तसेच राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/रापनों-२००९/प्र.क्र.४९/(भाग-२)/का-११,

दिनांक- २५/२/२०१३ च्या आदेशान्वये चिन्ह वाटपाबाबत जोडपत्र-१ व २ विहित केले आहे. चिन्ह वाटपाच्या संदर्भातील तरतुदी थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत:-

i. उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रामध्ये तो ज्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे त्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

ii. संबंधित राजकीय पक्षाने विहित कालावधीमध्ये उमेदवाराचे अधिकारपत्र व ते अधिकारपत्र सही करण्यास सक्षम असलेला अधिकारी कोण याबाबतची जोडपत्र १ व २, महानगरपालिका आयुक्त आणि संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निश्चित केलेल्या वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

iii राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेले राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय पक्ष तसेच इतर पक्ष यांनी उभे केलेले उमेदवार महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ दि. ३१.०३.२००९ च्या परिच्छेद ९ मधील अटी पूर्ण करीत असल्यास त्यांना त्यानुसार त्या पक्षाकरिता राखीव असलेले चिन्ह वाटप करता येईल किंवा चिन्ह वाटपामध्ये प्राधान्य मिळेल.

iv. बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये अमान्यताप्राप्त पक्षाद्वारे उभे करण्यात येणारे उमेदवार तसेच अपक्ष उमेदवार यांना चिन्ह वाटप करण्याबाबतची कार्यपध्दती राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.एसईसी-२००९/प्र.क्र.४९/का.११, दि.०४/०२/२०१२ अन्वये विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार एखाद्या पक्षाच्या "अ" जागेवरील उमेदवारास वाटप झालेले चिन्ह त्या पक्षाच्या त्या प्रभागातील अन्य जागांवरील उमेदवारांना देता येईल. तसेच प्रभागात निवडणूक लढविणाऱ्या सर्व अपक्ष उमेदवारांना वेगवेगळ्या चिन्हांचे वाटप होईल, याद्दष्टीने हे आदेश आहेत.

v. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या इतर पक्षांना मुक्त चिन्हांमधील त्यांनी मागणी केलेले एक चिन्ह प्राधान्याने देता येईल. (ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांना राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न केलेले पक्ष व अपक्ष उमेदवार यांच्यावर प्राधान्याने चिन्ह वाटप करण्यात येते.) याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी:-

(अ) जेथे एखाद्या मुक्त चिन्हाची मागणी केवळ एकाच नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवाराने केली असेल तेथे ते चिन्ह त्या उमेदवारास देण्यात येईल.

(ब) जेथे एखाद्या चिन्हाची मागणी दोन किंवा अधिक नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी केली असेल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठया टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

vi. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न झालेल्या राजकीय पक्षाच्या उमेदवारांना अपक्ष उमेदवार असल्याचे मानण्यात येईल. या अपक्ष उमेदवार यांना खालीलप्रमाणे चिन्ह वाटप करण्यात येईल.

(अ) जेथे एकापेक्षा जास्त उमेदवारानी एकाच मुक्त चिन्हाची मागणी केली असेल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठया टाकून कोणत्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

(ब) काही प्रसंगी पक्षाकडून उमेदवारांना पक्षाचा अधिकृत उमेदवार निश्चित करण्याबाबतचे नमुने एकापेक्षा अधिक उमेदवारांना देण्यात येतात अशा वेळी-

(i) जर नमुन्यांमध्ये एका उमेदवारास मूळ उमेदवार व दुस-या उमेदवारास डमी उमेदवार असल्याचा उल्लेख असेल अथवा तशा आशयाचे पत्र पक्षाच्या नमुना-२ सही करण्यास सक्षम असणाऱ्या व्यक्तीने दिले असेल अशा वेळी त्या मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र वैध ठरल्यास त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार गृहित धरावे. अशा परिस्थितीत डमी उमेदवार अपक्ष उमेदवार समजण्यात येईल. मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास डमी उमेदवार हा पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल.

(ii) जर पक्षातर्फे मूळ उमेदवार म्हणून दोघांना विहित नमुने देण्यात आले असतील व त्यापैकी कोणता उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार राहील याबाबत नामनिर्देशनपत्र भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत निश्चित केलेल्या वेळेत पक्षाकडून कोणतेही सूचनापत्र देण्यात आले नसेल तर ज्या उमेदवाराचे नामनिर्देशन प्रथम प्राप्त झाले असेल त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून गृहीत धरण्यात यावे.

२. राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्रमांक-एसईसी-२००९/सीआर-४९/का-११, दिनांक ५/२/२०१२ अन्वये एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांची नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास करावयाची कार्यवाही विहित केली आहे. त्यानुसार उचित कार्यवाही करावी.

३. राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना नामनिर्देशनपत्र भरावयाच्या शेवटच्या दिवशी त्यासाठी विहित वेळेपर्यंत किंवा त्यापूर्वी प्राप्त झाली पाहिजे. पक्षाने एकापेक्षा

जास्त उमेदवारांना "ए" व "बी" फॉर्म दिले असल्यास राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१९/का-५, दिनांक ६ जानेवारी, २००७ नुसार कार्यवाही करावी. राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक-रानिआ/रापनों-२००९/प्र.क्र.४९/(भाग-दोन)/का-११, दिनांक २५/२/२०१३ अन्वये सुधारित आदेश निर्गमित केले आहेत.

४. वैधरित्या नामनिर्देशित झालेली उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवार आपली उमेदवारी मागे घेण्याबाबतची लेखी सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांना नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत देऊ शकतात अशी सूचना उमेदवार स्वत: त्याचे सूचक व अनुमोदक अथवा उमेदवारांना प्राधिकृत केलेली व्यक्ती आणून देऊ शकतो. निवडणूक निर्णय अधिकारी अशी लेखी सूचना मिळाल्यानंतर त्याचा खरेपणा पडताळून व अशी सूचना आणून देणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवून त्याची प्रत सूचना फलकावर लावतील.

५. राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.४/का.११, दि.२०/१०/२०१६ अन्वये राजकीय पक्षांनी सादर करावयाचे अहवाल, विवरणपत्र इ. विहित केलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२,

दिनांक ३१ मार्च २००९

आदेश

महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९.

भारतीय संविधानाच्या भाग नऊ व नऊ (अ) अनुसार गठित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक चिन्हांचे आरक्षण व वाटप व इतर अनुषंगिक बाबींविषयीचे आदेश.

क्रमांक एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का. ११.—ज्याअर्थी, भारताच्या संविधानाने राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील पंचायती व नगरपालिकांच्या निवडणुका घेणे व अशा निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे, पारदर्शकतेने आणि प्रभाविपणे पार पाडण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांना चिन्हांचे विनिर्देश, आरक्षण, निवड व वाटप यासंबंधी व इतर अनुषंगिक बाबींची तरतूद करणे आवश्यक झाल्यामुळे; राज्य निवडणूक आयोगाने, आदेश क्रमांक एसईसी/जीइएन. २०००/सीआर-६०/का-१०, दिनांक २९ सप्टेंबर २००६ रोजी निर्गमित केलेले, महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण वाटप) आदेश, २००६ अन्वये (त्या आदेशात वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार) राज्यातील पंचायती व नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी निवडणूक चिन्हांचे आरक्षण व वाटप याबाबत आणि त्यासंबंधी इतर तरतुदी केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर आदेशामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, आता, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-२४३ के व २४३ झेडए व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम ९अ व महाराष्ट्र जिल्हा परिषद (निर्वाचक गट व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ (१) व महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ (१), मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई तीन) च्या कलम १८-ए चे पोट-कलम (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ चे पोट-कलम (४), नागपूर शहर महानगरपालिक अधिनियम, १९४८ (१९५० चा सी.पी. एन्ड बेरार २) च्या कलम ९ ब चे पोट-कलम (४) व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम १०-ए चे पोट-कलम (४) महाराष्ट्र नगर परिषद व नगरपंचायत निवडणूक नियम, १९६६ च्या नियम १६ चे पोट-नियम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व याबाबत सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचे व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकी संबंधीचे आरक्षण व चिन्हांचे वाटपासंबंधीचे अगोदरचे सर्व आदेश अधिक्रमित करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र याद्वारे खालील आदेश देत आहे.——

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ती व प्रारंभ.**—— (१) या आदेशास महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ असे म्हटले जाईल.

(२) त्याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर राहील व जिल्हा परिषदा, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकांना तो लागू राहील.

(३) सदर आदेश **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून अंमलात येईल.

२. **व्याख्या व निर्वाचन.**—— या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "आयोग" म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये गठित राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र ;

(२) "निर्वाचन क्षेत्र" म्हणजे जिल्हा परिषदेचा मतदार गट, पंचायत समितीचा मतदार गण व महानगरपालिकेचा, नगरपरिषदेचा किंवा यथास्थिती नगरपंचायतीचा प्रभाग ;

(३) "लढविण्यात येणारी निवडणूक" म्हणजे ज्या निवडणुकीत जिल्हापरिषद मतदार गट, पंचायत समिती मतदार गण व महानगरपालिका, नगरपरिषद किंवा नगरपंचायतीचा प्रभाग जेथे सार्वत्रिक अथवा पोट-निवडणुकांसाठी मतदान घेण्यात येते अशी निवडणूक ;

(४) "निवडणूक" म्हणजे सार्वत्रिक निवडणूक किंवा पोट-निवडणूक ज्यास हे आदेश लागू आहेत ;

(५) "सार्वत्रिक निवडणूक" म्हणजे हा आदेश लागू झाल्यानंतर राज्यात जिल्हा परिषदा, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद किंवा नगरपंचायती स्थापन करण्याच्या प्रयोजनाकरिता घेतलेली कोणतीही सार्वत्रिक निवडणूक ;

(६) "स्थानिक स्वराज्य संस्था" म्हणजे,—

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये गठित जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती ;

(ब) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये गठित नगरपरिषद किंवा नगरपंचायत ;

(क) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अन्वये गठित मुंबई महानगरपालिका ;

नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये गठित नागपूर महानगरपालिका ; किंवा

(इ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये गठित करण्यात आलेली कोणतीही महानगरपालिका ;

(७) "मान्यताप्राप्त राजकीय पक्ष" म्हणजे भारत निवडणूक आयोगाद्वारे काढण्यात आलेल्या निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८, आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा अन्वये राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेला आणि तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविण्यात आलेला राष्ट्रीय पक्ष किंवा राज्यस्तरीय पक्ष ;

(८) "नोंदणीकृत राजकीय पक्ष" म्हणजे आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेला भारतीय नागरिकांचा संघ/समूह.

(९) या आदेशात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व वाक्यप्रयोग यांना राज्यातील सध्या अस्तित्वात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमात किंवा त्याअन्वये तयार केलेल्या नियमाद्वारे जे अर्थ दिले असतील तेच अर्थ प्राप्त होतील.

३. **चिन्हांचे वाटप.**—— लढविण्यात येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला या आदेशातील तरतुदींनुसार चिन्हाचे वाटप करण्यात येईल, व एकाच स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविणाऱ्या वेगवेगळ्या उमेदवारांना वेगवेगळ्या चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

४. **चिन्हांचे वर्गीकरण.**—— (१) या आदेशाच्या प्रयोजनार्थ चिन्हे आरक्षित असतील किंवा मुक्त असतील.

(२) या आदेशात अन्यथा तरतूद असेल त्या व्यतिरिक्त आरक्षित चिन्ह हे मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत उमेदवारासाठी आरक्षित असेल.

(३) आरक्षित चिन्हांव्यतिरिक्त इतर चिन्हे ही मुक्त चिन्हे असतील.

५. **नोंदणीकृत राजकीय पक्षाचे वर्गीकरण.**—— या आदेशाच्या प्रयोजनांकरिता व आवश्यकतेनुसार आयोग विनिर्दिष्ट करील अशा इतर प्रयोजनांकरिता राजकीय पक्ष हा मान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष असेल.

ह्या आदेशांच्या प्रयोजनांकरिता "अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष" याचा अर्थ, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाव्यतिरिक्त, आयोगाकडे नोंदविण्यात आलेला कोणताही पक्ष असा आहे.

६. **राष्ट्रीय पक्ष आणि राज्य पक्ष यांच्यातर्फे उभ्या केलेल्या उमेदवारांसाठी चिन्हांची निवड व वाटप.**—— (१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीला मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षाद्वारे उभा करण्यात आलेल्या उमेदवारास भारत निवडणूक आयोगाद्वारे त्या पक्षाकरिता आरक्षित केलेल्या चिन्हाची निवड करता येईल व त्याचे त्यांना वाटप करण्यात येईल आणि इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

(२) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीला मान्यताप्राप्त राज्य पक्षाद्वारे उभ्या करण्यात आलेल्या उमेदवारास, जरी तो पक्ष राज्यातील पक्ष असो किंवा नसो, भारत निवडणूक आयोगाद्वारे त्या पक्षाकरिता आरक्षित केलेल्या चिन्हांची निवड करता येईल व त्याचे त्यांना वाटप करण्यात येईल आणि इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

परंतु असे की, महाराष्ट्र राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यताप्राप्त असलेल्या पक्षास त्यांच्याकरिता आरक्षित असलेले चिन्ह देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, जर महाराष्ट्र राज्याबाहेरील एकापेक्षा अधिक राज्यांतील मान्यताप्राप्त राज्य पक्षांकरिता विविध राज्यात समान चि[illegible] आरक्षित करण्यात आली असतील तर राज्य निवडणूक आयोग अशा राज्य पक्षांपैकी ज्या पक्षाचा, महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ च्या परिच्छेद ३ नुसार नोंदणीसाठी अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडे प्रथम प्राप्त झाला असेल, फक्त त्याच पक्षाला त्या आरक्षित चिन्हांचे वाटप करील व त्यानंतर नोंदणी अर्ज करणाऱ्या इतर राज्य पक्षांना त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या चिन्हांव्यतिरिक्त इतर चिन्हांचे वाटप करील.

(३) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कोणत्याही निवडणुकीत, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाद्वारे निवडणुकीला उभा करण्यात आलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त कोणत्याही इतर उमेदवारास, जरी अशा निवडणुकीत अशा पक्षाद्वारे निवडणुकीली उमेदवार उभा केला नसेल तरी अशा पक्षाकरिता आरक्षित करण्यात आलेल्या चिन्हांची निवड करता येणार नाही किंवा वाटप केले जाणार नाही.

७. **पूर्वी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष असलेल्या व आता अमान्यताप्राप्त असलेल्या पक्षांनी उभ्या केलेल्या उमेदवारांना चिन्ह वाटपासंदर्भात द्यावयाची सवलत.**—— जर एखादा पक्ष आता अमान्यताप्राप्त पक्ष असेल, तथापि निवडणुकीच्या तारखेच्या घोषणेपूर्वी ६ वर्षे अगोदर असा पक्ष राष्ट्रीय किंवा महाराष्ट्रातील राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त होता अशा पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांना जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकांमध्ये, त्या पक्षास, तो पक्ष ज्यावेळी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त पक्ष होता, त्यावेळी जे चिन्ह आरक्षित केलेले होते, त्या पक्षाचे चिन्ह राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या मुक्त चिन्हांच्या यादीमध्ये नसले तरी ते चिन्ह आरक्षित करण्याबाबतची सवलत खालील अटीच्या पूर्ततेनंतर देता येईल :—

(क) राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यापासून एका आठवड्याच्या आत अशा पक्षाने त्यांच्यातर्फे उभ्या करण्यात येणाऱ्या उमेदवारांना आरक्षित चिन्ह मिळावे म्हणून आयोगाकडे अर्ज सादर केलेला असावा.

(ख) अशा उमेदवाराने त्यांच्या नामनिर्देशन पत्रामध्ये तो संबंधित पक्षातर्फे उभा असल्याबाबतची घोषणा केलेली असून, तसे हा आदेशाच्या परिच्छेद ९ मधील तरतुदींची पूर्तता केलेली असावी.

(ग) अशाप्रकारे चिन्ह वाटप करण्याकरिताची विनंती अमान्य करण्यासाठी कोणतेही संयुक्तिक कारण नाही, असे राज्य निवडणूक आयोगाचे मत असेल :

परंतु उपरोक्त परिच्छेदामध्ये काहीही नमूद असले तरी, यापूर्वीच एखाद्या राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पक्षासाठी चिन्ह राखीव ठेवण्यात आले असेल, तर या परिच्छेदातील तरतुदी लागू होणार नाहीत.

८. **नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे उभ्या केलेल्या उमेदवारांद्वारे किंवा इतर उमेदवारांद्वारे चिन्हांची निवड व चिन्ह वाटप.**— (१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीस मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी उभ्या केलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त उभ्या राहिलेल्या कोणत्याही उमेदवारास या परिच्छेदात यानंतर नमूद केलेल्या तरतुदीनुसार, आयोगाद्वारे मुक्त चिन्हे म्हणून विनिर्दिष्टित केलेल्या चिन्हांपैकी एका चिन्हाची निवड करता येईल व त्यानुसार वाटप करण्यात येईल.

(२) अशा निवडणुकीत एका उमेदवाराद्वारे जर एका मुक्त चिन्हाची निवड करण्यात आली, तर निवडणूक निर्णय अधिकारी/निवडणूक अधिकारी यांनी त्या चिन्हाचे उमेदवारास वाटप करावे व इतर चिन्ह देऊ नये.

(३) जर अशा निवडणुकीत अनेक उमेदवारांद्वारे एकाच मुक्त चिन्हाची निवड करण्यात आली आणि जर या अनेक उमेदवारांपैकी केवळ एक उमेदवार नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे उभा केला असेल आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास देईल आणि इतर कोणासही नाही. जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा अधिक नोंदणीकृत राजकीय पक्षाचे उमेदवार असतील आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यायचे ते ठरवील आणि ज्या उमेदवारांची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही नाही.

९. **एखाद्या उमेदवारास नोंदणीकृत राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे केव्हा समजले जाईल.**— या आदेशाच्या प्रयोजनार्थ एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे तेव्हा समजले जाईल जेव्हा,—

(१) उमेदवारानी त्याबाबत नामनिर्देशनपत्रात तशी घोषणा केलेली असेल तर,

(२) (अ) संबंधित मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास व संबंधित जिल्हाधिकाऱ्यास किंवा यथास्थिती महानगरपालिका आयुक्ताना तशी लेखी सूचना देण्यात आलेली असेल,—

(एक) उक्त लेखी सूचना ही महाराष्ट्र जिल्हा परिषद निर्वाचक विभागाच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी विहित केलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद (निर्वाचक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ नुसार विहित केलेल्या नमुना "दोन अ" व "दोन ब" नुसार पाठविण्यात यावी ;

(दोन) उक्त लेखी सूचना ही पंचायत समिती निर्वाचक गणाच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ विहित केलेल्या महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ नुसार विहित केलेल्या नमुना "दोन अ" व "दोन ब" नुसार पाठविण्यात यावी ;

(तीन) महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायती यांच्या निवडणुकीच्या बाबतीत उक्त लेखी सूचना व सूचनापत्र जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती महानगरपालिका आयुक्त यांना जोडपत्र एक व जोडपत्र दोन मध्ये विनिर्दिष्टित केल्याप्रमाणे पाठविण्यात यावी.

(ब) उक्त सूचनापत्रावर, पक्षाच्या अध्यक्ष, सचिव किंवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्याने, शाईने अथवा बॉलपेनने स्वाक्षरी केलेली असेल. अशा सूचना पत्रावर प्रतिरूप सही असलेली अगर रबर स्टॅम्पची सही असलेली अगर अन्य प्रकारे सही असलेले चालणार नाही. तसेच फॅक्सने अगर अन्य प्रकारेही सूचनापत्र पाठविता येणार नाही. अशा कुठल्याही अन्य प्रकाराने पाठविण्यात आलेली सूचनापत्रे जिल्हाधिकारी अगर निर्वाचन अधिकारी यांनी स्वीकारू नये ;

१०. **चिन्हांची सूची असलेली अधिसूचना.**— आयोग, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या, एक किंवा अधिक अधिसूचनाद्वारे खालील माहिती विनिर्दिष्टित करील.—

(अ) राष्ट्रीय पक्ष

(ब) राज्यस्तरीय पक्ष

(क) इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष आणि त्यांच्यासाठी राखून ठेवलेली चिन्हे

(ड) मुक्त चिन्हांची यादी.

११. **सूचना देण्याचे आयोगाचे अधिकार.**— आयोग खालील बाबतीत सूचना व निदेश देऊ शकेल :—

(अ) या आदेशातील कोणत्याही तरतुदी बाबतच्या स्पष्टीकरणाकरिता ;

(ब) अशा कोणत्याही तरतुदीची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात उत्पन्न झालेल्या कोणत्याही अडचणी दूर करण्याकरिता ;

(क) निवडणूक चिन्हे आरक्षित ठेवणे व राजकीय पक्षांना त्यांचे वाटप करणे या संबंधात ह्या आदेशात तरतूद करण्यात आली नसेल किंवा करण्यात आलेली तरतूद अपूर्ण असेल तेव्हा ; आणि निवडणुका सुरळीत व सुस्थितीत पार पाडण्यास आयोगास आवश्यक वाटतील अशा योग्य त्या तरतुदी करणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत झाल्यास.

STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Opposite Mantralaya,
Madam Cama Road, Mumbai 400 032.
Dated the 31st March 2009.

Order

MAHARASHTRA ELECTION SYMBOLS (RESERVATION AND ALLOTMENT) ORDER, 2009.

An order to provide for reservation and allotment of symbols for the elections to Panchayats and Municipalities constituted under Part-IX and IX-A of the Constitution of India.

No. SEC/RPP-2009/CR-49/D-11.—Whereas, the superintendence, direction and control of all elections to the Panchayats and Municipalities in the State are vested in the State Election Commission, Maharashtra by the Constitution of India ;

And whereas, in the interest of holding elections to the Panchayats and Municipalities in the State and Conduct of such elections in free, fair, transparent and effcient manner, it was expedient to provide for certain matters incidental to the specification, reservation, choice and allotment of symbols for political parties and for matters connected therewith and therefore; the State Election Commission, Maharashtra by it's Order No. SEC/GEN-2000/CR-60/D-10, dated the 29th September 2006 as amended form time to time, made certain provisions with regard to reservation and allotment of symbols for the elections to the Panchayats and Municipalities ;

And whereas, the Commission is satisfied that it is expedient to amend the said Order ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Article 243-K and 243-ZA of the Constitution of India, read with section 9A of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) and sub-rule (*1*) of rule 15A of the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions and Conduct of Elections) Rules, 1962 and sub-rule (*1*) of rule 15A of the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Elections) Rules, 1962 sub-section *(4)* of Section 18A of the Mumbai Municipal Corporation Act, 1888 (Bom. III of 1888), sub-section (*4*) of Section 14 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LLX of 1949), sub-section *(4)* of section 9B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C. P. and Berar II of 1950) and sub-sections *(4)* of section 10A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965, read with sub-rule (*1*) of rule 16 of the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayats Election Rules, 1966 and of all other powers enabling it in this behalf and in supersession of it's all previous orders' regarding the reservation and allotment of symbols in the elections to the Zilla Parishads, Panchayat Samitis, Municipal Corporations, Municipal Councils and Nagar Panchayats in the State, the State Election Commission, Maharashtra, hereby makes the following order :—

1. **Short title, extent, application and commencement.**—(1) This Order may be called the Maharashtra Election Symbols (Reservation and Allotment.) Order, 2009.

(2) It extends to whole of the State of Maharashtra and applies in relation to elections to Zilla Parishads, Panchayat Samitis, Municipal Corporations, Municipal Councils and Nagar Panchayats.

(3) It shall come into force on the date of it's publication in the *Official Gazette.*

2. **Definitions and Interpretation.**—In this Order, unless the context, otherwise requires,—

(1) " commission " means the State-Election Commission, Maharashtra constituted under Article 243-K and 243-ZA of the Constitution of India ;

(2) " constituency " means an electoral division of the Zilla Purishad, electoral college of the Panchayat Samiti, ward of the Municipal Corporation, the Municipal Council or the Nagar Panchayat, as the case may be ;

(3) " contested election " means an election or bye-election in an electoral division of the Zilla Palrishad, electoral college of the Panchayat Samiti, ward of the Municipal Corporation, the Municipal Council or the Nagar Panchayat where poll is taken ;

(4) " **election** " means general election or bye-election to which this Order applies ;

Government only after the issuance of a notification under section 15 of the Act. At no point of time prior to the issuance of the notification can the Election Commission issue any direction to any authority, it is argued. In N. P. Punnuswami's case (supra) the Constitution Bench, quoted with approval, the following passage from Halsbury's Laws of England Edition 2, volume 12 under the heading "Commencement of the Election",— "Although the first formal step in every election is the issue of a writ the election is considered for some purpose to begin at an early date. It is a question of fact in each case when an election begins in such a way as to make the parties concerned responsible for breaches of election law, the test being whether the contest is 'reasonably imminent'. Neither the issue of the writ nor the publication of the notice of election can be looked to as fixing the date when an election begins from this point of view. Nor, again, does the nomination day afford any criterion. The election will usually begin at least earlier than the issue of the writ. The question when the election begins must be carefully distinguished from that as to when 'the conduct and management of' an election may be said to begin. Again, the question as to when a particular person commences to be a candidate is a question to be considered in each case." The 'writ' mentioned therein, according to us, can be the notification, contemplated by section 15 of the Act. The conduct and management of the election may start from the date of issue of notification, but it is to be considered that the election begins earlier to the date of the notification. Parties to the election will begin their activities prior to the date of notification. It can safely be held that such activities will begin from the date of announcement of the date by the Election Commission. Activities of parties during the time log between the date of announcement and the date of publication of the notification, should necessarily have effect in the ensuing election. Actions resorted to by the parties during this period may tend to influence the electorate. Are such actions of the candidates to be curbed by the Election Commission? In Halbury's Laws of England, Fourth Edition, volume, 15 under the heading, "684. Meaning of 'candidate." it is observed that a candidate may be guilty of bribing or treating and election expenses may be incurred on his behalf even though the bribery or treating takes place, or expenses are incurred, before he comes within the statutory definition of candidate. One becomes a candidate only on filing the nomination pursuant to the notification, but law states that his actions prior to his becoming a candidate within the statutory definition are also to be taken note of for deciding the issue as to whether he is guilty of the offence under the election law. In paragraph, 712 of the same book, it is observed that a person can incur election expenses before he has been formally adopted by a party as a candidate. An election has been held to begin for the purpose of election expenses at periods varying from four months to thirty months before the date of the poll. It states,.—— "The necessity for determining when an election begins has been criticised on the ground that the real test laid down by the statute is not one of time but of motive; expenditure must be in reference to the conduct or management of the election. As the statute expressly recognises that election expenses may be incurred before the election, it seems that the real issue in the cases considered above was the date when a particular candidate began the conduct or management of the election. This date might, at the same election, be different for different candidates." As per this, it is crystal clear that the conduct and management of election cannot be decided with reference to the date of notification of the election. It can apply to the conduct and management of the election anterior to the date of notification. It is the common case that Election Commission is duty bound to ensure free and fair election. For the said purpose, Election Commission is clothed with the powers emanating from Article 324 of the Constitution. According to their lordships of the Supreme Court 'A.I.R. 1978 Supreme Court 851), Constitution has made comprehensive provision in Article 324 to take care of surprise situations. Their lordships observed, — "The Constitution contemplates a free and fair election and vests comprehensive responsibilities of superintendence, direction and control of the conduct of elections in the Election Commission. This responsibility may cover powers, duties and functions of many sorts, administrative or other, depending on the circumstance." Goswami, J. in his concurring judgment in that decision observed,- "The Commission may be required to cope with some situation which may not be provide for in the enacted laws and the rules. That seems to be the raison d' etre for the opening clause in Article 327 and 328 which leaves the exercise of powers under. Article 324 operative and effective when "it is reasonably called for in a vacuous area. There is, however, no doubt whatsoever that the Election Commission will have to conform to the existing laws and rules in exercising its powers and performing its manifold duties for the conduct of free and fair elections." In A. Neelalohithadasan Nadar v. George Mascrene, 1994 Supp (2) Supreme Court Cases 619 their lordships stated that the principle of purity of election must have its way. The Election Commission is not only to see that free and fair election is to be held, but the purity of election should also be observed. What is a meant by purity

of election?According to us, it means the election should not only be free from corrupt practices but also free from evil practices. In Ghasi Ram v. Dal Singh, A.I.R. 1968 Supreme Court 1191, Hidayatullah, J., (as his lordship then was), observed, — "Election is something which must be conducted fairly. To arrange to spend money on the eve of elections in different constituencies, although for general public good, is when all is said and done an evil practice, even if it may not be corrupt practice. The dividing line between an evil practice and a corrupt practice is a very thin one. It should be understood that energy to do public good should be used not on the eve of elections but much earlier and that even slight evidence might change this evil practice into corrupt practice. Payments from discretionary grants on the eve of elections should be avoided." From this statement of law, it is evident that activities on the eve of election should also be for the conduct of a free and fair election. "Eve of election" can only be the period prior to the date of notification of election. By the date of notification, the process of election starts. It is not with reference to the date after process of commencement of election, their lordships referred to the period 'on the eve of election'. So, according to us, during the eve of election also, the Election Commission should ensure that nothing which tends to interfere with the conduct of free and fair election, takes place. Viewed in this light, we are of the considered view that Election Commission should take necessary steps for conduct of free and fair election even before the date of the issue of the notification. Petitioner has no case that Election Commission acted against any statutory provision. Their action in directing the Government to follow model code of conduct did not amount to issuing direction to act against any provision of law. When it is seen that the Election Commission has been entrusted with the responsibility to have a free and fair election which should be pure, and the source of their power is Article 324 of the Constitution, we are clear in our mind that the action taken by them in issuing Annexure p-5 is not at all illegal or arbitrary. The existence of political parties and their participation in election cannot be denied by any one. In the present democratic system prevailing in India, political parties play a vital role in the administration of the country. Leaders of the political parties, in their wisdom, evolved a model code of conduct, to be followed by them in election. That was so framed by them under the auspices of the Election Commission. That code does not contain any provision contrary or derogatory to any enactment. Such a code of conduct when it is seen that it does not violate any of the statutory provisions, can certainly be adopted by the Election Commission for the conduct of free and fair election which should be pure as well. On the eve of election, political parties or candidates may come forward with tempting offers to the electorate to win their favour. If such a course is allowed to be resorted to by the parties or the candidates contesting the elections, it will certainly undermine the purity of elections. In such a situation, if Election Commission took steps to implement the code of conduct which in no way infringes any of the laws, this Court, in exercise of the powers under Article 226 of the Constitution, is not to interfere. Election Commission has not taken any step to prevent activities of the party which is in power during the period prior to the date of announcement of the election. Knowing the situation, Election Commission announced the election more than three weeks prior to the issuance of the notification under section 15 of the Act. This period of three weeks is to apprise the political parties of the ensuing elections, for enabling them to prepare for the election. The said period intervening between the date of announcement and date of notification, is not at all unreasonable. During the short period preceding the notification, the Election Commission compels the political parties, the party in power and the candidates to behave in a manner which will not undermine conduct of free and fair election. On the basis of the observations made by the Supreme Court regarding payments from the discretionary grants at the disposal of the Ministers on the eve of election, Election Commission suggested law to be passed on the issue. Government of India, after considering that suggestion, took a decision that instead of making provisions in the rules regulating the disbursements from the discretionary grants, a convention should be adopted that for a period of three months immediately prior to the polling no expenditure should ordinarily be incurred from the Ministers' discretionary grants. So also, the Government of India in their communication dated October 28, 1969, took the view that instead of making any specific provision in the rules regulating disbursement from discretionary grants, a convention should be evolved that for a period of three months immediately prior to the polling, no expenditure should ordinarily be incurred from a Minister's discretionary grant. These decisions taken by the Government show that Government was inclined to have conventions on these matters and not to have statutory provisions. In such a situation, the action on the part of the Election Commission in directing Governments to follow the model code of conduct adopted by the various national parties appears to be quite legal and proper. Election Commission has categorically stated that they have not interfered with the day

to day decisions of the State Government. They only wanted officers connected with election to be retained as their respective places. They also wanted to ensure the conduct of free and fair election without interference by officers as well. If permanent executives of the State took into their heads that some of the actions which the political executive wanted to implement, as violative of directions given by the Election Commission, the Election Commission cannot be faulted. No direction of the Election Commission having the effect of interfering with the day to day decisions of the Government, has been brought to our notice either. In such a situation, we are not in a position to find any illegality in the action resorted to by the Election Commission. In view of what has been stated above, we are clear in our mind that the Election Commission are entitled to take necessary steps for the conduct of a free and fair election even anterior to the date of issuance of notification, from the date of announcement of the election. While doing so, the model code of conduct adopted to be followed by all political parties including the political party in Government, can be directed to be followed by the Election Commission. Action of the Commission in this regard cannot be faulted, for the said model code of conduct adopted by the political parties does not go against any of the statutory provisions. It only ensures the conduct of a free any fair election which should be pure. Writ petition fails. It is accordingly dismissed.

Sd/-

K. SREEDHARAN, CHIEF JUSTICE.

Sd/-

May 27, 1997

SWATANTER KUMAR, JUDGE.

परिशिष्ट-३

आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी विविध बाबींच्या अनुषंगाने सूचनांचे संकलन

भाग—एक

सर्वसाधारण वर्तणूक

१. **धार्मिक तणाव**—कोणताही पक्ष अथवा उमेदवार, वेगवेगळया जाती आणि धार्मिक किंवा सामाजिक गट यांच्यामध्ये मतभेद होणारी किंवा त्यांच्यामध्ये ज्यामुळे परस्परांमध्ये द्वेष किंवा तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करणार नाही.

२. **प्रतिस्पर्ध्यांवरील टीका**—इतर राजकीय पक्षांवर टीका करण्यात येईल तेव्हा ती पक्षांची धोरणे किंवा कार्यक्रम, त्यांचे पूर्वीचे कार्य यांच्यापुरती मर्यादित असेल. पक्षाच्या नेत्यांच्या किंवा कार्यकर्त्यांच्या सार्वजनिक कामांशी संबंधित नसलेल्या, खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करण्यापासून, पक्ष आणि उमेदवार दूर राहतील. बिनबुडाचे आरोप आणि विपर्यस्त माहिती यांच्या आधारावर पक्ष आणि त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका केली जाणार नाही.

राजकीय पक्ष आणि उमेदवारांना एखाद्या व्यक्तीची राजकीय मते वा कामे कितीही नापंसत असली तरी आपापल्या घरात शांत आणि स्वस्थ जीवन जगण्याचा प्रत्येक माणसाच्या अधिकारांचा आदर केला जाईल. लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शन करणे किंवा धरणे देणे या उपायांचा कोणत्याही परिस्थितीत अवलंब केला जाणार नाही.

३. **प्रार्थना स्थळांचा वापर**—मते मिळविण्याकरिता धर्म, जात यांना आवाहन केले जाणार नाही. कोणत्याही धर्माच्या प्रार्थनास्थळांचा निवडणूक प्रचाराचे व्यासपीठ म्हणून वापर केला जाणार नाही. तसेच कोणत्याही निवडणूक कामासाठी वापरता येणार नाहीत. विशिष्ट जाती, धर्मांच्या सभा घेण्यात येऊ नये.

४. **मतदारांना प्रलोभन /धाक**—मतदारांना लाच देणे, वस्तूंचे वाटप करणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, मतदारांची तोतयेगिरी, मतदान केंद्राजवळच्या २०० मीटर्स क्षेत्रामध्ये प्रचार करणे, या बाबी कारवाईस पात्र ठरतील. मतदानापूर्वी जाहीर प्रचार बंद करण्यासंबंधी तरतुदींचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहतुकीची आणि वाहनांची व्यवस्था करणे यासारख्या "भ्रष्टाचाराच्या" आणि निवडणूक कायद्यांतर्गत गुन्हा समजल्या जाणाऱ्या गोष्टी सर्व पक्ष आणि उमेदवार कटाक्षाने टाळतील. सोशल मिडीया, इलेक्ट्रॉनिक मिडीया / प्रिंट मिडीयाचा वापर करुन प्रलोभने किंवा लाच देता येणार नाही. कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी यांनी संपूर्ण आचारसंहितेच्या काळात दारुचे वाटप करु नये.

५. **खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागांवर बॅनर / फलक लावण्याबाबत**—कोणताही राजकीय पक्ष वा उमेदवार ध्वजदंड उभारण्यासाठी, फलक टांगण्यासाठी, सूचना चिटकविण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी वगैरे कोणत्याही व्यक्तीच्या जमीन, इमारत, कुंपण इत्यादींचा त्याच्या मालकाच्या परवानगीशिवाय वापर करणार नाही. तसेच यासंदर्भात संबंधित महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी कार्यालय अथवा आवश्यकतेनुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडूनही परवानगी आवश्यक असेल. (महाराष्ट्र मालमत्ता विरुपन प्रतिबंध अधिनियम, १९९५ चे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. सदर अधिनियमाचे उल्लंघन केल्यास सदर अधिनियमातील कलमांनुसार संबंधीतांवर कारवाई करणे)

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या असलेल्या जागांवर निवडणूक प्रचाराचे बॅनर / फलक लावण्याकरिता परवानगी घ्यावी किंवा कसे याबाबत संबंधित महानगरपालिका आयुक्त / मुख्याधिकारी / जिल्हाधिकारी यांनी निर्णय घेणे आवश्यक आहे. अशा ठिकाणी निवडणूक प्रचाराचे फलक / बॅनर लावण्यास परवानगी द्यावयाची असल्यास सर्व उमेदवार अथवा राजकीय पक्षांना समान व न्याय्य पद्धतीने त्याचे वाटप करता येईल. कोणत्याही उमेदवारास / पक्षास झुकते माप दिले जाणार नाही याची खबरदारी घेऊन आवश्यक तर सोडत पद्धतीने असे वाटप करण्यात यावे.

भाग—दोन

सत्तारुढ पक्ष

१. **राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घोषित केल्यापासून कोणतेही मंत्री, अथवा इतर प्राधिकारी यांनी,—**

(क) कोणत्याही प्रकारची वित्तीय अनुदान देण्याची किंवा ती देण्याबाबतची अभिवचने घोषित करता कामा नयेत.

(ख) कोणत्याही प्रकारचे प्रकल्प किंवा योजना यांच्या कोनशिला बसवता कामा नयेत,

(ग) रस्त्यांचे बांधकाम करण्याची किंवा पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादींसाठी तरतूद करण्याबाबत कोणतेही अभिवचन देता कामा नये,

(घ) शासन, सार्वजनिक उपक्रम तथा स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीमध्ये कोणत्याही नवीन अधिकारी, कर्मचारी यांच्या नियुक्त्या करता कामा नये. तसे केल्यास सत्तारुढ पक्षाच्या बाजूने मतदारांवर प्रभाव पाडल्यासारखे होईल.

२. घोषणा व जाहिराती—वित्तीय अनुदान किंवा इतर कल्याणकारी योजना घोषित करण्याच्या संबंधात निवडणूक आचारसंहितेत वर उध्दृत करण्यात आल्याप्रमाणे सर्व मनाई आदेश हे निवडणुका घोषित करण्यात आल्यानंतरच लागू होतील याची आयोगाला जाणीव आहे. तथापि, केंद्रातील आणि महाराष्ट्रातील व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तारुढ पक्षांनी निरनिराळ्या प्रकारच्या कल्याणकारी योजना आणि इतर सवलतींची घोषणा करुन, तसेच सार्वजनिक पैशांतून मुद्रित होणाऱ्या किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यम इत्यादीद्वारे केंद्रात आणि राज्यातील शासनाची कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणून देऊन शासन पुरस्कृतरितीने आपल्या पक्षाचा प्रचार वाढविण्यासाठी अधिकाराचा वापर करण्यास बंदी राहील.

जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडीयाद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहीराती देता येणार नाहीत. मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी वृत्तपत्रांमधून तसेच प्रसार माध्यमांद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहीराती देण्यात येणार नाहीत याची खबरदारी सर्व उमेदवार व राजकीय पक्षांनी घ्यावी.

३. जात, धर्म, जमात किंवा भाषा याच्या आधारे आचारसंहिता कालावधीत अधिवेशने घेता येणार नाहीत.

भाग—तीन

राजकीय पक्ष/उमेदवार यांच्यासंबंधीत

१. इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे प्रचार करणेबाबत—राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ६ जानेवारी २००९ च्या आदेशानुसार इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे कोणतेही साहित्य प्रसारित करण्यापूर्वी यासंदर्भात महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात गठित केलेल्या समितीकडून सदर साहित्य तपासून प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक २२ डिसेंबर २०११ च्या आदेशानुसार समितीचे अध्यक्ष व सदस्य कोण राहतील हे निश्चित करण्यात आले आहे. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे तसेच प्रिंट मिडीयाद्वारे देखील प्रचारावर बंदी राहील. यामध्ये एसएमएस, सोशल मिडीया, उदा. व्हॉट्स अप, फेसबुक, ट्विटर, इ.चाही समावेश होतो. निवडणूकीच्या कालावधीत इलेक्ट्रॉनिक मिडीयाचा गैरवापर केल्यास, इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे आक्षेपार्ह संदेश प्रसिद्ध केल्यास सायबर गुन्हयांचा (बंदी, प्रतिबंध इ.) कायदा २०१५ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार तसेच, संबंधीत इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक:स्थास्वसं-११०३/प्र.क्र३२/का.५, दिनांक १७/०३/२००५ च्या आदेशानुसार राजकीय स्वरुपाच्या मुलाखती किंवा इतर कार्यक्रमाचे प्रसारण करताना केबल नेटवर्क किंवा स्थानिक वाहिनी तसेच सहभागी होणारे राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या आचारसंहितेचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. तसेच या प्रसार माध्यमातून जाहीराती प्रसिद्ध केल्यास त्याचा खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

२. निवडणूक प्रचारासंदर्भात उमेदवाराने भित्तीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स लावण्याबाबत—निवडणूक प्रचार मोहिमांच्यावेळी राजकीय पक्षांचे व उमेदवारांचे कार्यकर्ते खाजगी व सार्वजनिक इमारतींच्या भिंतीवर निवडणूकविषयक भित्तीपत्रके चिकटवून घोषणा लिहून, निवडणूक चिन्हे रंगविण्यासाठी भिंतीचा उपयोग करतात. तसेच या गोष्टी इमारतींच्या मालकांची परवानगी न घेताच केल्या जातात व त्यांना त्या अतिशय त्रासदायक ठरतात. याबाबतीत सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, १९८४ व तसेच खाजगी वा सरकारी मालमत्ता विद्रुपन कायदा, १९९६ खाली असलेल्या तरतुदी पुरेशा परिणामकारक आहेत, वरील प्रकारची अनिष्ट कृत्ये करणाऱ्या पक्षांविरुद्ध/व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा. राज्य निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपिकरणासंदर्भात पत्र क्र. एसईसी/१०९५/सी.आर.२५/९५/आरआर, दिनांक २१ जानेवारी १९९५ अन्वये दिलेल्या सूचना यासंदर्भात लागू राहतील.

निवडणूक सुरू असलेल्या कालावधीत राजकीय पक्ष वा उमेदवार यांनी त्यांच्या अनुयायांना चिन्हे लावणे, फलक लावणे, नोटीसा चिकटवणे व घोषणा लिहिणे इत्यादींसाठी खाजगी जमीन, इमारती, भिंती इत्यादींचा मालकांच्या लेखी परवानगीशिवाय वापर करण्यास अनुमती देता कामा नये. तसेच राजकीय पक्ष वा उमेदवार किंवा त्यांचे कार्यकर्ते यांना कोणत्याही सार्वजनिक इमारतींवर आपली भित्तीपत्रके चिकटवणे, घोषणा लिहिणे, आपली निवडणूक चिन्हे रंगविणे अशाप्रकारे विद्रुपित करण्याचे अधिकार नाहीत.

पोस्टर, बॅनर इत्यादीबाबत परवानगी, जाहीर प्रचाराचा कालावधी संपेपर्यंतच्या कालावधीसाठी देण्यात येईल. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर सदर साहित्य संबंधित उमेदवार / पक्षांनी तात्काळ काढून टाकणे आवश्यक राहील. जर त्यांनी असे प्रचार साहित्य जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर काढले नाही तर त्याबाबत उपरोक्त मालमत्ता विद्रुपीकरण कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा व असे प्रचार साहित्य त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने काढून टाकावे आणि ते साहित्य काढण्याकरिता आलेल्या खर्चाचा समावेश संबंधित उमेदवाराच्या खर्चामध्ये करावा. निवडणुकांच्या संदर्भात राजकीय पक्ष/उमेदवारांनी संबंधितांची लेखी परवानगी न घेता खाजगी मालमत्तेवर त्यांची भित्तीपत्रके, घोषणा, निवडणूक चिन्हे इत्यादी चिकटवून किंवा लिहून ती मालमत्ता विद्रुपित केली असल्यास त्यांनी सदर भित्तीपत्रके, घोषणा, निवडणूक चिन्हे, पोस्टर्स, बॅनर्स काढून टाकून ती मालमत्ता पूर्ववत करण्याबाबत त्यांना सूचना देण्यात याव्यात. तसे न केल्यास त्या पक्ष / उमेदवाराविरुद्ध योग्य त्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. परवानगी प्राप्त भित्तीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स यांचे संरक्षण संबंधीत उमेदवार/पक्ष यांनी स्वतः करावयाचे आहे.

३. प्रचारामध्ये प्राण्यांच्या वापरास प्रतिबंध—राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२६/का.५, दिनांक २३ डिसेंबर २०११ च्या आदेशानुसार निवडणूक प्रचारामध्ये प्राण्यांचा वापर करण्यास बंदी घातलेली आहे. त्यानुसार कोणत्याही परिस्थितीत निवडणूक प्रचाराकरिता प्राण्यांचा वापर करण्यात येऊ नये.

४. निवडणूक प्रचारामध्ये लहान मुलांचा वापर न करण्याबाबत—निवडणुकीच्या प्रचाराच्या मिरवणुका तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित कार्यक्रमांमध्ये १४ वर्षाखालील मुलांना सामील करण्यात येऊ नये.

५. मतदान केंद्रातील प्रवेशाबाबत—मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री इत्यादींनी त्यांचे नाव ज्या मतदान केंद्रात आहे, अशा मतदान केंद्रात फक्त मतदान करण्यासाठीच प्रवेश करावा. अन्य कोणत्याही मतदान केंद्रात त्यांना प्रवेश देऊ नये अथवा त्यांनी भेट देऊ नये.

६. मुद्रक व प्रकाशकाचे नाव छापणेबाबत.—राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक एसईसी-१०९५/सीआर७७/९५/डेस्क-३, दिनांक २८ ऑगस्ट १९९५ अनुसार प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर प्रतींची संख्या, प्रत क्रमांक, मुद्रणालयाचे व प्रकाशकाचे नाव व पत्ता असणे आवश्यक आहे. या आदेशांचे पालन न झाल्याचे आढळल्यास प्रेस ॲक्टनुसार कार्यवाही करावी.

७. प्रचार फेरीतील वाहनांबाबत—प्रचार फेरी किंवा मिरवणुका यामध्ये किती वाहने वापरावीत याबाबत राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१९/का.५, दिनांक १९ ऑक्टोबर २००६ अन्वये आदेश दिले आहेत. त्यानुसार महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांकरिता जास्तीत जास्त तीन वाहने वापरता येतील. तर ग्रामपंचायत निवडणुकांकरिता जास्तीत जास्त एक वाहन वापरता येईल. राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त वाहने आढळल्यास प्रचार फेरी किंवा मिरवणुकीची परवानगी तात्काळ रद्द करण्यात यावी.

८. प्रचार कार्यालयांची संख्या—राज्य निवडणूक आयोगाने उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित केलेली आहे. उमेदवाराने उघडलेल्या सर्व प्रचार कार्यालयांचा खर्च, त्यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट होतो. त्यामुळे किती प्रचार कार्यालये उघडावीत यासंदर्भातील मर्यादा राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का.५, दिनांक ४ फेब्रुवारी २०१२ अन्वये काढून टाकण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रचार कार्यालयांना परवानगी देताना सर्व उमेदवारांना समान तत्वानुसार परवानगी द्यावी. तसेच महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी आणि पोलिस यंत्रणा यांनी सुरक्षितता आणि जागोजागी प्रचार कार्यालये उघडल्यास नागरिकांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेऊन प्रचार कार्यालयांना परवानगी देणे आवश्यक आहे. प्रचार कार्यालये ही सकाळी ६.०० वाजल्यापासून ते रात्री १०.०० वाजेपर्यंत उघडे ठेवण्याची मुभा राहील.

९. नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी येणा-या उमेदवारांना सुचना—निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या आवारात फक्त चार व्यक्ती यांना परवानगी द्यावी. मिरवणुकीने येत असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयापासून १०० मीटर अगोदर मिरवणूक थांबवावी.

१०. अ. सभा—

१. सभेच्या परवानगीबाबत—स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना वाहतुकीचे नियंत्रण करणे आणि शांतता आणि सुव्यवस्था राखणे शक्य व्हावे यासाठी पक्ष किंवा उमेदवारास, कोणत्याही प्रस्तावित सभेची जागा आणि वेळ त्यांना ४८ तास अगोदर कळविणे बंधनकारक असेल. सभेसाठी प्रस्तावित केलेल्या जागेत कोणतेही निर्बंधक किंवा प्रतिबंधक आदेश जारी केलेले आहेत किंवा कसे, याबद्दल पक्ष किंवा उमेदवार अगोदर खात्री करुन घेईल. अशा आदेशांमधून काही सूट हवी असल्यास, त्यासाठी अर्ज करुन अशी सूट अगोदर प्राप्त केली जाईल. सभेची परवानगी देताना सर्वांना समान संधी मिळावी आणि प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FIRST COME FIRST SERVED) या तत्वाचा अवलंब करावा.

२. ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत—ध्वनिवर्धकाचा वापर करण्यासाठी किंवा प्रस्तावित सभेच्या संदर्भात इतर कोणत्याही सुविधेसाठी परवानगी किंवा लायसन्स मिळवावयाचे असल्यास पक्ष किंवा उमेदवार संबंधित प्राधिकाऱ्याकडे त्यासाठी ४८ तास अगोदर अर्ज करुन अशी परवानगी किंवा लायसन्स प्राप्त करील. तसेच याबाबतचे The Noise Pollution (Regulation and Control) Rules, २००० ची अंमलबजावणी बंधनकारक राहील.

३. सभेमध्ये अडथळा निर्माण न करणेबाबत—आपले समर्थक, इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा किंवा मिरवणुका यामध्ये अडथळा निर्माण करीत नाहीत किंवा ते उधळून लावीत नाहीत याची राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी दक्षता घ्यावी. एक राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आणि समर्थक, दुसऱ्या पक्षाने आयोजित केलेल्या सार्वजनिक सभांमध्ये तोंडी किंवा लेखी प्रश्न विचारुन किंवा स्वतःच्या पक्षाची पत्रके वाटून अडथळा निर्माण करणार नाहीत. एक पक्ष सभा घेत असेल अशा ठिकाणी दुसरा पक्ष मिरवणूक घेऊन जाणार नाही. एका पक्षाने लावलेली भित्तीपत्रके दुसऱ्या पक्षाचे कार्यकर्ते काढणार नाहीत. सभेमध्ये अडथळा उत्पन्न करणाऱ्या किंवा इतर मार्गानी गोंधळ माजविणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्याकरिता सभेचे आयोजक स्वतः अशा व्यक्तींविरुद्ध कारवाई करणार नाहीत तथापि, कर्तव्यार्थ असलेल्या पोलिसांची मदत घ्यावी.

ब. मिरवणुका—

१. मिरवणुकीची वेळ व जागा निश्चितीबाबत—पक्ष किंवा उमेदवार, मिरवणूक सुरू होईल ती वेळ किंवा आणि ती जेथून जाईल तो मार्ग आणि मिरवणूक संपेल ती वेळ आणि जागा अगोदर निश्चित करील. कार्यक्रमांमध्ये सहसा बदल होणार नाही. कार्यक्रमाच्यावेळी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांनी आवश्यक ती व्यवस्था करावी यासाठी आयोजक त्यांना कार्यक्रमासंबंधी सर्व माहिती आगाऊ पुरवतील. मिरवणूक जेथून जाणार असेल त्या भागात काही निर्बंधक आदेश जारी असतील तर आयोजक त्याबद्दल खातरजमा करुन घेतील आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यामधून मुद्दाम सूट दिली नसल्यास, त्या निर्बंधाचे अनुपालन करतील. वाहतुकीच्या विनियमांचे आणि निर्बंधांचेही काळजीपूर्वक पालन केले जाईल.

२. **वाहतूक नियंत्रणाबाबत**—वाहतुकीची कोंडी होऊ नये किंवा तिला अडथळा होऊ नये अशारितीने मिरवणूक नेण्याची व्यवस्था करण्यासाठी आयोजक आगाऊ उपाययोजना करतील. मिरवणूक जर खूप लांब असेल तर तिचे सोयीस्कर आकाराच्या तुकड्यांमध्ये विभाजन केले जाईल, ज्यायोगे काही ठराविक स्थळांवर, विशेषतः मिरवणुकीला चौकांमधून जावयाचे असेल तेव्हा अडकलेल्या वाहतुकीला टप्प्याटप्प्याने मोकळे करता येईल आणि वाहतुकीची कोंडी होणे टाळता येईल. मिरवणुकीसंबंधी कर्तव्यार्थ असलेल्या पोलिसांचे निदेश आणि सल्ला यांचे काटेकोरपणे अनुपालन केले जावे. सभा, मिरवणूक, इ.च्यावेळी उमेदवारांनी / पक्षाने त्यांचे कार्यकर्ते अथवा स्वयंसेवक नेमून रहदारीचे नियंत्रण अशाप्रकारे करावे जेणेकरुन सभा अथवा मिरवणुकीचा त्रास सर्वसामान्य जनतेला होणार नाही.

३. **दोन मिरवणुका समोरासमोर येऊ न देणेबाबत**—दोन किंवा त्यापेक्षा अधिक राजकीय पक्ष एकाच मार्गावरुन किंवा त्याच्या भागांवरुन साधारणपणे एकाच वेळी मिरवणूक नेण्याचे ठरवित असतील तर आयोजक पुरेसे अगोदर संपर्क प्रस्थापित करतील आणि मिरवणुकी एकमेकांसमोर येणार नाहीत किंवा त्या वाहतुकीला अडथळा करणार नाहीत यादृष्टीने काय उपाययोजना करावयाच्या ते निश्चित करतील. समाधानकारक उपाययोजना निश्चित करण्यासाठी स्थानिक पोलिसांची मदत घेतली जाईल. पक्ष या प्रयोजनासाठी पोलिसांशी शक्य तेवढया लवकर संपर्क साधतील.

४. **मिरवणुकीदरम्यान बाळगावयाच्या वस्तूंबाबत**—असामाजिक तत्वांकडून, विशेषतः प्रक्षुब्ध मनःस्थितीत ज्यांचा दुरुपयोग केला जाऊ शकेल अशा, धारदार वस्तू, शस्त्रे किंवा विस्फोटक साहित्य जवळ बाळगता येणार नाहीत. बाळगलेली आढळल्यास ती जप्त करण्यात येतील व कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

५. **प्रतिकृतींच्या वापराबाबत**—इतर राजकीय पक्षांचे, सदस्यांचे किंवा त्यांच्या नेतृत्वाचे प्रतिनिधीत्व करीत असल्याचे समजल्या जाणाऱ्या त्यांच्या प्रतिकृती घेऊन जाणे, त्यांचे जाहीरपणे दहन करणे हे आणि असे निदर्शनांचे प्रकार कोणत्याही पक्षाकडून किंवा उमेदवाराकडून चालवून घेतले जाणार नाहीत.

६. **प्रचार फेरीवरील खर्चाबाबत**—प्रचार फेरी किंवा प्रचार मिरवणुकीत महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त ३ वाहनांचा समावेश करण्यात येईल. ही प्रचार फेरी अथवा मिरवणूक जर एकाच उमेदवाराची असेल तर त्या उमेदवाराने त्या प्रचार फेरीचा येणारा खर्च आपल्या खर्चात समाविष्ट केला पाहिजे. जर प्रचार फेरी पक्षातर्फे अथवा आघाडीतर्फे काढण्यात आली असेल तर ती प्रचार फेरी अथवा मिरवणूक ज्या प्रभागांमधून जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च विभागून दाखविण्यात येईल.

क. **मतदानाचा दिवस—**

१. **मतदारांना द्यावयाच्या ओळखचिठ्ठया**—उमेदवारांनी मतदारांना पुरविलेल्या ओळखचिठ्ठया स्वच्छ पांढऱ्या कागदाच्या आहेत आणि त्यांच्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव नाही याची खातरजामा करुन घेतली जाईल.

२. **उमेदवाराच्या तात्पुरत्या कार्यस्थान (उमेदवार/पक्षामार्फत चिठ्ठी वाटपाकरिता लावण्यात येणारे टेबल)**—कार्यकर्ते आणि पक्षाचे व उमेदवारांचे समर्थक यांच्यामधील संघर्ष आणि तणाव टाळण्याच्या दृष्टीने पक्षांनी आणि उमेदवारांनी मतदान केंद्रापासून २०० मीटर लांब उभारलेल्या तात्पुरत्या कार्यस्थानाजवळ विनाकारण गर्दी होऊ देऊ नये. उमेदवाराच्या तात्पुरत्या कार्यस्थळाच्या भागावर कोणतेही भित्तीपत्रक, ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य लावलेले असणार नाही. तेथे कोणत्याही खाद्यवस्तूंचे वाटप केले जाणार नाही किंवा गर्दी होईल अशी कोणतीही कृती केली जाणार नाही.

३. **मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत**—मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाचे क्र. एसईसी/जीईएन-१९९८/प्र.क्र.१/का.३, दिनांक ६ जानेवारी १९९८ च्या आदेशान्वये दिलेल्या निर्बंधाचे अनुपालन करताना सर्व पक्षांचे उमेदवार व कार्यकर्ते संबंधित प्राधिकाऱ्याशी सहकार्य करतील आणि वाहने चालविताना त्यासाठी आवश्यक परवाने मिळवून ते त्या वाहनांच्या दर्शनी भागांवर ठळकपणे लावले जातील. मतदानाच्या दिवशी वापरावयाच्या वाहनांच्या मर्यादेमध्ये बदल करण्यात येत असून त्यानुसार मतदानाच्या दिवशी प्रत्येक उमेदवारास स्वतःच्या किंवा निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी दोन वाहने वापरण्याचा अधिकार असेल. ही वाहने त्याच्या मतदारसंघातच वापरता येतील.

४. **मतदान केंद्रामध्ये प्रचार साहित्य नेण्यावरील निर्बंध**—निवडणूक चिन्ह, पार्टीचे/उमेदवाराचे नाव असलेले कोणतेही प्रचार साहित्य उदा. चिन्ह छपाई केलेले टी शर्ट, टोप्या, उपरणे तसेच छापील चिठ्ठया इ. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रामध्ये आणता येणार नाही.

५. **मतदान केंद्रात उमेदवाराच्या प्रवेशाबाबत**—उमेदवार/उमेदवाराचा निवडणूक प्रतीनिधी यांना मतदानाचे निरिक्षणासाठी मतदान केंद्राचे आत तीन मतदारांचे मतदान होईपर्यंतच थांबता येईल. त्यानंतर उमेदवाराने मतदान केंद्राच्या बाहेर पडणे अपेक्षित असेल. या सूचनांचा भंग करणाऱ्या उमेदवारास/उमेदवाराच्या प्रतीनिधीस पोलीसांमार्फत त्या क्षेत्राच्या बाहेर काढावे. उमेदवारास/उमेदवाराचा निवडणूक प्रतीनिधीस एका केंद्रामध्ये संपूर्ण मतदानाच्या कालावधीत जास्तीत जास्त तीन वेळा जाता येईल.

६. **मतदारांची ने-आण करण्यास वाहनांच्या वापरास बंदी असल्यास**—कोणत्याही उमेदवारास अथवा पक्षाला मतदारांची ने-आण करण्यासाठी कुठल्याही वाहनाचा वापर करता येणार नाही. असे वाहन आढळल्यास पोलिसांनी ते तात्काळ ताब्यात घ्यावे व नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

७. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या सर्वसाधारण वापराबाबत—मतदानाच्या दिवशी सर्व प्रकारच्या वाहनांच्या रहदारीवर बंदी घालून जनतेला गैरसोय होईल असा निवडणूक आयोगाचा कोणताही हेतू नाही. निवडणुकीच्या कामाखेरीज अन्य आवश्यक असलेल्या खऱ्याखुऱ्या प्रयोजनासाठी मतदानाच्या दिवशी पुढील प्रकारची वाहने वापरण्यास निवडणूक आयोगाची परवानगी असेल.

(अ) खाजगी वाहनांच्या मालकांना त्यांच्या स्वतःच्या खाजगी वापरासाठी वापरण्यात येणारी खाजगी वाहने परंतु, निवडणुकीच्या कामाशी त्यांचा कोणताही संबंध नसावा.

(ब) खाजगी वाहनांच्या मालकांना त्यांच्या स्वतःसाठी किंवा त्यांच्या स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीसाठी मतदानाचा हक्क बजावता येण्याकरिता मतदान केंद्रावर जाण्यासाठी खाजगी वाहने वापरता येतील. परंतु मतदान केंद्रापासून २०० मीटर त्रिज्येच्या आत अशी वाहने नेता येणार नाहीत.

(क) रुग्णालयातील वाहने, रुग्णवाहिका, दूधगाडया, वॉटर टँकर्स, तातडीच्या वीज पुरवठ्याची वाहने, कामावर असलेल्या पोलिसांची वाहने, निवडणुकीच्या कामावार असलेल्या अधिकाऱ्यांची वाहने यासारख्या अत्यावश्यक सेवांसाठी वापरण्यात येणारी वाहने.

(ड) ठराविक थांब्यावरुन व ठराविक मार्गांनी चालविण्यात येणाऱ्या सार्वजनिक परिवहन सेवेच्या बसगाडया.

(इ) विमानतळ, रेल्वे स्टेशन, आंतर-राज्यीय बस स्थानक, इस्पितळ येथे जाण्यासाठीचा जो प्रवास अनिवार्य ठरत असेल त्यासाठी टॅक्सी, तीन चाकी स्कूटर, रिक्षा इत्यादींचा वापर.

(फ) आजारी किंवा विकलांग व्यक्ती यांनी स्वतःच्या उपयोगासाठी केलेला खाजगी वाहनांचा वापर.

८. वाहनांच्या गैरवापराबाबत—अनिष्ट/अवैध कृत्यांना पायबंद घालण्यासाठी निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे इतर पक्ष नेते यांच्यासोबतच्या व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या वाहनांनी बेकायदेशीर दारुगोळा व शस्त्रास्त्रे वाहून नेणे यासारख्या गुन्हेगारी कृत्यांसह कोणत्याही संभाव्य अपकृत्यांवर जिल्हा प्रशासनाने बारीक लक्ष ठेवले पाहिजे. जर या वाहनांपैकी एकतर पक्षाची किंवा खाजगी मालकीची वाहने, अशा कोणत्याही कृत्यामध्ये किंवा मतदारांच्या मनात धाकदपटशा दाखविण्यासाठी किंवा दहशत निर्माण करण्याच्या हेतूने समाजविघातक व्यक्तीची ने-आण करण्यासाठी वापरात असल्याचे दिसून आल्यास अशी वाहने अटकावून ठेवणे आणि निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना मुक्त न करणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल. याशिवाय, जे अशा अवैध कृत्यांमध्ये गुंतलेले आहेत असे वाहनांचे मालक, वहिवाटदार आणि उमेदवार/राजकीय पक्ष यांच्या विरुद्धदेखील कायद्यानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल.

९. निवडणूक आचारसंहितेमध्ये येणाऱ्या सार्वजनिक सणांमधील आचरणाबाबत—बऱ्याचदा निवडणुकींच्या आचारसंहितेच्या कालावधीत काही सण व उत्सव येतात. या सण / उत्सवांच्या कालावधीत बरेच सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. महाराष्ट्रात काही सण / उत्सव सर्वच गावांमधून आयोजित करण्यात येतात. यावेळी भोजनेदेखील आयोजित करण्यात येतात. या सर्व कार्यक्रमांमुळे आचारसंहितेस बाधा येऊ शकते काय अशी विचारणा वेगवेगळया स्थानिक स्वराज्य संस्थाकडून करण्यात येते. सर्व बाबींचा विचार करुन व सामाजिक सलोखा लक्षात ठेवून विशेष बाब म्हणून राज्य निवडणूक आयोग या कार्यक्रमाबद्दल पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे ठरवून देत आहे :—

(१) राजकीय पक्षाचे नेते, उमेदवार, कार्यकर्ते या सण / उत्सवाच्या कार्यक्रमामध्ये व्यक्तिगतरित्या सहभागी होऊ शकतात.

(२) सण / उत्सवाच्या एखाद्या मंडळाचे विश्वस्त किंवा पदाधिकारी, उमेदवार म्हणून एखादी राजकीय व्यक्ती असल्यास तिचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर राहू शकते. परंतु, तेथे ते कुठल्या पक्षाशी संबंधित आहे किंवा कुठल्या प्रभागातील उमेदवार आहे याचा उल्लेख नको.

(३) या सणांमध्ये कोणत्याही राजकीय नेत्याचा / उमेदवाराचा सत्कार आयोजित करण्यात येऊ नये.

(४) या सण / उत्सवाच्या निमित्ताने कोणत्याही राजकीय नेत्याने अथवा उमेदवाराने कोणत्याही वस्तूंचे वाटप करु नये अथवा त्यासाठी कुठल्याही सार्वजनिक मंडळाचा आधार घेऊ नये. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सार्वत्रिक निवडणुका आहेत तेथे संपूर्ण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रासाठी या सूचना लागू राहतील.

(५) सण/उत्सव निमित्त लावण्यात आलेल्या पोस्टर्स, बॅनर्सवर उमेदवारांचा फोटो असू शकेल तथापि, त्या बॅनर्स पोस्टर्स वर प्रचाराचा उल्लेख असू नये.

(६) निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये भोजनावळ/जेवणाच्या कार्यक्रमाचेआयोजन करु नये.

१०. उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर करणेबाबत—नामनिर्देशनपत्र भरल्यापासून ते मतमोजणीपर्यंतच्या कालावधीत प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीवर किती खर्च करावा यासाठी आयोगाने मर्यादा घालून दिलेली आहे. उमेदवारांनी निवडणूक खर्च करण्याकरिता स्वतंत्र बँक खाते उघडून निवडणुकीचा खर्च त्या बँक खात्यामार्फत करणे आवश्यक आहे. तसेच दररोजच्या खर्चाचा हिशोब निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजेपर्यंत उमेदवाराने देणे आवश्यक आहे. तसेच निवडणुका पार पडल्यानंतर विहित कालावधीत सदर हिशोब व त्याबाबतचे शपथपत्र संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात नियमांचे पालन न करणाऱ्या उमेदवारांवर भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ आय नुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच जे उमेदवार राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/१०९५/१०१/डेस्क-३, दिनांक ७ फेब्रुवारी १९९५ नुसार विहित केलेल्या रितीने खर्चाचा हिशोब सादर करणार नाहीत अथवा राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेत खर्च करणार नाहीत असे उमेदवार अधिनियमातील तरतुदीनुसार अनर्हतेस पात्र आहेत. त्यामुळे यासंदर्भातील सूचनांचे पालन काटेकोरपणे होणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र. १७/का.५, दिनांक २८ डिसेंबर २००६ च्या आदेशानुसार पक्षाने निवडणुकांकरिता केलेला खर्च त्या पक्षाच्या उमेदवारांमध्ये विभागून दाखवायचा आहे. तसेच या आदेशान्वये विहित करण्यात आल्याप्रमाणे पक्षाने आचारसंहिता सुरू झाल्यापासून ठराविक कालावधीत हा खर्च संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सादर करावयाचा आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ८ नोव्हेंबर २०११ च्या आदेशानुसार स्टार प्रचारकांच्या प्रवास खर्चास उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यापासून सूट आहे. मात्र त्यांनी घेतलेल्या सभेतील इतर खर्चाचा समावेश उमेदवाराच्या निवडणूक खर्चात करणे आवश्यक राहील.

भाग—चार

शासनसंबंधी

१. धोरणात्क निर्णय व करावयाची कामे :— आचारसंहितेच्या कालावधीत कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. या संदर्भातील कोणत्याही स्वरुपाचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येऊ नये. निवडणुका जाहीर करतेवेळी जी कामे प्रत्यक्ष सुरू असतील ती तशीच पुढे चालू ठेवता येतील.

२. दुष्काळ, पाणी टंचाई, इतर नैसर्गिक आपत्ती, गंभीररित्या आजारी (मरणासन्न) असलेल्यांना मदत करणे व सुरू असलेल्या योजना पुढे चालू ठेवता येतील. आचारसंहिता असल्याने एखाद्या ठिकाणी दुष्काळ असेल अथवा पाणी टंचाई असेल तर ती दूर करण्याबाबत कार्यवाही करु नये असा आचारसंहितेचा अर्थ होत नाही. त्यामुळे दुष्काळ, पाणीटंचाई व नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी कामे करण्यास बंदी असणार नाही.

३. पोट निवडणुकीवेळी इतर कामे व योजना—स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पोट-निवडणुकांच्यावेळी ज्या कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद असेल व जे काम एखाद्या विशिष्ट भागाशी संबंधित नसेल असे कोणतेही काम हाती घेण्यास बंदी राहणार नाही.

४. अत्यावश्यक बाबींबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे परवानगीची विनंती करताना महानगरपालिकेबाबत, महानगरपालिका आयुक्तांचे तर इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट मत आवश्यक असेल.

५. बदल्या—आचारसंहितेच्या काळात निवडणुकांशी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या करता येणार नाहीत. जर अशा बदल्या करणे आवश्यक असल्यास त्याला राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल. यासंदर्भात राज्य निवडणूक आदेश क्रमांक एसईसी/१०९५/सी.आर-५/९५/डी-३, दिनांक १५ मार्च १९९५ लागू राहतील. निवडणुकांशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यामध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी, महानगरपालिका आयुक्त, मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व इतर पोलीस अधिकारी वा निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी जसे, जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसीलदार इत्यादी यांचाही समावेश होतो.

६. आचारसंहितेच्या कालावधीमध्ये नेमणुका/भरती करण्याच्या दृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती घेणे व प्रत्यक्ष नियुक्त्या करणेबाबत—आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासन सेवेत तसेच निमसरकारी संस्था, शासकीय मंडळे/महामंडळे सार्वजनिक उपक्रम इ. संस्थांमध्ये भरती करण्याच्या दृष्टीने जाहिरात देणे, मुलाखत घेणे इ. करण्यात येऊ नये. आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच पत्र पाठविले असल्यास लेखी परीक्षा घेण्यास हरकत नाही. तथापि, त्याचा निकाल जाहीर करता येणार नाही. तसेच मुलाखती व प्रत्यक्ष नेमणुका याबाबतची कार्यवाही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या सेवाभरतीसाठी जर संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) धर्तीवर अगोदरच वेळापत्रक जाहीर केलेले असल्यास, ही अट लागू असणार नाही.

७. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सर्वसाधारण सभा व बैठका—स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सर्वसाधारण सभा, विविध समित्यांच्या (विषय समित्या इ.) बैठका ज्या कायद्यानुसार घेणे बंधनकारक आहे, त्या घेता येतील. परंतु नेमणुका, अनुदान, कर्ज अथवा आर्थिक सहाय्य मंजूर किंवा अदा करण्यात येऊ नये. कोणत्याही नवीन कामास मंजुरी देता येणार नाही. तसेच मतदारांवर कोणत्याही प्रकारे प्रभाव पडेल असे कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत.

८. आचारसंहिता कालावधीत नियोजन समितीच्या व अन्य समित्या यांच्या बैठका—आचारसंहिता लागू असलेल्या क्षेत्रामध्ये नियोजन समितीची व अन्य समित्यांची बैठक घेता येत नाही. तसेच त्या क्षेत्राकरिता कोणतीही नवीन योजना जाहीर करता येत नाही. मात्र दुष्काळ, पाणीटंचाई अथवा नैसर्गिक आपत्ती दूर करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करता येते. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ/ग्रापनि/२०१२/प्र.क्र.६/का.८, दिनांक २१ ऑगस्ट २०१२ अन्वये सविस्तर आदेश जारी केलेले आहेत. अशा नियोजन समिती व अन्य समित्या, ज्यांचे अध्यक्ष / पदाधिकारी लाभाचे पद धारण करणारे असतील त्यांनादेखील हे आदेश लागू राहतील. ज्या समित्यांचे अध्यक्षपद जिल्हाधिकारी अथवा अन्य शासकीय अधिकाऱ्याकडे असेल त्यांना हे आदेश लागू होणार नाहीत. मात्र अशा समित्यांच्या बैठकांकरिता लाभाचे पद धारण करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना बोलविता येणार नाही.

९. आचारसंहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करण्याबाबत—स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करावयाचा झाल्यास त्यामध्ये लोकांकडून नेमणुका, अनुदान, आर्थिक कर्ज किंवा आर्थिक सहाय्य याबाबत प्रस्ताव स्वीकारता येत नाहीत. तसेच मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येत नाहीत. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने

क्रमांक रानिआ/ग्रापनि/२०१३/प्र.क्र.५/का.८, दिनांक ४ मार्च २०१३ अन्वये सविस्तर आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यांचे पालन करुन लोकशाही दिन साजरा करता येईल. लाभाचे पद धारण करणारे पदाधिकारी, इ. यांनी निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीमध्ये लोकशाही दिन साजरा करु नये.

१०. भूमिपूजन व उद्घाटन समारंभ—निवडणुका जाहीर झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राज्य शासनाच्या/केंद्र शासनाच्या खर्चाने पूर्ण झालेल्या कामांचे भूमिपूजन व उद्घाटन, समारंभ इत्यादी आयोजित करता येणार नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या किंवा केंद्र शासन अथवा राज्य शासन यांच्या अधिपत्याखालील महामंडळाच्या अथवा स्वायत्त संस्थेच्या खर्चातून पूर्ण झालेल्या कामांचा उपयोग जनतेसाठी तात्काळ व्हावा, यादृष्टीने समारंभ आयोजित न करतादेखील पूर्ण झालेली कामे, सक्षम प्राधिकाऱ्याचे पूर्णता प्रमाणपत्र घेऊन जनतेच्या उपयोगासाठी खुली/सुरू करता येतील. यामध्ये राजकीय व्यक्ती, उमेदवार यांना सहभागी करुन घेता येणार नाही. आचारसंहिता एका विशिष्ट क्षेत्रापुरती (जिल्ह्यापुरती किंवा नगर परिषद क्षेत्रापुरती) मर्यादीत असली तरी आजुबाजूच्या क्षेत्रात अथवा संपूर्ण राज्यामध्ये आचारसंहितेच्या कालावधीत मतदारांवर प्रभाव पडु शकेल असे कार्यक्रम आयोजित करता येणार नाहीत.

११. शासकीय दौरे व विश्रामगृहाच्या (शासकीय, निमशासकीय व महामंडळे, स्वायत्त संस्था यांच्या मालकीचे) वापराबाबत- केंद्रिय मंत्री, राज्याचे मंत्री, लाभाचे पद धारण करणारे अन्य पदाधिकारी, आचारसंहिता कालावधीत जर आचरसंहिता लागू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात शासकीय दौऱ्यावर येणार असतील तर त्यांच्या खाजगी सचिवाने असा दौरा का आवश्यक आहे, या स्पष्टीकरणासह महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांना व इतर सर्व निवडणुकांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना किमान दोन दिवस आधी कळविले पाहिजे. अशा दौऱ्याला जोडून कोणताही खाजगी किंवा प्रचाराचा कार्यक्रम ठेवता येणार नाही.

आचारसंहितेच्या कालावधीमध्ये विश्रामगृहाचे (Circuit House/Rest House इ.) वाटप करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे राहतील. विश्राम भवन (Circuit House/Rest House इ.) कसे द्यावे यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी :-

आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासकीय विश्रामगृह, निवडणूक कर्तव्यार्थ असलेले राज्य निवडणूक आयोगातील अधिकारी/ कर्मचारी तसेच निवडणुकीशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सर्वोच्च प्राधान्याने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

केंद्राच्या तसेच राज्य शासनाच्या मंत्र्यांना विश्राम भवन (Circuit House/Rest House) देण्यास हरकत नाही. तथापि, मंत्र्यांना आपल्या शासकीय कामकाजासाठी काढलेल्या दौऱ्याची निवडणुकीच्या कामकाजाशी सांगड घालू नये आणि निवडणुकीच्या कामाच्यावेळी सरकारी यंत्रणा व कर्मचारीवर्ग यांचा वापर करु नये.

विश्राम भवन (Circuit House/Rest House) चा वापर फक्त सत्ताधारी पक्ष किंवा त्यांच्या उमेदवारांसाठी असू नये आणि अशा निवासी व्यवस्थेचा वापर इतर पक्षांना किंवा उमेदवारांनाही न्याय्य पद्धतीने उपलब्ध करुन देण्यात यावा. मात्र, कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला विश्राम भवन, विश्रामगृहे अथवा अन्य कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्थांच्या इमारतीचा अथवा आवाराचा निवडणुकीच्या मोहिमेसाठी, उमेदवारांच्या मुलाखतीसाठी, बैठकीसाठी अथवा प्रचारासाठी किंवा निवडणुकीशी संबंधित पत्रकार परिषदेसाठी वापर करता येणार नाही. तसा वापर झाल्याचे निदर्शनास आल्यास अथवा कोणी निदर्शनास आणून दिल्यास महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करावी व असे प्रकार तात्काळ थांबविण्यात यावेत. आचारसंहितेच्या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारी/कर्मचारी यांनी निवडणुकीच्या कामासाठी जर विश्रामगृहात आरक्षण केले असेल तर ते कुठल्याही परिस्थितीत रद्द करता येणार नाही. अन्य शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांनी जर आरक्षण केले असेल तर ते राजकीय नेत्यांच्या निवडणूक दौऱ्याकरिता रद्द करता येणार नाही. निवडणुकीच्या प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर ते निकाल लागेपर्यंत कोणत्याही राजकीय व्यक्तीस/नेत्यास विश्रामगृहाचा वापर करता येणार नाही, राजकीय नेत्यांमध्ये मंत्री, राज्यमंत्री तसेच लाभाचे पद धारण करणारे पदाधिकारी यांचाही समावेश होतो.

१२. शासकीय वाहनांच्या वापराबाबत—स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आचारसंहितेच्या कालावधीत महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर शासकीय अधिकारी अथवा इतर स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी यांच्याकडून दौऱ्यावर असलेले मंत्री, लाभाचे पद धारण करणारे इतर पदाधिकारी यांना डी.व्ही. कार देता येणार नाही.निवडणुकीच्या काळात प्रचार मोहिम, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रचार करण्यासाठी शासकीय वाहनांचा वापर होणार नाही, याची दक्षता घ्यावयाची आहे. शासकीय वाहनांमध्ये केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, केंद्र व राज्य शासनाचे संयुक्तिक क्षेत्र उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, पणन मंडळे, सहकारी संस्था, जिल्हा परिषदा अथवा पंचायत समित्या, महामंडळे, स्वायत्त संस्था ज्यामध्ये जनतेच्या पैशांची गुंतवणूक आहे, अशा अन्य कोणत्याही संस्था यांच्या वाहनांचा वापर करता येणार नाही. ज्या पदाधिकाऱ्यांना वाहनांच्या वापराची परवानगी असते अशा पदाधिकाऱ्यांना आचारसंहितेच्या काळात फक्त शासकीय कामासाठी निवासस्थान ते शासकीय कार्यालय पर्यंत एवढ्याच वापराची परवानगी असेल. पदाधिकाऱ्यांकडुन शासकीय वाहन इतर कोणत्याही कामासाठी वापर करणार नाही याची लेखी हमी घेण्यात यावी. मात्र याचा अर्थ असा नाही की, सदर पदाधिकाऱ्यांची वाहने निवडणुकांच्या कामाकरिता महानगरपालिका आयुक्त अथवा संबंधित जिल्हाधिकारी यांना अधिग्रहित करता येणार नाहीत. आचारसंहितेची सुरूवात झाल्यापासून सहकारी संस्था, पणन मंडळे, शैक्षणिक संस्था, महामंडळे, स्वायत्त संस्था इत्यादींचीही वाहने वापरण्यावर बंदी असेल. अशा बंदीचे उल्लंघन होताना आढळल्यास ते वाहन ताब्यात घेण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांना असेल.

शासकीय वाहनांचा निवडणूक प्रचाराकामी गैरवापर झाल्याचे आढळून आल्यास वाहने ज्या शासकीय विभाग प्रमुखांच्या अखत्यारीत आहेत ते व्यक्तीशः जबाबदार राहतील व त्यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी.

आचारसंहितेच्या कालावधीत केंद्र शासनाची, राज्य शासनाची वा इतर सार्वजनिक उपक्रमांची विमाने किंवा हेलिकॉप्टर्स प्रचार दौऱ्याकरिता राजकीय नेत्यांनी वापरण्यावर पूर्णपणे बंदी असेल. राजकीय नेते यामध्ये मंत्र्यांचाही समावेश होतो. भारताचे प्रधानमंत्री मात्र शासकीय विमानाने अथवा हेलिकॉप्टरने प्रवास करु शकतील. सरकारी ब्ल्यु पुस्तकामध्ये ज्या सुरक्षा आवश्यकता प्रधानमंत्र्यांसाठी नियंत्रित केलेल्या आहेत त्या भारताचे प्रधानमंत्री यांना लागू राहतील. तसेच, ज्या व्यक्तींना झेड प्लस सुरक्षा पुरविण्यात आली आहे अशा व्यक्तींच्या बाबत भारत निवडणूक आयोगाच्या सूचना लागू राहतील.

प्रचाराकरिता खाजगी विमाने अथवा हेलिकॉप्टर्स यांचा वापर करता येईल. मात्र त्याचा खर्च पक्षाने करावयाच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा. राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का.५, दिनांक ८ नोव्हेंबर २०११ अन्वये महत्वाचे राजकीय नेते/प्रचारक (Star Campaigner) यांची नांवे कळविण्यात तरतूद आहे. त्यानुसार उमेदवाराच्या खर्चामध्ये केवळ ज्यांची नावे महत्वाचे राजकीय प्रचार (Star Campaigner) म्हणून कळविण्यात आली आहेत त्यांच्या प्रवासाचा खर्च समाविष्ट होणार नाही.

१३. वाहने, कर्मचारी व मालमत्ता अधिग्रहित करणेबाबत—राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/१०९५/३०६/डेक्स-३, दिनांक २ मार्च, १९९५ अनुसार महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी हे निवडणुकीच्या कामाकरिता वाहने, कर्मचारी व मालमत्ता अधिग्रहित करण्याकरिता सक्षम असून सदर आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आदेशात नमूद शिक्षेस पात्र राहील.

१४. ध्वजारोहण व शासकीय सण—महानगरपालिकांमध्ये महापौरांनी, जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष, नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये त्यांच्या अध्यक्षानी, पंचायत समितीच्या सभापतींनी व ग्रामपंचायतीमध्ये सरपंचांनी प्रजासत्ताक दिनी अथवा स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण करण्यास हरकत नाही. तथापि, अशा कार्यक्रमांच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये. तसेच या समारंभात करावयाची भाषणे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांच्या तसेच देशाचा गौरव यापुरतीच मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत या समारंभात निवडणूक प्रचाराविषयी भाषणे करता येणार नाहीत.

१५. मतदान केंद्राच्या आतील चित्रीकरण—मतदान केंद्रातील प्रत्यक्ष मतदानाचे, मतदान कक्षाचे तसेच ज्यामुळे मतदानाची गुप्तता भंग होऊ शकते अशा कुठल्याही बाबींचे व मतदान केंद्राच्या आतील भागाचे चित्रीकरण करता येणार नाही.

१६. पेड न्यूज—काही उमेदवार, राजकीय पक्ष निवडणुकांच्या दरम्यान बातम्यांच्या स्वरुपात वर्तमानपत्रामध्ये, इलेक्ट्रॉनिक मिडीयामध्ये आपल्या जाहिराती करतात. या जाहिरातींचे दृष्य स्वरुप बातमीसारखे असले तरी प्रत्यक्षात अशा बातम्या किंमत देऊन छापून आणल्या/प्रसिद्ध केल्या जातात. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १६/०१/२०१२ च्या आदेशानुसार महानगरपालिका, नगरपरिषद / नगरपंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या वेळी पेड न्यूजबाबत आलेल्या तक्रारींवर चौकशी करण्यासाठी समिती नेमणे आवश्यक आहे. या समितीने एखादी बातमी पेड न्यूज असल्याचे मत दिल्यास त्या न्यूजवर झालेला खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

१७. पक्ष/उमेदवारांचे सभेच्या जागा निश्चित करणे—संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने सभेची जागा निश्चित व वाटप करण्यासाठी नियम/धोरण निश्चित करुन सर्वसंबंधीतांना अवगत करणे.

भाग—पाच

पोलीस विभागाशी संबंधित

१. शस्त्रास्त्र बंदी—निवडणुका जाहीर झाल्यापासून शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध घालणे आवश्यक आहे. ही बंदी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ९ एप्रिल २०१५ च्या पत्रान्वये निवडणुकांच्या काळामध्ये शस्त्र जमा करण्याबाबत छाननी समिती गठित करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे कळविले आहे. सदर आदेश जिल्हाधिकारी अथवा अन्य संबंधित पोलीस अधिकारी यांच्याकडून वेळीच काढले जातील, याची संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी दक्षता घ्यावी.

२. दारुबंदी—कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी संपूर्ण आचारसंहितेच्या कालावधीत दारुचे वाटप करु शकणार नाही. तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्रीवर बंदी राहील. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक एसईसी/१०९५/सी.आर.१/९५ /डेक्स ३, दिनांक ७ मार्च १९९५ लागू राहतील.

३. ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत—ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल. तसेच रात्री १०.०० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत ध्वनिक्षेपकाच्या वापरावर बंदी राहील यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक एसईसी/१०९५/सी.आर.९/९५/डेस्क-३, दिनांक १८ मार्च १९९५ अन्वये ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत दिलेल्या सूचना लागू राहतील. तसेच, याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, २००० ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४. प्रचार संपल्यानंतर प्रचारासाठी आलेल्या व्यक्तींनी हद्दीमध्ये वास्तव्य न करणेबाबत—राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४/का.५, दिनांक ९ एप्रिल २०११ अन्वये प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर प्रचारार्थ आलेल्या व्यक्तींना किंवा ज्यांच्याबाबत पोलिसांना संशय असेल अशा, त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये वास्तव्य न करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांना पोलीस हद्दीबाहेर हलविण्याबाबतची कार्यवाही करु शकतील.

उपरोक्त बाबीव्यतीरिक्त आदर्श आचारसंहितेतील इतर मुद्यांमध्ये जेथे जेथे पोलीस विभागाशी संबंधीत असेल तेथे सेच, कायद्याचे/ आचारसंहितेचे भंग होत असल्याचे आढळल्यास त्यामध्येसुद्धा पोलीस विभागाने कारवाई करावयाची आहे.

भाग—सहा

" काय करावे व काय करु नये "

(अ) " काय करावे " :—

१. चालू असलेले कार्यक्रम/योजना पुढे सुरू ठेवता येईल.

२. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोग/महानगरपालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/मान्यता प्राप्त करण्यात यावी.

३. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व चालू असलेल्या योजना पुढे सुरू ठेवता येतील.

४. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समुचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल.

५. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना/निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना/निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडचा वापर निःपक्षपातीपणे उपलब्ध करून दिला पाहिजे.

६. विश्रामगृहे, डाक बंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णतया अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेले सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत.

७. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात येणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ याबाबींशी संबंधित असावी.

८. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे.

९. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानगी मिळविण्यात याव्यात.

१०. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळविण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे.

११. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक (Loudspeaker) किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे.

१२. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांचे सहाय्य मिळविण्यात यावे.

१३. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी.

१४. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्याविषयी खात्री करून त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे.

१५. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये.

१६. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू प्रचार फेरीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत.

१७. मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे. उमेदवार व त्याच्या अधिकृत कार्यकर्त्यांनी विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले आणि ओळखपत्रे निवडणूक प्रशासनाकडून मिळवावीत आणि ती दर्शनी भागावर लावावीत.

१८. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठया साध्या (पांढऱ्या) कागदावर देण्यात येतील व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही.

१९. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे.

२०. निवडणूक आयोगाचे, महानगरपालिका आयुक्त यांचे अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याहीवेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य) यातून सूट देण्यात आलेली नाही.

२१. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी / क्षेत्र /प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निर्देशनास आणून देण्यात यावी.

२२. राज्य निवडणूक आयोग/आयुक्त, महानगरपालिका/जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश/आदेश/अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

(ब) " काय करु नये " :—

१. शासकीय वाहने किंवा कर्मचारीवर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनांचा समावेश असेल :—

(१) केंद्र शासन, (२) राज्य शासन, (३) केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, (४) केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, (५) स्थानिक स्वराज्य संस्था, (६) महानगरपालिका, (७) नगरपरिषदा/नगरपंचायती, (८) पणन मंडळ (कोणत्याही नावाचे), (९) सहकारी संस्था, (१०) जिल्हा परिषदा/पंचायत समित्या/ग्रामपंचायती किंवा, (११) ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्श्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतविण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था आणि तसेच, (१२) संरक्षण मंत्रालयाच्या मालकीची आणि गृह मंत्रालय व राज्य शासन यांच्या केंद्रिय पोलीस संघटनेच्या मालकीची असलेली पुढील वाहने—

मालमोटारी, लॉरी, टेंपो, जीपगाड्या, मोटारगाड्या,ऑटोरिक्षा, बसगाड्या, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने.

२. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये.

३. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करू नयेत.

४. शासन / सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही नवीन नियुक्त्या करू नयेत.

५. मंत्री, ते उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत.

६. निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी काम पार पाडण्यात येऊ नये.

७. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये. कोणत्याही वस्तूंचे वाटप करू नये. यामध्ये ई-कॉमर्समधील ऑनलाईन खरेदीचादेखील समावेश होतो.

८. मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये.

९. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये.

१०. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये.

११. ज्यांचा खरे-खोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरुप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये.

१२. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादीसाठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये.

१३. लाच देणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूकविषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत.

१४. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुद्ध निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये.

१५. कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा इत्यादि लिहिणे यासाठी करता येणार नाही. यामध्ये खाजगी व सार्वजनिक जागांचा समावेश असेल.

१६. इतर राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये.

१७. एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे प्रचार फेरी काढण्यात येऊ नये.

१८. इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा व मिरवणुकीमध्ये कोणतेही अडथळे निर्माण करु नयेत.

१९. दुसऱ्या पक्षांनी किंवा उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके काढून टाकण्यात येऊ नयेत. मात्र याबाबत काही आक्षेप असल्यास पोलिसांच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे.

२०.मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वितरित करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षानिकट प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

२१. ध्वनिवर्धकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसविलेले असोत सकाळी ६-०० वाजण्यापूर्वी किंवा रात्री १०-०० वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करू नये. तसेच, याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, २००० ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

२२. तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची पूर्व लेखी परवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा प्रचार फेरीत ध्वनिवर्धकाचा वापर करू नये. अशा सभा / प्रचार फेरी रात्री १०-०० वाजल्यानंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या अटींचे पालन करावे. याखेरीज, ती स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टीकोन आणि हवामान, सणासुदीचा मोसम, परिक्षेचा काळ यांच्या अधीनतेने असतील.

२३. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या मद्याचे वाटप करण्यात येऊ नये.

आचारसंहितेची अंमलबजावणी योग्यरितीने करण्यात येईल याबाबत सर्वांनी कसोशीने प्रयत्न करावेत. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमूद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्‌भवल्यासच जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग झाल्यास तात्काळ नियमानुसार कार्यवाही करुन त्याचा अहवाल विनाविलंब आयोगास सादर करावा.

टीप :— 'काय करावे' किंवा 'काय करू नये' यांची वरील सूची केवळ वानगीदाखल असून ती सर्वसमावेशक नाही. वरील विषयावरील इतर तपशीलवार आदेश, निदेश/सूचना यांना पर्यायी असणार नाही. त्यांचे काटेकोर पालन करावेच लागेल.

भाग—सात

आचारसंहिते संदर्भात विविध विषयांवरील निदेशांचे संकलन सर्वसमावेशक नाही. आचारसंहितेच्या अंमलबजावणी योग्यरितीने करण्यात येईल याबाबत सर्वांनी कसोशिने प्रयत्न करावेत. निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये या उदा. दाखल दिलेल्या संकलनामध्ये नमूद नसलेली कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्‌भवल्यास परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या भारत निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेमधील तत्वांचे पालन करावे.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

एस. एम. चव्हे,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

STATE ELECTION COMMISSION

No. SEC.1095/CR-25/95/PR,
New Administrative Building,
Opp. Mantralaya, Madam Cama Road, Bombay 400.032.
Dated 21st January 1995.

To

The Commissioners,
(All Revenue Divisions),
The Municipal Commissioner,
(All Municipal Corporations),
The Collector,
(All Districts),
The Chief Executive Officer,
(All Zilla Parishads).

Sub.—Elections to the Panchayats and the Municipalities—

Prevention of defacement of property and for matters connected therewith or incidents thereto :—

The Governor of Maharashtra has promulgated an Ordinance, being Maharashtra Ordinance No. 1 of 1995, to provide for prevention of defacement of property and for matters connected therewith or incidental thereto. This Ordinance has been published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part IV, dated the 18th January 1995 at pages 14.

2. It is common knowledge that political parties/associations/bodies or candidates or their workers, supporters or sympathisers indulge in defacing or spoiling private or public property including buildings by pasting of posters, writing of slogans, painting of symbols, erecting flagstaffs, suspending banners, etc. Indulgence in such undesirable activities, without written permission of the owner of the building, whether private or public, by such party/association/body/candidate/person, calls for action such as prosecution or otherwise being proceeded against under the law. All such acts of defacement of property indulged in by political parties/ associations/bodies or persons whether during the election period or non-election period call for such action as mentioned above. The laws in relation to the Panchayati Raj institutions and the Municipal Corporations or Municipal Councils do not adequately provide for appropriate action against such party or persons and as the Government has observed that there is increasing tendency of defacing private or public properties for personal purpose and advertisement, etc. without obtaining necessary permission for the same from the local authority concerned, the abovementioned Ordinance has been promulgated.

3. The Ordinance defines the expressions " advertisement " " defacement ", " place open to public view ", " public place " as under—

(*a*) advertisement means any printed, cyclostyled typed or written notice, document paper on any other thing containing any letter, word, picture, sign or visible representation ;

(*b*) " defacement " includes impairing or interferring with the appearance of beauty, damaging, disfiguring spoiling or injuring in any way whatsoever and the word " daface " shall be construed accordingly;

(*c*) " place open to public view " includes any private place or building monument, statue post, wall, fence or contrivance, visible to a person being in, or passing along, any public place ;

(*d*) " public place " means any place (including a road, street, or way whether a throughfare or not and a landing place) to which the public are granted access or have a right to resort or over which they have a right to pass.

The offence for defacing property is punishable with imprisonment for a period which may extent to three months or with fine which may extend to two thousand rupees or with both.

The provisions of the Ordinance do not apply to any advertisement exhibitedwith the written permission of the local authority; or exhibited in the window of any building in relation to trade, profession or business carried on within the land or building upon or over which such advertisement is exhibited or to any sale or to letting of such land or building or any effects therein; or advertisement of any sale, entertainment or meeting to be held on or upon or in the same; or advertisement to business of railway administration.

The offence punishable under the Ordinance is cognizable. Under the provisions of the Ordinance, the State Government is empowered to free the property from any defacement, or to erase any writing or remove any erection or fixation from any place open to public view and the expenditure incurred in doing so shall be recoverable from the person guilty of such offence.

The provisons of this special law which has been enacted through this Ordinance would now be available for checking and preventing defacement of property more particularly when resorted to during or about the period of elections to the Panchayats and the Municipalities.

The copy of this Ordinance can be had from the relevant gazette pointed out above, and, with a view to checking or preventing defacement of private and public property, the authorities in the field shall no doubt bring the provisions thereof to the notice of the Officers and employees who would be dealing with election matters in respect of elections to the Panchayats and the Municipalties.

D. N. CHAUDHARI.
State Election Commissioner,
Maharashtra.

STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

No. SEC. 1095/CR-1/95/Desk-3,
New Administrative Building,
Opposite Mantralaya,
Madame Cama Road, Bombay 400 032.
Dated the 7th March 1995.

To,

The Chief Secretary to the Government of Maharashtra,
Mantralaya, Bombay 400 032.

Subject.—Prohibition on sale of liquor.

DIRECTION

Whereas, the superintendence, direction and control of all elections to the Panchayats and the Municipalities in the State are vested in the State Election Commission, Maharashtra in accordance with the provisions of Articles 243-K and 243-ZA of the Constitution of India ;

And Whereas, as envisaged in the provisions made by the Constitution (Seventy-third) Amendment Act, 1992 and the Constitution (Seventy-fourth) Amendment Act, 1992, it is intended *inter alia* to ensure regular, timely and also free, fair and in efficient manner, all elections to the Panchayats and the Municipalities under the superintendence, direction and control of the State Election Commission ;

And Whereas the provisions with regard to the elections to the Panchayats and the Municipalities made in the relevant State Acts under which Panchayat and the Municipalities are constituted do not, in all the Acts, provide for the prohibition on sale of liquor, during an election to a Panchayat or a Municipality ;

And Whereas, it is necessary and expedient in the interest of maintaining purity of elections to a Panchayat or a Municipality and in the interest of conduct of such elections in a free, fair, peaceful and efficient manner, to provide for prohibition on sale of liquor during any election to a Panchayat or the Municipality including any bye-election ;

And Whereas, the State Election Commission has ordered holding of general elections to over about 14,000 Village Panchayats throughout the State and fixed the programme therefor in two stages according to which the dates of poll fall on the 20th April 1995 and the 19th May 1995 and those of counting on the 20th or 21st April 1995 and the 19th or 20th May 1995 ;

Now, Therefore, in exercise of the powers conferred by Articles 243-K and 243-ZA of the Constitution of India, read with sub-section (*4*) of section 18A of the Bombay Municipal Corporation Act (Bom. III of 1888), sub-section (*4*) of section 9B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C. P. and Berar II of 1950), sub-section (*4*) of section 14 of the Bombay

Provincial Municipal Corporation Act, 1949 (Bom. LIX of 1949), sub-section (*4*) of section 10A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965, sub-section (*4*) of section 10A of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), the Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling me in this behalf, and in relation to holding of elections under these provisions under the supervision, direction and control of the State Election Commission, I, D. N. Chaudhari, State Election Commissioner, Maharashtra hereby direct as follows :—

1. The sale of liquor and intoxicants is banned on the day immediately before the day of poll, on the day of poll, and also on the day of counting of votes. Such a ban is considered imperative for the proper maintenance of public order and also to prevent the possibility, not too indistinct in social culture, of the use of intoxicants as an inducement to colour the judgement of the voter at the time of poll and also disturbing public order. This also has indirect impact on the reduction of illegal election expenses.

2. No liquor shops, hotels, restaurants, clubs and other establishments selling/serving liquor; shall be permitted to sell/serve liquor to any one whosoever, on the aforesaid days.

3. Non-proprietary clubs, Star Hotels, restaurants, etc and hotels run by anyone even if they are issued different categories of licences for possession and supply of liquor, should also not be permitted to serve liquor on these days.

4. The storage of liquor by individuals shall be curtailed during the above period and the restrictions provided in the Prohibition and Excise laws on the storage of liquor in unlicense premises shall be vigorously enforced.

5. Steps shall also be taken to prohibit sale of liquor in adjoining areas of the concerned Panchayat or Municipality so that there are no chances of clandestine movement of liquor from those areas, had the restrictions not been in operation.

6. The authorities concerned of the State Government shall declare and notify " dry days " under the Bombay Prohibition Act, 1949 (Bom. XXV of 1949) on the days referred to in direction 1 hereinabove.

7. The State Government shall strictly implement the above measures and issue detailed and comprehensive standing instructions to all the authorities concerned to take appropriate and legally effective steps in that behalf and assist the election authorities in the peaceful and smooth conduct of free and fair poll. A copy of the instructions so issued should be endorsed to the State Election Commission.

8. These directions shall apply at all other/future general or bye-elections to any Panchayat or Municipality in the State ;

D. N. CHAUDHARI,
State Election Commissioner, Maharashtra.

Copy forwarded for information to—
All the Divisional Commissioners.
All the Municipal Commissioners.
All the Collectors of Districts.
All the Chief Executive Officers of the All Zilla Parishad.

असा. क्र. ३३

रजिस्टर्ड नं. एमएच/वाय-साऊथ/२०

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, फेब्रुवारी १०, १९९५ / माघ २१, शके १९१६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

भाग एक-अ—मध्य उप-विभाग

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम याखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना

STATE ELECTION COMMISSION

New Administrative Building, Opp. Mantralaya, Madam Cama Road, Bombay 400 032, dated 7th February 1995.

Order

CONSTITUTION OF INDIA.

No. SEC. 1095/101/Desk-3.—Whereas the Superintendence, direction and control of all elections to the Panchayats and the Municipalities in the State are vested in the State Election Commission, Maharashtra in accordance with the provisions of Articles 243-K, and 243-ZA of the Constitution of India;

And whereas as envisaged in the provisions made by the Constitution (Seventy-third) amendment Act, 1992 and the Constitution (Seventy-fourth) amendment Act, 1992 it is intended *inter alia* to ensure regular, timely and also free, fair and in efficient manner, all elections to the Panchayats and the Municipalities under the superintendence, direction and control of the State Election Commission ;

And whereas the increasing role of money power in elections has a pernicious influence on society, resulting into malady which tends to reduce the process of election into a mere farce therby placing some privileged candidates with financial resources in a distinctly advantageous position over the other candidates with meagre resources ;

And whereas the provisions with regard to the elections to the Panchayats and the Municipalities made in the relevant State Acts under which the Panchayats and the Municipalities are constituted do not provide for any limit of expenditure to be incurred by a candidate at an election to a Panchayat or a Municipality ;

And whereas it is necessry and expendient in the interest of purity of elections to a Panchayat or a Municipality and in the interest of conduct of such election in a free, fare and efficient manner, to provide for limit of expenditure to be incurred bya candidate at an election and for incidental provisions with regard to rendering of accounts of such expenditure at elections ;

Now therefore, in exercise of the powers conferred by Articles 243-K and 243-ZA of the Constitution of India, read with sub-section (*4*) of section 18A of the Bombay Municipal Corporation Act (Bom. III of 1888), sub-section (*4*) of section 9B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C.P. and Berar II of 1950), sub-section (*4*) of section 14 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949), sub-section (*4*) of section 10A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965, sub-section (*4*) of section 10A of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) and of all other powers enabling me in this behalf, and in relation to holding of elections under these provisions by the State Election Commission, I., D. N. Chaudhari, State Election Commissioner, Maharashtra, hereby direct as follows :—

1. The limit of expenditure that may be incurred by a contesting candidate (either by himself or by his authorised election agent or any particular Party/Aghadi/Front or any other association, body or individual) in connection with the election to any of the Panchayats or the Municipalities shall—

(*a*) in the case of an election as a Councillor to a Municipal Corporation, be Rs. 40,000 ;
(*b*) in the case of an election as a Councillor to a Municipal council, be Rs. 30,000;
(*c*) in the case of an election as a Councillor to a Zilla Parishad, be Rs. 30,000 ;
(*d*) in the case of election as a member of a Panchayat Samiti, be Rs. 20,000 ; and
(*e*) in the case of election as a member of a Village Panchayat, be Rs. 5,000 ;

2. The contesting candidate shall maintain accounts of expenditure and submit the details of expenditure which may generally be on the items of expenditure specified in the proforma in Annexure I, and the account of such expenditure shall be submitted in detail in that Annexure as directed in paragraph 7 herein.

3. The contesting candidate for an election as a councillor to a Municipal Corporation, Municipal council or Zilla Parishad or a member to a *Panchayat Samit* shall maintain day-to-day account of expenditure in the proforma in Annexure II and submit the same to the Returning Officer concerned on the following day by 2-00 p.m.

4. The contesting candidate shall, either by himself or by his authorised election agent, keep separate and correct accounts of all expenditure in connection with the election between the date he has been nominated and the date of declaration of results, both dates inclusive. The total of such expenditure shall not exceed the limit laid down hereinabove.

5. No particular party/*Aghadi* /Front or any other association, body or individual shall put up any cut-outs, boardings, wall paintings or any other paintings on any property, buntings, arches, gates, banners, flags, advertisement in newspapers, etc. without the general or special authority in writing of the candidate whose election is sought to be promoted or procured by such cut-outs, hoardings, paintings, etc. as expenditure of all such items shall be treated as his legitimate expenditure incurred by the contesting candidate. No contesting candidate or any individual on his behalf shall put up any cutout, hoardings, paintings etc. on any property whatsoever without prior permission of the owner or the government or the local body concerned, as the case may be.

6. the failure to submit day-to-day account, as required under paragraph 3 above, by the candidate shall be viewed seriously and treated as a major default on the part of such candidate. Further as a consequence of that default, the result of election of such candidates shall not be declared till such time as details of day-to-day expenditure upto the date of poll is submitted to the returning officer concerned and the expenditure is found to be within the limit of expenditure permissible in the case of such a candidate at such election.

7. The statement of accounts maintained in Annexure-I by the contesting candidate shall be submitted by him within thirty days of the declaration of the result, in the case of a contesting candidate as councillor of Municipal Corporation, to the Municipal Commissioner concerned and the Municipal Commissioner or an officer not below the rank of Deputy Municipal Commissioner authorised by the Municipal Commissioner in this behalf, shall give an acknowledment for receipt of the statement. In any other case, such statement of accounts shall be submitted by the contesting candidate, within the period aforesaid, to the Collector of a District concerned and the Collector or an officer not below the rank of Deputy Collector authorised by the Collector in this behalf shall give acknowledgement for receipt of the statement.

8. The contesting candidate shall, while submitting the accounts, furnish together with the account, the following details of expenditure, if any incurred in respect thereof—

(*a*) size of the advertisement released in the Newspaper and the amount paid for each such advertisement and the name and date of such newspaper.

(*b*) Details of hoardings put up by them and of the writing on the walls, etc. and expenditure incurred on such items.

(*c*) Number of vehicles used by them and details of such vehicles and the expenditure incurred in respect thereof including expenditure incurred on petrol, etc.

9. A voucher shall be obtained for every item of expenditure, unless from the nature of the case, such as postage, travel by rail and the like, it is not practicable to obtain a voucher.

10. The statement of account of expenditure in Annexure I, submitted by the contesting candidate shall be accompanied by an affidavit on oath sworn in by him in the format in Annexure-III. The affidavit shall *inter alia* recite specifically that the expenditure against each item has been completely and unexceptionally included in the statement of accounts in Annexure-I and that no expenditure whatsoever has remained to be disclosed.

11. Any violation by the contesting candidate or his authorised agent or particular Party/ *Aghadi* / Front or any association, body or individual to incur expenditure in excess of the limit mentioned above or failure to submit the accounts as indicated hereinabove will be viewed seriously by the State Election Commission and stringent action as may be available under the relevant law including action to institute criminal prosecution shall be taken against the defaulter.

12. On receipt of the Statement of accounts in Annexure I, the Municipal Commissioner/the Collector shall satisfy that the statement reflects the *correct* account of *all* expenses and before recording that the statement of accounts is in accordance with the directions hereinabove he may, if found expedient, conduct such enquiry as he deem necessary. On being so satisfied, the Municipal Commissioner/the Collector shall certify to the Commission that the statement of account submitted by the contesting candidate is accepted as correct and complete in all respects.

13. The contesting candidate shall, on demand by the Municipal Commissioner or the Collector or an Officer authorised by them under paragraph 7, make available for inspection the accounts and vouchers etc. so maintained by him.

ANNEXURE I

Abstract Statement of Election Expenses

Item of expenditure (1)	Quantity/ number (2)	Name of person/Political Party/Aghadi/Front/ Body/Association incurring or authorising the expenditure. (3)	Amount of expenditure (4)	Date of payment (5)	Mode of payment (6)	Evidence of payment enclosed with the Account (7)	Remarks (8)
			Rs.				
1 Cost of nomination forms ...							
2 Expenditure on security deposit ...							
3 Expenditure on purchase of copies of electoral rolls/list of voters. ...							
4 Expenditure on hiring of campaign offices.							
5 Expenditure on printing of manifestos.							
6 Expenditure on printing of personal history.							
7 Expenditure on printing of posters ...							
8 Expenditure on printing of handbills.							
9 Expenditure on pasting of posters ...							
10 Expenditure on distribution of handbills.							
11 Expenditure on writing of wall writings.							
12 Expenditure on publication of advertisement.							
13 Expenditure on propoganda for public meetings.							
14 Hiring charges of places for public meetings.							
15 Hiring charges of pandals etc. for public meetings.							
16 Hiring charges of loudspeakars for public meetings.							
17 Hiring charges of photographers for public meetings.							
18 Expenditure on producting and playing of video cassettes.							
19 Expenditure on production and playing of audio cassettes.							
20 Visits of VIPs.							
21 Expenditure on construction of gates and arches.							
22 Hiring charges and POL on vehicle used by the candidate.							

245

23 Hiring charges and POL on vehicle used by Election agent.
24 Hiring charges and POL on vehicle used by polling agent.
25 Hiring charges and POL on vehicles used by counting agents.
26 Remuneration/cost of refreshment given to election agent.
27 Remuneration/cost of refreshments given to poling agents.
28 Remuneration/cost of refreshments given to counting agents.
29 Remuneration/cost of refreshments to house to house workers.
30 Expenditure on travelling to party head office by public transport.
31 Miscellaneous expenses (other than those listed above).

Signature of the contesting candidate.

Note.—1. The items listed hereinabove are not exhaustive. Therefore, item 31 is a general one under which the details of expenditure on any other item not covered by items 1 to 30 shall be furnished.

2. This proforma must be accompanied by an affidavit in the Format prescribed by the State Election Commission. No statement of account of expenditure shall be accepted as complete without the affidavit.

3. The Statement of account shall be countersigned by the candidate if it is lodged by his election agent and shall be certified by the candidate to be correct copy of the account kept.

4. The expenditure should be supported by vouchers which should be attached, except where it was not practicable to obtain a voucher such as in the case of postage stamps, travel by rail and the like.

ACKNOWLEDGEMENT

The account of the election expenses in respect of ..... (Candidate) at the general/bye-election to the .....Corporation/Municipal Council/Zilla Parishad/Panchayat Samit from ward/electoral division/electoral college number ..... result of which was declared on ..... (Date) has been filed by him/on his behalf on ..... (Date) has been received by me today the ..... (Date) of ..... (Month) ..... (Year).

Municipal Commissioner .....
Officer authorised by the Municipal Commissioner.
Collector,
District ..... /Office authorised by the Collector.

ANNEXURE II

proforma for the submission of election expenditure

Name of the Candidate

Name of the political party/Aghadi/Front, if any, by which the candidate is set up.

Ward/Electoral Division/Electoral College from which contesting

Date of declaration of result.

DAY-TO-DAY ACCOUNT

Date of Expenditure	Nature of Expenditure with reference to Item of expenditure	Amount of Expenditure		Date of Payment	Name and address of Payee	Serial number of Voucher in case of amount paid	Serial number of Bill in case of an amount outstanding	Name and Address of person to whom the amount outstanding is payable	Remark
		Paid	Out Standing						
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)
		Rs.	Rs.						

Certified that this is a true copy of the account kept by me/my election agent.

Signature of the contesting Ca[illegible]date.

ANNEXURE III

FORM OF AFFIDAVIT

Before the Municipal Commissioner ...../Collector, District .....

AFFIDAVIT

I, ... son/wife/Daughter of .... aged ..... years .... r/o ..... do hereby sloemnly and sincerely state and declare as under :—

(1) That I was a contesting candidate at the general election/bye election to the

*Ward Number ..... of the ..... Municipal Corporation/Council

Electoral Division/Electoral College Number ..... of the ..... Zilla Parishad/Panchayat Samiti, the result of which was declared on .....

(2) That I/my election agent kept a seperate and correct account of all expenditure in connection with the above election incurred or authorised by me or by my election agent between ..... (the date on which I was nominated) and the date of declaration of the result thereof, both days inclusive.

(3) That the said account of all election expenditure was maintained in the proforma devised by the State Election Commission for the purpose and a true copy thereof is annexed hereto with the supporting vouchers/bills mentioned in the said account.

(4) That the account of my election expenditure as annexed hereto includes all items of election expenditure incurred or authorised by me or by my election agent and nothing has been concealed or withheld/suppressed/omitted there from.

(5) that the statement in the foregoing paragraphs (1) to (4) are true to my personal knowledge, that nothing is false and nothing material has been concealed or withheld or supprsed or omitted.

Deponent.

Solemnly affirmed/sworn by ..... at ..... this day of 199 before me.

*Strike out whichever is not applicable.

D. N. CHAUDHARI,
State Election Commissioner, Maharashtra.

भाग एक

निवडणूकविषयक खर्चाचे संक्षिप्त विवरण

खर्चाची बाब (१)	परिमाण/संख्या (२)	खर्च करणाऱ्या किंवा त्याला अधिकृत मंजूरी देणाऱ्या व्यक्तीचे/राजकीय पक्षांचे/संस्थेचे/संघाचे नाव (३)	खर्चाची रक्कम (४)	प्रदानाचा/ प्रदानाचे दिनांक (५)	प्रदानाची पद्धत (६)	लेख्या सोबत जोडलेला प्रदानाचा पुरावा (७)	शेरा (८)
१ नामनिर्देशनपत्रावरील खर्च							
२ प्रतिभूति ठेवीवरील खर्च							
३ मतदार याद्यांच्या प्रती खरेदी करण्यावरील खर्च							
४ प्रचार मोहिमासाठी कार्यालये भाड्याने घेण्यावरील खर्च.							
५ जाहीरनाम्यांच्या मुद्रणावरील खर्च							
६ व्यक्तिगत माहिती पत्रकाच्या मुद्रणावरील खर्च							
७ भित्तिपत्रकांच्या मुद्रणावरील खर्च							
८ हस्तपत्रकांच्या मुद्रणावरील खर्च							
९ भित्तीपत्रके चिकटवण्यासाठी झालेला खर्च							
१० हस्तपत्रकांचे वितरण करण्यासाठी झालेला खर्च							
११ भित्तीवर लिखाण करण्यासाठी झालेला खर्च							
१२ जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी झालेला खर्च							
१३ सार्वजनिक सभांचा प्रचार करण्यासाठी झालेला खर्च.							
१४ सार्वजनिक सभांसाठी जागा भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च.							
१५ सार्वजनिक सभांसाठी मंडप वगैरे गोष्टी भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च.							
१६ सार्वजनिक सभांसाठी ध्वनिक्षेपक भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च.							
१७ सार्वजनिक सभांमध्ये छायाचित्रे काढण्यासाठी बोलाविलेल्या छायाचित्रकारांना भाडे खर्च.							

२३२

१८ व्हिडिओ कॅसेट काढण्यासाठी व दाखविण्यासाठी झालेला खर्च.

१९ ध्वनिमुद्रीत कॅसेट काढण्यासाठी व ऐकविण्यासाठी झालेला खर्च.

२० विशेष मान्यवर व्यक्तींच्या भेटी

२१ द्वारे व कमानी उभारण्यासाठी झालेला खर्च

२२ उमेदवाराने वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च

२३ निवडणूक प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च.

२४ मतदान प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च.

२५ मतमोजणी प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनाचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च.

२६ निवडणूक प्रतिनिधींना दिलेले पारिश्रमिक/दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च.

२७ मतदान प्रतिनिधींना दिलेले पारिश्रमिक/दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च.

२८ मतमोजणी प्रतिनिधींना दिलेले पारिश्रमिक/दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च.

२९ घरोघरी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलेले पारिश्रमिक/दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च.

३० पक्षाच्या मुख्यालयामध्ये जाण्यासाठी केलेल्या प्रवासावरील खर्च.

३१ संकीर्ण खर्च (वर यादीमध्ये नमूद केलेल्या बाबींच्या व्यतिरिक्त)

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची स्वाक्षरी

टिप.—(१) वर उल्लेखिलेल्या बाबी सर्व समाविष्ट नाहीत, त्यामुळे क्र. १ ते ३० बाबींव्यतिरिक्त करण्यात आलेला खर्च बाब क्र. ३१ या सर्वसाधारण खर्चाचे अंतर्गत तपशीलवार देण्यात यावा.

(२) या प्रपत्रासोबत विहित नमुन्यातील शपथपत्र जोडणे आवश्यक आहे. शपथपत्राशिवाय असलेले खर्चाचे विवरणपत्र पूर्ण विवरणपत्र म्हणून स्वीकारण्यात येणार नाही.

(३) हिशेब निवडणूक प्रतिनिधीने दाखल केला असेल तर त्यावर उमेदवाराने प्रतिस्वाक्षरी करावी व निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या हिशेबाची सत्यप्रत आहे असे प्रमाणित करावे.

(४) टपालखर्च, रेल्वे प्रवास अशा प्रकारची प्रमाणके सादर करणे व्यवहार्य नाही अशी प्रमाणके वगळता इतर सर्व खर्चाच्या बाबींची प्रमाणिके सादर करणे आवश्यक आहे.

283

जोडपत्र दोन

निवडणूक खर्च सादर करण्यासंबंधीचा नमुना

उमेदवाराचे नाव .

ज्यांच्यातर्फे उमेदवार निवडणूक लढवित असेल त्या राजकीय पक्ष/आघाडी/फ्रंट यांचे नाव

निवडणूक लढवित असलेला प्रभाग/मतदार गण/मतदार गट :

निवडणूक जाहीर झाल्याचा दिनांक :

दैनंदिन खर्च

खर्चाचा दिनांक	खर्चाचे स्वरुप	खर्चाची रक्कम		प्रदानाची तारीख	आदात्याचे नाव व पत्ता	दिलेलया रकमेच्या बाबतीत प्रमाणकाचा अनुक्रमांक	अदत्त रकमेच्या बाबतीत देयकाचा अनुक्रमाक	अदत्त रक्कम ज्या व्यक्तीस देय आहे त्या व्यक्तीचे नांव व पत्ता	शेरा
		दिलेली	अदत्त						
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)

प्रमाणित करण्यात येत आहे की, मी/माझ्या निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या लेख्यांची ही सत्य प्रत आहे.

निवडणूक लढणाऱ्या उमेदवाराची स्वाक्षरी.

पोचपावती

दिनांक ..... रोजी सार्वजनिक निवडणूक/ पोटनिवडणूक निकाल घोषित करण्यात आलेल्या नगरपालिका/नगरपरिषद/जिल्हापरिषद/पंचायत समिती मधील प्रभाग/मतदार गण/मतदार गट क्रमांक ..... मधील ..... (उमेदवाराचे नाव) यांच्या बाबतीतील निवडणूकविषयक खर्चाचा हिशेब त्यांनी/त्यांच्या वतीने दिनाक ..... रोजी सादर केला असून तो मला आज दिनांक ..... महिना ..... वर्ष ..... रोजी मिळाला आहे.

नगरपालिका आयुक्त/महानगरपालिका
आयुक्तांनी प्राधिकृत केलेला अधिकारी.

जिल्हा अधिकारी
जिल्हा ..... /जिल्हाधिकारी
यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी.

जोडपत्र तीन
(शपथपत्राचा नमुना)

महानगरपालिका आयुक्त, ... /जिल्हाधिकारी,

..... यांच्या समक्ष

शपथपत्र

मी, ... यांचा मुलगा/यांची मुलगी/पत्नी, वय ..... वर्षे, राहणार ..... याद्वारे गांभीर्यपूर्वक व मनःपूर्वक पूढील गोष्टी जाहीरपणे नमूद करत आहे.

(१) मी ..... नगरपालिका/नगरपरिषद ..... प्रभाग क्रमांक ..... /जिल्हा परिषद/पंचायत समिती मतदार गण/मतदार गट क्रमांक ..... मधून सार्वत्रिक निवडणूक/पोट निवडणूक लढवत होतो/होती आणि तिचा निकाल दिनांक ..... रोजी घोषित करण्यात आला होता.

(२) मी/माझ्या निवडणूक प्रतिनिधीने, दिनांक ..... (ज्या दिनांकास मला निवडणूकीसाठी नामनिर्देशन करण्यात आले तो दिनांक) ते त्या निवडणूकीचा निकाल घोषित करण्यात आला तो दिनांक ..... दोन्ही दिवस धरून, यांच्या दरम्यानच्या कालावधीमध्ये वरील निवडणूकीच्या संबंधात मी किंवा माझ्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या किंवा अधिकृत मंजूरी दिलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व बिनचूक हिशेब ठेवला होता.

(३) उक्त हिशेब, राज्य निवडणूक आयोगाने या प्रयोजनार्थ तयार केलेल्या प्रपत्रामध्ये ठेवण्यात आला होता आणि उक्त हिशोबामध्ये नमूद केलेली प्रमाणके/देयके पुष्ट्यर्थ जोडून त्याची एक सत्यप्रत यासोबत जोडलेली आहे.

(४) सोबत जोडलेल्या माझ्या निवडणूक खर्चाच्या हिशोबामध्ये मी किंवा माझ्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या किंवा अधिकृत मंजुरी दिलेल्या खर्चाच्या सर्व बाबी समाविष्ट केल्या आहेत आणि त्यामधील कोणतीही बाब लपवण्यात आलेली नाही किंवा रोखून ठेवण्यात आलेली नाही/दाबून ठेवण्यात आलेली नाही.

(५) पूर्वगामी परिच्छेद (१) ते (४) यांमध्ये केलेली विधाने माझ्या वैयक्तिक माहितीनुसार खरी आहेत, ती विधाने खोटी नाहीत आणि कोणतीही महत्वाची गोष्ट मी लपवून ठेवलेली नाही.

अभिसाक्षी

माझ्या समक्ष दिनांक ..... रोजी ..... येथे यांना गांभीर्यपूर्वक कथन केले शपथपूर्वक कथन केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यासाठी उमेदवारांकरिता "वेळ (Time) आणि रीत (Manner)" निश्चित करणेबाबत...

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०१६.

आदेश

लोकसभा/विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्था (नगर परिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या व महानगरपालिका) च्या निवडणुका राजकीय पक्षांच्या आधारावर लढविण्यात येत असल्याने उमेदवार तसेच राजकीय पक्ष हे मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचारासह अनेक बाबींवर खर्च करतात.

२. निवडणुकांमध्ये अवैध मार्गाने (जो Corrupt किंवा Evil Practice मध्ये मोडू शकतो) होणाऱ्या खर्चावर आळा बसविणे सुदृढ लोकशाहीसाठी आवश्यक असल्याने "लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१" मध्ये अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. (उदा. कलम ७७, कलम १२३ इत्यादी)

३. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने स्थापनेच्या १९९४ मध्ये स्थापना झाल्याबरोबरच उमेदवारांच्या खर्चाबाबत खालील बाबींचा समावेश असलेले एक आदेश क्रमांक-एसईसी.१०९५/१०१/डी-३, दि.०७/०२/१९९५ मध्ये निर्गमित केले :

(i) **खर्चावरील मर्यादा** - प्रत्येक उमेदवारासाठी खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली असून, खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या किंवा ओलांडणाऱ्या उमेदवारांविरुध्द कारवाई (फौजदारी गुन्ह्यासह) करण्याची तरतूद आहे.

(ii) **दैनंदिन निवडणूक खर्च** :- उमेदवारांनी खर्चाचा हिशोब दर दिवशी सादर करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास उमेदवारांचा निकाल राखून ठेवण्याची तरतूद आहे.

(iii) **एकूण निवडणूक खर्च व शपथपत्र** :- निवडणुकीचा निकालानंतर ३० दिवसांच्या आत एकूण खर्चाचा हिशोब व त्यासोबत 'निवडणुकीवर झालेल्या सर्व खर्चाचा हिशोब व तपशील देण्यात आलेला आहे आणि कोणताही खर्च लपविण्यात आलेला नाही' या आशयाचे शपथपत्र प्रत्येक उमेदवाराने देण्याची तरतूद आहे.

(iv) जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांना खर्चाची सत्यता तपासण्याचे अधिकार आहेत.

(v) जर जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी मागणी केली, तर उमेदवाराने खर्चाच्या हिशोबाची पुस्तके, बिले, व्हाऊचर इत्यादी तपासण्याकरिता देणे आवश्यक आहे.

४. राज्य निवडणूक आयोगाने यानंतर आवश्यकतेनुसार उमेदवाराच्या खर्चाबाबत अनेक आदेश निर्गमित केलेले आहेत.

५. उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचे खालील मुख्य स्रोत असतात :

(अ) उमेदवाराने अगर त्याच्या प्रतिनिधीने स्वत: केलेला खर्च,

(ब) राजकीय पक्षाने त्यांचेवर केलेला खर्च.

(क) इतर व्यक्ती (जसे-नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, हितचिंतक, समर्थक इ.) किंवा संस्थेने त्यांचेवर केलेला खर्च.

६. निवडणुकीमध्ये अवाजवी खर्च व तसेच अवैध मार्गाने मतदारांना प्रभावित करण्यासाठी किंवा प्रलोभन देण्यासाठी राजकीय पक्ष व उमेदवारांकडून वापरण्यात येणाऱ्या नवनवीन योजनांबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये चिंता व्यक्त करुन त्यांच्यावर आळा बसविण्यावर सर्वांचे लक्ष

केंद्रीत केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या काही निर्णयांचा थोडक्यात तपशील परिशिष्ट-१ मध्ये नमूद केला आहे.

७. निवडणुकांमध्ये आर्थिक बळाचा वाढता दुरुपयोग, त्यावर मा. सर्वोच्च/उच्च न्यायालयाचे निरनिराळया प्रकरणामध्ये अभिप्राय व लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील तरतुदी लक्षात घेता राज्य शासनाने सन २००८ मध्ये मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम आणि सन २०१० मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायत अधिनियमांमध्ये दुरुस्ती करुन खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

Disqualification by State Election Commission

If the State Election Commission is satisfied that a person,-

(a) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(b) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by an order published in the Official Gazette, declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a Councillor (for Corporation, Council & Nagar Panchayat) /Member (for Z.P. , P.S. & G.P) or for contesting an election for being a Councillor (for Corporation, Council & Nagar Panchayat) /Member (for Z.P. , P.S. & G.P) for a period of three (for Corporation, Council & Nagar Panchayat) /five years (for Z.P. , P.S. & G.P) from the date of the order.

८. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमातील वरील दुरुस्ती लक्षात घेता दि.०७/०२/१९९५ चे आदेश सुधारित करुन निवडणूक खर्चाचा तिशोब देण्यासाठी उमेदवारांकरिता राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे "वेळ (Time) व रीत (Manner)" निश्चित करत आहे.

आ दे श

९. **सर्व उमेदवारासाठी :-**

९.१. **स्वतंत्र बँक खाते उघडणे, निधी स्वीकारणे व खर्च करणे इ. करण्यासाठी :**

(i) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने शेड्यूल बँकेमध्ये एक स्वतंत्र खाते उघडावे व त्या खात्याचा तपशिल नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

(ii) बँकेच्या वरील खात्यामधूनच उमेदवारांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्व आर्थिक व्यवहार करावेत. तसेच हे सर्व व्यवहार धनादेशाद्वारे (Cheque) करण्यात यावेत. (जसे-देणग्या स्वीकारणे, भेटी स्वीकारणे, कर्ज स्वीकारणे, पक्ष निधी मदत स्वीकारणे, निवडणूक खर्च करणे, देयके अदा करणे, इत्यादी). अत्यंत किरकोळ स्वरुपाचे खर्च रोखीने करता येतील, तथापि, त्याचे व्हाऊचर्स, पावती इ.ठेवणे बंधनकारक असेल.

(iii) उमेदवारांनी असाच निधी स्वीकारावयाचा आहे जो कोणत्याही अमिषाला/दबावाला बळी न पडता स्वखुशीने देण्यात येईल. जर एखाद्या निधीबाबत तक्रार प्राप्त झाली तर उमेदवाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९.२. **स्वत: केलेल्या खर्चाबाबत खालील कागदपत्रे/विवरणपत्रे/शपथपत्र सादर करावे :**

(i). **दैनंदिन निवडणूक खर्च** :- नामनिर्देशपत्र भरल्यापासून निकाल लागेपर्यंत, केलेल्या खर्चाचा दैनंदिन तपशिल प्रत्येक उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करावा.

(ii). **एकूण निवडणूक खर्च** :- निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ३० दिवसाच्या आत प्रत्येक उमेदवाराने केलेल्या एकूण खर्चाचा तपशिल, संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्तांकडे सादर करावा व त्याची पोच घ्यावी.

(iii). **एकूण निवडणूक खर्चाच्या बाबी** :- सदर एकूण निवडणूक खर्चामध्ये वरील परिच्छेद-५ मध्ये नमूद केलेल्या तिन्ही बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे :-

(अ) उमेदवाराने अगर त्याच्या प्रतिनिधीने स्वत: केलेला खर्च

(आ) राजकीय पक्षाने त्याचेवर केलेला खर्च

(इ) इतर व्यक्ती (जसे- नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, हितचिंतक, समर्थक इ.) किंवा संस्थेने त्यांचेवर केलेला खर्च

(iv). **शपथपत्र** :- एकूण खर्चाच्या तपशिलासोबत सदर उमेदवाराने 'निवडणुकीवर झालेल्या सर्व खर्चाचा खरा, अचूक व योग्य हिशोब व तपशील देण्यात आलेला आहे आणि कोणताही खर्च लपविण्यात आलेला नाही' या आशयाचे शपथपत्र सादर करावे.

(v). **निवडणूक निधीचे स्रोत** : उमेदवाराने निवडणूक खर्चासाठी स्वीकारलेला निधी (देणग्या, भेटी, कर्ज, पक्ष मदत, इत्यादी) चा तपशील निकाल लागल्यापासून ३० दिवसात सादर करावा.

९.३. राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या एकूण खर्चाच्या मर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे.

९.४. उमेदवाराने केलेल्या सर्व निवडणूक खर्चाचे खरे, अचूक व योग्य पध्दतीने हिशोबाच्या नोंदी अभिलेख्यात ठेवाव्यात, व त्या खर्चास दुजोरा देणारी पुराव्याची कागदपत्रे जसे- पावती, बिल, व्हाऊचर इ. दिनांक व अनुक्रमांकानुसार फाईलिंग करुन जतन करावे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अगर जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी तपासणीसाठी मागणी केल्यास, सदर मूळ अभिलेख व खर्चास दुजोरा देणारी पुराव्याची मूळ कागदपत्रे सादर करावीत.

१०. **सर्व राजकीय पक्षांसाठी** -

१०.१ **स्वतंत्र बँक खाते उघडणे, निधी स्वीकारणे व खर्च करणे इत्यादि.**-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू इच्छिणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी शेड्यूल बँकेमध्ये खालीलप्रमाणे खाते उघडावे :-

(अ) प्रत्येक महानगरपालिकेकरिता एक स्वतंत्र खाते तसेच

(ब) इतर स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्रत्येक जिल्हयासाठी एक स्वतंत्र खाते.

(ii) पक्षांनी वरील खात्याचा तपशिल राज्य निवडणूक आयोगास व संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांना निवडणुकीपूर्वी सादर करावा.

(iii) उघडलेल्या बँकेच्या वरील खात्यामधूनच राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्व आर्थिक व्यवहार करावेत. तसेच हे सर्व व्यवहार धनादेशाद्वारे (Cheque) करण्यात यावेत. (जसे-देणग्या स्वीकारणे, भेटी स्वीकारणे, कर्ज स्वीकारणे, उमेदवारांना पक्ष निधी मदत देणे, निवडणूक खर्च करणे, देयके अदा करणे, इत्यादी)

(iv) राजकीय पक्षांनी असाच निधी स्वीकारावयाचा आहे जो कोणत्याही अमिषाला/दबावाला बळी न पडता स्वखुशीने देण्यात येईल. जर एखाद्या निधीबाबत तक्रार प्राप्त झाली तर पक्षाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१०.२. उमेदवारांवर केलेल्या खर्चाबाबतची खालील कागदपत्रे/विवरणपत्रे/शपथपत्र सादर करावे :

सर्व राजकीय पक्षांनी निकाल लागल्यापासून २० किंवा ६० दिवसाच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय खालील प्रकारचे अहवाल, विवरणपत्र संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांचेमार्फत राज्य निवडणूक आयोगास सादर करावे.

(i) नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या, पक्षातर्फे प्रपत्र-अ व ब देण्यात आलेल्या, माघार घेणाऱ्या व विजयी झालेल्या उमेदवारांचा तपशील सादर करावा. (निकाल लागल्यानंतर २० दिवसाच्या आत)

(ii) स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय एकूण खर्चाचा तपशिल सादर करावा. (निकाल लागल्यानंतर ६० दिवसाच्या आत)

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थेनिहाय पक्षांतर्फे निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारांकरिता खालील दोन्ही प्रकारचा केलेल्या खर्चाचा तपशिल सादर करावा. (निकाल लागल्यानंतर २० दिवसाच्या आत)

(अ) उमेदवारांवर केलेला थेट खर्च (Directly attributable to candidate). उदा. उमेदवारांना दिलेली पक्ष निधीची मदत, उमेदवारांसाठी छापलेले प्रचार साहित्य, उमेदवारांना पुरवलेली वाहने इ. ज्याचा संबंधित उमेदवाराशी थेट संबंध जोडता येतो व खर्च त्या उमेदवारावर थेट आकारण्यात यावा.

(आ) उमेदवारांवर केलेला खर्च जो त्यांच्यामध्ये विभाजित करता येतो (directly divisible between them). उदा. पक्षाने घेतलेली जाहिर सभा अगर रॅली अगर जाहिरात ज्यामुळे एकापेक्षा अनेक उमेदवारांचे नाव वापरले जाते आणि त्या उमेदवारांचा प्रचार होतो, असा खर्च त्या सर्व उमेदवारांमध्ये समप्रमाणात विभाजीत करण्यात यावा.

(iv) राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने 'निवडणुकीवर झालेल्या सर्व खर्चाचा खरा, अचूक व योग्य हिशोब व तपशील देण्यात आलेला आहे आणि कोणताही खर्च लपविण्यात आलेला नाही' या आशयाचे शपथपत्र सादर करावे. (निकाल लागल्यानंतर ६० दिवसाच्या आत)

(v) राजकीय पक्षाने निवडणूक खर्चासाठी स्वीकारलेला निधी (देणग्या, भेटी, कर्ज, इत्यादी) चा तपशील (निकाल लागल्यानंतर ६० दिवसाच्या आत)

(vi) मात्र, प्रत्येक उमेदवारांवर केलेला खर्च त्या उमेदवारांना २० दिवसांच्या आत अवगत करावा, जेणेकरुन सदर खर्च उमेदवार त्यांच्या एकूण खर्चात सादर करु शकतील.

(vii) खर्चाचा तपशील देताना भारत निवडणूक आयोगाच्या आदेशातील तत्व अवलंबिण्यात यावे.

(viii) प्रत्येक राजकीय पक्षांनी "वार्षिक लेखापरिक्षित लेख्याची" ऑडिटरद्वारे अधिप्रमाणित एक प्रत व संबंधित वर्षातील भरलेल्या "आयकर विवरणाची

(रिटर्नसची)" एक प्रमाणित प्रत वित्तीय वर्ष संपल्यापासून एक वर्षाच्या आत (जरी राजकीय पक्षाचे उत्पन्न करपात्र उत्पन्नापेक्षा कमी किंवा निरंक असेल तरीही दरवर्षी) राज्य निवडणूक आयोगाला सादर करावे.(दरवर्षी)

१०.३ पक्षाने केलेल्या सर्व खर्चाचे खरे, अचुक, व योग्य पध्दतीने हिशोबाच्या नोंदी अभिलेख्यात नोंदवाव्यात, व त्या खर्चास दुजोरा देणारी पुराव्याची कागदपत्रे जसे- पावती, बील, व्हाऊचर इ. दिनांक व अनुक्रमांनुसार फाईलिंग करुन जतन करावे. राज्य निवडणूक आयोगाने अगर संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी मागणी केल्यास सदर मूळ अभिलेख व खर्चास दुजोरा देणारी मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर करावे.

११. इतर व्यक्ती अगर संस्थांनी उमेदवारासाठी केलेला खर्च -

इतरांनी (जसे-नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, हितचिंतक, समर्थक इ.) किंवा संस्थेने केलेल्या खर्चाचा संपूर्ण हिशोब वरील परिच्छेद ९ च्या धर्तीवर देण्याची सर्व जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. इतर व्यक्तींनी कोणत्याही माध्यमातून दिलेल्या जाहिराती, प्रसार, माहिती ज्यामध्ये उमेदवाराचे नाव अगर फोटो असेल, त्याचा खर्च हा इतरांनी उमेदवारासाठी केलेला खर्च धरण्यात यावा.

१२. खर्चाच्या तपशीलाची सत्यता तपासणे -

मा. सर्वोच्च न्यायालय यांचे एल.आर. शिवरामगौडा इतर विरुध्द टि.एम.चंद्रशेखर सिव्हिल याचिका क्र. ४२७२/१९९१ मध्ये निकालाप्रमाणे उमेदवाराने सादर केलेला तपशील योग्य आहे किंवा कसे हे तपासण्याचे पूर्ण अधिकार आयोगाला असल्याने वरील " वेळ व रित" न पाळणाऱ्या उमेदवार व पक्षाविरुध्द पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१२.१ उमेदवारांबाबत :-

(i) जिल्हाधिकारी यांनी जिल्हानिहाय (आवश्यकता असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय) व महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित महानगरपालिकाकरिता निवडणुकीमधील ज्या मुख्य बाबींवर खर्च केला जातो

त्या बाबींचे स्थानिक स्तरावर प्रचलित दर निश्चित करावेत. नुकत्याच पार पडलेल्या इतर निवडणूकीकरिता दर निश्चिती झाली असल्यास, योग्य भाववाढ विचारात घेऊन सदर दर वापरण्यात यावेत.

(ii) प्रभाग रचना अंतिम झाल्यावर राजकीय पक्ष तसेच स्थानिक तज्ज्ञ इत्यादींच्या सल्लामसलतीने प्रचलित दर निश्चित करावेत व त्यास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

(iii) उमेदवाराने सादर केलेला दैनंदिन खर्च निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सूचना फलकावर प्रसिध्द करावा. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा निवडणूक संनियंत्रण यंत्रणेने काही आक्षेपार्ह बाबी नजरेस आणल्या तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी याबाबत संबंधित उमेदवारांना नोटीस देऊन, त्यांची बाजू ऐकून, निश्चित केलेल्या दरपत्रकाशी तुलना करून झालेला खर्च योग्य आहे किंवा कसे, याची चौकशी /खात्री करून निर्णय घ्यावा. दरपत्रकापेक्षा कमी खर्च दाखविण्यात आला असेल किंवा खर्च लपविण्यात आला असेल तर दरपत्रकाप्रमाणे खर्च ग्राह्य धरण्यात यावा.

(iv) उमेदवाराने निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर खर्चाचा एकूण तपशील ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांना देणे आवश्यक आहे. प्राप्त झालेला तपशील जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांनी सूचना फलकावर प्रसिध्द करावा. एकूण खर्चाच्या तपशीलाबाबत जनतेकडून तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा निवडणूक संनियंत्रण यंत्रणेने काही आक्षेपार्ह बाबी नजरेस आणल्या तर जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांनी याबाबत संबंधित उमेदवारांना नोटीस देऊन त्यांची बाजू ऐकून, निश्चित केलेल्या दरपत्रकाशी तुलना करून झालेला खर्च योग्य आहे किंवा कसे, याची चौकशी व खात्री करून निर्णय घ्यावा. दरपत्रकापेक्षा कमी खर्च दाखविण्यात आला

असेल किंवा लपविण्यात आला असेल तर दरपत्रकाप्रमाणे खर्च ग्राह्य धरण्यात यावा.,

(v) जर उमेदवाराने वरील "वेळ व रित" प्रमाणे खर्चाचा तपशील सादरच केला नसेल किंवा उमेदवाराचा एकूण खर्च मर्यादेपेक्षा जास्त असेल किंवा "वेळ व रित" याचे पालन झाले नसेल, तर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमामध्ये सन-२००८ / सन-२०१० मध्ये झालेल्या दुरुस्तीनुसार उमेदवारांना अनर्ह करण्याबाबतची कार्यवाही करावी.

१२.२ राजकीय पक्षाबाबत :-

(i) निश्चित करण्यात आलेल्या वरील "वेळ व रित" चे पालन न केल्यास, जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित राजकीय पक्षांना, विनाविलंब कागदपत्रे/विवरणपत्रे/ शपथपत्रे सादर करण्याबाबत सूचना द्यावी.

(ii) सदर सूचना मिळाल्यानंतरही कागदपत्रे/विवरणपत्रे/ शपथपत्रे सादर केले नाही, तर जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी त्याबाबत अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

(iii) निश्चित केलेली "वेळ व रीत" न पाळणाऱ्या राजकीय पक्षांविरुध्द राज्य निवडणूक आयोग "राजकीय पक्ष नोंदणी आदेश २००९" (प्रामुख्याने परिच्छेद ३ (१०) (इ), ४ (क), व ५ (अ) (ब) (क)) अंतर्गत खालीलप्रमाणे एक किंवा अनेक कारवाई करेल :-

(अ) नोंदणी निलंबित करणे.

(आ) विलंबाकरिता प्रती दिवस आर्थिक दंड (राज्य निवडणूक आयोग ठरविल त्याप्रमाणे) आकारणे

(इ) कायदेशीर कारवाई (फौजदारी गुन्ह्यासह) करणे.

(ई) राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९ व २०१६ मधील तरतुदींनुसार नोंदणी रद्द करणे.

१३. वरील आदेश खालीलप्रमाणे लागू राहतील :-

(अ) सर्व उमेदवारांना - सर्व प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निवडणूक लढविणाऱ्या.

(ब) सर्व राजकीयपक्षांना - ग्रामपंचायत वगळून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाग घेणाऱ्या.

१४. आयोगाने ऑनलाईन पध्दतीची सुविधा उपलब्ध करुन दिल्यास, त्याद्वारेच निवडणूक खर्च सादर करावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

(एस.एम. चन्ने)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सचिव, विधी मंडळ, विधानभवन, मुंबई.
४. प्रधान सचिव, वित्त व नियोजन, मंत्रालय, मुंबई ३२.
५. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग. मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय आयुक्त (कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर)
८. आयुक्त (सर्व महानगरपालिका)
९. जिल्हाधिकारी, (सर्व)
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

११. मुख्याधिकारी नगर परिषदा/ नगरपंचायती (सर्व)
१२. राष्ट्रीय मान्यता प्राप्त पक्ष /राज्यस्तरीय पक्ष व नोंदणी कृत राजकीय पक्ष
१३. मा. आयुक्त यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४. मा. सचिव यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५. आयोगातील सर्व कार्यासने
१६. निवड नस्ती

परिशिष्ट -१

(मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायालयाच्या निकालातील संदर्भ)

I. श्री. यशवंतराव गडाख (१९९४)... "खर्चासाठी निश्चित केलेल्या मर्यादा बहुतांशी प्रकरणामध्ये ओलांडल्या जातात..." (civil Appeal No २११५/१९९३, (१९९४) १SCC ६८२:AIR १९९४ SC६७८, Date of Decision १९/११/१९९३)

II. श्री. एल.आर. सिवारामा गौड वि. पंतप्रधान चंद्रशेखर (१९९९) :... "निवडणूक आयोगास उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाचा तपशील योग्य आहे किंवा कसे, हे तपासण्याचे अधिकार आहेत..." सिव्हिल याचिका क्र. ४२७२/१९९१

"Rule enables the Election Commission to decide whether a contesting candidate has failed to lodge his account of election expenses within the time and in the manner required by the Act after adopting the procedure mentioned therein. If an account is found to be incorrect or untrue by the Election Commission after enquiry under Rule ८९, it could be held that the candidate had failed to lodge his account within the meaning of Section १०(A) and the Election Commission may disqualify the said person".

III. भिकाजी केशव जोशी विरुध्द ब्रिजलाल नंदलाल बियानी सिव्हिल अपिल क्र.१५/१९५४ (१९५५) AIR ६१०, १९५५ SCR (२) ४२८, Date of Decision ०२/०५/१९५५)

".. ..Respondent has given a totally untrue return of election expenses. This is in contravention of law.. ..

.. .. It is not in the interest of purity of elections that such allegations of disqualification should be completely ignored without enquiry"

IV. एस.खादर शरिफ विरुध्द मुत्तुस्वामी गांऊडर (१९५५) २ एससीआर ४६९ (१९५५)२ SCR ४६९: ११ELR२०८: AIR१९५५SC, ७७५, Date of Decision १५/०९/१९५५)

".. ..while it is meritorious to make a donation for charitable purposes, if that is made at the time or on the eve of an election, it is open to the charge that its real object was to induce the electors to vote in favour of the particular candidate, and that it should therefore be treated as election expense.. ..

Charity at election times ought to be kept by politicians in the background....."

V. विद्या सागर जोशी विरुध्द सुरेंद्रनाथ गैतम सिव्हील अपिल क्र. ८५३/१९६८ (Civil appeal No ८५३/१९६८) (१९६९) २SCR ८४: AIR१९६९SC २८८: ४४ELR२९) १३/०९/१९६८

".. ..if the expenses are primarily or principally, expenses incurred for the promotion of the interest of the candidate, they are election expenses"

VI. मोहिंदर सिंग गिल विरुध्द मुख्य निवडणूक आयुक्त सिव्हिल अपिल क्र.१२९७/१९७७ (१९७८ AIR ८५१, १९७८ SCR (३) २७२, Date of Decision ०२/१२/१९७७)

"Article ३२४, in our view, operates in areas left unoccupied by legislation and the words 'superintendence, direction and control' as well as 'conduct' of all elections' are the broadest terms."

"Parliament or any State Legislature has made valid law relating to or in connection with elections, the Commission shall act in conformity with, not in violation of such provision but where such law is silent Art. ३२४ is a reservoir of power to act for the avowed purpose of, not divorced from pushing forward a free and fair election with expedition.

" the Commission shall be responsible to the rule of law, act bona fide and be amenable to the norms of natural justice in so far as conformance to such canons can reasonably and realistically be required of it as fairplay-in-action in a most important area of the constitutional order, viz., elections."

VII. ए. सी. जोस विरुध्द सिवन पिल्ले व इतर सिव्हिल अपिल ३८३९/१९८२ ((१९८४)२ SCC no ६५६, Date of Decision ०५ march १९८४)

"To sum up, therefore, the legal and constitutional position is as follows:

१(a). When there is no Parliamentary legislation or rule made under the said legislation, the Commission is free to pass any orders in respect of the conduct of elections.

१(b). where there is an Act and express Rules made thereunder it is not open to the Commission to override the Act or the Rules and pass orders in direct disobedience to the mandate contained in the Act or the Rules. In other words, the powers of the Commission are meant to supplement rather than supplant the law (both statute and Rules) in the matter of superintendence, direction and control as provided by Art. ३२४,

१(c). where the Act or the Rules are silent, the Commission has no doubt plenary powers under Art. ३२४ to give any direction in respect of the conduct of election, and.."

VIII. गडाख शंकराव विरुध्द बाळासाहेब विखे पाटील सिव्हिल याचिका क्र. २११५/१९९३ (१९९४ AIR ६७८, १९४४ SCC (१) ६८२)

".. .. The ceiling on expenditure is fixed only in respect of the expenditure incurred or authorised by the candidate himself but the expenditure incurred by the party or anyone else in his election campaign is safely outside the net of legal sanctionThe spirit of the provision suffers violation through the escape route. The prescription of ceiling on expenditure by a candidate is a mere eye-wash and no practical check on election expenses for which it was enacted to attain a meaningful democracy. This lacuna in the law is, however, for the Parliament to fill lest the impression is reinforced that its retention is deliberate for the convenience of everyone. If this be not feasible, it may be advisable to omit the provision to prevent the resort to indirect methods for its

circumvention and subversion of the law, accepting without any qualm the role of money power in the elections. This provision has ceased to be even a fig leaf to hide the reality.. .."

IX. कॉमन कॉसेस रजिस्ट्रर सोसायटी विरुध्द भारत सरकार (१९९६) २ SCC ७५२ (IT १९९६ (३) ७०६ १९९६ Scale (३) २५८, Date of Decision ०४/०४/१९९६)

"The Court ruled that (१) the political parties that had not been filing tax returns violated the provisions of the Income Tax Act and (२) the burden lies with the candidate to prove that expenditures were incurred by the party and not the candidate him or herself. the Court concluded that the Election Commission's constitutional authority includes issuing directions for political parties to submit for its scrutiny the details of all expenditures incurred or authorized by the parties in connection with the election of their respective candidates (pg. १५). Thus, the Court ruled that the Government of India shall (i) to inquire into why requirements under the Income Tax Act for the disclosure and filing of income tax by political parties were not being enforced by the tax authorities, and (ii) investigate political parties that had failed to disclose and file Income Tax and initiate action, including any penal action against the defaulting political parties, in accordance with the Income Tax Act"

(x) कॉमन कॉसेस रजिस्ट्रर सोसायटी विरुध्द भारत सरकार (मा.सर्वोच्च न्यायालय ६८२) रिट याचिका क्र.१३/२००३

".. ..Though advertising by governments should remain regulated all the time, it is particularly important to scrupulously follow these principles before and during the elections. As far as possible, during the period prior to elections, only those advertisements required by law (such as public health and safety advisories or job and contract advertisements) alone be released by governments;.. ..

.. .. aim to influence public support for a political party or a candidate for election o or.. .. .. embargo on advertisements on the eve of the elections.. .."

(xi) अशोक शंकरराव चव्हाण विरुध्द माधवराव किन्हाळकर (२०१४) ७ एससीसी ९९ **W.P.No. 4590/2014 & CM 9137/2014, Date of Decision 12/9/2014)**

. . . . .Where the Election Commission decides that a contesting candidate has failed to lodge his account of election expenses within the time and in the manner required by the Act and these rules it shall by notice in writing call upon the candidate to show cause why he should not be disqualified. . . . .

. . .The said Rule prescribes that a voucher shall be obtained for every item of expenditure and for lodging all vouchers along with the account of TC election expenses. . . .

. .. . . . Rule enables the Election Commission to decide whether a contesting candidate has failed to lodge his account of election expenses within the time and in the manner required by the Act after adopting the procedure mentioned therein. If an account is found to be incorrect or untrue by the Election Commission after enquiry under Rule ८९, it could be held that the candidate had failed to lodge his account within WP (C) No.२५११/२०११ page १५ of १८ the meaning of Section १०(A) and the Election Commission may disqualify the said person.. .."

(xii) Association for Democratic Reforms Vs. Union of India and another सिव्हिल रिट याचिका क्र. ५१५/२००२,दि.१३/०३/२००३

". . . .Omission to furnish the information as per the mandate of Section ३३B and furnishing false information in that behalf is made punishable.. . . ."

(xiii) मनोज नरुला विरुध्द केंद्र सरकार सिव्हिल रिट याचिका क्र. २८९/२००५, दि.२७/०८/२००५

". . . . . Democratic polity - Pure concept of - Abhorrence to corruption and repulsiveness to idea of criminalisation of politics - Held, democracy expects prevalence of genuine orderliness, positive propriety, dedicated discipline and sanguine sanctity by constant affirmance of constitutional morality which is the pillar stone of good governance,

Free and fair elections and democracy - Holding of free and fair election held, is the heart and soul of parliamentary system - It is one of the features, absence of which can erode fundamental values of democracy - Concern of Supreme Court expressed in earlier cases with regard to various facets of candidates who contest election and seek votes, noticed. . . .

. . . .Criminalisation of politics - Negative effects on democracy - Held, systemic corruption and sponsored criminalisation can corrode fundamental core of elective democracy and, consequently, the constitutional governance - Criminalisation of politics creates dent in marrows of the nation - Democratic republic polity hopes and aspires to be governed by government which is run by elected representatives who do not have any involvement in serious criminal offences or offences relating to corruption, casteism, societal problems, affecting sovereignty of nation and many other offences. . . . .

. . . . . Need for cleansing of political climate - Electoral reforms - Recommendations of Justice J.S. Verma Committee Report on Amendments to Criminal Law (२०१३) and Law Commission २४४th Report (२०१४) on electoral reforms - Need for enactment into law, emphasised . . . . . ."

राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९(सुधारित -२०१६)
सार्वत्रिक निवडणुका -
राजकीय पक्षांनी सादर करावयाचे अहवाल,
विवरणपत्रे, इत्यादी बाबत

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.०४/का.११.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२
दि. २० ऑक्टोबर, २०१६.

अधिसूचना

राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९. (सुधारित २०१६)

भारतीय संविधानाच्या भाग नऊ व नऊ (अ) अनुसार गठीत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राजकीय पक्षांची नोंदणी करणे व इतर अनुषंगिक बाबींविषयीचे आदेश.

ज्याअर्थी, भारतीय संविधानातील तरतुदीनुसार लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकांचे व तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचलन व नियंत्रण याची जबाबदारी अनुक्रमे भारत निवडणूक आयोग व संबंधित राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी, राजकीय पक्षांना लोकसभा/विधानसभा निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगातर्फे त्यांच्या निकषानुसार मान्यता प्रदान व चिन्ह आरक्षित करण्यात येते.

३. आणि ज्याअर्थी, राजकीय पक्षाच्या आधारावर लढविल्या जाणाऱ्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (महानगरपालिका, जिल्हा परिषदा / पंचायत समित्या व नगर परिषदा/नगर पंचायती) निवडणुकांचे पावित्र्य राखणे व अशा निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने खालील प्रमाणे दोन आदेश पारित केलेले आहेत :-

(i) राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००४ / २००९, व

(ii) महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९

४. आणि ज्याअर्थी, या दोन्ही आदेशामध्ये खालील मुख्य बाबींचा अंतर्भाव आहे :-

(i) राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षास, निवडणुकीच्यावेळी चिन्ह वाटप करताना इतरांपेक्षा प्राधान्य देणे.

(ii) नोंदणीकृत राजकीय पक्षांनी काही अहवाल, विवरणपत्रे इत्यादी राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे व तसेच राजकीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश पाळणे बंधनाकारक असणे व तसे न केल्यास त्यांची नोंदणी रद्द करणे.

(iii) आदेशातील कोणत्याही तरतुदींबाबत स्पष्टता नसल्यास किंवा काही अडचणी येत असल्यास, त्याबाबत सूचना देण्याचे सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोगास असणे.

(iv) निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक व्हाव्यात व त्यामध्ये पावित्र्य राखता यावे यासाठी :

(अ) राजकीय पक्ष यांनी त्यांचे मिळकत व खर्च यांचे हिशोब योग्य रीतीने ठेवणे आणि विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर करण्यात आलेला खर्च, पक्षाच्या सर्वसाधारण प्रसिध्दीवर करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील दर्शविणारा खर्च व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उभ्या करण्यात आलेल्या ठराविक उमेदवारांच्या किंवा पक्षाद्वारे पाठिंबा देण्यात आलेल्या

उमेदवारांच्या प्रचाराकरिता करण्यात आलेल्या खर्चाचे उमेदवारनिहाय वेगळे हिशोब ठेवणे.

(ब) पक्षाच्या "वार्षिक लेखा परिक्षित लेख्याची" एक प्रत व संबंधित वर्षातील कायद्यान्वये भरलेल्या आयकर विवरणाची (रिटर्नची) एक प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यापासून एका वर्षाच्या आत आयोगाच्या कार्यालयात देणे.

५. आणि ज्याअर्थी निवडणुकांमध्ये आर्थिक बळाचा वाढता दुरुपयोग, त्यावर मा. सर्वोच्च/उच्च न्यायालयाचे निरनिराळया प्रकरणामध्ये अभिप्राय व लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ मधील तरतुदी लक्षात घेता राज्य शासनाने सन २००८ मध्ये मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम आणि सन २०१० मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायत अधिनियमांमध्ये दुरुस्ती करुन खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे:

<u>Disqualification by State Election Commission</u>

If the State Election Commission is satisfied that a person,-

(a) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(b) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by an order published in the Official Gazette, declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a Councillor (for Corporation, Council & Nagar Panchayat) /Member (for Z.P. , P.S. & G.P) or for contesting an election for being a Councillor (for Corporation, Council & Nagar Panchayat) /Member (for Z.P. , P.S. & G.P) for a period of three years (for Corporation, Council & Nagar Panchayat) /five years (for Z.P. , P.S. & G.P) from the date of the order.

६. आणि ज्याअर्थी, अधिनियमातील वरील तरतुदीनुसार निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यासाठी उमेदवारांकरिता राज्य निवडणूक आयोगाने त्यांचे आदेश क्र.रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/ संगणकीकरण कक्ष, दि. १५.१०.२०१६ अन्वये " वेळ व रीत " निश्चित केली असून त्या प्रमाणे इतर गोष्टी शिवाय खर्चाचा हिशोब (स्थानिक स्वराज्य संस्था निहाय व उमेदवार निहाय) राज्य निवडणूक आयोगाला देणे नोदंणीकृत राजकीय पक्षांना बंधनकारक करण्यात आले आहे. ही बाब लक्षात घेता "राजकीय पक्ष नोंदणी आदेश २००९ " मध्ये दुरूस्ती करणे आवश्यक झालेले आहे.

७. त्याअर्थी, " राजकीय पक्ष नोंदणी आदेश २००९ " मधील (प्रामुख्याने तरतुदी ३(१०) (इ), ४(क) व ५(अ), (ब) व (क)) प्राप्त व इतर अधिकार वापरून राज्य निवडणूक आयोग "राजकीय पक्ष नोंदणी आदेश २००९" मध्ये दुरूस्ती करून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.:

आदेश

८. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या सर्व राजकीय पक्षांनी (भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त पक्षांसह) खालील प्रमाणे कार्यवाही करावी व राज्य निवडणूक आयोगाला अहवाल / विवरणपत्रे इत्यादी सादर करावे:-

८.१ <u>स्वतंत्र बँक खाते उघडणे, निधी स्वीकारणे व खर्च करणे इत्यादी -</u>

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू इच्छिणाऱ्या सर्व राजकीय पक्षानी शेड्यूल बँकेमध्ये खालीलप्रमाणे खाते उघडावे :-

(अ) प्रत्येक महानगरपालिकेकरिता एक स्वतंत्र खाते, तसेच

(ब) इतर स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्रत्येक जिल्हयासाठी एक स्वतंत्र खाते .

(ii) पक्षांनी वरील खात्याचा तपशिल राज्य निवडणूक आयोगास व संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांना निवडणूकीपूर्वी सादर करावा.

(iii) बँकेच्या वरील खात्यामधूनच राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्व आर्थिक व्यवहार करावेत. तसेच हे सर्व व्यवहार धनादेशाद्वारे (Cheque) करण्यात यावेत. (जसे-देणग्या स्वीकारणे, भेटी स्वीकारणे, कर्ज स्वीकारणे, उमेदवारांना पक्ष निधी मदत देणे, निवडणूक खर्च करणे, देयके अदा करणे, इत्यादी)

(iv) राजकीय पक्षांनी असाच निधी स्वीकारावयाचा आहे जो कोणत्याही अमिषाला/दबावाला बळी न पडता स्वखुशीने देण्यात येईल. जर एखाद्या निधीबाबत तक्रार प्राप्त झाली तर पक्षाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

८.२. <u>उमेदवारांवर केलेल्या खर्चाबाबतची खालील कागदपत्रे/विवरणपत्रे/शपथपत्र सादर करावे</u> : सर्व राजकीय पक्षांनी निकाल लागल्यापासून २० किंवा ६० दिवसाच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय खालील प्रकारचे अहवाल, विवरणपत्र संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांचेमार्फत राज्य निवडणूक आयोगास सादर करावीत:

(i) नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या, पक्षातर्फे प्रपत्र-अ व ब देण्यात आलेल्या, माघार घेणाऱ्या व विजयी झालेल्या उमेदवारांचा तपशील सादर करावा. (निकाल लागल्यापासून २० दिवसाच्या आत)

(ii) स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय एकूण खर्चाचा तपशिल सादर करावा. (निकाल लागल्यापासून ६० दिवसाच्या आत)

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थेनिहाय पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारांकरिता खालील दोन्ही प्रकारचा केलेल्या खर्चाचा तपशिल सादर करावा. (निकाल लागल्यापासून २० दिवसाच्या आत)

(अ) उमेदवारांवर केलेला थेट खर्च जो त्यांच्यामध्ये विभाजित (Directly divided between them) करता येतो. उदा. उमेदवारांना दिलेली पक्ष

निधीची मदत, उमेदवारांसाठी छापलेले प्रचार साहित्य इ. ज्याचा संबंधित उमेदवाराशी थेट संबंध जोडता येतो व खर्च त्या उमेदवारावर थेट आकारता येतो इत्यादी

(आ) उमेदवारांवर केलेला खर्च जो त्यांच्यामध्ये संविभाजित (Indirectly Apportioned between them)करता येतो. उदा. पक्षाने घेतलेली जाहिर सभा अगर रॅली अगर जाहिरात ज्यामुळे एकापेक्षा अनेक उमेदवारांचा प्रचार होतो, असा खर्च त्या सर्व उमेदवारांमध्ये त्यांच्या होणाऱ्या प्रचाराच्या प्रमाणात (अंदाजे) संविभाजीत करण्यात येतो इत्यादी

(iv) राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने " निवडणुकीवर झालेल्या सर्व खर्चाचा खरा, अचूक व योग्य हिशोब व तपशील देण्यात आलेला आहे आणि कोणताही खर्च लपविण्यात आलेला नाही " या आशयाचे शपथपत्र सादर करावे.

(निकाल लागल्यापासून ६० दिवसाच्या आत)

(v) राजकीय पक्षाने निवडणूक खर्चासाठी स्वीकारलेला निधी (देणग्या, भेटी, कर्ज, इत्यादी) चा तपशील निकाल लागल्यापासून ६० दिवसात सादर करावा. (निकाल लागल्यापासून ६० दिवसाच्या आत)

(vi) मात्र, प्रत्येक उमेदवारांवर केलेला खर्च पक्षांनी त्या उमेदवारांना २० दिवसाच्या आत अवगत करावा, जेणेकरुन सदर खर्च उमेदवार त्यांच्या एकूण खर्चात सादर करु शकतील.

(vii) खर्चाचा तपशील देताना भारत निवडणूक आयोगाच्या आदेशातील तत्व अवलंबिण्यात यावे.

(viii) प्रत्येक राजकीय पक्षांनी "वार्षिक लेखापरिक्षित लेख्याची" ऑडिटरद्वारे अधिप्रमाणित एक प्रत व संबंधित वर्षातील भरलेल्या "आयकर विवरणाची (रिटर्नसची)" एक प्रमाणित प्रत वित्तीय वर्ष संपल्यापासून एक वर्षाच्या आत (जरी राजकीय पक्षाचे उत्पन्न करपात्र उत्पन्नापेक्षा कमी किंवा निरंक असेल तरीही) राज्य निवडणूक आयोगाला सादर करावे. (दरवर्षी)

८.३ पक्षाने केलेल्या सर्व खर्चाचे खरे, अचुक, योग्य पध्दतीने हिशोबाच्या नोंदी अभिलेख्यात नोंदवाव्यात, व त्या खर्चास दुजोरा देणारी पुराव्याची कागदपत्रे जसे- पावती, बील, व्हाऊचर इ. दिनांक व अनुक्रमांनुसार फाईलिंग करुन जतन करावे. राज्य निवडणूक आयोगाने अगर संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी मागणी केल्यास सदर मूळ अभिलेख व खर्चास दुजोरा देणारी मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर करावे.

९. खर्चाच्या तपशीलाची सत्यता तपासणे -

मा. सर्वोच्च न्यायालय यांचे एल. आर. शिवरामगौडा इतर विरुध्द टि.एम. चंद्रशेखर सिव्हील याचिका क्र ४२७२/१९९१ मध्ये निकालाप्रमाणे उमेदवाराने सादर केलेला तपशील योग्य आहे किंवा कसे हे तपासण्याचे पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाला असल्याने वरील " वेळ व रीत " न पाळणाऱ्या पक्षाविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

(i) निश्चित करण्यात आलेल्या वरील " वेळ व रित " चे पालन न केल्यास, जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित राजकीय पक्षांना, विनाविलंब कागदपत्रे/विवरणपत्रे/ शपथपत्रे इत्यादी सादर करण्याबाबत सूचना द्यावी.

(ii) सदर सूचना मिळाल्यानंतरही कागदपत्रे/विवरणपत्रे/ शपथपत्रे सादर केले नाही, तरी जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी त्याबाबत अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

(iii) "निर्धारित केलेली वेळ व रीत" न पाळणाऱ्या राजकीय पक्षांविरुध्द राज्य निवडणुक आयोग खालीलप्रमाणे एक किंवा अनेक कारवाई करेल करू शकेल :-

(अ) नोंदणी निलंबित करणे.

(आ) विलंबाकरिता प्रती दिवस आर्थिक दंड (राज्य निवडणूक आयोग ठरविल त्याप्रमाणे) आकारणे

(इ) कायदेशीर कारवाई (फौजदारी गुन्ह्यासह) करणे.

(ई) राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९ मधील तरतुदींनुसार नोंदणी रद्द करणे.

१०. सदर आदेश ग्रामपंचायत वगळून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका मध्ये भाग घेतलेल्या सर्व राजकीय पक्षांना लागू राहतील.

११. आयोगाने ऑनलाईन पध्दतीची सुविधा उपलब्ध करुन दिल्यास, त्याद्वारे निवडणूक खर्च सादर करावेत.

भा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

(एस.एम. चन्ने)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. भा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३. सचिव, विधी मंडळ, विधानभवन, मुंबई.

४. प्रधान सचिव, वित्त व नियोजन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

५. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, २५, मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

६. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. सर्व विभागीय आयुक्त (कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर)

८. आयुक्त (सर्व महानगरपालिका)

९. जिल्हाधिकारी (सर्व)

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

११. मुख्याधिकारी नगर परिषदा/नगरपंचायती (सर्व)

१२. राष्ट्रीय मान्यता प्राप्त पक्ष/राज्यस्तरीय पक्ष व नोंदणीकृत राजकीय पक्ष

१३. मा. आयुक्त यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

१४. मा. सचिव यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

१५. आयोगातील सर्व कार्यासने

१६. निवड नस्ती

२९५

उमेदवारांच्या व राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चाबाबत विवरणपत्रे व शपथपत्रे यांचे नमुने....

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र : रानिआ-२०१६/प्र.क्र.१३/का. सं.कक्ष,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ ऑक्टोबर, २०१६.

आ दे श क्र.२

राज्य निवडणूक आयोगाने दि.१५ ऑक्टोबर, २०१६ रोजी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यासाठी "वेळ (Time) व रीत (Manner)" निश्चित केली आहे. सदर आदेशात उमेदवाराने तसेच राजकीय पक्षाने विविध विवरणपत्रे व शपथपत्रे सादर करावयाची आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने या आदेशाद्वारे या विवरणपत्रे व शपथपत्रे यांचे नमुने निर्धारित करण्यात येत आहेत. सदर नमुने देताना उमेदवारांना हिशोब सादर करणे सोपे व्हावे तसचे सर्व उमेदवारांच्या खर्चाच्या हिशोबात एकसारखेपणा व एकवाक्यता राहावी, हा मुख्य उद्देश आहे.

२. उमेदवाराने सादर करावयाचे खर्चाच्या हिशोबाचे नमुने

२.१.परिच्छेद.९.२ (i) नुसार दैनंदिन निवडणूक खर्चाकरिता नमुना क्र.१

२.२.परि.९.२ (ii) व (iii) नुसार एकूण निवडणूक खर्चाकरिता नमुना क्र.२

२.३.परि.९.२ (iv) नुसार शपथपत्र नमुना क्र. ३

२.४.परि.९.२ (v) नुसार निधीचे स्रोत नमुना क्र. ४

३. राजकीय पक्षांनी सादर करावयाची विवरणपत्रे व शपथपत्र

३.१. परि.१०.२ (i) नुसार पक्षातर्फे नामनिर्देशन पत्र दाखल करणाऱ्या उमेदवारांचा तपशिल नमुना क्र. ५

३.२.परि.१०.२ (ii) नुसार पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर केलेला खर्चाचा तपशिल नमुना क्र. ६

३.३.परि.१०.२ (iii) नुसार पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणाऱ्या त्यांच्या उमेदवारांवर केलेला खर्चाचा तपशिल नमुना क्र. ७

३.४. परि.१०.२ (iv) नुसार पक्षाने सादर करावयाचे शपथपत्र नमुना क्र.८

३.५.परि.१०.२ (v) नुसार पक्षाने निवडणुकांकरिता स्विकारलेला निधीचा तपशिल, हा निवडणूक लढविणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी सोबत जोडलेल्या नमुना क्र. ९

४. स्थानिक प्रचलित दराची प्रसिध्दी :-

४.१. परि.१२.१ (i) नुसार जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी निश्चित केलेले स्थानिक प्रचलित दराची प्रसिध्दी ही सोबत जोडलेला नमुना क्र.१०नुसार करावे.

५. जनतेचे आक्षेप :-

५.१. जनतेनी नोंदविलेल्या आक्षेपांची / तक्रारींची दि.१५/१०/२०१६ रोजीच्या आदेशातील परि.१२.१ (iii) व (iv) नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

६. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे उमेदवारांच्या खर्चाबाबतचे कर्तव्य

६.१. सर्व उमेदवार त्यांचा दैनंदिन निवडणुकीचा खर्च निर्धारित वेळेत व विहित पध्दतीने सादर करतात किंवा कसे हे रोज तपासून, खर्च सादर न करणाऱ्या उमेदवारांना असे खर्च सादर करण्याच्या लेखी सूचना दयाव्यात.

६.२. निवडणुकीचा निकाल लागल्यापासून एका आठवडयाच्या आत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने आवश्यक त्या कर्मचाऱ्यांची मदत घेऊन सर्व उमेदवारांनी सादर केलेले दैनंदिन खर्च तपासावे. हे तपासताना स्थानिक प्रचलित दरापेक्षा कमी दर लावलेले खर्च (तफावत असलेला खर्च) याबाबत आवश्यकतेनुसार नैसर्गिक न्याय तत्वाचा अवलंब करुन दि.१५/१०/२०१६ रोजीच्या आदेशानुसार निर्णय घेतील.

६.३. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने उमेदवाराच्या खर्चात केलेली वाढ (स्थानिक प्रचलित दरानुसार) ही त्याच्या एकूण खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

(एम. एम. चन्ने)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत

१. सर्व विभागीय आयुक्त (कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर)
२. आयुक्त (सर्व महानगरपालिका)
३. जिल्हाधिकारी, (सर्व)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
५. मुख्याधिकारी नगर परिषदा/ नगरपंचायती (सर्व)
६. राष्ट्रीय मान्यता प्राप्त पक्ष /राज्यस्तरीय पक्ष व नोंदणी कृत राजकीय पक्ष
७. मा. आयुक्त यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
८. मा. सचिव यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
९. आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती

नमुना-१

उमेदवार - दैनंदिन निवडणूक खर्च

(उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या दिनांकापासून निकाल लागेपर्यंत दररोज सादर करावे)

उमेदवाराचे नाव :
पक्षाचे नाव :
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
प्रभाग/गण/गट क्रमांक :
जागा / seat क्र :

जिल्ह्याचे नाव :
सार्वत्रिक/ पोट निवडणूक :
मतदानाचा दिनांक :
खर्चाचा दिनांक :

अ.क्र.	खर्चाची मुख्य बाब	खर्चाची आंतर बाब	तपशिल	संख्या/क्षेत्रफळ/दिवस इ. Single unit	प्रति दर rate	एकूण खर्च (रोख आणि उधारी मिळून)	चेक/ रोखीने	कोणास दिले/कोणास देणे बाकी	पावती/बिल/व्हाऊचर क्र.	स्वतःचा की/ पक्षाचा की/ इतर व्यक्तीचा	पक्षाचा केलेल्या खर्चाच्या बाबत पक्षाचे नाव / इतर व्यक्तिने केलेल्या खर्चाच्या बाबत त्याचा तपशिल नाव, पत्ता, मोबाईल नंबर ई
1											
2											
3											
4											
.											
.											

दिनांक .....रोजी .....वा मी दैनंदिन खर्चाचा नमुना १ सादर करत आहे.

उमेदवाराची सही

सादर दैनंदिन खर्चाचा नमुना १, दिनांक .....रोजी .....वा मला प्राप्त झाला.

सही
निवडणूक निर्णय अधिकारी
प्रभाग / गण / गट
.....स्थानिक स्वराज्य संस्था

टीप : (१) दररोज खर्च नोंदवून सदर नमुना १ दुसऱ्या दिवशी दुपार २ वाजे पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करावा.
(२) सादर करतेवेळी उमेदवाराने न चुकता पोहोच घ्यावी. सदर पोहोच हि भविष्यात उमेदवाराला बचावासाठी उपयोगी होऊ शकेल.
(३) ऑन लाईन पद्धतीने खर्च भरल्यास सदर नमुना ऑटोमॅटिक तयार होईल. उमेदवाराने फक्त नमुना डाऊनलोड करून, तपासून, प्रिंट करून, सही करून, (१) प्रमाणे सादर करावा.

नमुना-२
उमेदवार - एकूण निवडणूक खर्च

उमेदवाराचे नाव :
पक्षाचे नाव :
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
प्रभाग/वार्ड/गट क्रमांक :
जागा / seat क्र :

(निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निकाल जाहीर झाल्यापासून 30 दिवसाच्या आत एकूण निवडणूक खर्च सादर करावा. यामध्ये स्वतः केलेला खर्च पक्षाने केलेला खर्च व इतर व्यक्ती/संस्था यांनी केलेल्या

जिल्ह्याचे नाव :
सार्वत्रिक/ पोट निवडणूक :
मतदानाचा दिनांक :
दिनांक :

					खर्चाची रक्कम		
अ.क्र.	खर्चाची मुख्य बाब	खर्चाची अंतर बाब	तपशील	दिनांक	उमेदवाराने	पक्षाने	इतर व्यक्तींनी
1	नामनिर्देशन प्रक्रिया खर्च	नामनिर्देशन फी					
		अनामत रक्कम					
		इतर खर्च					
2	प्रचार दरम्यान आडे खर्च	प्रचार कार्यालय					
		प्रचार मैदाने					
		प्रचारातील वाहने					
		उमेदवाराची वाहने					
		कार्यालयीन वाहने					
		विविध प्रतिनिधींना दिलेले वाहने					
		जाहिरातीची ठिकाणे					
		व्यासपिठ					
		मंडप					
		बुथ					
		खुर्ची, टेबल इ.					
		विविध इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रीकल उपकरण					
		इतर खर्च					
3	प्रचार कार्यालयीन खर्च	प्रचारकांचा भत्ता					
		प्रतिनिधी भत्ता					
		मतदान प्रतिनिधी भत्ता					
		मतमोजणी प्रतिनिधी भत्ता					
		दुरध्वनी/भ्रमणध्वनी खर्च					
		विज/ पाणी/चहापान खर्च					
		इतर कार्यालयीन खर्च					
4	प्रचार साहित्यावरील खर्च	जाहिरनामा छपाई व वितरण					
		वैयक्तिक माहिती पुस्तिका					
		पोस्टर छपाई व वितरण					
		हॅन्ड बिल छपाई वितरण					
		भिंतीवरील प्रचाराचे लिखाण					
		व्होटर स्लिप					
		इतर साहित्य खर्च					

300

5	प्रचार माध्यमावरील खर्च	वर्तमान पत्र खर्च					
		होर्डिंग खर्च					
		ऑडिओ जाहिरात					
		व्हिडीओ जाहिरात					
		एसएमएस					
		केबल टिव्ही					
		संकेतस्थळ इत्यादी इंटरनेट माध्यम					
		सोशल मिडिया					
		रेडिओ/एफएम					
		प्रदेश दूरदर्शनची कमान					
		टिव्ही चॅनल					
		इतर प्रचार माध्यम					
6	प्रचारातील खर्च	रॅली					
		जन सभा					
		व्हिआयपी वरील खर्च					
		सजावट खर्च					
		इतर खर्च					
7	खानपान	प्रचारातील खानपान					
		मतदान प्रतिनिधी खानपान					
		मतमोजणी प्रतिनिधी खानपान					
		कार्यकर्ता खानपान					
		इतर खर्च					
8	इतर सर्व खर्च (जे वरील						
				एकूण निवडणुकीचा खर्च	xxx	yyy	zzz

दिनांक .....रोजी .....वा मी एकूण निवडणूक खर्चाचा नमुना २ सदर करत आहे.

उमेदवाराची सही

सदर दैनंदिन खर्चाचा नमुना १, दिनांक .....रोजी .....वा प्राप्त झाला.

सही
जिल्हाधिकारी / महापालिका आयुक्त
एवं निवडणूक अधिकारी
.....स्थानिक स्वराज्य संस्था

टीप : (१) एकूण खर्च सदर नमुना २ प्रमाणे निवडणूक निकाल लागल्यापासून ३० दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी/ महापालिका आयुक्त यांना सादर करावा.
(२) सादर करतेवेळी उमेदवाराने न चुकता पोहोच घ्यावी. सदर पोहोच हि भविष्यात उमेदवाराला बचावासाठी उपयोगी होऊ शकेल.
(३) ऑन लाईन पद्धतीने दैनंदिन खर्च भरल्यास सदर नमुना २ ऑटोमॅटिक तयार होईल. उमेदवाराने फक्त नमुना डाऊनलोड करून, तपासून, प्रिंट करून,

302

८

नमुना-३

उमेदवाराचे शपथपत्र

(निकाल लागल्यापासून 30 दिवसाच्या आत शपथपत्र सादर करावे.)

मी नावे . . . . . वडीलाचे/पतीचे नाव . . . . . , वय. . . वर्ष, राहणार . . . . . याद्वारे गांभीर्यपूर्वक व मनपूर्वक पुढीलप्रमाणे या शपथपत्राद्वारे जाहिर करतो आहे की,

१. मी..... महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत/ जिल्हापरिषद/पंचायत समितीच्या ..... प्रभाग क्रमांक/गट/ गण मधुन सार्वत्रिक /पोट निवडणूक दिनांक ..... मधुन निवडणूक लढविली होती व तिचा निकाल ..... रोजी घोषित करण्यात आला होता आणि सदर निकालानुसार मी विजयी/पराभूत झालो आहे.

२. मी/ माझ्या प्रतिनिधीने नामनिर्देशन दिनांक ..... ते निकाल घोषित करण्यात आलेल्या दिनांक ....., दोन्ही दिवस धरुन; या काळात केलेले सर्व निवडणूक खर्चाचे खरे व बिनचूक हिशोब ठेवलेले आहेत, तसेच खर्चाचे पूरक पुराव्याचे कागद देखील जतन केले आहे.

३. मी राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.१५/१०/२०१६ मधील सर्व निदेशाचे तंतोतंत पालन केलेले आहे.

४. मी सादर केलेल्या खर्चामध्ये कोणतीही बाबत लपवून ठेवलेली नाही किंवा रोखून ठेवलेली नाही.

५. मी स्वत: केलेला खर्च, पक्षाने माझ्यासाठी केलेला खर्च, इतर व्यक्तींनी व संस्थांनी माझ्यासाठी केलेला खर्च संपूर्णपणे, खरे व अचुकपणे माझ्या एकूण खर्चात अंतर्भूत केलेला आहे.

६. मी निवडणुकीकरिता देणगी, भेटी, कर्ज, पक्ष निधी इत्यादि स्वरुपात गोळा केलेला निधीचा अचूक तपशिल सादर केला आहे. हा सर्व निधी स्वखुशीने देण्यात आलेला आहे.

७. मी ठेवलेले हिशोबाचे पुस्तके व त्यासंबंधातील खर्चाच्या पृष्ठयार्थ ठेवलेले पावती/बिल/ व्हाऊचर इ. यांच्या मूळ प्रती, मी निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मागणीनुसार पडताळणीसाठी न चुकता व विनाविलंब सादर करील.

८. मी सादर केलेल्या खर्चाचे दर जर प्रचलित स्थानिक दरापेक्षा कमी असल्यास व त्याबाबत माझा खुलासा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांना मान्य नसल्यास ; त्यांनी ठरविलेला प्रचलित स्थानिक दराप्रमाणे खर्च मला मान्य असेल.

९. मी पेड न्यूजचा अवलंब केलेला नाही. पण तरीही तशी तक्रार आल्यास, त्याबाबतच्या पेड न्यूज समितीने घेतलेला निर्णय मला मान्य असेल.

१०. मी सादर केलेले निवडणूक खर्च जर, राज्य निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या वेळेमध्ये व आवश्यक रितीने खर्च केले, हिशोब ठेवले अगर नमुन्यात सादर केली नसतील तर मी कारवाईस पात्र असेन याची मला कल्पना आहे.

वरील केलेले विधान हे खरे आहे. या विधानात कोणतीही माहिती खोटी व लपवून ठेवलेली नाही.

अभिसाक्षी

माझ्या समक्ष दिनांक..... रोजी ..... येथे श्री..... यांनी शपथपूर्वक कथन केले आहे.

निवडणूक प्राधिकारी

नमुना ४

उमेदवार - निधीबाबतचा तपशिल (देणगी, भेट, कर्ज, पक्ष निधी इ.)

उमेदवाराचे नाव :

पक्षाचे नाव :

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :

प्रभाग/गण/गट क्रमांक :

जागा / seat क्र :

(निकाल घोषित झाल्यापासून 30 दिवसांच्या आत सादर करावा.)

जिल्ह्याचे नाव :

सार्वत्रिक/ पोट निवडणूक :

मतदानाचा दिनांक :

दिनांक :

अ. क्र.	निधी देणाऱ्याचा नाव व पत्ता	निधी देणाऱ्याचा संपर्क क्रमांक	दिनांक	रोख/ चेक/ डि.डी. / इतर प्रकारे	देणाऱ्याच्या बँकेचे नाव व शाखा	निधीचा प्रकार (देणगी, भेट, कर्ज इ.)	रक्कम

नमुना - ५

राजकीय पक्ष - उमेदवारांची यादी

(सदर विवरणपत्र निकाल लागल्यापासून 20 दिवसाच्या आत सादर करावे)

पक्षाचे नाव :
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
एकूण लढविलेल्या जागा :

जिल्ह्याचे नाव :
सार्वत्रिक/ पोट निवडणूक :
मतदानाचा दिनांक :
दिनांक :

अ.क्र.	स्थानिक स्वराज्य सस्थेचे नाव	प्रभाग /गट/गण क्रमांक	जागा / seat क्र	उमेदवाराचे नाव	छाननीत वैध/अवैध	माघार घेतली/ घेतली नाही	विजयी/ पराभूत
1							
2							
3							
.							
.							
.							

दिनांक .....रोजी .....वा. नमुना ५ सादर करित आहे.

पक्षाच्या पदाधिकाऱ्याची सही

(सही करणाऱ्याचे नाव, पद)

पक्षाचे नाव

सदर नमुना ५ हा दिनांक ..... रोजी प्राप्त झाला.

सही

जिल्हाधिकारी / महापालिका आयुक्त

एवं निवडणूक अधिकारी

.....स्थानिक स्वराज्य संस्था

टीप : (१) एकूण उमेदवारांची माहिती स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय नमुना 5 मध्ये, निकाल लागल्यापासून 20 दिवसाच्या आत, जिल्हाधिकारी/ महापालिका आयुक्त यांना सादर करावा. सदर नमुना त्यांच्यामार्फत छाननी होऊन राज्य निवडणूक आयोगाकडे अग्रेषित होईल याची खात्री करावी.

(२) सादर करतेवेळी न चुकता पोहोच घ्यावी. सदर पोहोच हि भविष्यात बचावासाठी उपयोगी होऊ शकेल.

नमुना-६

पक्षाने केलेला एकूण निवडणुकीचा खर्च

(सदर विवरणपत्र निकाल लागल्यापासून ६० दिवसाच्या आत सादर करावे.)

पक्षाचे नाव :
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
एकूण लढविलेल्या जागा :

जिल्ह्याचे नाव :
सार्वत्रिक/ पोट निवडणूक :
मतदानाचा दिनांक :
दिनांक :

अ.क्र.	खर्चाची मुख्य बाब	खर्चाची आंतर बाब	तपशिल	दिनांक	खर्चाची रक्कम	कोण-कोणत्या स्था.स्व.संस्थेच्या निवडणुकीसाठी खर्च केला, त्यांची नावे
1	कार्यालयीन खर्च	कार्यालयाचे भाडे				
		विज बिल				
		पाणी बिल				
		स्टेशनरी खर्च				
		चहापान				
		इतर खर्च				
2	प्रशासकीय खर्च	कर्मचाऱ्यांचे पगार				
		इतर खर्च				
3	पक्षाचा प्रचार कार्यालयीन खर्च	पक्षाच्या प्रचार कार्यालयाचे भाडे				
		स्टेशनरी खर्च				
		कार्यकर्त्यांचा भत्ता				
		कर्मचाऱ्यांचे पगार				
		दुरध्वनी/भ्रमणध्वनी खर्च				
		विज/ पाणी/चहापान खर्च				
		इतर कार्यालयीन खर्च				
4	पक्षाचा प्रचार साहित्यावरील खर्च	जाहिरनामा छपाई व वितरण				
		वैयक्तिक माहिती पुस्तिका				
		पोस्टर छपाई व वितरण				
		हॅन्ड बिल छपाई वितरण				
		भिंतीवरील प्रचाराचे लिखाण				
		व्होटर स्लिप				
		इतर साहित्या खर्च				
5	प्रचार माध्यमावरील खर्च	वर्तमान पत्र खर्च				
		होर्डिंग खर्च				
		ऑडिओ जाहिरात				
		व्हिडीओ जाहिरात				
		एसएमएस				
		केबल टिव्ही				
		संकेतस्थळ इत्यादी इंटरनेट माध्यम				

३०५

३१६

		सोशल मिडिया				
		रेडिओ/एफएम				
		प्रवेश द्वाराची कमान				
		टिव्ही चॅनल				
		इतर प्रचार माध्यम				
6	विविध प्रकारचा प्रचार	रॅली				
		जन सभा				
		व्हिआयपी वरील खर्च				
		स्टार प्रचारकांचा खर्च				
		सजावट खर्च				
		इतर खर्च				
7	प्रवास खर्च	हवाई मार्गाने प्रवास				
		लोहमार्गाने प्रवास				
		रस्तेमार्गाने प्रवास				
		भाड्याच्या वाहनांचा खर्च				
		खाजगी वाहनान केलेल्या प्रवासाचा खर्च जसे -इंधन, वाहन चालकाचा पगार इ.				
		इतर खर्च				
8	इतर सर्व खर्च (जे वरील बाबीत मोडत नाहीत)	पक्षाने केलेल्या इतर सर्व किरकोळ खर्चाचा यात समावेश करावा.				
				एकूण निवडणुकीचा खर्च	xxx	

दिनांक .....रोजी .....चा. नमुना ६ सादर करित आहे.

पक्षाच्या पदाधिकाऱ्याची सही
(सही करणाऱ्याचे नाव, पद)
पक्षाचे नाव

सदर नमुना ६ हा दिनांक ..... रोजी प्राप्त झाला.

सही
जिल्हाधिकारी / महापालिका आयुक्त
एवं निवडणूक अधिकारी
.....स्थानिक स्वराज्य संस्था

टीप : (१) एकूण सर्व सामान्य खर्चाची माहिती स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय नमुना 6 मध्ये, निकाल लागल्यापासून 90 दिवसाच्या आत, जिल्हाधिकारी/ महापालिका आयुक्त यांना सादर करावा. सदर नमुना त्यांच्यामार्फत छाननी होऊन राज्य निवडणूक आयोगाकडे अग्रेषित होईल याची खात्री करावी.

(२) सादर करतेवेळी न चुकता पोहोच घ्यावी. सदर पोहोच हि भविष्यात बचावासाठी उपयोगी होऊ शकेल.

नमुना क्र.७

पक्षाने केलेला स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय उमेदवार निहाय निवडणुकीचा खर्च

(सदर विवरणपत्र निकाल लागल्यापासून 90 दिवसाच्या आत सादर करावा)

पक्षाचे नाव :	जिल्हयाचे नाव :
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :	सार्वत्रिक/ पोट निवडणूक :
एकूण लढविलेल्या जागा :	मतदानाचा दिनांक :
	दिनांक :

स्था. स्व. सं. नाव	उमेदवाराचे नाव	अ.क्र.	खर्चाची मुख्य बाब	खर्चाची अंतर बाब	तपशिल	दिनांक	खर्चाची रक्कम
		1	पक्षाने दिलेला निवडणूक लढविण्यासाठी निधी	रोखीने			
				चेकने			
		2	उमेदवारांच्या प्रचार कार्यालयासाठी पक्षाने केलेला खर्च	पक्षाच्या प्रचार कार्यालयाचे भाडे			
				स्टेशनरी खर्च			
				कार्यकर्त्यांचा भत्ता			
				कर्मचाऱ्यांचे पगार			
				दुरध्वनी/भ्रमणध्वनी खर्च			
				विज/ पाणी/चहापान खर्च			
				इतर कार्यालयीन खर्च			
		3	उमेदवारांच्या प्रचार साहित्यासाठी पक्षाने केलेला खर्च	जाहिरनामा छपाई व वितरण			
				वैयक्तिक माहिती पुस्तिका			
				पोस्टर छपाई व वितरण			
				हॅन्ड बिल छपाई वितरण			
				भिंतीवरील प्रचाराचे लिखाण			
				व्होटर स्लिप			
				इतर साहित्या खर्च			
		4	उमेदवारांच्या प्रचार माध्यमांसाठी पक्षाने केलेला खर्च	वर्तमान पत्र खर्च			
				होर्डिंग खर्च			
				ऑडिओ जाहिरात			
				व्हिडीओ जाहिरात			
				एसएमएस			
				केबल टिव्ही			
				संकेतस्थळ इत्यादी इंटरनेट माध्यम			
				सोशल मिडिया			
				रेडिओ/एफएम			

				प्रवेश द्वारांची कमान			
				टिव्ही चॅनल			
				इतर प्रचार माध्यम			
		6	उमेदवारांसाठी विविध प्रकारच्या प्रचारावरील पक्षाचा खर्च	रॅली			
				जन सभा			
				व्हिआयपी वरील खर्च			
				स्टार प्रचारकांचा खर्च			
				सजावट खर्च			
				इतर खर्च			
		7	उमेदवारांच्या प्रचारासाठी पक्षाने केलेला प्रवास खर्च	हवाई मार्गाने प्रवास			
				लोहमार्गाने प्रवास			
				रस्तेमार्गाने प्रवास			
				भाड्याच्या वाहनांचा खर्च			
				स्वतःची वाहनाने केलेल्या प्रवासाचा खर्च जसे -इंधन, वाहन चालकाचा पगार इ.			
				इतर खर्च			
		8	इतर सर्व खर्च (जे वरील बाबीत मोडत नाहीत)	पक्षाने केलेल्या इतर सर्व किरकोळ खर्चाचा यात समावेश करावा.			
							xxx

दिनांक .....रोजी .....वा. नमुना 7 सादर करित आहे.

पक्षाच्या पदाधिकाऱ्याची सही
(सही करणाऱ्याचे नाव, पद)
पक्षाचे नाव

सदर नमुना ७ हा दिनांक ..... रोजी प्राप्त झाला.

सही
जिल्हाधिकारी / महापालिका आयुक्त
एवं निवडणूक अधिकारी
.....स्थानिक स्वराज्य संस्था

टीप : (१) एकूण सर्व सामान्य खर्चाची माहिती स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय नमुना 7 मध्ये, निकाल लागल्यापासून 90 दिवसाच्या आत, जिल्हाधिकारी/ महापालिका आयुक्त यांना सादर करावा. सदर नमुना त्यांच्यामार्फत छाननी होऊन राज्य निवडणूक आयोगाकडे अग्रेषित होईल याची खात्री करावी.

(२) सादर करतेवेळी न चुकता पोहोच घ्यावी. सदर पोहोच हि भविष्यात बचावासाठी उपयोगी होऊ शकेल.

नमुना-८

राजकीय पक्षाचे शपथपत्र

(निकाल लागल्यापासून ६० दिवसाच्या आत)

मी नावे . ..... वडीलाचे/पतीचे नाव ....., वय.... वर्ष, राहणार .....; .... राजकीय पक्षाचा .... पदाधिकारी असून पक्षाचे मुख्य कार्यालय .... पत्यावर आहे. मी या शपथपत्राद्वारे पक्षातर्फे, पक्षाने मला प्राधिकृत केले असल्याने, मी गांभीयपूर्वक व मनपूर्वक पक्षातर्फे पुढीलप्रमाणे जाहिर करतो आहे की,

१. पक्षातर्फे नामनिर्देशन पत्र भरणाऱ्या स्था. स्व. संस्थानिहाय उमेदवारांची यादी प्रपत्र ५ प्रमाणे दिली आहे. सदर यादी व त्यातील तपशिल अचूक व बरोबर आहे. या सर्व उमेदवारांना पक्षातर्फे निवडणूक लढविण्यासाठी प्रपत्र-अ व प्रपत्र-ब देण्यात आले होते.

२. माझ्या पक्षाने स्था. स्व. सं. निहाय निवडणुकीसाठी केलेला सामान्य खर्च प्रपत्र ६ प्रमाणे अचूक दिलेला आहे. पक्षाने केलेले सर्व निवडणूक खर्चाचे खरे व बिनचूक हिशोब ठेवलेले आहेत, तसेच खर्चाचे पूरक पुराव्याचे कागद देखील जतन केलेले आहेत.

३. माझ्या पक्षाने उमेदवारनिहाय, उमेदवारांच्या निवडणूक प्रचारासाठी केलेला खर्च हा प्रपत्र ७ प्रमाणे अचूक दिलेला आहे. पक्षाने केलेले सर्व निवडणूक खर्चाचे खरे व बिनचूक हिशोब ठेवलेले आहेत, तसेच खर्चाचे पूरक पुराव्याचे कागद देखील जतन केलेले आहेत.

४. माझ्या पक्षाने राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र..... मधील सर्व निदेशाचे तंतोतंत पालन केलेले आहे.

५. माझ्या पक्षाने सादर केलेल्या खर्चामध्ये कोणतीही बाबत लपवून ठेवलेली नाही किंवा रोखून ठेवलेली नाही.

६. माझ्या पक्षाने केलेला सर्वसामान्य खर्च व उमेदवारनिहाय खर्च (उचित प्रमाणात विभाजीत (Directly divided between them) व संविभाजीत (Indirectly Apportioned between them)) सादर केलेला असून, तो संपूर्ण, खरा व अचुकपणे नमुन्यात अंतर्भूत केलेला आहे.

७. माझ्या पक्षाने ठेवलेले हिशोबाची पुस्तके व त्यासंबंधातील खर्चाच्या पृष्ठयार्थ ठेवलेले पावती/बिल/ व्हाऊचर इ. यांच्या मूळ प्रती; मी अगर प्रतिनिधी हा, जिल्हाधिकारी/ महापालिका आयुक्त यांच्या मागणीनुसार पडताळणीसाठी न चुकता व विनाविलंब सादर करु.

८. माझ्या पक्षाने पेड न्यूजचा अवलंब केलेला नाही. पण तरीही तशी तक्रार आल्यास, त्याबाबत समितीने पक्षाचे म्हणने ऐकून घेतलेला निर्णय माझ्या पक्षाला मान्य असेल.

९. माझ्या पक्षाने सादर केलेले निवडणूक खर्चात तसेच उमेदवाराने सादर केलेल्या खर्चात काही तफावत आढळल्यास, आम्हाला संधी दिल्यानंतर जिल्हाधिकारी/ महापालिका आयुक्त यांनी घेतलेला निर्णय आम्हाला मान्य असेल.

१०. जर राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाचे पालन झाले नाही तर राज्य निवडणूक आयोग राजकीय पक्ष नोंदणी आदेश २००९ अन्वये माझा पक्ष कारवाई पात्र असेन याची पक्षाला कल्पना आहे.

वरील केलेले विधान हे खरे आहे. या विधानात कोणतीही माहिती खोटी व लपवून ठेवलेली नाही.

अभिसाक्षी

माझ्या समक्ष दिनांक..... रोजी ..... येथे श्री..... यांनी शपथपूर्वक कथन केले आहे.

एच-१७६७[८००-१२-१६]-५.

(११) निवडणूक निर्णय अधिकारी सर्व वैध टपाली मतपत्रिकांवरील मते कोणत्या उमेदवारांना देण्यात आली आहेत त्याची मोजणी करील व त्यांची बेरीज संबंधित निवडणुकीसाठी विहित करण्यात आलेल्या प्रपत्रात नोंदवील व ती जाहीर करील.

(१२) तद्नंतर, सर्व वैध टपाली मतपत्रिका आणि अवैध ठरलेल्या टपाली मतपत्रिकांचे वेगवेगळे गठ्ठे बांधून एका पाकिटात ठेवण्यात यावेत व ते पाकीट निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मोहरेने मोहोरबंद करण्यात यावे. सदर पाकिटावर सही करण्याची ज्या उमेदवारांची, निवडणूक प्रतिनिधींची, मतमोजणी प्रतिनिधींची इच्छा असेल त्यांना सहया करण्याची अनुमती देऊन सदर पाकिटावर मतदार संघाचे नांव, निवडणुकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व पाकिटात काय आहे, त्याचे थोडक्यात विवरण लिहिण्यात येईल.

११. निवडणूक कार्य प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेल्या लोकसेवकांनी मतदान करणे :-

(१) निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेले मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी तसेच अन्य लोकसेवक त्यांचे नांव ज्या मतदार संघाच्या मतदार यादीत समाविष्ट आहे, त्याच मतदार संघात निवडणूक कामावर नियुक्त असल्यास ते ज्या मतदान केंद्रावर नियुक्त आहेत त्याच मतदान केंद्रात मतदान करु शकतात. अशा व्यक्तींना अशा प्रकारे मतदान करावयाचे असल्यास त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पीबी-२ या प्रपत्रात अर्ज केला पाहिजे आणि निवडणूक निर्णय अधिकारी अशा अर्जदारांना प्रपत्र पीबी-३ मध्ये नियम ३(२) मध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार निवडणूक कार्य प्रमाणपत्र देतील.

(२) निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेल्या ज्या मतदारांना निवडणूक कार्य प्रमाणपत्र प्रपत्र पीबी-३ मध्ये प्राप्त झालेले आहे, त्यांना ते ज्या मतदान केंद्रावर नियुक्त आहेत, त्याच मतदान केंद्रावर खाली नमूद केलेल्या पध्दतीनुसार मतदान करु देण्यात यावे:-

१. निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष यांनी ते सादर करणा-या व्यक्तीची सही निवडणूक कार्य प्रमाणपत्रावर घ्यावी.

२. मतदान केंद्राध्यक्ष चिन्हांकित मतदार यादीच्या शेवटी निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणा-या व्यक्तीचे नांव व त्यावरील मतदार यादीतील त्याचा अनुक्रमांक नमूद करतील.

३. मतदान केंद्राध्यक्ष संबंधित व्यक्तीस त्या मतदान केंद्रावरील अन्य मतदाराने ज्या प्रकारे मतदार केले असते त्याच प्रकारे निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणा-या व्यक्तीस मतदान करु देईल.

१२. या आदेशात नमूद केलेले सर्व प्रपत्रांचे नमुने अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे असतील.

अनुसूची

प्रपत्र पीबी-१

(पहा नियम ३)

निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचनापत्र

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी,

..... जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत/ महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूक

महोदय,

मी, ... मतदार गट/मतदार गण/प्रभाग (क्रमांक व नांव असल्यास नमूद करावे) च्या निवडणुकीमध्ये टपालाने मतदान करु इच्छितो.

माझे नांव .....मतदार गटाच्या/मतदार गणाच्या/प्रभागाच्या मतदान केंद्र क्रमांक ..... च्या मतदार यादीत अ.क्र. ..... वर समाविष्ट आहे.

टपाली मतपत्रिका मला खालील पत्त्यावर कृपया पाठविण्यात यावी :-

.....

.....

.....

.....

स्थळ - .....

दिनांक-.....

आपला विश्वासू,

.....

प्रपत्र पीबी-२
(पहा नियम ३(२))
निवडणूक कार्य प्रमाणपत्रासाठी अर्ज

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी,
मतदार गठ/मतदार गण/प्रभाग क्र. ..... नांव .....
..... जिल्हा परिषद/पंचायत समिती/
ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूक

महोदय,

मी ..... मतदार गटाच्या/मतदार गणाच्या/प्रभागाच्या निवडणुकीमध्ये व्यक्तिशः मतदान करु इच्छितो.

मला ..... जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या/ग्रामपंचायतीच्या/महानगरपालिकेच्या/नगरपरिषदेच्या/नगर पंचायतीच्या निवडणुकीमध्ये ..... मतदार गट/मतदार गण/प्रभागामधील मतदान केंद्र क्रमांक- ..... येथे निवडणूक कामावर नियुक्त करण्यात आले आहे. तथापि, माझे नांव वरील नमूद ..... मतदार गट/मतदार गण/प्रभाग मधील मतदान केंद्र क्रमांक- ..... च्या मतदार यादीत अनुक्रमांक ..... येथे समाविष्ट आहे.

मी अशी विनंती करतो की, मला कृपया प्रपत्र पीबी-३ मध्ये निवडणूक कार्य प्रमाणपत्र देण्यात यावे, जेणेकरुन मला ज्या मतदान केंद्रावर निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आले आहे, त्या मतदान केंद्रावर मी मतदान करु शकेन. निवडणूक कार्य प्रमाणपत्र मला खालील पत्त्यावर पाठविण्यात यावे.

.....
.....
.....
.....

ठिकाण :- ..... आपला विश्वासू,

दिनांकः- ....

प्रपत्र पीबी-३
(पहा नियम ३ (२))
निवडणूक कार्य प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री..... हे ..... जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या/ग्रामपंचायतीच्या/महानगरपालिकेच्या/नगरपरिषदेच्या/नगर पंचायतीच्या निवडणुकीतील ..... मतदार गट/मतदार गणामधील/प्रभागामधील मतदार असून, त्याचा मतदार यादीतील अनुक्रमांक ..... असून, त्यांना निवडणूक कर्तव्यार्थ नेमण्यात आले असल्यामुळे त्यांचा ज्या मतदान केंद्रामध्ये मतदान करण्याचा हक्क आहे, त्या मतदान केंद्रावर ते मतदान करण्यास असमर्थ असल्यामुळे त्यांना उपरोक्त नमूद मतदार गट/मतदार गण/प्रभागामधील मतदान केंद्रापैकी ते ज्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी निवडणूक कामावर असतील त्या मतदान केंद्रावर त्यांना मतदान करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

ठिकाण ..... सही .....

दिनांक-..... निवडणूक निर्णय अधिकारी

प्रपत्र पीबी-४
(पहा नियम ५)
मतदाराचे घोषणापत्र

.....

.....जिल्हा परिषद/पंचायतसमिती/ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायती मधील .....मतदार गट/मतदार गण/प्रभागाची निवडणूक.

(ही बाजू मतदार जेंव्हा घोषणापत्रावर स्वतः सही करणार असेल तेंव्हा उपयोगात आणावी.)

मी याद्वारे असे घोषित करतो की, उपरोक्त निवडणुकीतील ..... अनुक्रमांकाची टपाली मतपत्रिका देण्यात आली आहे, असा मी मतदार आहे.

दिनांक-.....

मतदाराची सही .....

पत्ता-

.....

.....

.....

सहीचे साक्षांकन

श्री.....हे माझ्या वैयक्तिक ओळखीचे असून/मला त्यांची ओळख माझ्या वैयक्तिक ओळखीचे श्री..... (ओळख पटवून देणारे) यांनी समाधानकारकरित्या पटवून दिली असून, त्यांनी माझ्या उपस्थितीत वरील सही केली आहे.

साक्षांकन करणा-या अधिका-याची
सही .....
पदनाम.....
पत्ता - .....
.....
दिनांक- .....

ओळख पटवून देणारे असल्यास
त्यांची सही .....
पत्ता - .....
.....

...कृ. मा. प. /-

(ही बाजू जेंव्हा मतदार स्वतः सही करु शकत नसेल तेंव्हा उपयोगात आणावी.)

मी याद्वारे असे घोषित करतो की, उपरोक्त निवडणुकीतील ..... अनुक्रमांकाची मतपत्रिका ज्यास देण्यात आली आहे, असा मी मतदार आहे.

मतदाराच्या वतीने साक्षांकन करणा-या
दिनांक- ..... अधिका-याची सही .....
मतदाराचा पत्ता .....
.....

प्र मा ण प त्र

मी याद्वारे प्रमाणित करतो की –

(१) श्री ..... हे माझ्या वैयक्तिक ओळखीचे असून/मला त्यांची ओळख माझ्या वैयक्तिक ओळखीचे श्री..... (ओळख पटवून देणारे) यांनी समाधानकारक रित्या पटवून दिली आहे.

(२) मतदार अशिक्षित असून, तो स्वतःचे मत स्वतः नोंदवू शकत नाही अथवा घोषणापत्रावर सही करु शकत नाही, याबद्दल माझी खात्री पटली आहे.

(३) त्यांनी त्यांच्या वतीने मतपत्रिकेवर मत नोंदविण्याची तसेच वरील घोषणापत्रावर सही करण्याची मला विनंती केली आहे, आणि,

(४) मतपत्रिकेवर मी त्यांच्या वतीने त्यांचे उपस्थितीत त्यांचे इच्छेनुसार मत नोंदविले असून, घोषणापत्रावर त्यांचे उपस्थितीत सही केली आहे.

साक्षांकन करणा-या अधिका-याची
ओळख पटवून देणारा असल्यास सही .....
त्याची सही ..... पदनाम .....
पत्ता ..... पत्ता .....
....
दिनांक-.....

प्रपत्र पीबी-५
(पहा नियम ५)
(पाकीट-अ)

अ

मतमोजणी पूर्वी उघडू नये.

*..... जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत मधील .....मतदार गट/मतदार गण/प्रभागाची निवडणूक

टपाली मतपत्रिका

अनुक्रमांक- .....

***निवडणुकीचा योग्य तो तपशील येथे भरावा.**

प्रपत्र पीबी-६
(*पहा* नियम ५)
(पाकीट-ब)

(.....जिल्हा परिषद/पंचायतसमिती/ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगरपरिषद/नगर पंचायत निवडणुकीत उपयोगासाठी)

ब

ज्या अधिका-यावर ही टपाली मतपत्रिका पोहोचविण्याची जबाबदारी आहे अथवा ज्या अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली ही मतपत्रिका पोहोचती करावयाची आहे त्यांनी ती खालील नमूद पत्त्यावर विनाविलंब पोहोचती करावी.

निवडणूक तात्काळ
टपाली मतपत्रिका

मतदार गट/मतदार गण/प्रभाग क्रमांक-..*.....
नांव:-.....ची निवडणूक
प्रति,
निवडणूक निर्णय अधिकारी **.....
पाठविणाराची सही .....

*निवडणूक निर्णय अधिकारी यांनी येथे योग्य त्या मतदार संघाचे नांव नमूद करावे.

**निवडणूक निर्णय अधिकारी यांनी येथे आपला पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता नमूद करावा.

प्रपत्र पीबी-७
(पहा नियम ५)
मतदारांसाठी मार्गदर्शक सूचना
(जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपंचायत निवडणुकीमध्ये उपयोगासाठी)

.....जिल्हापरिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगरपरिषद/नगर पंचायत मधील ..... मतदार गट/मतदार गण/प्रभागांची निवडणूक

- सोबत पाठविण्यात येत असलेल्या मतपत्रिकेवर ज्यांची नांवे छापलेली आहेत त्या व्यक्ती वरील निवडणुकीमध्ये मतदार आहेत. ज्या उमेदवारास आपण आपले मत देऊ इच्छिता त्या उमेदवाराच्या नांवासमोर स्पष्ट दिसेल अशी खूण करा. अशी खूण स्पष्ट दिसून यावी, जेणेकरुन आपण मत देऊ इच्छिता त्या उमेदवारास मत दिले आहे किंवा कसे, याविषयी शंका घेण्यास वाव राहणार नाही. आपण केलेल्या खुणेवरुन कोणत्या उमेदवारास मत दिले आहे हे पुरेसे स्पष्ट होत नसेल तर आपले मत अवैध ठरेल.

- सदर निवडणुकीमध्ये केवळ एकच उमेदवार निवडून दयावयाचा आहे. कृपया हे लक्षात ठेवा की, आपण फक्त एकच मत देऊ शकता. त्या अनुषंगाने आपण एकापेक्षा जास्त उमेदवारास मत देऊ नये. असे केल्यास आपली मतपत्रिका रद्द करण्यात येईल. परंतु, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी एकापेक्षा जास्त उमेदवार एका प्रभागातून निवडून दयावयाचे असतात. यास्तव प्रभागातून जितके उमेदवार निवडून दयावयाचे आहेत तितकी मते आपण देऊ शकता. तथापि, एका उमेदवारास एकापेक्षा जास्त मते देण्यात येऊ नयेत.

- मतपत्रिकेवर मत देण्यासाठी करावयाच्या खुणेव्यतिरिक्त आपण आपली सही करु नका. कोणताही शब्द लिहू नका अथवा कोणतीही अन्य खूण करु नका.

- आपणास सोबत पाठविलेल्या प्रपत्र-४ मधील घोषणापत्रावर राजपत्रित अधिकारी अथवा आपणास नियुक्त केलेल्या मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षांच्या उपस्थितीत सही करा.

- वरील बाबतीत आपण घोषणापत्र योग्य त्या सक्षम अधिका-याकडे घेऊन जाऊ शकता व तुमची ओळख पटविल्यानंतर व अधिका-याचे त्याविषयी समाधान झाल्यानंतर त्यावर त्यांचे उपस्थितीत सही करु शकता. सदर अधिकारी तुमच्या सहीचे साक्षांकन करुन घोषणापत्र तुम्हाला परत करील. तुम्ही तुमची मतपत्रिका साक्षांकन करणा-या अधिका-यास कोणत्याही परिस्थितीत दाखवू नका अथवा तुम्ही कसे मतदान केले हे सांगू नका.

- तुम्ही अशिक्षित असल्यामुळे वर नमूद केलेल्या पध्दतीनुसार मतपत्रिकेवर स्वतः खूण करण्यास आणि घोषणापत्रावर सही करण्यास असमर्थ असाल तर तुम्ही वर नमूद केलेल्या सक्षम अधिका-याकडून तुमचे मत नोंदवून घेऊ शकता. तसेच तुमच्या वतीने घोषणापत्रावर त्यांची सही घेऊ शकता. सदर अधिकारी तुमच्या विनंतीनुसार व तुमच्या उपस्थितीत तुमच्या इच्छेनुसार मतपत्रिकेवर खूण करील. तो त्यासंदर्भातील दाखलाही लिहून पूर्ण करील.

- तुमचे घोषणापत्र त्यावर सही करुन झाल्यानंतर व तुमची सही साक्षांकित करुन झाल्यानंतर प्रपत्र-४ मधील सदर घोषणापत्र तसेच 'अ' अशी खूण केलेले लहान पाकीट ज्यामध्ये मतपत्रिका ठेवलेली आहे, हे सर्व 'ब' अशी खूण केलेल्या मोठया पाकिटात ठेवा. मोठे पाकीट बंद केल्यानंतर ते निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पोस्टाने अथवा खास दूतासमवेत पाठवा. 'ब' या पाकिटावर त्यासाठी नेमलेल्या ठिकाणी तुम्हास तुमची पूर्ण सही करावयाची आहे.

सदर पाकीट निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दिनांक-..... रोजी ..... पूर्वी (वेळ नमूद करावी) पोहोचते करण्याची दक्षता घ्यावी.

कृपया खालील बाबींची नोंद घ्यावी:-

(१) वर नमूद केलेल्या पध्दतीनुसार आपण आपले घोषणापत्र साक्षांकित करुन घेण्यास अथवा प्रमाणित करुन घेण्यास असमर्थ ठरल्यास तुमची मतपत्रिका रद्द करण्यात येईल.

(२) दिनांक- ..... रोजी .....वेळेनंतर व त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे पोचणा-या पाकिटातील मतांची मतमोजणी करण्यात येणार नाही.

सही/-
य. ल. राजवाडे,
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

एएबी८२

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.५/का-१०,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १७ जानेवारी, २००२.

प्रति,
आयुक्त,
महानगरपालिका (सर्व)
(बृहन्मुंबई वगळून)

जिल्हाधिकारी(सर्व)
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय:- टपाली मतपत्रिका आदेश- २००१
संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाकडील समक्रमांकाचे
दिनांक- १६/१/२००१ चे आदेश

महोदय,

संदर्भाधीन आदेशाद्वारे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या निवडणुकांमध्ये टपालाद्वारे मतदान नोंदविण्याची पध्दती विहित करण्यासंबंधातील आदेश काढण्यात आले आहेत.

२. सदर आदेशाच्या नियम क्रमांक-४ मध्ये टपाली मतपत्रिकेचा नमुना कसा असावा, याबद्दल सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार टपाली मतपत्रिका ही निवडणुकीत वापरल्या जाणाऱ्या मतपत्रिकेसारखीच असेल. तथापि, सदर मतपत्रिकेवर अगदी वरच्या बाजूस "टपाली मतपत्रिका" (Postal Ballot Paper) असे छापलेले असेल, असे नमूद करण्यात आले आहे.

३. काही महानगरपालिका तसेच जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून झालेल्या विचारणेच्या अनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की, पोस्टल बॅलेट पेपरवर फक्त उमेदवारांची नांवे छापण्यात यावीत, त्यांच्यासमोर त्यांचे चिन्ह व चिन्हाचे नांव छापण्याची आवश्यकता नाही. यासंदर्भात विधानसभा/लोकसभा निवडणुकीसाठी ज्याप्रमाणे फक्त उमेदवारांची नांवे मतपत्रिकेवर छापण्यात येते, तशा मतपत्रिका छापण्यात याव्यात.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

(बी. जी. वीर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

एसीएम

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- एसईसी/एमसी-२००३/प्र.क्र.७० /का.१०
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २० सप्टेंबर, २००३

प्रति,
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी, (सर्व) (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्यावरील माहिती राज्य निवडणूक आयोगास कळविणेबाबत..

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए मधील तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थावर निवडून आलेल्या सदस्यांची मुदत संपण्यापूर्वी तसेच नवीन स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन झाल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत सार्वत्रिक निवडणूका घेण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक कार्यक्रम देण्यात येतो. तसेच कोणत्याही कारणामुळे रिक्त झालेल्या जागेसंबंधी पोटनिवडणूक घेण्याचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येतो. अशा निवडणूकांच्या कार्यक्रमातील प्रत्येक टप्पा कोणत्या तारखेस पूर्ण करावयाचा आहे याचा सविस्तर कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येतो व प्रत्येक टप्पा पूर्ण झाल्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठविण्याबाबतच्या सूचना देखील सर्व संबंधितांना देण्यात येतात. असे असूनही निवडणूकीचा टप्पा पूर्ण झाल्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास काही स्थानिक स्वराज्य संस्थाकडून वेळीच प्राप्त होत नाहीत. विशेषत: मतदान व मतमोजणीचे दिवशी राज्य निवडणूक आयोगाकडे वेळोवेळी माहिती पाठविणे अपेक्षित असते ती देखील योग्यवेळी पाठविली जात नाही असे

कृ.मा.प.

निदर्शनास आले आहे. तरी या संदर्भात आयुक्त महानगरपालिका तसेच जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे दक्षता घेण्यात याव्यात असे कळविण्यात येत आहे :-

१) निवडणूकीचा प्रत्येक टप्पा पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल फॅक्सद्वारे राज्य निवडणूक आयोगास तात्काळ पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी.

२) मतदान व मतमोजणीच्या दिवशी राज्य निवडणूक आयोगास माहिती पाठविण्यासाठी एका समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. तसेच सदर अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, सतत व्यस्त राहणार नाही असा दूरध्वनी व फॅक्स क्रमांक राज्य निवडणूक आयोगास कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत व सदर अधिकाऱ्याने आयोगाशी सतत संपर्कात राहून मतदान व मतमोजणी याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगास कळविणे अपेक्षित आहे. मात्र असे आढळून आले आहे की, दूरध्वनी क्रमांक व्यस्त तर राहतातच तसेच माहिती पुरविणारे संबंधित अधिकारी देखील उपलब्ध नसतात व ते आयोगाच्या संपर्कातही राहत नाहीत या बाबी टाळणे आवश्यक आहे.

३) मतदानाचे दिवशी मतदान सुरु झाल्यानंतर प्रत्येक २ तासांनी झालेल्या मतदानाची आकडेवारी (स्त्री, पुरुष, एकूण मतदान व टक्केवारी) २ तास संपल्यानंतर एका तासात उदा. ७.३० ते ९.३० या २ तासातील आकडेवारी १०.३० पर्यंत आयोगाच्या फॅक्सवर प्राप्त होणे आवश्यक आहे, अथवा दूरध्वनीवर माहिती कळविण्याची आवश्यकता आहे.

४) मतदान सुरु असतांना अथवा पूर्ण झाल्यानंतर मतदानाच्या प्रक्रियेमध्ये अथवा निवडणूका होत असलेल्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून कोणतीही घटना घडली असल्यास त्याबाबतचा अहवाल आयोगास त्याच दिवशी तात्काळ फॅक्सद्वारे कळविण्यात यावा.

५) मतदानाचेवेळी बोगस मतदान करतांना काही व्यक्तींना अटक झाली

असल्यास व भारतीय दंड संहितेच्या कलम १७१-डी अन्वये पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असल्यास त्याबाबतची माहिती मतदानाच्या दिवशी सायंकाळपर्यंत आयोगाकडे प्राप्त होईल अशा रितीने पाठवावा.

६) मतमोजणीच्या दिवशी मतमोजणीची प्रत्येक फेरी संपल्यानंतर व त्या फेरीचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्या फेरीमध्ये कोणकोणत्या प्रभागात कोणत्या पक्षाचे किती उमेदवार निवडून आले याची राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या पक्षनिहाय स्थितीच्या नमुन्यात माहिती पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्या फेरीमध्ये निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव, त्याचा पक्ष, मिळालेली वैध मते तसेच दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराचे नाव, त्याचा पक्ष, त्यांस मिळालेली वैध मते ही माहिती राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात आयोगास प्राप्त होणे आवश्यक आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमातील प्रत्येक टप्प्याची माहिती राज्य निवडणूक आयोगास वेळीच कळविणे आवश्यक असून सदर माहिती आयोगास कळविली जात आहे किंवा कसे याविषयीची दक्षता घेण्याची जबाबदारी आयुक्त, महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांची राहील.

आयोगाच्या या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता घेण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(चाँद गोयल)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत- १) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
३) विभागीय आयुक्त (सर्व)

mssest727/4

निवडणुकीत झालेल्या सर्व महत्वाच्या घटना
अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला
ताबडतोब कळविण्याबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-मनपा-२००४/प्र.क्र.३५/का-०५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १ डिसेंबर, २००४.

प रि प त्र क

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, निवडणुकीच्यावेळी होणारे गैरप्रकार किंवा सर्व महत्वाच्या घटना राज्य निवडणूक आयोगाला तात्काळ कळविल्या जात नाहीत. यामध्ये खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्राचा ताबा घेणे, मतपेटयांत जबरदस्तीने मते टाकणे, गाळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे याचा समावेश होतो. मतमोजणीच्या वेळीदेखील होणा-या सगळया घटना राज्य निवडणूक आयोगास कळविण्यात याव्यात. तसेच निवडणूक प्रक्रिया सुरु असताना घडणा-या सर्व महत्वाच्या घटना राज्य निवडणूक आयोगास कळविणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच गैरप्रकार घडल्यास त्याबाबत पोलिसांकडे तक्रारसुध्दा ताबडतोब नोंदविण्यात यावी.

अशा घटना व निवडणुकीतील गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला कळवून त्यावर राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन मागविणे ही संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी/जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांची जबाबदारी असेल, याची कल्पना सर्व निवडणूक निर्णय अधिका-यांना दयावी. असे न घडल्यास निवडणूक निर्णय अधिकारी तथा अन्य कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई होईल, याची कल्पना सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व अन्य निवडणूक कर्मचारी यांना दयावी.

(नंद लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व महानगरपालिका आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

५५७

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २३ डिसेंबर, २००४.

आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळी ब-याचदा नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या तारखेनंतर एकच उमेदवार शिल्लक राहिल्याने उमेदवार बिनविरोध निवडून आला असे जाहीर करण्यात येते. उमेदवार अर्ज भरताना अनेक उमेदवार अर्ज भरतात परंतु, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्यावेळी एक उमेदवार सोडून अन्य सर्व उमेदवार अर्ज मागे घेतात. अशा वेळी तो उमेदवार इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो, ही शक्यता नाकारता येत नाही. तरी यापुढे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगाला त्याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा व राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करण्यात यावे.

(नंद लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति:-
१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतीचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

५५९

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघांची पुनर्रचना

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ ऑक्टोबर, २००५.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाकडे अशा तक्रारी प्राप्त होतात की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघांच्या (महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, ग्रामपंचायती यांचे प्रभाग, जिल्हा परिषदांचे मतदार गट व पंचायत समित्यांचे मतदार गण) पुनर्रचनेच्या कामात राजकीय पुढा-यांचा हस्तक्षेप होतो. तरी असा हस्तक्षेप टाळण्यासाठी व प्रभाग रचना राजकीय प्रभावाखाली होऊ नये यासाठी मतदार संघांच्या पुनर्रचनेचे काम प्रारंभिक म्हणजे प्रारुप मतदार संघ तयार करण्याचे काम गोपनीय स्वरुपात हाताळण्यात यावे. कोणत्याही राजकीय पक्षाने अथवा पुढा-याने अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्याने त्याबाबतची माहिती मागितल्यास ती देण्यात येऊ नये, अशा सूचना सर्व मतदार संघांच्या पुनर्रचनेच्या कामकाजाशी संबंधित असणा-या अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात याव्यात. अशी माहिती मिळाल्यास राजकीय पुढा-यांकडून किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांकडून मतदार संघांची पुनर्रचना कशी करावी यासंबंधी सूचना देण्यात येतात व त्या सूचनांचे काही वेळा पालनही होते. मतदार संघाच्या रचनेवर ब-याचदा आरक्षण अवलंबून असते विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे. कोणत्याही अधिका-याने/कर्मचा-याने अशी माहिती दिल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्वरीत सुरु करण्यात यावी. प्रारुप मतदार संघ ज्यावेळी जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात येतात त्यावेळी सर्व संबंधितांना प्रस्तावाची माहिती होतेच.

२. माहितीच्या अधिकाराखाली कोणत्याही नागरिकांने प्रभाग रचनेची माहिती मागितल्यास अशी माहिती देण्यात येऊ नये. कारण माहितीचा अधिकार अशा बाबींना लागू होतो की, ज्यात निर्णय झाला आहे.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. :-रानिआ/मनपा२००५/प्र.क्र.१७/का.०५
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२/०७/२०१३

विषय - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघांची पुर्नरचना.
कामकाज गोपनीयरित्या हाताळण्याबाबत...
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का.५,
दिनांक २४ ऑक्टोबर, २००५.

आदेश

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेचा मसूदा जाहीर करण्याअगोदरच ही प्रभाग रचना हे कामकाज हाताळणा-या व्यक्तींव्यतिरिक्त अन्य व्यक्तींना तसेच प्रसिध्दी माध्यमांना माहित होते. महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने प्रभाग रचनेबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देताना यासंदर्भात नागरीक मोठया प्रमाणावर हरकत घेताना दिसून आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मतदारसंघांच्या (महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, ग्रामपंचायती यांचे प्रभाग, जिल्हा परिषद मतदार गट व पंचायत समिती मतदार गण) पुर्नरचनेच्या कामकाजामध्ये राजकीय व्यक्तींचा हस्तक्षेप टाळण्याकरिता हे कामकाज गोपनीय स्वरुपात हाताळण्यात यावे अश्या सूचना संदर्भाधिन आदेशान्वये दिलेल्या आहेत. मात्र या आदेशांकडे दुर्लक्ष करुन प्रभागरचनेची माहिती राजकीय व्यक्ती अथवा प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी यांना देण्यात येते. मतदारसंघांची माहिती प्रसिध्द होण्यापूर्वीच राजकीय व्यक्तींना माहित झाल्यास त्यांच्याकडून सोयीची प्रभाग रचना होण्याबाबत दबाव येऊ शकतो. ब-याचदा मतदारसंघांचे आरक्षण हे प्रभागांच्या रचनेवर अवलंबून असते. आरक्षणात बदल करण्याच्या दृष्टीनेही राजकीय व्यक्तींकडून दबाव येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील परिस्थितीत पुन्हा आदेशित करण्यात येते की, मतदारसंघांची पुर्नरचना करताना हे कामकाज अत्यंत गोपनीय स्वरुपात हाताळण्यात येईल याची दक्षता घ्यावी. राज्य निवडणूक आयोगाने अथवा प्राधिकृत अधिका-याने प्रथम प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर आरक्षित प्रभाग निश्चित करण्याकरिता सोडत काढण्यात येते आणि त्याच दिवशी प्रभागांची रचना नागरीकांच्या माहितीकरिता सोडतीच्या ठिकाणी प्रथम जाहीर करण्यात येते. त्यामुळे प्रभाग रचनेच्या कामकाजास सुरुवात केल्यापासून ते सोडतीच्या वेळी प्रभाग रचना जाहीर करेपर्यंतच्या कालावधीमध्ये प्रभाग रचनेचा तपशिल अनधिकृत व्यक्तींना अथवा प्रसिध्दी माध्यमांना माहित होणार नाही याबाबत पुरेशी खबरदारी घेण्यात यावी. कोणत्याही अधिका-याने / कर्मचा-याने अशी माहिती दिल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्वरित सुरु करण्यात यावी. या आदेशाचे पुरेपूर पालन होईल अशा सक्त सूचना प्रभाग रचनेचे काम हाताळणा-या सर्व संबंधितांना वेळोवेळी देण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(पूनम शिरसोळकर)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत : १. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व नगरपरिषदा, नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६. निवड नस्ती.

५६३

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची राज्य निवडणूक आयोगाने निश्चित करुन दिलेली कमाल मर्यादा काढून टाकण्याबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४(१)/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०६/०२/२०१५

वाचा :- १. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.९/का.५, दि.२०/१२/२००४
२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.मनप-२००४/प्र.क्र.३१/का.६, दि.२०/१२/२००४
३. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४(१)/का.५, दि.३०/०७/२०११
४. शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.संकीर्ण-२००६/५१२/प्र.क्र.८९/२००६/नवि-२०, दिनांक १६/०७/२००७

आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त दिनांक २०/१२/२००४ च्या दोन स्वतंत्र आदेशान्वये तसेच दिनांक ३०/७/२०११ च्या आदेशान्वये राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा वेळोवेळी निश्चित करुन दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए नुसार राज्य निवडणूक आयोगावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न्याय्य, मुक्त व पारदर्शक रितीने पार पाडण्याची संविधानिक जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. तसेच भारतीय संविधानामध्ये भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाला समान दर्जा देण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.५७५६/२००५, श्री. किशनसिंग तोमर वि. अहमदाबाद महानगरपालिका व इतर मध्ये दि.१९/१०/२००६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, अधिकार व जबाबदा-या भारत निवडणूक आयोगाशी समतूल्य आहेत. तसेच राज्य निवडणूक आयुक्तांना त्यांची जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे असे नमूद करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगावर असलेली संविधानिक जबाबदारी योग्यरितीने पार पाडण्याच्या दृष्टीने भारत निवडणूक आयोगाकडून घेण्यात येणा-या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळी ज्या पध्दतीने व ज्या ज्या बाबींवर कार्यवाही केली जाते त्या सर्व बाबींवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या वेळी कार्यवाही केली जाणे अनिवार्य आहे. अशा परिस्थितीत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना खर्चाची कमाल मर्यादा घालून दिल्यास या मर्यादेचे पालन करुन वरीलप्रमाणे कार्यवाही करणे शक्य होणार नाही. परिणामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पारदर्शक व मुक्त वातावरणात पार पाडता येणे शक्य होणार नाही.

त्याअर्थी आता, वरील सर्व बाबी विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाचे उपरोक्त दिनांक २०/१२/२००४ चे दोन स्वतंत्र आदेश व दिनांक ३०/०७/२०११ चे आदेश अधिक्रमित करण्यात येत असून राज्य निवडणूक आयोगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चासाठी घालून दिलेली कमाल मर्यादा काढून टाकण्यात येत आहे. तसेच सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना असे आदेश देण्यात येत आहेत की, भारत निवडणूक आयोगाकडून घेण्यात येणा-या लोकसभा / विधानसभा निवडणुकांच्या वेळी ज्या ज्या बाबींवर कार्यवाही केली जाते अशा सर्व आवश्यक बाबींवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही कार्यवाही करण्यात यावी. त्यासाठी कराव्या लागणा-या खर्चासाठी दरवर्षी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात यावी. तसेच या निवडणुकांवर खर्च करताना वित्तीय औचित्याच्या तत्वांचे पालन केले जाईल तसेच आवश्यक बाबींवर खर्च करताना तो काटकसरीने केला जाईल याची दक्षता घेण्याची संपूर्ण

जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांची राहील व त्यासाठी ते जबाबदार राहतील.

सदर आदेश राज्य निवडणूक आयोगाच्या www.mahasec.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
६. सर्व नगरपरिषद / नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने
८. मा. राज्य निवडणूक आयुक्तांचे स्वीय सहायक
९. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
१०. निवड नस्ती

STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

No. SEC. 1095/CR-11/Desk-3,
New Administrative Building,
Opposite Mantralaya,
Madame Cama Road, Bombay 400 032.
Dated the 10th April 1995.

To,
All the Divisional Commissioners.
All the Municipal Commissioners.
All the Collectors.
All the Chief Executive Officers of Zilla Parishad.

Subject.—General or bye-election to Municipal Corporation, Municipal Council, Zilla Parishad and Panchayat Samiti.

Sub-rule (2) of rule 4 of the Maharashtra Local Authoritry Members' Disqualification Rules, 1987 made under the Maharashtra Local Authority Members' Disqualification Act, 1986 provides *inter alia* that every councillor in relation to a Municipal Party and a Zilla Parishad Party and Member in relation to a Panchayat Samiti Party who takes his seat in the Municipal Corporation, Municipal Council, Zilla Parishad or, as the case may be, in Panchayat Samiti, after the commencement of the said rules (it appears that these rules have commenced on the 1st November 1987, on which date they have been gazetted) shall, before taking his seat in the Municipal Corporation, Municipal Council, Zilla Parishad or, as the case may be, Panchayat Samiti deposit with the Commissioner (which expression means the Commissioner of a Revenue Division appointed under section 6 of the Maharashtra Land Revenue Code, 1966, Cf. Section 2(c) of the Local Authority Members' Disqualification Act, 1986) his Election certificate or, as the case may be, certified copy of the notification nominating him as a member. The *Explanation* appended to the said sub-rule (2) of rule 4 provides that the " election certificate " means the certificate of election issued under the relevant Municipal Acts or Zilla Parishad Act. None of these Acts in operation in the State or the Election Rules made thereunder provide for issuance of an election certificate to an elected candidate at the general or bye-election. It is, therefore, expedient to prescribe such certificate to meet the requirements of the said rule 4(2). The State Election Commission, therefore, in exercise of the powers conferred by Articles 243-K and 243-ZA of the Constitution of India, read with sub-section (*4*) of section 18A of the Bombay Municipal Corporation Act (Bom. III of 1888), sub-section (*4*) of section 9B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C. P. and Berar II of 1950), sub-section (*4*) of section 14 of the Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949 (Bom. LIX of 1949), sub-section (*4*) of section 10A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965, the Zilla Parishads and Panchayats Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in this behalf, directs that an " election certificate " in the form appended herewith

and as may be relevant shall be issued by the Returning Officer to a contesting candidate who has been declared elected as a councillor or, as the case may be, a member at any general or bye-election to the Municipal Corporation, Municipal Council, Zilla Parishad, or, as the case may be, the Panchayat Samiti.

D. N. CHAUDHARI,
State Election Commissioner, Maharashtra.

Encl. Form of Election Certificate.

Copy forwarded for information to—

(1) The Chief Secretary to the Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai 400 032.

(2) The Principal Secretary to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya, Mumbai 400 032.

(3) The Secretary to the Government of Maharashtra, Rural Development Department, Mantralaya, Mumbai 400 032.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

[राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक : एसईसी-१०९५/सीआर १७/डेस्क-३, दिनांक १० एप्रिल १९९५ अन्वये विहित केलेले]

प्रमाणपत्र

जिल्हापरिषद / पंचायत समिती } सार्वत्रिक निवडणूक / पोट निवडणूक

मी .....

निर्वाचन अधिकारी, निवडणूक विभाग / निर्वाचन गण .....

जिल्हा परिषद ..... पंचायत समिती, जिल्हा .....

याअन्वये प्रमाणित करतो की, दिनांक ..... रोजी

श्री. / श्रीमती ..... [.....

पक्षाने / आघाडी / फ्रंट यांनी पुरस्कृत केलेले / स्वतंत्र उमेदवार] जिल्हा परिषद / पंचायत समिती क्षेत्रामधील

निवडणूक विभाग / निर्वाचन गण ..... मधून सदस्य म्हणून निवडून आले आहेत.

[ ]

निर्वाचन अधिकारी.

ठिकाण :

दिनांक :

निवडणूक विभाग / निर्वाचन गण .....

जिल्हा परिषद / पंचायत समिती.

STATE ELECTION COMMISSION

No. SEC. 1095/CR-11/Desk-3,
New Administrative Bldg.,
Opp. Mantralaya, Madam Cama Road,
Bombay 400 032.

Date 8th June, 1995.

To,

All the Divisional Commissioners,
All the Municipal Commissioners,
All the Collectors.
All the Chief Executives of Zilla Parishads.

Sub. : General/Bye-election to the Municipal Corporation, Municipal Council, Zilla Perishad and Panchayat Samiti.

Ref. : Letter No. SEC-1095/CR-11/Desk-3, dated the 10th April 1995 from the State Election Commission, Maharashtra.

The State Election Commission, Maharashtra, has prescribed formats of election certificates to be issued to the candidates elected at any election or bye-election to a Municipal Corporation or a Municipal Council or a Zilla Parishad or a Panchayat Samiti. Under the provisions of Rule 4(2) of the Maharashtra Local Authority Members' Dis-qualification Rules, 1987, a councillor elected to a Municipal Corporation has to deposit this election certificate with the Commissioner of a revenue division and in the case of a councillor elected to a Municipal Council, Zilla Parishad or a member elected to a Panchayat Samiti has to deposit the election certificate with the Collector of a district. While issuing election certificate, these provisions may be brought to the notice of a councillor or, as the case may be a member.

D. N. CHAUDHARI
State Election Commissioner,
Maharashtra.

५७७

महानगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या
उमेदवारांना द्यावयाचे प्रमाणपत्र

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:-रानिआ/मनपा २००५/प्र.क्र.१५/का.०५
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ८ एप्रिल, २००५.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांच्या द्यावयाच्या प्रमाणपत्रावर निवडणूक निर्णय अधिकारी व महानगरपालिका, आयुक्त अशा दोघांच्याही सहीची आवश्यकता होती. त्यामध्ये बदल करुन राज्य निवडणूक आयोगाने यापुढे महानगरपालिकांमधील निवडून आलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रावर फक्त निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची सही राहील, असा निर्णय घेतला आहे. निवडणूक प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त

उ. 10356(258)

५७४

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्र मा ण प त्र

---------- महानगरपालिका सार्वत्रिक / पोटनिवडणूक ----------

मी, ---------- निवडणूक निर्णय अधिकारी, ---------- महानगरपालिका, यान्वये प्रमाणित करतो की दिनांक---------- रोजी श्री./श्रीमती ----------(---------- पक्षाने/आघाडी/फ्रन्ट यांनी पुरस्कृत केलेले/स्वतंत्र उमेदवार) महानगरपालिका क्षेत्रामधील प्रभाग क्रमांक ----------/जागा क्रमांक ---------- मधून सदस्य म्हणून निवडून आले आहेत.

ठिकाण : ----------

दिनांक : ----------

(----------)
निवडणूक निर्णय अधिकारी
----------महानगरपालिका

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.०२/सं.कक्ष
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दि.१४ डिसेंबर, २०१६

राज्य निवडणूक आयोगाने नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया संगणक प्रणालीमार्फत राबविण्याचे आदेश दिलेले आहेत. नगर परिषदा/ नगर पंचायतींच्या पहिल्या टप्प्यातील निवडणुकीच्या वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आले की, सदर नगरपालिकांनी व तेथील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदानाचा तपशील तसेच मतमोजणीचा तपशील संगणक प्रणालीत भरलेला नाही. निवडणूक निर्णय अधिकारी हे मतमोजणी पूर्ण करुन सदर निकाल घोषित करतात व विजयी उमेदवारास प्रमाणपत्र वाटप करतात. संगणक प्रणालीमध्ये तपशील भरण्याकडे दुर्लक्ष करतात. वेळेवर मतमोजणीचा तपशील न भरल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर अद्यापपर्यंत निवडून आलेल्या उमेदवारांचा तपशील दिसू शकलेला नाही.

आयोगाने सर्व १६४ नगरपालिकांची मतमोजणीची माहिती पारंपरिक पध्दतीने जमा करता करता ८ दिवसाचा कालावधी लागला. विशेष म्हणजे मतमोजणीच्या दिवशी आयोगाकडे माहिती उपलब्ध होत नव्हती; मात्र पत्रकार, टि.व्ही. चॅन्सल यांना ताबडतोब माहिती उपलब्ध होत होती.

नगरपालिकांच्या दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे,

५७६

-: आदेश :-

१. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतमोजणीची फेरी करत उमेदवार निहाय फेऱ्या निहाय मतांची माहिती प्रथम लेखी स्वरुपात नोंदवून घ्यावी व त्यांच्या बेरीजेची पडताळणी करावी.

२. सदर मतमोजणीची आकडेवारी नंतर संगणक प्रणालीतच उमेदवार निहाय भरावी.

३. जागानिहाय संपूर्ण माहिती भरुन झाल्यावर, विजयी उमेदवारांचे प्रमाणपत्र संगणक प्रणालीतून डाऊनलोड करुन घ्यावे.

४. सदर डाऊनलोड केलेल्या प्रमाणपत्राची मूळ रंगीत प्रत (Colour Print) काढावी. सदर (सदर प्रमाणपत्रामध्ये विजयी उमेदवाराचे नाव, प्रभाग क्रमांक, जागा क्रमांक इ. तपशिल तपासून घ्यावा.)

५. सदर प्रत (Colour Print) काढल्यानंतरच निकाल घोषित करावा व प्रमाणपत्राचे वितरण करावे.

प्रभागांच्या जागांसाठी फक्त वरील कार्यपध्दतीचा अवलंब करावा. प्रथम माहिती संगणक प्रणालीतच भरावी व कोणत्याही परिस्थितीत प्रमाणपत्र संगणक प्रणालीतून डाऊनलोड केल्याशिवाय अधिकृत निकाल जाहिर करु नये, याची सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनो नोंद घ्यावी.

जे निवडणूक निर्णय अधिकारी सदर आदेशाचे पालन करणार नाहीत, त्यांच्याविरुध्द आयोगाचे आदेशाचे पालन न करणे या कारणाकरिता उचित कारवाई करण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

१४/१२/१५

(अविनाश सणस)
प्रभारी उपायुक्त
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १.विभागीय आयुक्त (सर्व) २. जिल्हाधिकारी (संबंधित)
३. मा. आयुक्त व सचिव यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
५.आयोगातील सर्व कार्यासन
७.निवड नस्ती

D/Compute desk/Computerization/Kuche

५७७

निवडणूकीसंबंधी गुन्हयात तातडीने
आरोपपत्र दाखल करण्याबाबत

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

परिपत्रक क्र. रानिआ/मनपा २००५/प्र.क्र. १४/का.०५
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १२/०४/२००५

परिपत्रक

नुकत्याच पार पडलेल्या २ महानगरपालिकांच्या, ५ नगरपरिषदांच्या व १५९२ ग्रामपंचायतींच्या निवडणूकीच्या वेळी असे स्पष्ट झाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये अतिशय चुरस असते. या चुरसीचे पर्यावसन निवडणूक विषयक गुन्हयांमध्ये बरेचदा होते. यामध्ये प्रतिस्पर्धी उमेदवारांना आणि त्यांच्या समर्थकांना धमकावणे, त्यांना मारहाण करणे, त्यांच्या प्रचार साहित्याची नासधूस करणे, असे गुन्हे असतात. नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकांमध्ये एका समर्थकांचा खून देखील झाला. ही गुन्हेगारी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी वेळीच कार्यवाही करणे आवश्यक आहे. पोलिसांनी वेळीच कार्यवाही केल्यास गुन्हेगाराला जरब बसून गुन्हयांचे प्रमाण कमी होते व निवडणूका शांततेत पार पडण्यास मदत होते.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका शांततेत पार पाडण्यासाठी व त्यामध्ये हिंसाचार होवू नये यासाठी पोलिसांनी गुन्हयाची नोंद तात्काळ घ्यावी व अशा गुन्हयांमुळे ज्या अधिनियमांचा भंग झाला असेल, उदाहरणार्थ, मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायदा, भारतीय दंड संहिता अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांविषयक अधिनियम व त्या खालील नियमान्वये गुन्हे नोंदवावे. तसेच निवडणूकीच्या दिवशी घडणाऱ्या गुन्हयांबाबत देखील संबंधित अधिनियमाखाली तात्काळ कारवाई करावी. या गुन्हयांमध्ये बोगस मतदान करणे, मतदाराची ओळख पटविण्यासाठी बनावट कागदपत्रांचा

वापर करणे, मतदानाच्या दिवशी गोंधळ करणे, दंगल करणे किंवा जाहिर प्रचाराचा कालावधी संपला तरी जाहिर प्रचार चालू ठेवणे इत्यादी गुन्हा नोंदविल्यानंतर शक्यतो ३ महिन्यांच्या आत त्या गुन्ह्याची चौकशी करुन, संबंधित न्यायालयात गुन्हा दाखल होईल यासाठी प्रयत्न करावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमधील हिंसाचार कमी होण्यासाठी गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून, पोलिसांनी त्यावर कार्यवाही करणे व गुन्ह्या संबंधी आरोपपत्र संबंधित न्यायालयात तातडीने दाखल होणे, ही कार्यवाही अतिशय आवश्यक आहे. अन्यथा, जर वेळेवर कार्यवाही झाली नाही तर हिंसाचाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. पोलिस महासंचालक, मुंबई
६. सर्व पोलिस महानिरिक्षक
७. सर्व पोलिस कमिशनर
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक
१२. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती
१३. राज्य निवडणूक आयोगामधील सर्व अधिकारी
१४. निवड नस्ती

\\Zp\d\mtdzp\11.4.5mtd1.doc\zp

५५८

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र,
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.२५/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ११ ऑगस्ट, २००५.

प रि प त्र क

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-एसईसी/जीईएन-२००२/प्र.क्र.८५/का-५, दिनांक-१५ मार्च, २००४ अन्वये महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी प्रत्येक उमेदवाराने दयावयाचे प्रतिज्ञापत्र व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी प्रत्येक उमेदवाराने दयावयाचे घोषणापत्र विहित करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, उमेदवार प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात संपूर्ण माहिती देतातच असे नाही. कधीतरी तर चुकीची माहितीसुध्दा देण्यात येते. निवडणुका झाल्यानंतर किंवा नामनिर्देशनपत्रांचा स्वीकार झाल्यानंतर असे लक्षात आले की, त्यांनी प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात अपूर्ण माहिती अथवा चुकीची माहिती दिली आहे, त्या उमेदवाराविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम १७१जी (निवडणुकीसंदर्भात खोटी माहिती देणे), कलम १७७ (कोणत्याही प्राधिकृत अधिका-यास खोटी माहिती देणे) व कलम १८१ (शपथेवर खोटी माहिती देणे) या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात यावा.

विशेषतः गुन्हेगारी पार्श्वभूमीबद्दल जी माहिती देण्यात येते त्यामध्ये बऱ्याचदा असे आढळून येते की, पूर्ण माहिती दिली जात नाही किंवा माहिती लपविण्यात येते. उमेदवाराच्या नांवावर दाखल असलेले दखलपात्र गुन्हे नमूद न करण्याकडे उमेदवारांचा कल असतो. अशा बाबतीत गुन्हा न चुकता दाखल करावा.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) सर्व महानगरपालिका आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

C:\Documents and Settings\PATIL\My Documents\babu\s.doc

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने द्यावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/मनपा २००७/प्र.क्र.३/का.०५
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१३.

परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र. रानिआ / मनपा-२००५ / प्र.क्र.२५ / का.५, दि. ११ ऑगस्ट, २००५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांनी प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात अपूर्ण अथवा चुकीची माहिती दिली तर त्या उमेदवाराविरुध्द भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमाखाली गुन्हा दाखल करण्यासंबंधी सूचना दिल्या आहेत.

उमेदवाराने जाहीर केलेल्या संपत्तीची बाजारभावानुसार नेमकी किंमत काय आहे हे माहित नसल्यामुळे काही प्रकरणी उमेदवारावर विनाकारण गुन्हा दाखल केला जाण्याची शक्यता विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्रमांक रानिआ/मनपा-२००७/ प्र.क्र.३/का.५, दि. १७ मे, २००७ अन्वये उमेदवाराने प्रतिज्ञापत्रात संपत्ती कमी दाखविल्याबद्दल किंवा संपत्तीबद्दल काही तक्रारी असल्यास अशा प्रकरणी त्या उमेदवारावर गुन्हा दाखल करण्यापूर्वी ते प्रकरण संपूर्ण वस्तुस्थितीसह राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवून त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे निदेश प्राप्त करुन घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सरसकट सर्व प्रकरणे राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविली जातात. यामुळे गुन्हे दाखल करण्याप्रकरणी विनाकारण विलंब होतो.

५८२

राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ / मनपा-२००७/ प्र.क्र.३/का.५, दि. १७ मे, २००७ चे परिपत्रक रद्द करण्यात येत असून यासंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

उमेदवाराने शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चूकीची माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास अशा उमेदवाराविरुध्द आयोगाच्या उपरोक्त दि.११/०८/२००५ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र संपत्तीबाबत चूकीची माहिती दिल्याबाबतच्या प्रकरणांमध्ये उमेदवाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यापूर्वी त्याने अशी माहिती हेतुपुरस्सररित्या चूकीची दिली असल्याबाबत खात्री करून घेण्यात यावी.

शपथपत्रामध्ये चुकीची माहिती देणाऱ्या उमेदवारांविरुध्द आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती या परिपत्रकासोबतच्या प्रपत्रात भरुन ती या कार्यालयास सादर करण्यात यावी. महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्तांनी व इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आयोगास सादर करावी. तसेच यापुढे ३१ डिसेंबर अखेर, ३१ मार्च अखेर, ३० जून अखेर तसेच ३० सप्टेंबर अखेरची त्रैमासिक माहिती त्या पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत सोबतच्या विहित प्रपत्रात या कार्यालयास सादर करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

भा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(वि. मा. पानसरे)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व नगरपरिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.३/का-५, दिनांक- २० फेब्रुवारी, २०१३ सोबतचे प्रपत्र

दि.:_____पर्यंतचा तिमाही अहवाल

_____महानगरपालिका / जिल्हाधिकारी

अ.क्र.	स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव	उमेदवाराचे नांव	प्रभाग क्रमांक/निवडणूक विभाग/निर्वाचक गण नाव व क्रमांक	शपथपत्र सादर केल्याचा दिनांक	मतदानाचा दिनांक	तक्रारदाराचे नांव	केलेल्या कार्यवाहीचा तपशील (खटला दाखल करण्यात आला असल्यास त्याबाबतचा तपशील)

दि.:_____

_____महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी

५८५

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा/२००५/प्र.क्र.३६/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २० डिसेंबर, २००५.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी

विषय:- व्हिडिओ कॅसेटसची विल्हेवाट लावण्याबाबत...

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकीमध्ये आचारसंहितेचे पालन काटेकोरपणे होते की नाही हे तपासण्यासाठी उमेदवारांच्या सभा किंवा उमेदवारांच्या मिरवणुका किंवा निवडणूक निर्णय अधिका-यांच्या कार्यालयांत घडणा-या निवडणूक विषयक सर्व कार्यवाहीचेदेखील व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येते. हे व्हिडिओ चित्रीकरण केल्यानंतर त्या सर्व व्हिडिओ कॅसेटस नंतर कार्यालयांत पडून असतात. त्याची विल्हेवाट कशी लावावी असा प्रश्न काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिका-यांनी उपस्थित केला आहे. या व्हिडिओ कॅसेटसची विल्हेवाट लावण्याबद्दल राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे सूचना देत आहे:-

(१) व्हिडिओ कॅसेटस निवडणुका झाल्यानंतर सहा महिन्यांपर्यंत सांभाळून ठेवण्यात याव्यात.

(२) निवडणुकीनंतर सहा महिन्यांचा कालावधी पार पडल्यानंतर ज्या प्रभागाबाबत निवडणूक याचिका प्रलंबित नसेल तेथील व्हिडिओ कॅसेटस पुसून (Erase) पुन्हा उपयोगात आणावी किंवा त्याची विक्री करण्यात यावी.

(३) ज्या व्हिडिओ कॅसेटस पुसून पुन्हा वापरण्याजोग्या नसतील त्या मोडण्यात (Crushed) याव्यात.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(महेन्द्र ब. बारभुवन)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

A:\nabto.doc

५८७

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २ ऑगस्ट, २००६.

परिपत्रक

भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के अन्वये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाली आहे. त्या अनुच्छेदांतर्गत सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ झेडए अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२४ अन्वये भारत निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. अनुच्छेद ३२४ व अनुच्छेद २४३ के मध्ये केवळ तीन फरक आहेत व त्यातील पहिला फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाकडून राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, संसदेची दोन्ही सभागृहे व राज्य विधानमंडळे यांच्या निवडणुका घेण्यात येतात तर राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका घेण्यात येतात. दुसरा फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते. राज्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते. तिसरा फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाला जे अधिकारी/कर्मचारी लागतात ते राष्ट्रपती उपलब्ध करुन देतात. राज्य निवडणूक आयोगाला जे अधिकारी/कर्मचारी लागतात ते राज्याचे राज्यपाल उपलब्ध करुन देतात. हे तीन फरक सोडल्यास या दोन्ही अनुच्छेदांमध्ये काहीही फरक नाही.

२. भारत निवडणूक आयोगाने भारत सरकार व इतर शासन यांच्याविरुध्द १९९३ साली एक रिट याचिका दाखल केली होती. (रिट याचिका क्रमांक-६०६/१९९३) या याचिकेमध्ये भारत निवडणूक आयोगाला विधानसभा व लोकसभा निवडणुकीत जे अधिकारी व कर्मचारी निवडणुकीचे काम करीत असतात, त्यांच्याविरुध्द कामात निष्काळजीपणा दाखविल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत की नाही असा मुद्दा उपस्थित झाला होता. सुरुवातीला केंद्र शासनाने व इतर राज्य शासनाने अशी भूमिका घेतली होती की, निवडणुकीत काम करणारे अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार केंद्र शासनातील अधिकारी व कर्मचा-यांच्याबाबतीत केंद्र शासनाला व राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्याबाबतीत राज्य शासनाला आहेत. केंद्र व राज्य शासन या भूमिकेविरुध्द भारत निवडणूक आयोगाने ही रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेत दिनांक-२६ जुलै, २००० रोजी भारत निवडणूक आयोग, केंद्र शासन व इतर राज्य शासन यांच्यामध्ये एक करार झाला. हा करार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद करण्यात आला आहे. या करारान्वये भारत निवडणूक

आयोगाला निवडणुकीत काम करणारे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी जे निवडणुकीच्या कामासाठी नेमलेले असतात त्यांच्याविरुध्द पुढील कारवाई करण्याचे अधिकार आहेत:-

(१) निवडणुकीसाठी नेमलेले कोणतेही अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा त्यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल निलंबित करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत.

(२) कोणतेही अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्याऐवजी दुसरा योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करणे व त्या व्यक्तींच्या जागी दुस-या अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली असेल त्याला त्याच्या मूळ विभागात परत पाठविणे व त्यासोबत त्यांच्या वागणुकीबद्दल योग्य तो अहवालसुध्दा पाठविणे.

(३) सक्षम प्राधिका-यास एखादा अधिकारी किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल त्याने वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा दिलेल्या निवडणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल शिफारस करणे. अशा शिफारशीवर शिस्तभंगाची कारवाई करणा-या अधिका-याकडून तात्काळ कार्यवाही होईल आणि निवडणूक आयोगास अशी कारवाई केल्याची माहिती शिफारस केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत कळविण्यात येईल.

३. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद केलेल्या करारात केंद्र शासन व इतर राज्यांसोबत महाराष्ट्र शासनसुध्दा पक्षकार होते व त्यांनी या कराराप्रमाणे कार्यवाही करण्याचे मान्य केले आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२४ व २४३ झेड(ए) यांच्यामध्ये निवडणुकीच्या बाबतीत फरक नसल्याने हा करार राज्य निवडणूक आयोगातर्फे घेण्यात येणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी तसेच पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्या बाबतीतही लागू होतो. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगास पुढीलप्रमाणे अधिकार प्राप्त आहेत:-

(१) निवडणुकीसाठी नेमलेले कोणतेही राज्य शासनाचे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा त्यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल निलंबित करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहेत.

(२) कोणतेही राज्य शासनाचे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्याऐवजी दुसरा योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करणे व त्या व्यक्तींच्या जागी दुस-या अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली असेल त्याला त्याच्या मूळ विभागात परत पाठविणे व त्यासोबत त्यांच्या वागणुकीबद्दल योग्य तो अहवालसुध्दा पाठविणे.

(३) सक्षम प्राधिका-यास एखादा अधिकारी किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल त्याने वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा दिलेल्या निवडणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल शिफारस करणे. अशा शिफारशीवर शिस्तभंगाची कारवाई करणा-या अधिका-याकडून तात्काळ कार्यवाही होईल आणि निवडणूक आयोगास अशी कारवाई केल्याची माहिती शिफारस केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत कळविण्यात येईल.

४. निवडणुकीचे काम प्रभाग रचनेपासून सुरु होते. निवडणुकीच्या कामात प्रभाग रचना करणे, मतदार याद्या तयार करणे, मतपत्रिका छापणे, निवडणुकीच्यावेळी मतदान यंत्र अथवा मतपेटया तयार करणे, मतदान यंत्रे अथवा मतपेटया सील करणे, निवडणुकीचे साहित्य विकत घेणे, त्यांचे वाटप करणे, मतदानाच्या दिवशी प्रत्यक्ष काम करणे, मतमोजणी करणे, निवडणुकीनंतर कागदपत्रे, मतपेटया व मतदान यंत्रे हे अधिनियमातील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाच्या अनुषंगिक आदेशानुसार व्यवस्थित ठेवणे, निवडणुकीच्या सर्व कामांची सुरक्षा ठेवणे इत्यादी कामांचा समावेश होतो. या सर्व कामात सहभागी असणारे अधिकारी/कर्मचारी तसेच निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून नेमलेले अधिकारी व पोलिस अधिकारी/पोलिस कर्मचारी यांनी हलगर्जीपणा दाखविल्याबाबत किंवा वरिष्ठांचे आदेश न पाळल्याबाबत परिच्छेद-३ प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतील.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रत:-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२) सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
३) सर्व विभागीय आयुक्त
४) पोलिस महासंचालक, मुंबई
५) सर्व महानगरपालिका आयुक्त
६) सर्व पोलिस आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व पोलिस अधिक्षक
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) सर्व गट विकास अधिकारी
११) सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायती
१२) सर्व तहसिलदार
१३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab-action.doc

निवडणूकविषयक गुन्हे

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र. १०/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १४ मार्च, २००७.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये व पोटनिवडणुकांमध्ये समाजातील निरनिराळ्या व्यक्तींविरुध्द अनेक प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात येतात. त्यांमध्ये प्रामुख्याने आचारसंहिता भंगाच्या गुन्ह्यांचा समावेश असतो. त्याव्यतिरिक्त मतदान केंद्र ताब्यात घेणे, मतदान साहित्याची नासधूस करणे, मतदान अधिकाऱ्यांशी असभ्य व्यवहार करणे, त्यांना मारहाण करणे, समाजातील वेगवेगळ्या घटकांमध्ये वैर पसरविणे, राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे वक्तव्य अथवा लिखाण करणे, मतदानासाठी लाच देणे, निवडणुकीत दबाव टाकणे, दुसऱ्याच्या नांवाने मतदान करणे, निवडणुकीसंदर्भात बेकायदेशीर देयके देणे, निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब न देणे, लोकांमध्ये भ्रम निर्माण होईल असे निवेदन करणे व इतर प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश असतो. अशा प्रकारच्या गुन्ह्यांबाबत पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधित व्यक्तींविरुध्द न्यायालयात दावा दाखल करण्यात यावयास हवा. परंतु, बऱ्याचदा राज्य शासनाच्या परवानगीने असा दावा किंवा नोंदविलेला गुन्हा मागे घेण्यात येतो.

२. असा दावा किंवा गुन्हा मागे घेतल्याने निवडणुकीमध्ये काहीही केले तरी चालते, असा लोकांमध्ये समज पसरु शकतो. असा समज लोकांमध्ये पसरणे म्हणजे निवडणुकीचे महत्व कमी करण्यासारखे आहे. पर्यायाने लोकशाहीची ती एक प्रकारची

थट्टाच आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए खाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. भारतीय संविधानाच्या या अनुच्छेदांखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्र, निष्पक्ष वातावरणात व पारदर्शीपणे पार पाडाव्यात यासाठी राज्य निवडणूक आयुक्त या नात्याने असे आदेश देत आहे की, असा दावा किंवा गुन्हा मागे घेताना राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ।
२) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) महासंचालक, पोलिस, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व महानगरपालिका आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व पोलिस आयुक्त
९) सर्व पोलिस अधिक्षक,
१०) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
११) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-मनप-२००७/प्र.क्र.१८/का-५
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ७ एप्रिल, २००७.

आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रमाच्या कालावधीत विविध राजकीय पक्ष, आघाडया व निवडणूक लढविणारे उमेदवार यांच्याकडून आचारसंहितेची अंमलबजावणी योग्य रितीने करण्यात येते की नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित क्षेत्रामध्ये निवडणूकविषयक कार्यवाहीचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे. अशा व्हिडिओ चित्रीकरणाच्या चित्रफितीची तपासणी किंवा चित्रफितीच्या प्रमाणित प्रतीची मागणी संबंधित उमेदवारांकडून अनेकदा होत असते. अशा मागणीसंदर्भात व्हिडिओ चित्रफितीची (सीडी) तपासणी करणे अर्जदारांना उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरविली आहेत :-

(१) संबंधित व्हिडिओ चित्रफितीच्या तपासणीसाठी लेखी अर्ज करण्यात यावा. अर्जामध्ये, ज्या निवडणुकीसंबंधी सीडी पहावयाची असेल त्या निवडणुकीच्या दिनांकासहित संपूर्ण माहिती देण्यात यावी. पडताळणीसाठी दर तासाला रुपये २५/- याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. अर्ज केल्याच्या तारखेच्या लगतच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर पडताळणी करता येईल. संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात चित्रफित तपासणीसाठी उपलब्ध असेल. जर चित्रफितीची तपासणी तात्काळ करावयाची असेल तर पडताळणी शुल्क दर तासाला रुपये ५०/- याप्रमाणे अदा करावे लागेल.

(२) व्हिडिओ चित्रीकरणाची प्रमाणित सीडी हवी असल्यास वरील १ येथे नमूद केल्याप्रमाणे अर्जात संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे व त्याकरिता अर्जाचे शुल्क रुपये २५०/- (एका चित्रफितीसाठी) एवढे असेल.

(३) अर्जदारास व्हिडिओ चित्रीकरणाच्या तपासणीसाठी/ चित्रीकरणाची चित्रफित मागण्यासाठी स्पष्ट व निश्चित कारण देणे आवश्यक असेल व अर्जदाराचा त्या व्हिडिओ चित्रीकरणाशी व्यक्तिश: संबंध कसा आहे, हे दाखविणे आवश्यक असेल.

(४) शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयीन कामकाजासाठी जर व्हिडिओ चित्रफित आवश्यक असेल व अर्जात तसे नमूद केले असेल तर त्याकरिता शुल्क आकारण्यात येणार नाही.

(५) व्हिडिओ चित्रीकरणातील कोणत्याही सत्यतेबाबत आयोग कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही. चित्रफित (सीडी) "जसे आहे तसे" या तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

(६) व्हिडिओ चित्रीफितीसाठी (सीडी) प्राप्त झालेल्या अर्जाबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून सर्व संबंधित राजकीय पक्षांना आणि निवडणूक लढविलेल्या उमेदवारांना अवगत करण्यात येईल.

(७) व्हिडिओ चित्रफितीच्या तपासणीसाठी किंवा प्रमाणित प्रतीसाठी करण्यात येणाऱ्या अर्जाची, माहितीच्या अधिकारान्वये करण्यात येणाऱ्या अर्जाशी सांगड घालू नये. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ अन्वये, केवळ अशी माहिती अर्जदारांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे की जी राज्य विधी मंडळाला देण्यास नकार देता येणार नाही. परंतु, राज्य निवडणूक आयोग सांविधानिक संस्था असल्यामुळे व राज्य विधान मंडळात राज्य निवडणूक आयोगाबद्दल प्रश्न विचारले जात नाही म्हणून कामकाजासंबंधी कुठलीही माहिती राज्य विधान मंडळाला देणे आयोगावर बंधनकारक नाही. राज्य निवडणूक आयोग याला नियमानुसार तपासून जे योग्य वाटेल अशा एखादया प्रकरणाबाबतची/प्रकरणांबाबतची माहिती अर्जदाराला/अर्जदारांना पुरविण्यास नकार देऊ शकेल.

(८) चित्रफितीसाठी तसेच चित्रफितीच्या तपासणीसाठी देण्यात आलेली शुल्काची रक्कम त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वतःच्या संबंधित लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक असेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(पी. एस. मीना)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

५८५

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र. ६/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १० एप्रिल, २००७.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निवडणुकीच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये होणाऱ्या कार्यवाहीची माहिती आधी मिळावी यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी यांच्यावर दबाव आणण्यात येतो. काही वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विशिष्ट पक्षाला अथवा गटाला रुचेल असाच निर्णय दयावा यासाठीही दबाव आणण्यात येतो. दबाव आणणाऱ्यांमध्ये निवडणूक लढविणारे उमेदवार, पक्षाचे पदाधिकारी, उमेदवारांचे प्रतिनिधी, खासदार, आमदार आणि इतर वरिष्ठ पदाधिकारी यांचाही समावेश असू शकतो.

२. नामनिर्देशनपत्रांची छाननी, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया व निवडणुकीचा निकाल यावेळी तर दबाव फार जास्त असतो. तसेच प्रभाग रचना सुरु असताना प्रभाग रचना कशी होणार आहे याची माहिती आधी प्राप्त होण्यासाठीही दबाव आणण्यात येतो. अशा दबावाला बळी पडल्यास निवडणूक प्रक्रिया स्वच्छ, मोकळ्या, स्वतंत्र आणि मार्गदर्शक वातावरणात पार पडणार नाही. येथे स्पष्ट करण्यात येते की, निवडणूक कार्यात हस्तक्षेप करण्याचे कोणालाही विशेष अधिकार नाही.

३. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए खाली प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन असे आदेश देत आहे की, निवडणूक प्रक्रियेदरम्यान अथवा प्रभाग रचने काम सुरु असताना कोणत्याही व्यक्तीने किंवा प्रस्तावित उमेदवार अथवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा पक्षाच्या पदाधिकाऱ्याने अथवा आमदार, खासदार यापैकी कोणीही निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी यांचेवर दबाव आणल्यास त्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाला सत्वर दयावी व अशा दबावाला बळी न पडता स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार/राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab121.noc

५९७

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००८/प्र.क. ९/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ११ नोव्हेंबर, २००८.

आ दे श

सर्वोच्च न्यायालयाने दिनांक- ६ डिसेंबर, २००७ रोजी दिवाणी अर्ज क्रमांक-५६५९/२००७ यामध्ये दिलेल्या निर्णयास अनुसरुन राज्य निवडणूक आयोग असे आदेश काढीत आहे की, --

सर्वसाधारणपणे राज्य निवडणूक आयोगातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकीतील मतदान रविवारीच घेण्यात येते. काही प्रसंगी निवडणुकीतील मतदान रविवारी आयोजित करता येणे शक्य नसते, त्यावेळी त्या निवडणुकीतील मतदान रविवारशिवाय अन्य दिवशी घेण्यात येते. अशावेळी तो दिवस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात सुट्टीचा दिवस म्हणून घोषित करण्यात येतो. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार शाळेतील व महाविद्यालयातील शैक्षणिक कार्यात असलेल्या कर्मचारीवर्गाला निवडणुकीसंबंधी काम देताना ते काम सुट्टीचा दिवस किंवा ज्या दिवशी शैक्षणिक काम नसते अशा दिवशी देण्यात यावे.

ज्या दिवशी मतदान अधिकारी/कर्मचारी सर्व मतदान साहित्य घेऊन मतदान केंद्राचा ताबा घेतात त्या दिवशी संबंधित स्थानिक स्वराजय संस्थेच्या हद्दीतील शाळांना सुट्टी असणे आवश्यक आहे. तसेच मतदानाच्या दिवशीसुध्दा शाळांना सुट्टी राहील, याची खात्री करण्यात यावी. तसेच शिक्षकांची ज्यावेळी मतदान अधिकारी म्हणून

नेमणूक करण्यात येते त्यावेळी त्यांच्यासाठी आयोजित करण्यात येणारे प्रशिक्षण हेसुध्दा सुट्टीच्या दिवशीच घेण्यात यावे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(रचना नातू)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,

१) सर्व महानगरपालिका आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व तहसिलदार
४) सर्व नगर परिषदा/ नगर पंचायतींचे मुख्याधिकारी

प्रत:-

१) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सर्व विभागीय आयुक्त

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
आदेश क्रमांक - रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२३/का.५,
दिनांक- ११ डिसेंबर, २०११

आदेश

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए मधील तरतुदीन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार यादया तयार करण्याच्या कामाचे अधिक्षण, संचालन आणि नियंत्रण आणि अशा निवडणुकांचे आयोजन करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्यापूर्वी या संस्थांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. मात्र ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचारी वृंदाची सेवा अधिग्रहित करण्याबाबतच्या तरतुदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमांमध्ये करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन दिनांक २ मार्च, १९९५ च्या आदेशान्वये कर्मचा-यांच्या सेवा, निवडणुकीसाठी लागणा-या इमारती / जागा, वाहने अधिग्रहित करण्यासाठी आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशामध्ये कर्मचा-यांच्या सेवा अधिग्रहित करण्यासंदर्भातील तरतूद थोडक्यात पुढील प्रमाणे आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या संदर्भात संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी व इतर निवडणुकांच्या बाबतीत जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी विनंती केल्यानंतर राज्य शासनाचे विभाग / कार्यालय, स्थानिक प्राधिकरण, राज्य शासनाच्या मालकीचे अथवा नियंत्रणाखाली असलेली महामंडळे किंवा राज्य शासनाची कंपनी किंवा सब्सीडीअरी कंपनीकडून निवडणुकीच्या कामासाठी आवश्यक असलेला कर्मचारी वृंद उपलब्ध करुन दिला जाईल.

आदेशामध्ये पुढे अशीही तरतूद आहे की, उपरोक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास एक वर्षाच्या कालावधीपर्यंत कैदेची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा दिली जाईल.

२. राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त आदेशातील तरतुदी स्पष्ट आहेत. निवडणुकीच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आलेले अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व इतर कर्मचारी हे कोणत्याही कारणास्तव कामावर येत नसले किंवा कार्यालयात अनुपस्थित राहण्यास त्यांना परवानगी देण्यात आली असली तरीदेखील निवडणुकीच्या कामाच्या संदर्भात त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी त्यांनी पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. तसेच ही जबाबदारी पार पाडण्यात त्यांनी दिरंगाई अथवा जाणीवपूर्वक टाळाटाळ केली असता ते उपरोक्त आदेशानुसार शिक्षेस पात्र ठरतात. या व्यतिरिक्त त्यांच्याविरुध्द विभागीय कार्यवाहीही करण्यात येऊ शकते.

३. राज्य शासकीय अधिकारी व कर्मचा-यांच्या विविध संघटनांनी दिनांक १४ डिसेंबर, २०११ पासून बेमुदत संपावर जाण्याची नोटीस शासनास दिलेली आहे. आगामी काळात संपूर्ण राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. सध्या राज्यातील १९५ नगरपरिषद निवडणुकांची प्रक्रिया सुरु आहे. या निवडणुकांच्या कामासाठी मोठया प्रमाणावर अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या सेवा अधिग्रहित करण्यात आल्या आहेत किंवा येणार आहेत. वर नमूद केलेल्या परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी कोणतीही सबब न सांगता पार पाडणे आवश्यक आहे. या जबाबदारीतून त्यांना रजा, संप, इ. कोणत्याही कारणास्तव सूट दिली जाणार नाही. तसेच निवडणुकीच्या कामाची जबाबदारी पार पाडण्यात टाळाटाळ करणारे अधिकारी व कर्मचारी वर नमूद केल्याप्रमाणे फौजदारी व विभागीय कार्यवाही करण्यास पात्र ठरतील. या आदेशाची समज सर्व संबंधितांना करुन देण्यात यावी.

नीला सत्यनारायण
(नीला सत्यनारायण) ११/१२/११
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति :- सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त

D:\Bhakti\SEC order to all mun corp & collector

५०७

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.०३/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ३१/०१/२०१२

आदेश

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. या निवडणुकीमध्ये मतदान / मतमोजणी केंद्रावरील कर्मचा-यांना तसेच निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी / कर्मचा-यांना दयावयाचा भत्ता हा भारत निवडणूक आयोगाच्या प्रचलित दराप्रमाणे देण्यात यावा असे राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासाठी काढलेल्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आले आहे व त्यानुसार आतापर्यंत निवडणुकांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचा-यांना भत्त्याचे प्रदान करण्यात येत आहे. मात्र या संदर्भात आयोगाने आदेश निर्गमित केलेले नाहीत. त्यामुळे निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात येणा-या पोलिस अधिकारी व कर्मचा-यांना कोणत्या दराने भत्त्याचे प्रदान करण्यात यावे तसेच त्यासाठीच्या खर्चासाठी कोणत्या विभागाने निधी उपलब्ध करुन दयावा याबाबत आयोगाकडे विचारणा करण्यात येत आहे. सबब भारतीय संविधानातील उपरोक्त तरतुदी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमातील तरतुदीअन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन या प्रकरणी पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१. भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणा-या लोकसभा / विधानसभेच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकीच्या वेळी मतदान / मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना दयावयाच्या निवडणूक भत्त्याचे दर तसेच आहार भत्त्याचे दर वेळोवेळी शासनाच्या सामान्य प्रशासन

विभागाकडून निश्चित करण्यात येतात. त्याच दराने महानगरपालिका, नगरपरिषदा व नगर पंचायतींच्या निवडणुकांच्यावेळी निवडणूक भत्ता/आहार भत्त्यांचे प्रदान करण्यात यावे. यासाठी होणारा खर्च संबंधित महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायतींनी त्यांच्या निधीतून करावा.

२. जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या निवडणुकींवरील खर्च भागविण्यासाठी शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निधी उपलब्ध करून देण्यात येतो. त्यामुळे या निवडणुकांच्यावेळी मतदान /मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दयावयाच्या निवडणूक भत्ता/आहार भत्त्यासंदर्भात त्या विभागाने आदेश निर्गमित करावेत. सदरचे दर हे, सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येणाऱ्या लोकसभा / विधानसभेच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकीच्या वेळी मतदान / मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना दयावयाच्या निवडणूक भत्त्याच्या तसेच आहार भत्त्याच्या दराप्रमाणे असावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-

१. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ११/०२/२०१२.

वाचा:- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/
प्र.क्र.३/का-५, दिनांक- ३१/१/२०१२.

शु द्धी प त्र क

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान/मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना दयावयाच्या निवडणूक भत्ते व आहार भत्त्याच्या दरासंदर्भात दिनांक- ३१/१/२०१२ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यामधील पहिल्या परिच्छेदाखालील अनुक्रमांक-१ व अनुक्रमांक-२ वरील आदेशामध्ये **"निवडणुकीच्यावेळी मतदान/मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दयावयाच्या"** असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याऐवजी पुढीलप्रमाणे वाचण्यात यावे:-

"निवडणुकीच्यावेळी मतदान /मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना तसेच पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांना दयावयाच्या"

तसेच उपरोक्त दिनांक- ३१/१/२०१२ च्या आदेशामधील पहिल्या परिच्छेदाखाली पुढीलप्रमाणे अनुक्रमांक-३ समाविष्ट करण्यात आला आहे असे वाचण्यात यावे.

"अनुक्रमांक-३- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य शासनाच्या गृह विभागाने मुंबई पोलीस कायदा,१९५१ मधील तरतुदीनुसार विशेष पोलीस

अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यास अशा विशेष पोलीस अधिकाऱ्यांना मानधन मंजूर करण्यासंदर्भातील आदेश गृह विभागाने निर्गमित करावेत व त्यासाठी आवश्यक निधी त्या विभागाने उपलब्ध करून द्यावा."

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत:-

१. अपर मुख्य सचिव (गृह) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई (दिनांक-३१/१/२०१२ च्या आदेशाच्या प्रतीसह)
२. प्रधन सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सर्व महानगरपालिका आयुक्त
६. सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगर पंचायती

लोकसभा / विधानसभेच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकीच्या वेळी मतदान / मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना देण्यात यावयाच्या निवडणूक भत्त्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- टिडीए-१००९/प्र.क्र.३१०/०९/३३.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ८ एप्रिल २००९

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक-टिडीए-१०९६/१३५९/३३, दिनांक ८/४/१९९६
२) शासन निर्णय क्रमांक-टिडीए-१००४/३७६३/प्र.क्र.१४८/०४/३३, दिनांक १३/५/२००४
३) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४६४(आयएनएसटी)/२००९/ईपीएस, दिनांक ९/१/२००९
४) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४५८/४/९८/Vol-II/पीएलएन-१, दिनांक ८/१२/१९९८
५) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४६४/आयएनएसटी/२००८/ईपीएस, दिनांक १२/९/२००८
६) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४६४/आयएनएसटी/२००८/ईपीएस, दिनांक ५/१२/२००८

प्रस्तावना:- भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारितील लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक/पोट निवडणुकांच्या कामासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दयावयाच्या निवडणूक भत्त्याचे दर शासनाच्या दिनांक ८/४/१९९६ च्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निश्चित केलेले आहे. भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या पत्र क्रमांक ४६४/आयएनएसटी/२००९/ईपीएस, दिनांक ९/१/२००९ अन्वये हे दर सुधारीत करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. भारत निवडणूक आयोगाने सदर पत्रामधील निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करावयाच्या कर्मचाऱ्यांना दयावयाच्या निवडणूक भत्त्याचे किमान दर नमूद केले आहेत. आयोगाच्या सदर पत्रातील सूचनांना अनुसरुन राज्यातील लोकसभा / विधानसभा निवडणुकांच्या कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात येणाऱ्या निवडणूक कर्मचाऱ्यांना सुधारीत दराने निवडणूक भत्ता देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

(१) निवडणूक भत्ता

लोकसभा / विधानसभेच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकीच्या वेळी मतदान / मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना देण्यात यावयाच्या निवडणूक भत्त्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक टिडीए-१०९६/१३५९/३३, दिनांक ८/४/१९९६ तसेच शासन निर्णय क्रमांक टिडीए-१००४/३७६३/प्र.क्र.१४८/०४/३३, दिनांक १३/५/२००४ अधिक्रमीत करुन भारत निवडणूक आयोगाच्या

पत्र क्रमांक ४६.../आयोग/एसटी/२००९/ईपीएस, दिनांक २/१/२००९ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांना अनुसरुन महाराष्ट्र राज्यातील लोकसभा/विधानसभा निवडणुकांच्या मतदान/मतमोजणी कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे निवडणूक भत्ता मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

कालावधी	मतदान केंद्राध्यक्ष / मतमोजणी निरीक्षक (रुपयामध्ये)	मतदान अधिकारी / मतमोजणी सहायक (रुपयामध्ये)	चतुर्थश्रेणी कर्मचारी (रुपयामध्ये)
प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता	२५०/-	१५०/-	१००/-

प्रशिक्षणाकरीता उपस्थित राहणाऱ्या, मतदानाचे साहित्य ताब्यात घेणाऱ्या तसेच मतदान व मतमोजणीच्या दिवशी प्रत्यक्ष मतदान /मतमोजणी कर्तव्यार्थ उपस्थित राहणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वरील दराने निवडणूक भत्ता देय राहील.

क्षेत्रिय अधिकारी (Sector Officer) तसेच क्षेत्रिय दंडाधिकारी (Zonal Magistrate) यांना रु.८००/- या ठोक दराने (Lump Sum Rate) निवडणूक भत्ता अनुज्ञेय राहील.

मतदान / मतमोजणीच्या भत्याचे वाटप करणाऱ्या, तत्संबंधी वेतन पावती नोंदवहीचे काम करणाऱ्या लेखा कर्मचाऱ्यांना मतदान अधिकारी/मतमोजणी सहायकांना अनुज्ञेय असलेल्या भत्याच्या दराने ३ दिवसाचा भत्ता अनुज्ञेय असेल.

निवडणूकीसंबंधात काम देण्यात आलेल्या:-

(१) तलाठी/पटवारी/ग्रामसेवक हयांना मतदान केंद्राध्यक्षांना अनुज्ञेय असलेल्या दराने दोन दिवसांचा निवडणूक भत्ता देय राहील.

(२) पोलीस पाटील यांना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांकरीता अनुज्ञेय असलेल्या दराने दोन दिवसांचा निवडणूक भत्ता देय राहील.

(३) कोतवाल यांना चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांकरीता अनुज्ञेय असलेल्या दराने दोन दिवसांचा निवडणूक भत्ता देय राहील.

(२) आहार भत्ता

मतदान केंद्र/मतमोजणी केंद्रावर निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना भोजनाची पाकीटे आणि सौम्य अल्पोपहार (प्रती दिन प्रती व्यक्तीकरीता रु.१००/- या मर्यादेत) पुरविण्यात यावा किंवा तसे करणे शक्य नसल्यास प्रत्येक व्यक्तीकरीता प्रती दिन रु.१००/- या दराने आहार भत्ता रोखीने प्रदान करण्यात यावा.

मतदान/मतमोजणीच्या दिवशी निवडणूक कर्तव्य [illegible] करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी, गृहरक्षक दल, वनरक्षक, एनसीसी अधिकारी, एनसीसी (सीनिअर) कॅडेट, माजी सैनिक [illegible], माजी सैनिक, केंद्रीय निम लष्करी दल यांचे कर्मचारी/ अधिकारी यांनाही [illegible] व [illegible] देण्यात [illegible] पुरविण्यात यावा किंवा त्याऐवजी वरीलप्रमाणे रु.१००/- [illegible] आधार भत्ता [illegible] व [illegible] यावा

(३) निवडणूक कर्तव्यार्थ नेमण्यात आलेल्या [illegible] / [illegible] यांना निवडणूक भत्ता

मतदान/मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्याशी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी तसेच मतदान/मतमोजणी केंद्राच्या ठिकाणी प्रत्यक्ष कर्तव्यार्थ नियुक्त [illegible] पोलीस अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी, एनसीसी अधिकारी, माजी सैनिक [illegible] केंद्रीय निम लष्करी दल अधिकारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/मतमोजणी निरीक्षक यांना देण्यात [illegible] [illegible] अनुज्ञेय राहील. तसेच पोलीस कर्मचारी, एनसीसी (Senior) [illegible], [illegible] [illegible] गृह रक्षक दल यांच्या कर्मचाऱ्यांना मतदान अधिकारी/मतमोजणी [illegible] यांना देण्यात [illegible] निवडणूक भत्ता अनुज्ञेय राहील. या भत्त्या व्यतिरिक्त अन्य प्रवास [illegible] भत्ता देय [illegible] नाही.

उपरोक्त बाबींवर होणारा खर्च प्रकरणाकरिता "२०१५-निवडणुका, १०[illegible]-संसदेच्या निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च" किंवा "२०१५-निवडणुका, १०९-[illegible]/संघराज्य क्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च" किंवा "[illegible]-निवडणुका, १०४-लोकसभा व राज्यसंघराज्य क्षेत्र विधानसभा यांच्या [illegible] घेण्यात आलेल्या निवडणुकांचा खर्च" या लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४६/०९/सेवा-९, दिनांक ६ एप्रिल २००९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व [illegible],

(अ.ना. वळवी)
[illegible] सचिव व [illegible] मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र शासन

A.L.P.

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/बांद्रे
५. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,
६. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२६
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९. सर्व मंत्रालयीन विभाग
१०. मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
११. वित्त विभाग/व्यय-४/सेवा-६
१२. निवड नस्ती

* * * * * * * * * * * * *

महानगरपालिका आणि नगरपालिका/नगरपंचायती यांच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाच्या मानधनाबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२००६/५१२/प्र.क्र.८९/२००६/नवि-२०
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक:-१६ जुलै,२००७

वाचा:- शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२००६/५१२/प्र.क्र.८९/२००६/नवि-२०, दिनांक १० जानेवारी,२००७.

प्रस्तावना:- उपरोक्त शासन निर्णयाअन्वये महापालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकामध्ये काम करणा-या निवडणुक निर्णय अधिकारी व सहायक निवडणुक अधिकारी यांना द्यावयाच्या मानधनाबाबत आदेश काढले आहेत. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये कित्येक निवडणुक अधिकारी व सहायक निवडणुक निर्णय अधिकारी यांनी मानधनाबाबत नाराजी व्यक्त केली असून, मानधन घेण्यास नकार दिलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, राज्य शासन ज्याप्रमाणे विधानसभा निवडणुकीसाठी मानधन/परिश्रमीक/अतिकालीक भत्ता मंजूर करते त्याप्रमाणेच त्यांना मानधन देण्यात यावे. दिनांक १० जानेवारी,२००७ च्या शासन निर्णयामध्ये इतर काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाच्या परिश्रमीकाबद्दल काहीच उल्लेख केलेला नाही.

शासन निर्णय:- नागरी स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये काम करणाने निवडणुक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी इतर अधिकारी, कर्मचारी अतिकालीक भत्ता यांना खालीलप्रमाणे मानधन देण्यास शासन मंजूरी देत आहे.

१) सार्वत्रिक निवडणुकांसाठी:- महानगरपालिकांकरिता तसेच "अ", "ब" आणि "क" वर्ग नगरपरिषदा/नगरपंचायती यांचे निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी इतर अधिकारी यांना एक महिन्याचे मूळ वेतन अधिक ५० टक्के महागाई वेतन व कर्मचारी (अतिकालीक भत्ता) यांना कमाल मर्यादा एक महिन्याचे मूळ वेतन अधिक ५० टक्के महागाई वेतन एवढे मानधन मंजूर करण्यात यावे.

२) पोट निवडणुकांसाठी :- महानगरपालिका व "अ","ब" व "क" वर्ग नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या पोट निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी इतर अधिकारी यांना रुपये १५००/- व कर्मचारी

(अतिकालीक भत्ता) यांना कमाल मर्यादा रु.१५००/- प्रमाणे मानधन देण्यात यावे.

कर्मचा-यांचा दरताशी वेतनाचा अतिकालिक भत्ता ठरविताना प्रत्येक पूर्ण दिवसाला (अर्धा तास किंवा अध्या तासापेक्षा जास्त काम केले असेल तर तो पूर्ण दिवस धरण्यात येईल) मूळ वेतनाच्या प्रमाणात देण्यात यावे. दरताशी वेतनाचा दर ठरविताना महिना ३० दिवसांचा व दिवस ७ तासांचा समजण्यात यावा. चतुर्थश्रेणी वर्गाचे दैनंदिन कामाचे तास आठ तास समजण्यात यावेत.

हे आदेश दिनांक २२.९.२००६ पासून लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(मो. कृ. पुराडउपाध्ये)
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव.
प्रधान सचिव, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय भवन,मुंबई.
आयुक्त, सर्व महानगरपालिका.
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपालिका (सर्व),
संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-२५.
महालेखापाल (लेखा व परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
मुख्य लेखा परिक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा कोकण भवन, नवी-मुंबई.
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
सर्व सहसचिव/उपसचिव/अवरसचिव/कार्यासन अधिकारी.
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
निवडनस्ती (नवि-२०)

विधानसभा सार्वत्रिक निवडणुका-२००९
माहे ऑक्टोबर-२००९ मधील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांच्या कामासाठी नियुक्त केलेल्या विभागीय, जिल्हा व तहसिल पातळीवरील निवडणूक शाखेच्या अराजपत्रित कर्मचा-यांनी केलेल्या जादा कामासाठी अतिकालीक भत्ता देणेबाबत तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या (Sector officer) मानधनाबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : ईएसटी-१००९/प्र.क्र. १५३३/०९/३३
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक २९ एप्रिल २०११

शासन निर्णय :-

माहे ऑक्टोबर २००९ मध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणुका संबंधीचे काम ठराविक मुदतीत पार पाडण्यासाठी मंत्रालय विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवरील निवडणूक शाखांमध्ये काम करणा-या कर्मचारी वर्गाला सुट्टीच्या दिवसांसह प्रत्येक दिव जादा काम करावे लागले. त्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्तांची कार्यालये तसेच सर्व जिल्हाधिका-य निवडणूक कार्यालये, तहसिल कार्यालये, यामध्ये निवडणुकांचे काम करणा-या आणि निवडणूक निर्णय अधिकारी व सहा निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये यांमध्ये काम करणा-या अराजपत्रित कर्मचारी वर्गाला तसेच जिल्हा निवड अधिका-यांनी आपल्या जिल्हा आस्थपनेतून खास निवडणूकीच्या कामासाठी घेतलेल्या इतर कर्मचारी वर्गाला निम्नलिखि शर्तीच्या अधिनतेने, पुढील प्रमाणानुसार अतिकालीक भत्ता देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(१) अतिकालीक भत्याचा दर :-

कौणत्याही कामाच्या दिवशी केलेल्या जादा कामाच्या प्रत्येक पूर्ण तासाला (अर्धा तास किंवा अर्धा तासापेक्षा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल) प्रत्येक तासाच्या मूळ वेतनाच्या प्रमाणात देण्यात येईल.

टिप :-

तृतीय श्रेणी कर्मचा-यांना दर ताशी वेतनाचा दर ठरविण्यासाठी महिना ३० दिवसांचा आणि दिवस ७ तासांचा समजण येईल, चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाचे दैनंदिन कामाचे तास बृहन्मुंबईत ८ तास व इतर ठिकाणी ९ तास समजण्यात येतील.

शर्ती :-

१. अतिकालीक भत्ता माहे सप्टेंबर २००९ च्या ६ व्या वेतन आयोगानुसार देय मूळ वेतन + ग्रेड वेतन (Pay in Band+Grade Pay) प्रमाणात तासाच्या दराने दिला जाईल. तसेच दैनंदिन वेतनाचा दर काढताना, त्यामध्ये कुठल्याही भत्याचा (उदा. घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता इत्यादी) समावेश होणार नाही.

२. सर्वसाधारण कार्यालयीन वेळेपेक्षा जास्त काम केलेल्या कामासाठी अतिकालीक भत्ता अनुज्ञेय असेल आणि फक्त दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ ते दिनांक २६ ऑक्टोबर, २००९ (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीसाठी राहील.

३. उपरोक्त कालावधीतील सुट्टीच्या दिवशी केलेल्या निवडणुकासंबंधीच्या कोणत्याही कामासाठी अतिकालीक दिला जाईल.

(क्र. ना.

ROTA 1H 670 (A) (500-5-2011) 1
C/My document/vidhansabha 2009 GROT

४. मंत्रालय, विभागीय, जिल्हा व तहसिल पातळीवरील निवडणूक शाखेतील कर्मचा-यांना तसेच निवडणूकीसाठी नेमण्यात आलेल्या इतर संस्थातील कर्मचा-यांना वरील पध्दतीने अतिकालीक भत्ता देय राहील.

५. तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या अतिकालीक भत्याची कमाल मर्यादा यांच्या माहे सप्टेंबर २००९ च्या ६ व्या वेतन आयोगानुसार देय होणा-या मूळ वेतन + ग्रेड वेतन (Pay in Pay Band+Grade Pay)एवढी राहील. त्यामध्ये इतर कुठल्याही भत्याचा (उदा. घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता इत्यादी) समावेश होणार नाही.

६. जे कर्मचारी निवडणुकीच्या कामासाठी मुख्यालयाबाहेर प्रवास करतील त्यांना नियमानुसार मिळणा-या प्रवास/दैनिक भत्याव्यतिरिक्त अतिकालीक भत्ता देय नाही. या दोन्ही भत्यापैकी जो फायदेशीर असेल तो भत्ता घेण्याबाबत संबंधित कर्मचा-यांना पर्याय राहील.

२. क्षेत्रिय अधिका-यांना (Sector officer) सप्टेंबर २००९ च्या ६ व्या वेतन आयोगानुसार देय मूळ वेतन + ग्रेड वेतन (Pay in Pay Band+Grade Pay)या रकमेच्या ५०% रक्कम मानधन म्हणून देय राहील. त्यामध्ये इतर कुठल्याही भत्याचा (उदा. घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता इत्यादी) समावेश होणार नाही.

३. निवडणुकीचे काम ज्या राजपत्रित अधिका-यांच्या देखरेखीखाली पार पाडले जाते ते अधिकारी, अतिकालिक भत्यासाठी कर्मचारी वर्गाने केलेल्या जादा कामाचा दैनंदिन कालावधी दैनंदिन हजेरीपटाच्या आधारे प्रमाणित करतील.

४. निवडणुकीच्या कामासाठी दैनंदिन वेतनावर नेमलेल्या कर्मचारी वर्गाला अतिकालीक भत्ता देय नाही.

५. वरील बाबींवर होणारा खर्च प्रधानशीर्ष २०१५-निवडणुका, उपशीर्ष ००,१०६ राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, (००) (०१) राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, २०१५००६८, १३ कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखालील सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी या शासन निर्णयाच्या आधारे मानधनाची /अतिकालीक भत्याची परिगणना करून अनुदानाची स्वतंत्रपणे मागणी करावी.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२६/११/व्यय-४, दिनांक १०.०३.२०११ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(शंकर चन्ने)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा),महाराष्ट्र-२, नागपूर
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी
७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
८) वित्त विभाग/काया.सेवा-६, व्यय-४ ९) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन क्रमांक १९/२६)
१०) निवड नस्ती, कार्यासन क्रमांक ३३ (अर्थ संकल्प शाखा),

H 670 (9)-1 अ
C/My documents/vidhansabha 2009 GROT

- - - - -

६१३

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का.५.
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ नोव्हेंबर, २०११

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये किन्नरांकरिता प्रभाग आरक्षित करण्याबाबत...

महोदय/महोदया,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये किन्नरांकरिता स्वतंत्र प्रभाग आरक्षित ठेवण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे निवेदने प्राप्त होत आहेत. या संदर्भात नमूद करण्यात येते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये किन्नरांकरिता स्वतंत्र प्रभाग आरक्षित ठेवण्याबाबत संबंधित अधिनियमांमध्ये तरतूद नाही. तथापि, मतदारयादीमध्ये किन्नर असलेल्या मतदाराच्या नावासमोर जे लिंग नमूद केलेले असेल त्यानुसार त्यास संबंधित प्रभागातील आरक्षित किंवा खुल्या प्रभागातून निवडणूक लढविता येईल. तरी त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

D:\Rashmi\ward reservation for kinner.doc

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ज्येष्ठ नागरीक, अंध व अपंग मतदार तसेच गरोदर अथवा तान्हया मुलासह असणाऱ्या स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करु देण्याबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र. २०/का-५.
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ५ डिसेंबर, २०११.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढण्याकरिता तसेच मतदारांना जास्तीत जास्त सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता विविध पावले उचलली आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की वयोवृध्द व्यक्ती, अंध व अपंग मतदार, गरोदर स्त्रिया अथवा तान्हया मुलासह असणाऱ्या स्त्रिया यांना मतदानाची रांग लांब असल्यास मतदानासाठी त्या रांगेत उभे राहून बराच काळ प्रतिक्षा करावी लागते. यास्तव असे बरेच मतदार मतदानास जाणे टाळतात. पर्यायाने मतदानाची टक्केवारी घटते. अश्या मतदारांना मतदान करणे सोईचे व्हावे याकरिता पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे :-

(१) मतदान केंद्राबाहेर वयोवृध्द व्यक्ती, अंध व अपंग मतदार व त्याचा सोबंती, गरोदर स्त्रिया अथवा तान्हया मुलासह असणाऱ्या स्त्रिया मतदानाच्या रांगेत उभ्या असतील तर अश्या मतदारांना प्राधान्याने मतदान करण्याची संधी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांनी उपलब्ध करुन दयावी. ~~यासंदर्भात तशी स्पष्ट सूचना मतदान केंद्राबाहेर फलकावर लावण्यात यावी.~~

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

D:\DISK_VOL2 (D)\OLD COMPUTER DATA\CORPORATION\orders.doc

महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या कर्तव्यांवर असतांना जखमी झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना तसेच मृत झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या कुटुंबियाना सानुग्रह अनुदान देणेबाबत.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. २४/का-०६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक :- २८/११/२०१६.

आदेश

विषय :- महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकीच्यावेळी कर्तव्यावर असताना मृत पावलेल्या कर्मचा-यांच्या वारसांना,गंभीर जखमी/कायमचे अपंगत्व आलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत.

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक - रानिआ/जिपपंस/२००६/ प्र.क्र.२०/का-०७ दिनांक १०/०१/२०१२.

२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीईल-२०१४/प्र.क्र.६००/३३ दिनांक- ९ एप्रिल,२०१४

३. महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- ग्रापनि-२०१५/प्र.क्र.९६/ पंरा-२, दिनांक २० जून,२०१६ (प्रत संलग्न).

राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १०/०१/२०१२ च्या आदेशान्वये राज्यातील महानगरपालिका,नगरपरिषदा,नगरपंचायती,जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या निवडणुकीमध्ये कर्तव्यार्थ हजर असलेल्या कर्मचा-यांचा कर्तव्य कालावधीमध्ये मृत्यू झाल्यास अथवा कर्तव्य बजावत असताना त्याला ईजा पोहचल्यास खाली नमूद केल्याप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

अ. क्र.	तपशिल	सानुग्रह अनुदानाचे दर
१	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारस.	रु.०५,००,०००/-
२	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया,नक्षलवादयांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट,सुरुंग अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला (Road Mines,Bomb Blast,Armed Attac,etc.) यामध्ये मृत पावलेले अधिकारी /कर्मचारी यांचे वारस	रु.१०,००,०००/-
३	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी जसे हात/पाय/डोळा गमविणे.	रु.२,५०,०००/-
४	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया,नक्षलवादयांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट,सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला (Road Mines,Bomb Blast, Armed Attacks etc.) यात कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी. जसे हात/पाय/डोळा गमविणे.	रु.५,००,०००/-

२. महाराष्ट्र शासन, सामन्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांनी संदर्भिय क्रमांक २ येथील दिनांक ९ एप्रिल,२०१४ चे शासन निर्णयानुसार भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणा-या निवडणुकीच्या कर्तव्यावर असताना जखमी झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना व मृत झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांच्या कुटुंबयांना दयावयाच्या सानुग्रह अनुदानाबाबत व संदर्भीय क्रमांक ३ अन्वये ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन,मर्झबान पथ,मुंबई ४०० ००१ यांनी दिनांक २० जून,२०१६ चे शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत,जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या निवडणुकांच्या वेळी कर्तव्यावर असताना मृत पावलेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसांना,गंभीर जखमी/कायमचे अपंगत्व आलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत तरतुद केलेली आहे. त्याच धर्तीवर महानगरपालिका,नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या कर्तव्यावर असलेल्या कर्मचा-यांच्या संदर्भातील वाढीव दराने सानुग्रह अनुदान मंजूर करणे आवश्यक आहे असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

३. वरील परिस्थितीत राज्यातील महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकीमध्ये कर्तव्यार्थ हजर असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांचा कर्तव्य कालावधीमध्ये मृत्यू झल्यास त्याच्या वारसाला अथवा कर्तव्य बजावत असतांना अधिकारी/कर्मचा-यास ईजा पोहचल्यास त्यांना खाली नमूद केल्याप्रमाणे वाढीव दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे असे आदेशित करण्यात येत आहे.

अ.क्र.	तपशिल	सानुग्रह अनुदानाचे सुधारित दर
१	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारस.	रु.१०,००,०००/-
२	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया,नक्षलवादयांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट,सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला (Armed Attacks etc.) मृत पावलेले अधिकारी /कर्मचारी यांचे वारस	रु.२०,००,०००/-
३	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी (जसे हात/पाय/डोळा गमाविणे इ.)	रु.५,००,०००/-
४	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया,नक्षलवादयांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट,सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला (Road Mines,Bomb Blast, Armed Attacks etc.) यात कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी (जसे हात/पाय/डोळा गमाविणे इ.)	रु.१०,००,०००/-

४. राज्यातील महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांवरील खर्च हा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने करावयाचा असल्याने असे अनुदानाचे प्रस्ताव प्रकरणपरत्वे संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपंचायत यांनी मंजूर करावेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(एस.एम. चन्ने)

सचिव

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र.

प्रत :- १. सर्व विभागीय आयुक्त.

२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)

३. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा व नगरपंचायती.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१८ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २३/०१/२०१२

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई शहर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर क्षेत्रिय अधिकाऱ्याचे (झोनल ऑफिसर) काम सोपविण्याबाबत.

महोदय / महोदया,

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे. या निवडणुकांसाठी लागणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका यांना प्रदान करण्यात आले आहेत. या अधिकारांचा वापर करुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी आवश्यकतेनुसार शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची क्षेत्रिय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते. ही जबाबदारी सोपवितांना शासकीय अधिकाऱ्यांचा दर्जा विचारात घेतला जात नाही अशा आशयाच्या तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त झाल्या आहेत. विशेषत: काही कार्यकारी अभियंता या जिल्हास्तरीय पदधारकावर झोनल ऑफिसरची जबाबदारी सोपविण्यात आली आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. या संदर्भात नमूद करण्यात येते की, निवडणुकीची जबाबदारी सोपवितांना शक्य असेल तिथवर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा दर्जा विचारात घेतला जाणे आवश्यक असते.

निवडणुकीमध्ये क्षेत्रिय अधिकाऱ्यांवर असलेली कामांची जबाबदारी लक्षात घेता त्यांना सातत्याने सहायक निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या थेट नियंत्रणाखाली काम करावे लागते त्यामुळे या पदावर नियुक्त करण्यात येणारा अधिकारी हा सहायक निवडणूक

निर्णय अधिकाऱ्याच्या पदाच्या समकक्ष दर्जाचा किंवा त्याच्यापेक्ष कनिष्ठ दर्जाचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांना झोनल ऑफिसरचे काम देण्यात आले असल्यास त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात याव्यात व त्यांच्याऐवजी अन्य योग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ही जबाबदारी सोपविण्यात यावी तसेच यापुढेही झोनल ऑफिसरची जबाबदारी सोपवितांना उपरोक्त निकष विचारात घेण्यात यावेत असे आपणास मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

आपला,

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी घेणे, निष्कर्ष प्रसिध्द करण्याबाबतचे निर्बंध.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक- रानिआ/ मनपा/२०१२/प्र.क्र.१३/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २/०२/२०१२

आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए नुसार राज्यातील स्थानि स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संदर्भात अधीक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतची जबाबदारी रा निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषद पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्या राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे.

